शुक्रवार ५ सप्टेंबर २०२५
अकोला
पाने : ८ + ४
वर्ष : १९
अंक : १८४
स्वागत मूल्य ३ रुपये
www.ajinkyabharat.com

बातम्यांचा गतिमान पाठलाग
# अजिंक्य भारत





आज
शिक्षक दिन

## महत्त्वाचे

### ओबीसींवर अन्याय होऊ देणार नाही - पंकजा मुंडे



**मुंबई :** मराठा आरक्षणासाठी सुरू असलेल्या मनोज जरांगे पाटील यांच्या सातत्यपूर्ण लढ्याला यश आलं असून, मराठा समितीने हैदराबाद गॅझेट मान्य केल्याचं जाहीर केलं आहे. या घडामोडींवर राज्याच्या पर्यटनमंत्री पंकजा मुंडे यांनी आपली भूमिका मांडली. त्या म्हणाल्या की, आर्थिक मागासलेपण आणि सामाजिक मागासलेपण हे दोन वेगवेगळे मुद्दे आहेत. मला हे आधीपासूनच असं वाटत आलं आहे आणि पुढेही असंच वाटत राहील, यात कोणताही बदल होणार नाही. मराठा समाजासाठी शासनाने जीआर काढला असला तरी त्याचा परिणाम ओबीसी समाजावर होऊ नये, यासाठी स्वतंत्र समिती स्थापन करण्यात आली असल्याचे पर्यटनमंत्री पंकजा मुंडे यांनी स्पष्ट केले. या निर्णयामुळे कोणत्याही समाजावर अन्याय होऊ नये, असा सुवर्णमध्य राज्य सरकार काढेल अशी प्रार्थना आणि अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

### टॅरिफ वाढीला चोख प्रत्युत्तर -एकनाथ शिंदे

**मुंबई :** राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जे टॅरिफ लावलेलं आहे, त्यामुळे त्यांनाच नुकसान होणार आहे. कारण भारत ट्रम्प टॅरिफमुळे आत्मनिर्भरतेकडे जात आहे. जीएसटीच्या निर्णयामुळे भारत सक्षमतेकडे वाटचाल करत ट्रम्पच्या टॅरिफला नरेंद्र मोदी यांनी चोख प्रत्युत्तर दिल्याचे दिसून येत असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. मोदी सरकारने २१ ऑगस्ट रोजी झालेल्या मंत्रिगटाच्या बैठकीत जीएसटीचे दोन स्लॅब रद्द करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर बुधवारी (३ ऑगस्ट) जीएसटी परिषदेची ५६ वी बैठक नवी दिल्लीत पार पडली. या बैठकीमध्ये २२ सप्टेंबर २०२५ पासून हे बदल लागू करण्यासंदर्भात शिक्कामोर्तब करण्यात आले. यावरून एकनाथ शिंदे यांनी विरोधकांसह अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर निशाणा साधला.

### मुंबईत आंदोलनांना बंदी घाला - मिलिंद देवरा

**मुंबई :** गणेशोत्सवाच्या काळात मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे यांच्या नेतृत्वाखाली मुंबईत सलग पाच दिवस चाललेल्या आंदोलनाने दक्षिण मुंबईत वाहतूक कोंडी, कचरा संकट आणि गणेशभक्तांना नाहक गैरसोय झाली. आता या पार्श्वभूमीवर शिवसेना शिंदे गटाचे राज्यसभा खासदार मिलिंद देवरा यांनी ३ सप्टेंबर २०२५ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून दक्षिण मुंबईतील आंदोलने शहराबाहेर हलवण्याची मागणी केली आहे. आंदोलनांमुळे प्रशासकीय कामकाज थांबते, रस्ते बंद होतात आणि सामान्य नागरिकांना त्रास होतो. आंदोलनाचा अधिकार असला तरी, सामान्यांना होणारा त्रास टाळण्यासाठी दक्षिण मुंबईतील उच्च-सुरक्षा क्षेत्रातील आंदोलने शहराबाहेर हलवावीत, अशी मागणी देवरा यांनी केली आहे.

**एडीआरच्या अहवालातून आकडेवारी समोर : महाराष्ट्रातील ४१ पैकी २५ मंत्र्यांवर गुन्हे**

# देशातील ४७ टक्के मंत्र्यांवर गुन्हेगारीचे आरोप!

**नवी दिल्ली, दि. ४** वृत्तसंस्था

**देशातील जवळपास ४७ टक्के मंत्र्यांवर गुन्हेगारीचे खटले दाखल आहेत. यामध्ये खून, अपहरण आणि महिलांवरील गुन्हे यासारखे गंभीर आरोप देखील आहेत, असे असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स (एडीआर) च्या अहवालात समोर आले आहे.**

७२ केंद्रीय मंत्र्यांपैकी २९ मंत्र्यांनी (४० टक्के) त्यांच्या प्रतिज्ञापत्रात गुन्हेगारी खटले घोषित केले आहेत. तर महाराष्ट्रातील ४१ पैकी २५ मंत्र्यांवर गुन्हे आहेत. यापैकी १६ जणांवर गंभीर गुन्ह्याचे आरोप आहेत. तसेच अहवालानुसार देशातील ६४३ मंत्र्यांकडे २३ हजार ९२९ कोटी रुपयांची मालमत्ता असल्याचे समोर आले आहे. अहवालात एडीआरने मंत्र्यांच्या आर्थिक मालमत्तेचे विश्लेषण देखील केले आहे. त्यानुसार, मंत्र्यांची सरासरी मालमत्ता ३७.२१ कोटी रुपये आहे, तर सर्व ६४३ मंत्र्यांची एकूण मालमत्ता २३,९२९ कोटी रुपये आहे. ३० विधानसभांपैकी ११ विधानसभांमधील मंत्री अब्जाधीश आहेत. कर्नाटकमध्ये सर्वाधिक




आठ अब्जाधीश मंत्री आहेत, त्यानंतर आंध्र प्रदेशात सहा आणि महाराष्ट्रात चार मंत्री अब्जाधीश आहेत. अरुणाचल प्रदेश, दिल्ली, हरियाणा आणि तेलंगणामध्ये प्रत्येकी दोन, तर गुजरात, हिमाचल प्रदेश, मध्य प्रदेश आणि पंजाबमध्ये प्रत्येकी एक मंत्री अब्जाधीश आहे. ७२ केंद्रीय मंत्र्यांपैकी ६ (आठ टक्के) अब्जाधीश आहेत, असे अहवालात म्हटले आहे. पक्षनिहाय, भाजपचे सर्वाधिक १४ मंत्री अब्जाधीश आहेत. काँग्रेस दुसऱ्या क्रमांकावर असून पक्षाच्या ६१ मंत्र्यांपैकी ११ (१८ टक्के) अब्जाधीश आहेत, तर टीडीपीच्या २३ मंत्र्यांपैकी ६ अब्जाधीश मंत्री आहेत (२६ टक्के). आम आदमी पक्ष, (पान २ वर)

### २९ केंद्रीय मंत्र्यांवर गुन्हेगारी खटले

७२ केंद्रीय मंत्र्यांपैकी २९ मंत्र्यांनी (४० टक्के) त्यांच्या प्रतिज्ञापत्रात गुन्हेगारी खटले घोषित केले आहेत. राज्यांमध्ये, आंध्र प्रदेश, तामिळनाडू, बिहार, ओडिशा, महाराष्ट्र, कर्नाटक, पंजाब, तेलंगणा, हिमाचल प्रदेश, दिल्ली आणि पुद्दुचेरी या ११ विधानसभांमध्ये ६० टक्क्यांहून अधिक मंत्र्यांवर गुन्हेगारी खटले आहेत. याउलट, हरियाणा, जम्मू आणि काश्मीर, नागालँड आणि उत्तराखंडमधील मंत्र्यांवर एकही गुन्हेगारी खटला नोंदवलेला नाही.

# बंगाल विधानसभेत अभूतपूर्व राडा!

## * ममता बॅनर्जीकडून मोदीविरोधी नारा
## * भाजपचे ५ आमदार निलंबित

**कोलकाता, दि. ४** वृत्तसंस्था



पश्चिम बंगाल विधानसभेत गुरुवारी नाट्यमय घडामोडीनंतर सत्ताधारी तृणमूल काँग्रेस आणि विरोधी भाजप आमदारांमध्ये जोरदार शाब्दिक चकमक उडाली. यानंतर विधानसभेत अभूतपूर्व राडा झाल्याने कामकाज स्थगित करण्यात आले. या गोंधळानंतर भाजपच्या पाच आमदारांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली.

बंगाली स्थलांतरितांवर होणाऱ्या अत्याचारांबाबत सत्ताधारी पक्षाने आणलेल्या प्रस्तावावर चर्चा सुरू होती. यादरम्यान विरोधी पक्षाने (भाजप) घोषणाबाजी केली. या प्रस्तावावर मुख्यमंत्री ममता बॅनर्जी बोलत होत्या. त्यानंतर भाजप आमदारांनी २ सप्टेंबर रोजी विरोधी पक्षनेते शुभेंदु अधिकारी यांच्या झालेल्या निलंबनावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले, ज्याला तृणमूल काँग्रेसच्या आमदारांनी विरोध केला. ममता बॅनर्जी आपल्या भाषणात म्हणाल्या, भाजपची हुकूमशाही आणि वसाहतवादी मानसिकता आहे, ती बंगालला आपली वसाहत बनवू इच्छिते. आम्ही हिंदी किंवा इतर कोणत्याही भाषेच्या विरोधात नाही, परंतु भाजप बंगाली विरोधी आहे. भाजपने देशाचा सन्मान परदेशी शक्तींना विकला आहे. केंद्र कधी अमेरिकेसमोर भीक मागते, तर कधी चीनसमोर, अशा शब्दांत त्यांनी विरोधकांवर निशाणा साधला. भाजप मते चोरण्यात गुंतलेली आहे, परंतु इतरांना लोकशाही प्रक्रियेवर व्याख्याने देतात. भाजप हा मतदान चोर आहे, त्यांनी निवडणुका जिंकण्यासाठी लोकांचा जनादेश चोरला आहे, असे त्यांनी म्हटले. यावेळी विरोधी पक्षनेते शुभेंदू अधिकारी यांना २ सप्टेंबर रोजी विशेष अधिवेशनासाठी निलंबित केल्याबद्दल भाजप आमदारांनी जोरदार घोषणाबाजी केली. यामुळे तृणमूल काँग्रेसच्या सदस्यांनीही जोरदार (पान २ वर)

# खऱ्या कुणबींनाच जीआरचा फायदा : मुख्यमंत्र्यांनी ठणकावले

**मुंबई, दि. ४** वृत्तसंस्था



मराठा आरक्षणासाठी नुकत्याच जारी केलेल्या जीआरमुळे ओबीसी समाजावर अन्याय होईल, असा संभ्रम काही घटक जाणीवपूर्वक पसरवत असल्याचा आरोप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. मराठा आरक्षणाच्या जीआरमुळे ओबीसी समाजाचे नुकसान होणार नाही आणि फक्त निजामकालीन हैदराबाद गॅझेटमधील नोंदी असलेल्या खऱ्या कुणबींनाच या जीआरचा लाभ मिळेल, अशी स्पष्ट ग्वाही फडणवीस यांनी दिली आहे.

या जीआरबाबत निर्माण झालेल्या गैरसमजांना पूर्णविराम देत, त्यांनी कोणावरही अन्याय होऊ देणार नसल्याचे ठणकावून सांगितले. दरम्यान, ओबीसी नेते आणि अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्याशी चर्चा झाल्याचे सांगत, त्यांच्या मनातील संभ्रम दूर केल्याचा दावा फडणवीस यांनी केला आहे. देवेंद्र फडणवीस म्हणाले, हा जीआर सरसकट मराठ्यांना आरक्षण देणारा नसून, केवळ ऐतिहासिक नोंदी असलेल्या कुणबी समाजापुरता मर्यादित आहे. काही लोक जाणीवपूर्वक गैरसमज पसरवत आहेत. आम्ही फक्त गॅझेटमधील नोंदींनुसार प्रमाणपत्र देणार आहोत. ओबीसींवर कोणताही अन्याय होणार नाही, असे फडणवीस यांनी ठामपणे सांगितले.

### छगन भुजबळ नाराज?

ओबीसी नेते आणि मंत्री छगन भुजबळ यांनी या जीआरवर सुरुवातीला नाराजी व्यक्त केल्याची चर्चा होती. भुजबळ यांनी ओबीसी कोट्याला धक्का लागू नये, अशी भूमिका मांडली होती. यावर फडणवीस यांनी सांगितले की, भुजबळ यांच्याशी सविस्तर चर्चा झाली असून, त्यांच्या मनातील सर्व संभ्रम दूर करण्यात आले आहेत. भुजबळ नाराज नाहीत. आम्ही त्यांना विश्वासात घेतले आहे. ओबीसी समाजाला कोणताही धोका नाही, असे फडणवीस यांनी नमूद केले.

### राज्य आणि केंद्राने कुकी समूहाशी केला शांतता करार!

**मणिपूर :** मागील दोन वर्षांपासून मणिपूरमध्ये कुकी आणि मेईतेई समाजात तीव्र संघर्ष सुरू आहे. या संघर्षात शेकडो लोकांचा मृत्यू झाला आहे. मात्र, आता लवकरच हा संघर्ष संपण्याची चिन्हे आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या १३ सप्टेंबर रोजी मणिपूर राज्याचा दौरा करण्याची चर्चा आहे. त्यांच्या दौऱ्यापूर्वी सरकारला मोठे यश मिळाले आहे. केंद्र आणि मणिपूर सरकारने गुरुवारी (४ सप्टेंबर २०२५) कुकी-झो कौन्सिल (केझेडसी) सोबत एक नवीन करार केला आहे, ज्याअंतर्गत सर्व पक्षांनी राज्याची प्रादेशिक अखंडता राखण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग-२ उघडण्यास सहमती दर्शविली आहे.



गेल्या काही दिवसांत केंद्रीय गृह मंत्रालयाचे अधिकारी आणि केझेडसीच्या शिष्टमंडळात अनेक बैठका झाल्या. मणिपूरमध्ये कायमस्वरुपी शांतता आणि स्थिरता आणण्यासाठी संवादाद्वारे तोडगा काढण्याच्या गरजेवरही तिन्ही पक्षांनी सहमती दर्शविली आहे. त्यामुळे लवकरच राज्यातील संघर्ष कायमचा संपण्याची शक्यता वर्तवली जात आहे. इम्फाळ आणि नवी दिल्लीतील अधिकाऱ्यांचा असा विश्वास (पान २ वर)

# लाडकी बहिण : ऑगस्ट महिन्याचा हप्ता लवकरच लाभार्थींच्या खात्यांमध्ये

**मुंबई, दि. ४** वृत्तसंस्था



राज्य सरकारच्या लोकप्रिय 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण' योजनेच्या लाभार्थी महिलांसाठी एक आनंदाची बातमी आहे. राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी आज (४ सप्टेंबर) एका मराठी वृत्त वाहिनीशी बोलताना ऑगस्ट महिन्याच्या हप्त्याबाबत महत्त्वपूर्ण माहिती दिली आहे.

यावेळी लाडकी बहिण योजनेच्या हप्त्याबाबत विचारले असता, तटकरे यांनी स्पष्ट केले की, ऑगस्ट महिन्याचा हप्ता लवकरच लाभार्थींच्या खात्यांमध्ये जमा होईल. तसेच, योजनेची अंमलबजावणी कधीच खंडित पडणार नाही, असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला. लाडकी बहिण योजनेच्या लाभार्थी महिलांना दर महिन्याला १,५०० रुपये डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर (डीबीटी) द्वारे दिले जातात. ऑगस्ट महिन्याचा हप्ता अद्याप जमा झालेला नसल्याने अनेक महिलांमध्ये चिंता होती. याबाबत तटकरे यांनी सांगितले की, "लवकरच ऑगस्ट महिन्याचा हप्ता येणार आहे." योजनेच्या नियमांनुसार, हप्ता महिन्याच्या सुरुवातीला जमा होतो, पण काही वेळा तांत्रिक कारणांमुळे थोडा उशीर होऊ शकतो. गेल्या महिन्यांत जुलै हप्ता रक्षाबंधनाच्या पूर्वसंध्येला जमा करण्यात आला होता, तर एप्रिल आणि मे महिन्यांचे हप्ते महिनाअखेरीस जमा झाले होते. ऑगस्ट हप्त्याबाबत अद्याप अधिकृत तारीख जाहीर झालेली नाही, पण तटकरे यांच्या विधानानुसार तो लवकरच येईल. जर विलंब झाला तर सप्टेंबर महिन्यात संयुक्त हप्ता (ऑगस्ट + सप्टेंबर) म्हणजे ३,००० रुपये जमा होण्याची शक्यता आहे. लाभार्थी महिलांना ladkibahin.maharashtra.gov.in वर किंवा हेल्पलाइन १८१ वर स्टेटस तपासण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

### २१०० रुपयांची वाढ कधी?

योजनेच्या हप्त्यात २१०० रुपयांपर्यंत वाढ करण्याबाबत विचारले असता, तटकरे यांनी सांगितले की, आमचे जे घोषणापत्र आहे ते पाच वर्षाचे आहे. योग्य वेळी आम्ही नक्कीच २१०० रुपये देणार. महायुती सरकारने विधानसभा निवडणुकीत (२०२४) हा वादा केला होता, पण अद्याप तो अंमलात आणलेला नाही.

# मनोज जरांगेंसह मराठा समाजाचीही फसवणूक - आंबेडकर

**मुंबई, दि. ४** वृत्तसंस्था



मराठवाड्यातील मराठा समाजातील व्यक्तीला कुणबी प्रमाणपत्र मिळावे यासाठी राज्य सरकारने हैदराबाद गॅझेट लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. या गॅझेटमधील नोंदीनुसार आता स्थानिक पातळीवर एक समिती स्थापन करण्यात येणार आहे. या समितीद्वारे अर्जदार मराठा व्यक्ती कुणबी असल्याचे प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहे की नाही? हे ठरवले जाईल. दरम्यान, सरकारच्या या जीआरमध्ये वेगळे काहीही नाही. सरकारने जरांगे यांच्यासह मराठा समाजाची फसवणूक केलेली आहे, असा दावा वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी केला. यासंदर्भात त्यांनी थेट सर्वोच्च न्यायालयाचा दाखला दिल्याने खळबळ उडाली आहे. प्रकाश आंबेडकर यांनी आज पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी पत्रकारांनी विचारलेल्या अनेक प्रश्नांची उत्तरे दिली. मनोज जरांगे यांच्या उपोषणानंतर सरकारने काढलेल्या शासन निर्णयावर बोलताना त्यांनी सर्वोच्च न्यायालयाचा संदर्भ दिला. सर्वोच्च न्यायालयानेही सर्वच मराठा हे कुणबी आहेत असे सरसकट ग्राह्य धरता येत नाही, असे सांगितलेले आहे. म्हणूनच भाजपने जीआरमार्फत जो निर्णय घेतला आहे, तो फसवणारा आहे, असा थेट आरोप त्यांनी केला.तसेच, या शासन निर्णयाच्या माध्यमातून राधाकृष्ण विखे पाटील यांच्या समितीलाही फसवण्यात आले आहे. निवृत्त न्यायमूर्ती संदीप शिंदे यांच्या समितीलाही फसवण्याचे काम करण्यात आले. मनोज जरांगे हे आंदोलनाला बसले होते. त्यांच्यासोबत इतरही अनेक कार्यकर्ते होते. त्यांनाही फसवलेले आहे, असेही भाष्य त्यांनी केले.




**चीनची आगेकूच** जगभरात हल्ला करण्यास सक्षम

# चीनने बनविले धडकी भरविणारे हत्यार!

**बीजिंग (चीन), दि. ४** वृत्तसंस्था

जगातील वाढत्या संघर्ष आणि शस्त्रास्त्र स्पर्धेत चीनने एका अत्यंत घातक हत्याराने सर्वांना हादरवले आहे. -१ हे उच्च-शक्तीचे लेझर हत्यार, ज्याची मारक क्षमता तब्बल २० हजार किलोमीटरपर्यंत आहे, हे चीनच्या नव्या सैन्य सामर्थ्याचे प्रतीक ठरले आहे. यामुळे चीन जवळपास संपूर्ण जगाच्या टप्प्यात आला असून, पृथ्वीवरील कोणत्याही भागात, अगदी अंतराळातील धमकींनाही प्रत्युत्तर देण्यास सक्षम झाला आहे.

बुधवारी (३ सप्टेंबर) बीजिंगमध्ये द्वितीय महायुद्धाच्या विजय दिवसानिमित्त आयोजित भव्य परेडमध्ये हे हत्यार प्रथमच प्रदर्शित करण्यात आले. पीपल्स लिबरेशन आर्मीने आयोजित या परेडमध्ये




-१ लेझरचा समावेश असून, त्याने जागतिक संरक्षण क्षेत्रात खळबळ उडवली आहे. चीनच्या राजधानी बीजिंगमध्ये झालेल्या या परेडमध्ये राष्ट्रपती शी जिनपिंग यांच्या नेतृत्वाखाली सैन्याचे विविध हत्यार प्रदर्शित करण्यात आले. यात -१ लेझर हत्यार आठ चाकांच्या -१५५ चिलखत ट्रकवर बसवलेले दिसले. हे हत्यार शत्रूच्या हत्यारांचे ऑप्टिकल सेंसर्स नष्ट करू शकते, ज्यामुळे ते ड्रोन, मिसाइल आणि इतर उपकरणांना प्रभावीपणे रोखू शकते. चीनच्या सरकारी वृत्तपत्र 'ग्लोबल टाईम्स'ने लिहिले की, हे डायरेक्टेड एनर्जी वेअपन मुख्यतः नौदलासाठी डिझाइन केले गेले असून, ते ड्रोन आणि मिसाइल नष्ट करण्यासाठी उपयुक्त आहे. मात्र, जमिनीवरही त्याचा वापर शक्य आहे. परेडमध्ये हे हत्यार प्रथमच सार्वजनिकरित्या दाखवण्यात आले. यामुळे चीनच्या सैन्य तंत्रज्ञानातील प्रगतीचे दर्शन घडले. परेडमध्ये रशियाचे राष्ट्रपती व्लादिमीर पुतिन आणि उत्तर कोरियाचे किम जोंग उन यांसारखे नेतेही उपस्थित होते. -१ हे लेझर हत्यार ड्रोन, सबसॉनिक अँटी-शिप मिसाइल आणि इतर धमक्यांना नष्ट करण्यासाठी बनवले गेले आहे. ते शत्रूच्या ऑप्टिकल सेंसर्सना निष्क्रिय करू शकते, ज्यामुळे शत्रूची दृष्टी आणि नियंत्रण प्रणाली अचानक बंद पडते. चीनचे संरक्षण तज्ज्ञ सांगतात की, हे हत्यार समुद्रातील युद्धात क्रांती घडवू शकते, कारण ते कमी खर्चात अचूक हल्ले करू शकते. उच्च-शक्तीच्या लेझर बीममुळे ते हायपरसॉनिक मिसाइलही रोखू शकते.

### जागतिक शस्त्रास्त्र स्पर्धेत नवीन वळण

याची रेंज २० हजार किलोमीटरपर्यंत असल्याने, ते जगभरातील कोणत्याही ठिकाणी हल्ला करण्यास सक्षम आहे. अगदी पृथ्वीबाहेरील धमकींनाही प्रत्युत्तर देऊ शकते. हे हत्यार नौदलाच्या जहाजांवर बसवण्यासाठी प्राधान्याने डिझाइन केले असले तरी, जमिनीवरही तैनात करता येते. चीनने याची अनेक तांत्रिक वैशिष्ट्ये गुप्त ठेवली आहेत, पण परेडमधील दर्शनाने जागतिक शस्त्रास्त्र स्पर्धेत नवीन वळण आले आहे.

## पान 1 वरून...

### देशातील ४७ टक्के मंत्र्यांवर ...

जनसेना पक्ष, जेडी(एस), राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना यांचेही अब्जाधीश मंत्री आहेत. देशातील सर्वात श्रीमंत मंत्री टीडीपीचे डॉ. चंद्रशेखर पेम्मासानी आहेत. ते लोकसभेत आंध्र प्रदेशच्या गुंटूरचे प्रतिनिधित्व करतात. त्यांनी ५ हजार ७०५ कोटी रुपयांपेक्षा जास्त संपत्ती जाहीर केली आहे. कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डी.के. शिवकुमार यांच्याकडे १,४१३ कोटी रुपयांची मालमत्ता आहे, तर आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू, यांच्याकडे ९३१ कोटी रुपयांपेक्षा जास्त संपत्ती आहे. महाराष्ट्रातील मंत्री मंगल प्रभात लोढा पहिल्या १० श्रीमंत मंत्र्यांमध्ये समाविष्ट आहेत. एडीआरने २७ राज्यांच्या विधानसभा, तीन केंद्रशासित प्रदेश आणि केंद्रीय मंत्रिमंडळातील ६४३ मंत्र्यांच्या प्रतिज्ञापत्रांची तपासणी केली. यामध्ये आढळून आले की, देशातील ३०२ मंत्र्यांवर, म्हणजेच एकूण जवळपास ४७ टक्के मंत्र्यांवर गुन्हेगारी खटले आहेत. या ३०२ मंत्र्यांपैकी १७४ मंत्र्यांवर गंभीर गुन्हेगारी खटले आहेत, असे अहवालात म्हटले आहे. भाजपच्या ३३६ मंत्र्यांपैकी १३६ (४० टक्के) मंत्र्यांवर गुन्हेगारी खटले आहेत. यामध्ये ८८ मंत्र्यांवर गंभीर गुन्हे दाखल आहेत. चार राज्यांमध्ये सत्तेत असलेल्या काँग्रेसच्या ४५ मंत्र्यांवर (७४ टक्के) गुन्हेगारी खटले आहेत, ज्यात १८ (३० टक्के) गंभीर गुन्हे आहेत. शिवसेना शिंदे गटाच्या १३ मंत्र्यांपैकी ७ जणांवर गुन्हे दाखल असून यातील ३ जणांवर गंभीर आरोप आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसच्या १० पैकी ३ मंत्र्यांवर गुन्हे दाखल आहेत. द्रमुकच्या ३१ मंत्र्यांपैकी २७ जणांवर गुन्हेगारी खटले आहेत, तर १४ (४५ टक्के) गंभीर खटले आहेत. तृणमूल काँग्रेसच्या ४० मंत्र्यांपैकी १३ मंत्र्यांवर गुन्हेगारी खटले आहेत, ज्यात ८ जणांवर गंभीर गुन्ह्याचे आरोप आहेत. तेलुगू देसम पक्षाच्या २३ मंत्र्यांपैकी २२ मंत्र्यांवर (९६ टक्के) गुन्हेगारी खटले दाखल आहेत. त्यापैकी १३ मंत्र्यांवर गंभीर खटले दाखल आहेत. तर आम आदमी पक्षाच्या १६ पैकी ११ मंत्र्यांवर (६९ टक्के) गुन्हेगारी खटले आहेत, तर पाच जणांवर गंभीर खटले आहेत.

### बंगाल विधासभेत अभूतपूर्व ...

नारेबाजी सुरू केली. याप्रसंगी गोंधळ सुरूच राहिल्याने सभापती बिमन बॅनर्जी यांनी उर्वरित दिवसासाठी कामकाज स्थगित केले.

सभापती बिमन बॅनर्जी यांनी गोंधळ निर्माण केल्याच्या आरोपावरून भाजपचे मुख्य प्रतोद शंकर घोष यांना विधानसभेतून निलंबित केले. घोष यांनी बाहेर जाण्यास नकार दिल्यावर मार्शलना बोलावण्यात आले आणि त्यांना सभागृहातून बाहेर काढण्यात आले. त्यांना बाहेर काढताना ते बेशुद्ध पडले, त्यांना रुग्णवाहिकेतून रुग्णालयात नेण्यात आले. घोष यांच्याव्यतिरिक्त, भाजपचे आणखी दोन चार आमदारांना सभागृहातून निलंबित करण्यात आले आहे.

### राज्य आणि केंद्राने कुकी ...

आहे की, आवश्यक वस्तूंची सहज उपलब्धता विस्थापित कुटुंबे आणि मदत छावण्यांमध्ये राहणाऱ्या नागरिकांच्या अडचणी कमी करेल. राज्यासाठी जीवनरेखा मानल्या जाणाऱ्या एनएच-२ वर शांतता राखण्यासाठी केझेडसीने केंद्र सरकारने तैनात केलेल्या सुरक्षा दलांना सहकार्य करण्याचे आश्वासन दिले आहे, अशी माहिती गृह मंत्रालयाने दिली आहे. मणिपूरला नागालँड आणि ईशान्येकडील इतर भागांशी जोडणारा एनएच-२ राज्यातील वाढत्या जातीय तणावामुळे मे २०२३ पासून बंद होता. नवी दिल्लीत गुरुवारी गृह मंत्रालय, मणिपूर सरकार, कुकी नॅशनल ऑर्गनायझेशन (केएनओ) आणि युनायटेड पीपल्स फ्रंट (यूपीएफ) यांच्या प्रतिनिधींमध्ये एक बैठक झाली. यामध्ये, मणिपूरमध्ये कायमस्वरूपी शांतता आणि स्थिरता आणण्यासाठी संवादाद्वारे तोडगा काढण्याची गरज यावर तिन्ही पक्षांनी सहमती दर्शविली.

**स्वातंत्र्यानंतरचा सर्वात मोठा निर्णय**

जीएसटी बदलांवर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी पहिली प्रतिक्रिया दिली आहे. दिल्लीतील एका कार्यक्रमात मोदी यांनी जीएसटीमध्ये बदल करणे हा स्वातंत्र्यानंतरचा सर्वात मोठा निर्णय आहे, असे म्हटले आहे. जीएसटी आता आणखीन सरळ, सुटसुटीत झाला आहे. दिवाळीपूर्वी भारतीयांना डबल धमाका अनुभवता येणार आहे. जीएसटीमध्ये आता ५ आणि १८ टक्के असे दोनच स्लॅब उरले आहेत. यामुळे नागरिकांसोबतच व्यापाऱ्यांनाही जीएसटी सोपा झाला आहे. २.० ची ही व्यवस्था घरे, छोटे व्यापारी आणि उद्योगांना दिलासा देणारी आहे, असे मोदी म्हणाले.

# आता कामगारांना ९ तासांऐवजी १२ तास काम करावे लागणार

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**मुंबई, दि.४ :** राज्य सरकार कामाचे तास वाढवण्याचा विचार करत असल्याची माहिती आधीच समोर आली होती. काही दिवसांपूर्वी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत या संदर्भात कामगार विभागाला याबाबतचा प्रस्ताव सादर केला होता. अखेर, यावर शिक्कामोर्तब करण्यात आला असून महाराष्ट्र दिवसाचे कामाचे तास ९ वरून १२ तास करण्यात आला आहे.

केंद्र सरकारच्या धोरणांतर्गत देशात होणारे बदल लक्षात घेता कायद्यातील उद्योग आणि कामगारांसाठी या दोन्ही घटकांसाठी महत्त्वाचे असून उदयोग क्षेत्राला आहे आणि औद्योगिक क्षेत्राला अधिक लवचिकता आणि कामगारांसाठी पारदर्शक आणि नियोजित कामकाजासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचं राज्य सरकारने हा निर्णय घेतला आहे.कारखाने आणि दुकानांमध्ये




काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या कामाच्या तासात ही वाढ करण्यात आली. कारखाना अधिनियम १९४८ च्या कलम ६५ नुसार कारखाना कामगारांसाठी दररोज काम करण्याची वेळ मर्यादा ९ तास होती मात्र आता ही वेळ १२ तासांपर्यंत करण्यात आली. आतापर्यंत कारखान्यात मधला ब्रेक किंवा विश्रांतीचा कालावधी ५ तासांनंतर ३० मिनिटे होता. तर ६ तासांनंतर ३० मिनिटं इतका करण्यात आला. नवीन नियमांनुसार, दुकानांमधील कामाचे तास ९ वरून १० पर्यंत बदलण्यात आले आहेत. तर तातडीचे काम सोपविलेल्या कर्मचाऱ्यांचा कार्यकाळ साडेदहावरुन १२ तासांवर करण्यात आला आहे. यातील कलम ५६ मध्ये आठवड्याचे कामकाजाचे तास ४८ तासांवरून ६० तासांपर्यंत वाढविण्यात आले आहेत.

कलम ६५ मध्ये, कामगारांसाठी ओव्हरटाईमची मर्यादा ११५ तासांवरून १४४ तासांपर्यंत वाढवण्यात आली आहे. यामुळे कामगारांना अधिक आर्थिक फायदे मिळतील. तसेच, कारखान्यांचे असे वेळेवर बदल सरकारच्या मान्यतेशिवाय शक्य होणार नाहीत. त्याचबरोबर, आठवड्यात ४८ तास काम ही कालमर्यादा ओलांडता येणार नसल्याचेही कामगार मंत्री अॅड.फुंडकर यांनी सांगितले आहे. कामगारांकडून जास्तीचे काम घेतल्यास त्याचा पुरेपूर मोबदला आणि पगारी सुट्ट्या देण्यासंबंधीचे बदल यात सुचविण्यात आल्याचं फुंडकर यांनी सांगितलं.

## कामगारांच्या निर्णयावर आव्हाडांचा कडाडून विरोध

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला , दि. ४ :** कामगारांच्या कामाच्या तासांसंदर्भात राज्य मंत्रिमंडळाने मोठा निर्णय घेतला आहे. कारखाने अधिनियमातील दुरुस्तीला मंत्रिमंडळाची मान्यता मिळाल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे आता ९ तासांऐवजी १२ तास काम करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी याबाबतची माहिती दिली आहे. मात्र, या निर्णयावर शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी विरोध दर्शवला आहे. त्यांनी एक्सवरून पोस्ट शेअर करत सरकारला खडेबोल सुनावले आहेत.जेव्हा जेव्हा शासनाचा ताबा उद्योगपती घेतात. तेव्हा



तेव्हा कामगारांचे शोषण होते, याला इतिहास साक्ष आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान लिहिताना व कामगार कायदे तयार करताना कामाचे तास किती असावेत, याचे व्यवस्थित नियमन केले आहे. असे असताना कामाचे तास वाढविण्याचा राज्य शासनाचा निर्णय हा कामगारांच्या श्रमाचा अवमान आहे, अशी टीका आव्हाडांनी राज्य सरकारवर केली आहे.

पोस्टमध्ये पुढं ते म्हणाले, कारण, त्यांच्या श्रमातूनच मुंबई आणि महाराष्ट्र उभा राहिला आहे.

## नागपूरमधील सोलार कंपनीत मध्यरात्री स्फोट; एकाचा मृत्यू, १७ कामगार जखमी

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**नागपूर , दि. ४ :** जिल्ह्यातील बाजारगाव जवळील सोलार एक्सप्लोसिव्ह कंपनीत काल मध्यरात्री १२:३० वाजताच्या सुमारास भीषण स्फोट झाला. या स्फोटात १ कामगाराचा मृत्यू झाला असून १७ कामगार जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे. यातील ४ जखमींची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगितले जात आहे.

सीबी वन या प्लांटमध्ये स्फोट होण्यापूर्वी काही प्रमाणात धूर निघत असल्याचे अनुभवी कर्मचाऱ्यांच्या लक्षात येताच, सर्व कामगारांनी बाहेरच्या दिशेने धाव घेतली. मात्र संबंधित प्लांटमधील मयूर गणवीर हे वेळेत बाहेर पडू शकले नाही आणि तेवढ्यात स्फोट झाला. स्फोटाची तीव्रता एवढी भीषण होती की, प्लांटच्या इमारतीचे तुकडे अनेक मीटर लांबपर्यंत उडाले आणि त्या मलब्याच्या आघाताने अनेक कामगार जखमी झाले. या घटनेची माहिती कळताच पोलीस, अग्निशमन दलासह प्रशासनाचे वरिष्ठ अधिकारी रात्री उशिराच घटनास्थळी दाखल झाले.

सुरुवातीला घटनास्थळी काही वेळ पुन्हा स्फोट घडणार नाही, याची काळजी घेत वाट पाहण्यात आली, त्यानंतर कूलिंग ऑपरेशन करून मालब्याखाली दबलेल्या जखमींना बाहेर काढण्यात आले. दरम्यान, सर्व जखमींना प्रथमोपचारानंतर नागपूरातील विविध रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

## ८ सप्टेंबरलाही शाळा, कॉलेज, ऑफीस राहणार बंद

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**मुंबई, दि.४ :** मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यात ईद-ए-मिलाद निमित्त सार्वजनिक सुट्टी यापूर्वी ५ सप्टेंबरला जाहीर करण्यात आली होती. आता ही सुट्टी शुक्रवार ५ सप्टेंबर ऐवजी सोमवार ८ सप्टेंबरला असणार आहे. मुंबई शहर व उपनगर जिल्ह्याव्यतिरिक्त इतर जिल्ह्यांसाठी शुक्रवार ५ सप्टेंबर ही सार्वजनिक सुट्टीची तारीख कायम ठेवण्यात येत आहे.

महाराष्ट्र सरकारने ईद-ए-मिलादसाठी जाहीर केलेल्या सार्वजनिक सुट्ट्यांमध्ये बदल केला आहे. सरकारच्या सामान्य प्रशासन विभागाने जारी केलेल्या अधिसूचनेनुसार, शुक्रवार, ५ सप्टेंबर २०२५ ऐवजी सोमवार, ८ सप्टेंबर २०२५ रोजी सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. राज्यात बंधुता आणि



एकता टिकावी या हेतूने मुस्लीम समाजाने ईद-ए-मिलाद निमित्त काढला जाणारा जुलूस कार्यक्रम ६ सप्टेंबर ऐवजी ८ सप्टेंबर २०२५ रोजी घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे, मुंबई शहर व उपनगर जिल्ह्यातील ५ सप्टेंबर रोजी जाहीर झालेली सार्वजनिक सुट्टी रद्द करून ती ८ सप्टेंबरला जाहीर करण्यात आली आहे. यामुळे मुंबई शहर व उपनगरातील शासकीय कार्यालये ५ सप्टेंबर रोजी नियमित सुरु राहतील, अशी माहिती सामान्य प्रशासन विभागाने परिपत्रकाद्वारे दिली आहे.

शनिवार दि ६ सप्टेंबर रोजी अनंत चतुर्दशी हा हिंदूचा सण आहे. राज्यात बंधुता आणि हिंदू मुस्लिम ऐक्य राखण्यासाठी मुस्लीम समुदायाने जुलूसचा कार्यक्रम ८ सप्टेंबर २०२५ रोजी घेण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी शुक्रवार दि. ५ सप्टेंबर रोजीची सुट्टी आता सोमवार ८ सप्टेंबर रोजी देण्यात येणार आहे.या निर्णयामुळे, मुंबई शहर आणि उपनगरातील सरकारी कार्यालये, शाळा आणि महाविद्यालये सोमवारी बंद राहतील. मूळ अधिसूचनेनुसार, ईद-ए-मिलादची सुट्टी शुक्रवार, ५ सप्टेंबर होती. दरम्यान, मुस्लिम संघटनेने २१ ऑगस्ट २०२५ रोजी बैठक घेऊन सोमवार, ८ सप्टेंबर रोजी मिरवणूक काढण्याचा निर्णय घेतला. ६ सप्टेंबर रोजी रोजी अनंत चतुर्दशी असल्याने संभाव्य गर्दी टाळणे आणि शांतता राखणे हा यामागील उद्देश होता.

## मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात भरीव कामगिरी करा!

### खा. अनुप धोत्रे : जिल्हास्तरीय कार्यशाळा उत्साहात




दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि.४ :** ग्रामीण भागाचा सर्वांगीण व शाश्वत विकास देशाच्या प्रगतीचा कणा असून ग्रामीण जनतेच्या आशा-आकांक्षा पूर्ण करण्यासाठी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान एक प्रभावी व दूरदर्शी माध्यम ठरेल. या अभियानामध्ये अकोला जिल्ह्याने भरीव कामगिरी करुन जिल्ह्याचा नाव लौकीक करावा, असे प्रतिपादन खासदार अनुप धोत्रे यांनी केले. ते जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे आज दिनांक ४ सप्टेंबर रोजी जिल्ह्यातील ग्रामपंचायत अधिकारी, सरपंच, कर्मचारी-अधिकारी यांच्यासाठी आयोजित मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाच्या जिल्हास्तरीय कार्यशाळेत बोलत होते.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणुन आमदार अमोल मिटकरी, आमदार वसंत खंडेलवाल, जिल्हाधिकारी वर्षा मीना, अमरावती विभागीय आयुक्त कार्यालयातील उपायुक्त राजीव फडके, जि.प. चे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विनय ठमके, उपजिल्हाधिकारी महेश परांडेकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी दिगंबर लोखंडे आदी उपस्थित होते. यावेळी खा. धोत्रे म्हणाले की, राज्यातील ग्रामीण भागाचा चेहरा-मोहरा बदलण्यासाठी, संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास ध्येय्यांची यशस्वी अंमलबजावणी करण्यासाठी आणि ग्रामविकासात लोकसहभाग निर्माण करण्यास नवी ऊर्जा निर्माण करण्याचे काम हे अभियान करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी ग्रामपंचायत स्तरावरील कर भरण्याची सुविधा नागरिकांना ऑनलाईन उपलब्ध व्हावी या उद्देशाने अकोट पंचायत समिती अंतर्गत रोहनखेड ग्रामपंचायतने उपलब्ध केलेल्या क्यू आर कोडचे अनावरण करण्यात आले. आ. मिटकरी म्हणाले की, प्रत्येक गावाने पुढाकार घेत आधुनिक व पारदर्शक आणि लोकाभिमुख कार्यप्रणाली राबवावी. स्थानिक स्वराज्य संस्थांना सक्षम केल्याशिवाय शाश्वत विकास साध्य होऊ शकत नाही. तसेच अधिकारी-कर्मचारी यांनी गावापर्यंत पोहोचण्यासाठी सातत्यपुर्ण प्रयत्न करावेत अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. ग्रामस्तरावर विकासाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी नागरिकांचे सहकार्य महत्वाचे आहे. ग्रामपंचायत कडून आकारल्या जाणारा कर वेळेवर म्हणजे दर महिना भरून नागरिकांनी ग्रामपंचायतला सहकार्य करावे, यामध्ये सरपंचांनी पुढाकार घ्यावा तसेच कर भरण्याची सुविधा नागरिकांना ऑनलाईन उपलब्ध करुन द्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी केले.

## ध्येय निश्चितीच्या दिशेने एकाग्र मार्गक्रमण हाच स्पर्धापरीक्षेचा मूलमंत्र - अर्चित चांडक

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि.४ :** शिवाजी अभियांत्रिकी महाविद्यालय गणेशोत्सवातील बौद्धिक सत्र अकोला : स्पर्धा परीक्षेत भाग घेणाऱ्या व्यक्तीने ध्येयपूर्ती निश्चित करून जर चिकाटीने व जिद्दीने त्याच दिशेने मार्गक्रमण केल्यास यश प्राप्ती मिळते हा या उपक्रमाचा मूलमंत्र आहे असे मौलिक मार्गदर्शक अकोला जिल्हाचे आय पी एस पोलीस अधिक्षक अर्चित चांडक यांनी केले . बाभूळगांव अकोला येथील श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्यालयाच्या गणेशोत्सव आयोजनाच्या शैक्षणिक मार्गदर्शन या सदरात प्रमुख अतिथी तथा प्रमुख वक्ते या नात्याने भाषणांतून अभियांत्रिकी विद्यार्थ्यांशी संवाद साधतांना अर्चित चांडक यांनी दिल्ली येथून अभियांत्रिकी पदवी संपादन करून मोठ्या पगाराची नोकरी न स्वीकारता अथक परिश्रमाने मध्ये १८४ वा क्रमांक प्राप्त करून पदवी मिळविली असल्याने विद्यार्थ्यांना आपल्या या प्रेरणादायी जीवनप्रवासाची



माहिती सांगितली. तसेच समाजसेवा, राष्ट्रनिष्ठा व योग्य निर्णय घेण्याचे महत्त्व यावरही त्यांनी बहुमूल्य प्रकाश टाकून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले . या प्रसंगी महाविद्यालयातील अंतीम वर्ष संगणक विभागातील विद्यार्थी प्रथमेश व्यं. ढोरे यांनी स्वतः श्री गणेशमूर्ती साकारण्याच्या अप्रतिम कलेबाबत महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघाच्या वतीने अर्चित चांडक यांच्या शुभहस्ते गौरव करण्यात आला . . या मूर्तीची विधीवत स्थापना गणेश चतुर्थीला महाविद्यालय परिसरात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत थोरात यांच्या शुभहस्ते तथा सर्व गणेशोत्सव आयोजन समिती सदस्य यांच्या उपस्थितीत संपन्न झाली होती. महाविद्यालयातील प्रथम आगमना प्रित्यर्थ महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघटनेने पोलीस अधिक्षक अर्चित चांडक यांचा स्मृतीचिन्हासह यथोचित सत्कार करून महाविद्यालयास उपकृत करून घेतले . अर्चित चांडक यांनी परिसरातील शिक्षण महर्षि डॉ भाऊसाहेब देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन तथा श्री गणेशाला वंदन करून परिसरात वृक्षारोपणाचीही नोंद केली . प्रा. शर्वरी दिक्षीत यांच्या श्री गणेश वंदनेने शुभारंभ झालेल्या या शैक्षणीक सत्र कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. एस. एल. सातारकर तथा उत्सव आयोजन समिती प्रमुख प्रा. डॉ अमित गावंडे यांची उपस्थिती होती .

## ट्रम्प प्रशासनात अर्थतज्ज्ञ म्हणून डॉ. श्रीप्रकाश कोठारी यांची नियुक्ती

**पुणे :** कर्नाटकच्या कलबुर्गी येथील रहिवासी असलेले अर्थतज्ज्ञ डॉ. श्रीप्रकाश प्रकाशचंद्र कोठारी, मॅसॅच्युसेट्स यांची अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या काळात अमेरिकेच्या ट्रेझरी विभागात आर्थिक धोरणाचे सहाय्यक सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. कोठारी यांना लिहिलेल्या पत्रात, व्हाईट हाऊसच्या ट्रेझरी डिपार्टमेंटचे संपर्क अधिकारी जिलियन लेन वायंट यांनी म्हटले आहे की, ही नियुक्ती अमेरिकन सिनेटच्या संमतीने आणि अमेरिकेच्या राष्ट्रपतींच्या मान्यतेने केली जात आहे.

डॉ. कोठारी यांनी अहमदाबादच्या बिर्ला इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी अँड सायन्सेसमधून अभियांत्रिकीची पदवी प्राप्त केली आहे. त्यानंतर त्यांनी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटमधून एमबीए पूर्ण केले. अमेरिकेतील मॅसॅच्युसेट्स इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजीच्या स्लोन स्कूल ऑफ मॅनेजमेंट येथे अकाऊंट आणि फायनान्स या विषयांचे प्राध्यापक म्हणून काम केले आहे.

## दिपमाला हातोले यांनी केले शाळा व कॉलेज मधील मुलांना आरोग्य विषयक समुपदेशन




दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि.४ :** महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटी मुंबई अंतर्गत Intensifide IEC Campain School Awareness Session २२०२५ -२६ हा कार्यक्रम MSACS कर्मचाऱ्यांमार्फत संपुर्ण महाराष्ट्रात राबविण्यात येत आहे. Adolescent Education Program हा शाळा व कॉलेजमध्ये MSACS समुपदेशकामार्फत राबविण्यात येत आहे किशोरवयीन मुलामुलींना शारीरिक बदल,भावनिक व मानसिक बदल,आहार व षोषण,स्वच्छता व वैयक्तिक काळजी ,मानसिक आरोग्य,व्यसनमुक्ती , लैंगिक आरोग्य जागरूकता , सामाजिक जबाबदारी याविषयी समुपदेशन दिपमाला हातोले आयसीटीसी समुपदेशक जिल्हा स्त्री रूग्णालय अकोला यांनी उस्मान आझाद के.एम.असगर हुसेन जुनियर कॉलेज व रूहअफ्जा खानम कन्या शाळा अकोला येथे विद्यार्थ्यांचे वेगवेगळे समुपदेशन सत्र घेतले.डॉ.आरती कुलवाल जिल्हा शल्यचिकित्सक अकोला ,डॉ.वंदना पटोकार वैद्यकीय अधीक्षक जिल्हा स्त्री रूग्णालय अकोला, श्री दर्शन जनईकर जिल्हा कार्यक्रम अधिकारी डापकु अकोला यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम घेण्यात आला. मि.ईम्तीयाज खान प्रिंसीपल उस्मान आझाद अजगर हुसेन जुनियर कॉलेज अकोला यांनी दिपमाला हातोले यांचे स्वागत केले.सर्व शिक्षक व प्राध्यापक यांचे सहकार्य लाभले .सत्रासाठी एकुण मुली ३३० व मुले २५० होते.

**निर्णय** आता सर्व भाविकांना समान वागणूक

# संत बाळूमामा देवालयातील व्हीआयपी दर्शन बंद

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**गारगोटी, दि. ४ :** कर्नाटक, आंध्र, गोवा, कोकण व महाराष्ट्रासह अन्य राज्यभरातील लाखो भाविकभक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या श्रीक्षेत्र आदमापूर (ता. भुदरगड) येथील संत बाळूमामा देवालय समितीने व्हीआयपी दर्शन बंद करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. बाळूमामाच्या समाधीचे पावित्र्य जपण्यासाठी गाभारा आणि त्यासमोरील विशेष दर्शन व्यवस्था आता बंद करण्यात आली आहे.

बाळू मामा दर्शनात सर्व भाविकांना समान लेखण्यात येणार आहे. त्यामुळे भाविकांना सुलभ आणि कमी वेळेत दर्शन होणार असल्याने रांगेतून बाळूमामांचे दर्शन घेणाऱ्या भाविकांमध्ये समाधानाचे वातावरण पसरले आहे. यापुढे सर्व भाविकांना रांगेतून थेट दर्शन, मुखदर्शन आणि पायरी दर्शन या तीन पर्यायांमधूनच दर्शन घ्यावे लागेल. दर्शन मंडपातून



सुरू होणाऱ्या रांगेतून भाविकांना बाळूमामांच्या समाधीचे व चांदीच्या पादुकांचे दर्शन घेता येईल. मंदिराच्या पूर्व बाजूने मुखदर्शन व पायरी दर्शनाची सोय केली असून, दोन्ही बाजूंना भंडारा लावण्याची व श्रीफळ, प्रसाद अर्पण करण्याची व्यवस्था आहे.

दरम्यान, सर्वच भाविकांना सुलभ आणि कमी वेळेत दर्शन घेता यावे, यासाठी नवनवीन योजना राबवण्याचा संकल्प असल्याची माहिती देवालय समितीचे अध्यक्ष धैर्यशील भोसले, कार्याध्यक्ष शामराव होडगे व सचिव रावसाहेब कोणकेरी व सदस्यांनी दिली.

श्रीक्षेत्र आदमापूर बाळूमामा यांच्या दर्शनासाठी दिवसेंदिवस गर्दी वाढत असून, रोज रांगा लागत आहेत. सर्व भाविकांना दर्शन सुलभपणे घेता यावे यासाठी दर्शन रांगासाठी उपाययोजना आखण्यात येत आहेत. व्हीआयपी दर्शन बंद निर्णय घेतला असला तरी अपवाद वगळता मंत्री, खासदार, जिल्हाधिकारी व तत्सम अधिकाऱ्यांना देवस्थान समितीने त्या-त्या प्रसंगानुसार दर्शन दिले जाण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच आदमापूर ग्रामस्थांना सकाळी सात ते दहापर्यंत विना रांग समोरून दर्शन दिले जाणार आहे. आदमापूर परिसरात काही ठिकाणी हॉटेल, दुकानासमोर बाळूमामांचे पुतळे ठेवण्यात येत आहेत. त्यामुळे श्री मामांच्या प्रतिमेला बाधा पोहचू शकते. श्री बाळूमामांच्या प्रतिमेचे पावित्र राखले जावे. त्यासाठी असे पुतळे ठेवण्यास देवस्थान समितीने बंदी घालण्याचा निर्णय ही घेतला आहे.

**जाहीर नोटीस**
**मा. उपविभागीय अधिकारी आकोट यांच्या न्यायालयात**

प्रकरण क्र. आर. टी.एस.५९/अडगाव बु. / २०२४-२५
चौ.ता.०९.०९.२०२५
नारायण पद्माकर पतकी - विरुद्ध श्रीमती प्रतिक्षा निलेश पतकी

अपिलार्थी नारायण पद्माकर पतकी यांनी गैरअपिलार्थी श्रीमती प्रतिज्ञा निलेश पतकी यांच्या विरुद्ध उपविभागीय अधिकारी अकोट (महसुल) यांच्या कार्यालयात अपिल प्रकरण क्र. आर. टी. एस. ५९/अडगाव बु./२०२४- २५ नुसार दाखल केले असुन दि. २७.०५. २०२५ व दि.०४.०८.२०२५ रोजी नोटीसेस काढल्या आहेत. परंतु आपण गैरअपिलार्थी श्रीमती प्रतिज्ञा निलेश पतकी रा. अडगाव बु या पत्त्यावर राहत नसल्यामुळे हजर झाल्या नाहीत. करीता आपणास मा. उपविभागीय अधिकारी आकोट यांच्या आदेशानुसार सदर जाहीर नोटीस द्वारे सुचीत करण्यात येते की, दि.०९.०९.२०२५ रोजी सदर अपिलामध्ये तारीख असुन आपण आपला जबाब नोंदविण्याकरीता हजर राहावे अन्यथा आपले काहीही म्हणने नाही असे समजुन प्रकरण निकाली काढण्यात येईल. करीता सदरची जाहीर नोटीस.

आदेशानुसार
उपविभागीय अधिकारी
आकोट (महसुल)

## युक्रेनशी थेट चर्चेसाठी पुढाकार

# पुतिन यांनी दिले झेलेन्स्कींशी चर्चेचे संकेत

**कीव/मॉस्को : दि.४ वृत्तसंस्था**

रशिया आणि युक्रेन युद्धाने सध्या भयकंर रुप धारण केले आहे. गेल्या तीन वर्षाहून अधिक काळ हे युद्ध सुरु आहे. रशिया सतत युक्रेनवर हल्ला करत आहे. एकीकडे शांतता चर्चांचे प्रयत्न सुरु आहेत, मात्र युद्ध थांबवण्याचे कोणतेही चिन्ह दिसत नाही. दरम्यान रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांनी शांततेने चर्चेचे संकेत दिले आहे. यामुळे युद्ध थांबवण्याची शक्यता असल्याची आशा तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

व्लादिमिर पुतिन यांनी युक्रेनला शांततेने आणि संतुलनाने चर्चा करण्यास तयार असल्याचे संकेत दिले आहे, पण गरज पडल्यास मॉस्को युद्ध बळजबरीने संपवेल असेही त्यांनी म्हटले आहे. त्यांनी युक्रेनचे अध्यक्ष वोलोडिमिर झेलेन्स्की यांच्याशी चर्चा करण्याची तयारी दर्शवली आहे. पुतिन यांचे हे विधान अशा वेळी आहे जेव्हा रशिया आणि चीनमध्ये गॅस पाइपलाइन करारावर स्वाक्षरी झाली आहे.

पुतिन यांनी पत्रकारांशी चर्चा करताना म्हटले आहे की, जर युक्रेनने शहाणपणे आणि संतुलन ठेवून



संघर्ष संपवण्यासाठी तोडगा काढला, तर आम्हीही त्यावर सहमत होऊ. पण असे न झाल्यास मॉस्को जबरदस्तीने युद्ध संपवण्यासाठी तयार आहे. याच वेळी पुतिन यांनी युद्ध संपवण्यासाठी ठेवल्याला अटींचे पुन्हा पुनरुच्चारण केले आहे.

पुतिन यांनी युक्रेनला पूर्व डोनेट्स्क भागातून सैन्य माघारी घेण्यास सांगितले आहे. गेल्या अनेक काळापासून रशिया आणि युक्रेनमध्ये डोनेट्स्क भाग वादग्रस्त मुद्दा राहिला आहे. इथून सैन्य माघारी घेतल्यास येथील कारवाया थांबवण्याचे रशियाने

### झेलेन्स्कींना भेटण्यस तयार पुतिन

**पुतिन यांनी युक्रेनचे अध्यक्ष झेलेन्स्की यांच्याशी समोरा-समोर चर्चा करण्यास सहमती दर्शवली आहे. पण चर्चा रशियाच्या अटींवर आणि शांततेने व्हावी असे त्यांनी म्हटले आहे. मात्र कीवने रशियाचा हा प्रस्ताव नाकारला आहे. मॉस्कोमध्ये बैठकीचे प्रस्तावाला युक्रेनच्या परराष्ट्र मंत्र्यांना नकार दिला आहे. तर झेलेनस्की यांनी अमेरिकेला आणि युरोपीय देशांना रशियावर कडक निर्बंध लादण्याची मागणी केली आहे. आतापर्यंतच्या अनेक चर्चा अयशस्वी झाल्या आहेत. यावेळी देखील चर्चा अपयशी ठरल्यास रशियावर निर्बंध लादले जाऊ शकतात. मात्र पुतिन यांनी यावेळी शांततेने युद्ध संपवू इच्छित असल्याचे म्हटले आहे. मात्र रशिया अटींपासून मागे हटणार नाही असेही त्यांनी म्हटले आहे.**

म्हटले आहे. पुतिन यांनी नाटोला पूर्वेकडील युक्रेन भागातील विस्तार थांबवण्याची मागणी केली आहे. तसेच युक्रेनला नाटोमध्ये सामील न करण्याचीही मागणी पुतिन यांनी केली आहे. युरोपमधील नाटोचे वाढते अस्तित्व रशियासाठी धोक्याचे पुतिन यांनी म्हटले आहे.

## पाकिस्तान, बांगलादेशातून आलेल्या अल्पसंख्याकांना दिलासा

**नवी दिल्ली : दि.४ वृत्तसंस्था**

अफगाणिस्तान, पाकिस्तान, बांगलादेशमधून ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत भारतात आलेल्या अल्पसंख्याकांना पारपत्र किंवा अन्य कागदपत्रांशिवाय भारतात वास्तव्य करता येईल. केंद्रीय गृह मंत्रालयाने याबाबतची घोषणा केली. नागरिकत्व दुरुस्ती कायद्यानुसार २०१४ पर्यंत भारतात या देशांतून आलेल्या धार्मिक अल्पसंख्याकांना नागरिकत्व देण्याची तरतूद होती. नुकत्याच लागू झालेल्या स्थलांतरित आणि परदेशी नागरिक कायद्यांतर्गत हा आदेश देण्यात आला. नागरिकत्व दुरुस्ती कायद्यानुसार (सीएए) अफगाणिस्तान, बांगलादेश, पाकिस्तानमध्ये होणाऱ्या धार्मिक छळामुळे २०१४ पर्यंत भारतात आलेल्या हिंदू, शीख, जैन, पारशी, बौद्ध, ख्रिश्चन धर्मीयांना भारताचे नागरिकत्व देण्याची तरतूद होती. आता ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आल्याचे केंद्रीय मंत्री सुकांता मुजुमदार यांनी स्पष्ट केले.

केंद्रीय गृह मंत्रालयाने जारी केलेल्या आदेशात म्हटले आहे, 'अफगाणिस्तान, बांगलादेश, पाकिस्तानमधील ज्या अल्पसंख्य हिंदू, शीख, बौद्ध, जैन, पारशी, ख्रिश्चन धर्मीयांना या देशांमधील धार्मिक छळांमुळे भारतात आश्रय घेणे भाग पडले आहे, जे ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत भारतात आले आहेत, त्यांना कुठल्याही आवश्यक कागदपत्रांशिवाय, पासपोर्ट किंवा इतर प्रवासी कागदत्रांशिवाय; तसेच ज्या कागदपत्रांची मुदत संपली आहे, अशा व्यक्तींना (भारतात राहण्यासाठी) व्हिसातून सूट देण्यात आली आहे.'

### महत्त्वाचे

## गुंडा कर ही सपा सरकारची परंपरा होती-योगी

गोरखपूर: पूर्व उत्तर प्रदेशच्या औद्योगिक विकासात आज(दि.४) एक अतिशय महत्त्वाचा दिवस होता. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी (गोरखपूर औद्योगिक विकास प्राधिकरण) क्षेत्रात २२५१ कोटी रुपयांच्या गुंतवणूक आणि विकास प्रकल्पाची पायाभरणी आणि उद्घाटन केले. गुंतवणूक प्रकल्पांमध्ये बहुराष्ट्रीय कंपनी कोका कोलाच्या बॉटलिंग प्लांटचा भूमिपूजन समारंभ आणि देशातील आघाडीची प्लास्टिक उत्पादन-पॅकेजिंग कंपनी टेक्नोप्लास्टच्या युनिटचे उद्घाटन यांचा समावेश आहे. यानिमित्त आयोजित समारंभात मुख्यमंत्र्यांनी सध्याच्या सरकारने निर्माण केलेल्या सुरक्षा वातावरणाचे वर्णन गुंतवणुकीची पायाभरणी म्हणून केले. या संदर्भात, त्यांनी मागील सरकारवर टीका केली आणि सांगितले की, व्यापारी आणि उद्योजकांकडून गुंडा कर वसूल करणे हा समाजवादी पक्षाच्या सरकारच्या संस्कारांचा एक भाग होता.प्लास्टिक पार्कमध्ये उपस्थित असलेल्या जनतेला संबोधित करताना मुख्यमंत्री म्हणाले की, गोरखपूर, पूर्व उत्तर प्रदेश आणि उत्तर प्रदेशमध्ये गुंतवणूक हे २०१७ पूर्वीचे स्वप्न होते.

## कल्याणमधील सैनिक चाळ भागातून दोन अल्पवयीन मुली बेपत्ता

**कल्याण :** कल्याण पश्चिमेतील अमरदीप वसाहती मधील सैनिक चाळ भागातील दोन १५ आणि १६ वर्षाच्या मुली मागील पाच दिवसांपासून बेपत्ता झाल्या आहेत. आपल्या मुलींना अज्ञात इसमाने फूस लावून पळवून नेली असल्याची तक्रार यामधील एका मुलीच्या आईने मानपाडा पोलीस ठाण्यात केली आहे.मानपाडा पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या २०२३ च्या कलम १३७(२) प्रमाणे गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. या मुलींच्या बेपत्ता होण्याप्रकरणी एका मुलीची आई आशाबाई गणपत काळे यांनी मानपाडा पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे. त्या सैनिक चाळीत राहतात. त्या लिंबू मिरची विक्री करण्याचा व्यवसाय करतात.हे कुटुंब मुळचे सांगली जिल्ह्यातील जत तालुक्यातील पारधी तांडा, पांडाढरी गावचे रहिवासी आहे. घरातील दोन अल्पवयीन पळून गेल्याने कुटुंबीयांमध्ये अस्वस्थता पसरली आहे. या मुलींचा कुटुंबीय आपले नातेवाईक, परिसरात शोध घेत आहेत. ३० ऑगस्ट रोजी दुपारी १२ वाजल्यापासून तक्रारदार यांची १५ वर्षाची मुलगी आणि तक्रारदार यांच्या नातेवाईक महिलेची १६ वर्षाची मुलगी बेपत्ता झाल्या आहेत.

## मुंबईच्या इसमाकडून ९३ लाखाची फसवणूक

**डोंबिवली :** आपणास व्यवसायासाठी पैशाची खूप गरज आहे. मी तुमच्या नावावर कर्ज काढतो. ते कर्जाचे हप्ते मी नियमित वेळेत फेडतो. असे नवी मुंबईतील ऐरोली येथे राहणाऱ्या एका इसमाने डोंबिवलीतील रहिवासी असलेल्या नोकरदार महिलेला सांगितले. या महिलेची कर्जासाठी आवश्यक असलेली कागदपत्रे घेऊन त्या आधारे इसमाने वित्तीय संस्थेतून ९३ लाख ६० हजार ४४९ रूपयांचे कर्ज काढले. त्यानंतर या कर्जातील काही रक्कम फेडून उर्वरित रक्कम फेडण्यास नकार दिला.महिलेच्या नावे घेतलेला रकमेचा अपहार केला म्हणून महिलेने डोंबिवलीतील विष्णुनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. ८ एप्रिल २०२२ ते १६ एप्रिल २०२२ या कालावधीत हा फसवणुकीचा प्रकार घडला आहे. हा प्रकार डोंबिवली पश्चिमेतील शास्त्रीनगर रुग्णालयाजवळील वाशी बस थांब्याजवळील मंगल सोसायटीत घडला आहे.योगेश सुधाकर नाईक असे फसवणूक करणाऱ्या इसमाचे नाव आहे.

## पंजाब, हरियाणात पूरस्थिती कायम, छत्तीसगडमध्ये अचानक आलेल्या पुरामुळे चौघांचा मृत्यू



**चंडीगड : दि.४ वृत्तसंस्था**

देशाच्या उत्तर आणि वायव्य भागाबरोबरच मध्य भागातही बुधवारी मुसळधार पाऊस झाला. पूरग्रस्त पंजाब आणि हरियाणामध्ये गेल्या काही आठवड्यांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे मोठा भूभाग पाण्याखाली गेला असून जनजीवन विस्कळीत झाले आहे. पंजाबमध्ये ७ सप्टेंबरपर्यंत सर्व शैक्षणिक संस्था बंद ठेवण्यात आल्या आहेत.

पंजाबमधील अमृतसर, लुधियाना, पतियाळा, पठाणकोट, गुरसादपूर आणि मोहाली या जिल्ह्यांमध्ये बुधवारी सकाळी ८.३० वाजता संपलेल्या २४ तासांमध्ये मुसळधार पाऊस झाला. तर हरियाणाच्या अंबालामध्ये या कालावधीत १०५.६ मिमी इतका पाऊस झाला. त्याशिवाय हिसार, कर्नाल, नारनौल, रोहतक, सिरसा, फरीदाबाद आणि पंचकुला या जिल्ह्यांना पावसाने झोडपून काढले आहे. दोन्ही राज्यांची राजधानी असलेल्या चंडीगडमध्ये ६३.६ मिमी पाऊस झाला.हरियाणातील घग्गर, मार्कंडा आणि टांगरी या नद्यांच्या पाण्याची पातळी वाढत आहे. पंजाबच्या सतलज, बियास आणि रावी या नद्यांसह हंगामी उपनद्यांची पातळी वाढल्यामुळे त्या राज्यात मोठ्या प्रमाणात पूर आला आहे. पंजाबमध्ये एनडीआरएफ, लष्कर, बीएसएफ, पोलीस आणि जिल्हानिहाय प्रशासन यांच्यामार्फत पूरग्रस्त भागांमध्ये मदत व बचावकार्य सुरू आहे.

## मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पातील नववा स्टील पूल उभा

**मुंबई : दि.४ वृत्तसंस्था**

मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पासाठी २०० मीटर लांबीच्या स्टील पुलाचा दुसरा १०० मीटरचा टप्पा गुजरातमधील नाडियादजवळील राष्ट्रीय महामार्ग ४८ (एनएच-४८) वर यशस्वीरित्या उभारण्यात आला आहे. गुजरातमध्ये नियोजित १७ स्टील पुलांपैकी हा प्रकल्पासाठी पूर्ण झालेला नववा स्टील पूल आहे.दिल्ली, मुंबई आणि चेन्नईला जोडणारा सहा पदरी राष्ट्रीय महामार्ग ४८ हा सर्वात वर्दळीच्या महामार्गांपैकी एक आहे. पुलाचा दुसरा टप्पा महामार्गावर तीन पदर ओलांडून एका टोकापासून १०० मीटर सरकवून उभारण्यात आला आहे.

## पावसाने पाकिस्तानमध्ये हाहाकार; ८८३ जणांचा मृत्यू, शेकडो गावे पाण्याखाली

**इस्लामाबाद : दि.४ वृत्तसंस्था**

पाकिस्तान सध्या भीषण नैसर्गिक आपत्तीशी झुंजतो आहे. जून महिन्याच्या अखेरीपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसाने संपूर्ण देशाला अक्षरशः कोंडीत पकडले आहे. सतत पडणाऱ्या या मुसळधार पावसामुळे नद्या दुथडी भरून वाहू लागल्या असून अनेक जिल्ह्यांत पूरस्थिती निर्माण झाली आहे. राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या आकडेवारीनुसार, आतापर्यंत ८८३ नागरिकांना प्राण गमवावे लागले आहेत, तर १,२०० हून अधिक जण जखमी झाले आहेत.पाकिस्तानातील खैबर-पख्तूनख्वा प्रांत हा या आपत्तीचा सर्वाधिक बळी ठरला आहे. येथे एकट्याच ४८८ नागरिकांचा मृत्यू झाला असून ३६० हून अधिक जखमी झाले आहेत. डोंगराळ भागात नद्यांना आलेल्या पुरामुळे घरे वाहून गेली, पूल कोसळले आणि डोंगरांवर भूस्खलनाची भीतीही वाढली आहे. स्थानिक माध्यमांच्या वृत्तानुसार, फक्त बुधवारी रात्री उशिराच झालेल्या घटनांमध्ये दोन मुलांचा मृत्यू झाला. यात



एक मुलगा इस्लामाबादमध्ये तर दुसरा पाकव्याप्त काश्मीरमध्ये आपत्तीचा बळी ठरला.पाकिस्तान हवामान विभागाने इशारा दिला आहे की वरच्या भागात अजूनही मुसळधार पाऊस सुरू आहे. त्यामुळे लाहोर, गुजरांवाला, रावळपिंडी आणि इस्लामाबाद या शहरांत शहरी पूर येण्याचा गंभीर धोका निर्माण झाला आहे.पंजाबमधील गंडा सिंग वाला भागातील सतलज नदीची पाणीपातळी विक्रमी उंचीवर पोहोचली आहे. त्याचबरोबर चिनाब, रावी आणि सतलज नद्यांचा संगम असलेल्या पंजनाद परिसरात पुढील काही दिवसांत पूरस्थिती आणखी भीषण होऊ शकते.

## विधेयकांचे भवितव्य राज्यपालांच्या मर्जीवर नसावे; पश्चिम बंगाल सरकारचा सर्वोच्च न्यायालयात युक्तिवाद

**नवी दिल्ली : दि.४ वृत्तसंस्था**

राज्याच्या विधानसभांनी संमत केलेली विधेयके ही जनतेच्या इच्छांचे स्वरूप असते, त्याचे भवितव्य राज्यपाल आणि राष्ट्रपतींच्या मर्जी आणि लहरींवर अवलंबून असू नये, असा युक्तिवाद पश्चिम बंगाल सरकारने बुधवारी सर्वोच्च न्यायालयात केला. राज्यपाल आणि राष्ट्रपती हे कार्यकारी असून त्यांना वैधानिक प्रक्रियेत हस्तक्षेप करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे, असा मुद्दा राज्य सरकारने घटनापीठासमोर उपस्थित केला.विधानसभांनी मंजूर केलेल्या विधेयकांना मंजुरी देण्यासाठी राज्यपाल आणि राष्ट्रपतींसाठी कालमर्यादा असावी का आणि त्याबाबतची कार्यपद्धती याबाबत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी विचारलेल्या १४ प्रश्नांसंबंधी बुधवारीही घटनापीठासमोर सुनावणी झाली. सरन्यायाधीशांसह न्या. सूर्य कांत, न्या. विक्रम नाथ, न्या. पी. एस. नरसिंह आणि न्या. अतुल शरदचंद्र चांदुरकर यांचा या घटनापीठामध्ये समावेश आहे.

''सभागृहांनी मंजूर केलेली विधेयके न्यायपालिकेच्या कार्यकक्षेत येतात. मात्र, राज्यपाल सार्वभौम जनतेच्या इच्छेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करू शकत नाहीत, तसेच ते विधेयकांच्या वैधानिक गुणवत्तेची तपासणीही करू शकत नाहीत,'' असे पश्चिम बंगाल सरकारची बाजू मांडणारे ज्येष्ठ वकील कपिल सिबल यांनी घटनापीठाला सांगितले.

## पुन्हा एकदा भूकंपाने हादरला अफगाणिस्तान; परिस्थिती अधिक बिकट

**काबूल : दि.४ वृत्तसंस्था**

अफगाणिस्तान नुकत्याच झालेल्या भूकंपाच्या झटक्यातून सावरत असताना पुन्हा एक झटका बसला आहे. पुन्हा एकदा भूकंपाच्या झटक्यांना अफगाणिस्तान हादरला आहे. गुरुवारी (४ सप्टेंबर) अफगाणिस्तानमध्ये ४.८ रिश्टर स्केलचा भूकंप झाला. राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्राने दिलेल्या माहितीनुसार, या भूकंपाची खोली १३५ किलोमीटर खोल होती. सध्या या दुसऱ्या भूकंपामुळे कोणती जीवितहानी झाल्याची माहिती मिळालेली नाही.

भारतीय वेळेनुसार, सकाळ १०.



४० वाजता हा भूंकप झाला. यापूर्वी बुधवारी(३ सप्टेंबर) रात्री उशिरा ४.३ रिश्टर स्केलचा भूकंप झाला होता. तर यापूर्वी रविवारी ३१ ऑगस्ट रोजी ६.० तीव्रतेचा भूंकप झाला होता. सध्या या भूकंपामुळे अफगाणिस्तानमधील परिस्थिती अत्यंत बिकट झाली आहे. आतापर्यंत १४११ लोकांचा मृत्यू झाला आहे. तसेच २ हजाराहून अधिक लोका जखमी झाले आहेत. शिवाय अनेक लोक इमारतींच्या ढिगाऱ्याखाली अडकले आहेत.

कमी तीव्रतेच्या भूंकपामुळे जास्त धोकादायक परिस्थिती निर्माण झाली आहे. कारण कमी तीव्रतेच्या भूकंपामुळे जमिनीवर जास्त कंपने होतात. यामुळे इमारतींना अधिक नुकसान होत आहे आणि जीवितहानीची शक्यता वाढत आहे.

अफगाणिस्तानमधील या भूंकपाचा सर्वाधिक परिणाम कुनार आणि नांगरहार प्रांतामध्ये झाला आहे. अनेक लोक मृत्यूमुखी पडले आहेत, तसचे ३००० लोक जखमी झाले आहेत.

सध्या ब्रिटन, चीन आणि भारताकडून अफगाणिस्तानला मदत पुरवली जात आहे. भारताने १००० कुटुंबासाठी तात्परुते तंबु उभारले आहे. तसेच अन्नाधान्याचा साठा पाठवला आहे. अजूनही मदत पाठवली जात आहे. ब्रिटनने देखील आपत्कालीन सेवांच्या आणि आरोग्य सेवांची १.३५ दशलक्ष डॉलर्सची मदत पुरवली आहे.

### शोध

### जर्मनीच्या गॉटिंगेन विद्यापीठाच्या शास्त्रज्ञांच्या संशोधनात खुलासा

# पृथ्वीच्या गाभ्यात सुमारे ३० अब्ज टन सोने असल्याचा अंदाज

**मॉस्को/नवी दिल्ली , दि.४ वृत्तसंस्था**

आपण अनेकदा ऐकलं असेल की पृथ्वी अमूल्य संपत्तीने भरलेली आहे. समुद्र, डोंगर, खनिजसंपत्ती आणि धातू यांचा प्रचंड साठा पृथ्वीच्या गर्भात दडलेला आहे. परंतु तुम्हाला माहिती आहे का की आपल्या पृथ्वीच्या गाभ्यात अब्जावधी टन सोन्याचा खजिना लपलेला आहे? आणि आश्चर्य म्हणजे ज्वालामुखीच्या उद्रेकावेळी या सोन्याचे अगदी सूक्ष्म कण पृथ्वीच्या पृष्ठभागावर पोहोचतात. हा धक्कादायक खुलासा जर्मनीच्या गॉटिंगेन विद्यापीठातील शास्त्रज्ञांनी केला असून, त्यांच्या संशोधनाने विज्ञानविश्वात खळबळ माजवली आहे. संशोधनानुसार, पृथ्वीच्या गाभ्यात सुमारे ३० अब्ज टन सोने असल्याचा अंदाज आहे. या सोन्याची किंमत जवळपास २.७७ ट्रिलियन युरो इतकी प्रचंड आहे. मात्र, या खजिन्यापर्यंत माणसाचा हात पोहोचणे सध्या अशक्यच आहे. कारण पृथ्वीचा गाभा हा सर्वात खोल आणि कठीण स्तर आहे. यातून फक्त अगदी लहानसा अंशच बाहेर येतो. जणू काही पृथ्वी आपल्या गाभ्यातील संपत्तीची सूक्ष्म झलक



आपल्याला दाखवत असते.

शास्त्रज्ञांच्या मते, जेव्हा ज्वालामुखीचा उद्रेक होतो, तेव्हा आतल्या थरातून बाहेर येणाऱ्या लाव्यासोबत सोने, रुथेनियम आणि इतर मौल्यवान धातूंचे सूक्ष्म कण बाहेर पडतात. याच संशोधनासाठी गॉटिंगेन विद्यापीठातील वैज्ञानिकांनी हवाईतील किलौथा आणि लोइही ज्वालामुखीच्या उद्रेकानंतर बाहेर पडलेल्या लाव्याचा सखोल अभ्यास केला. त्यात सोन्याचे आणि रुथेनियमचे सूक्ष्म कण सापडले. म्हणजेच ज्वालामुखी हा पृथ्वीच्या गाभ्यातून बाहेर पडणाऱ्या मौल्यवान धातूंचा खरा दरवाजा ठरतो.संशोधकांनी महासागरातील बेटांवर आढळणाऱ्या बेसाल्ट खडकांचा अभ्यास केला. हे खडक पृथ्वीच्या गर्भातून वर येणाऱ्या गरम धातूच्या थरांपासून बनलेले असतात. या खडकांमध्ये रुथेनियम धातू आढळला, जो पृथ्वीच्या गाभ्याचा थेट पुरावा मानला जातो. लाव्यामध्ये आढळणाऱ्या १०० समस्थानिकांची उच्च पातळी हे दर्शवते की पृथ्वीच्या गाभ्याचा ०.३% पेक्षा कमी भाग पृष्ठभागापर्यंत पोहोचतो. पूर्वी शास्त्रज्ञांना वाटत होतं की पृथ्वीचा गाभा पूर्णपणे वेगळा आहे आणि त्याचा वरच्या थरांशी काहीही संबंध नाही. पण या संशोधनामुळे हा समज चुकीचा ठरला आहे.आजच्या घडीला पृथ्वीच्या गाभ्यातून थेट सोने किंवा इतर धातू काढणं तंत्रज्ञानाच्या मर्यादांमुळे शक्य नाही. गाभ्यापर्यंत पोहोचणे म्हणजे मानवी इतिहासातील सर्वात मोठे आव्हान. पण या संशोधनामुळे आपल्याला पृथ्वीची रचना, तिच्यातील नैसर्गिक प्रक्रिया आणि अब्जावधी वर्षांपासून सुरू असलेला निसर्गाचा 'सोनेरी खेळ' समजून घेण्याची नवी दिशा मिळाली आहे.

## हिंसाचारानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी पहिल्यांदाच देणार मणिपूरला भेट?

**इम्फाळ : दि.४ वृत्तसंस्था**

मणिपूरमध्ये मोठ्या प्रमाणात हिंसाचार झाला होता. या हिंसाचाराच्या उद्रेकानंतर दोन वर्षांहून अधिक काळानंतर देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे आता मणिपूरला भेट देणार असल्याची माहिती समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनसार, पंतप्रधान १३-१४ सप्टेंबर रोजी आसाम आणि मिझोरामला भेट देणार आहेत. या काळात ते मणिपूरलाही भेट देऊ शकतात, असे सांगण्यात आले आहे. मात्र, याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही.

पंतप्रधानांचा मणिपूर दौरा लवकरच होणार आहे. अंतिम घोषणा करण्यापूर्वी अनेक घटक लक्षात ठेवावे लागतील. त्यामुळे सध्या त्यांच्या दौऱ्याची नेमकी तारीख सांगितली गेली नाही. मात्र, ते मणिपूरला भेट देणार असल्याचे स्पष्ट होत आहे. विरोधी पक्षांनी देखील अनेकदा पंतप्रधान मोदींना मणिपूरला न गेल्याबद्दल धारेवर धरले होते. यावरून टीकाटिप्पणी वेळोवेळी केली जात होती. असे असताना आता पंतप्रधान मोदी मणिपूरला भेट देतील, अशी माहिती सध्या दिली जात आहे.

मणिपूर येथील मैतेई आणि कुकी समाजातील बांधवांमध्ये



संघर्ष सुरू होता. याच दरम्यान मोठ्या प्रमाणात हिंसाचारही झाला. त्यापासूनच विरोधक मोदी सरकारला कोंडीत पकडत आहेत. या संघर्षात २५० हून अधिक लोक मारले गेले आणि ५७००० हून अधिक लोक विस्थापित झाले. त्यानंतर, याचवर्षी १३ फेब्रुवारीपासून राज्यात राष्ट्रपती राजवट लागू केली गेली. असे केल्याने आता तुलनेने येथील सामान्य परिस्थिती आहे.

दरम्यान, पंतप्रधान मिझोरमहून इम्फाळला जाणार आहेत, जिथे ते १३ सप्टेंबर रोजी रेल्वे प्रकल्पाचे उद्घाटन करतील.

इम्फाळस्थित एका संस्थेचे सल्लागार जितेंद्र निंगोम्बा म्हणाले की, मोदींच्या भेटीमुळे शांतता किंवा तोडगा निघेल अशी आशा आहे. अलीकडच्या काही महिन्यांत, मणिपूरमधील राष्ट्रपती राजवट संपवून पुन्हा सरकार स्थापन करण्याची मागणी एनडीएच्या आमदारांकडून वाढत आहे. ही मागणी करणाऱ्या नेत्यांमध्ये भाजपचे माजी मुख्यमंत्री एन. बिरेन सिंग आणि त्यांच्या जवळचे आमदारांचा समावेश आहे.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि **मुख्य संपादक तिक्ष्णगत सुगत वाघमारे** यांनी भास्कर प्रिंटिंग प्रेस एन.एच.६ बोरगाव मंजू येथे मुद्रित करून दै.अजिंक्य भारत, सुगत भवन,बारा ज्योतिर्लिंग मंदिराजवळ, रणपिसेनगर, अकोला येथे प्रकाशित केले.* **कार्यकारी संपादक-रूबेन डी.वाळके (*पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची)** आरएनआय-MAHMAR/2009/35271

# शिक्षक दिन : ज्ञान, संस्कार आणि कृतज्ञतेचा उत्सव




दिन विशेष

डॉ.सुगत वाघमारे
उद्योगरत्न, अकोला.


भारतीय संस्कृतीत ''गुरु'' आणि ''शिक्षक'' यांना देवासमान मानले जाते. कारण आई-वडील जन्म देतात, पण शिक्षक जीवन घडवतात. आपलं आयुष्य उज्ज्वल करण्यासाठी शिक्षक जे योगदान देतात, त्याला शब्दात मोजता येत नाही. त्यांच्या त्याग, कष्ट आणि समर्पणाचा गौरव करण्यासाठी आपण दरवर्षी ५ सप्टेंबरला ''शिक्षक दिन'' साजरा करतो.

**शिक्षक दिनाचे ऐतिहासिक महत्त्व**

५ सप्टेंबर हा दिवस डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिन आहे. ते भारताचे महान तत्त्वज्ञ, आचार्य, शिक्षणतज्ज्ञ आणि राष्ट्रपती होते. एकदा त्यांच्या शिष्यांनी त्यांचा वाढदिवस साजरा करायची परवानगी मागितली, तेव्हा त्यांनी नम्रतेने सांगितले माझा वाढदिवस साजरा करण्यापेक्षा जर तो शिक्षक दिन म्हणून साजरा केला, तर मला अधिक आनंद होईल. तेव्हापासून भारतात ५ सप्टेंबर शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो.

**शिक्षकांचे समाजातील स्थान :** शिक्षक हे समाजाचे शिल्पकार असतात. विद्यार्थी म्हणजे कच्चं मातीचं भांडं, आणि शिक्षक म्हणजे कुंभार. योग्य घडवले तर भांडं सुंदर होतं, चुकीचं घडवलं तर आयुष्य मोडतं. शिक्षक फक्त पुस्तकाचं ज्ञान देत नाहीत, तर संस्कार, नैतिकता, प्रामाणिकपणा, आणि जीवनमूल्ये देतात. एक चांगला शिक्षक म्हणजे एक मार्गदर्शक, प्रेरणादायी मित्र, आणि जीवनाचा आधार.

**शिक्षकाचे गुणधर्म :**

शिक्षक कसा असावा? ज्ञानसमृद्ध सतत शिकणारा आणि विद्यार्थ्यांना नवनवीन ज्ञान देणारा. संयमी व करुणामय प्रत्येक विद्यार्थ्याला प्रेमाने घडवणारा. प्रेरणादायी स्वतःच्या आचरणातून विद्यार्थ्यांना योग्य दिशा देणारा. दृष्टीकोन असलेला फक्त आज नाही तर विद्यार्थ्याच्या भविष्यासाठी विचार करणारा.

शिकवणारा नव्हे, तर घडवणारा फक्त धडा नाही, तर जीवन शिकवणारा.

**विद्यार्थी आणि शिक्षक नातं :**

विद्यार्थ्याच्या आयुष्यात सर्वात पवित्र नातं म्हणजे ''गुरु-शिष्य नातं''. हे नातं विश्वास, आदर, प्रेम आणि कृतज्ञतेवर आधारलेले असते. शिष्याने गुरुंचे मार्गदर्शन मान्य करून त्यातून स्वतःची वाट तयार केली, तर तो विद्यार्थी कधीही हरत नाही.

**शिक्षकांची भूमिका**

: आजच्या युगात मोबाईल, इंटरनेट आणि तंत्रज्ञानामुळे माहिती सहज उपलब्ध आहे. पण माहिती आणि शिक्षण यात फरक आहे. माहिती देणारे साधनं असतात, पण शिक्षण देणारा शिक्षकच असतो. शिक्षक विद्यार्थ्याला केवळ करिअरसाठी नव्हे, तर सुसंस्कारित नागरिक घडवतो. आजच्या पिढीला योग्य मूल्यं शिकवून समाजाची घडी सांभाळण्याची जबाबदारी फक्त शिक्षकांवर आहे.

**शिक्षक दिन कसा साजरा करावा?**

शाळा व महाविद्यालयांत विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांचा सन्मान करावा. सांस्कृतिक कार्यक्रम, नाटकं, भाषणं यांद्वारे शिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त करावी. विद्यार्थ्यांनी या दिवशी ''गुरुंचा आशीर्वाद घेऊन नवा संकल्प'' करावा. सोशल मीडियावर शिक्षकांना कृतज्ञतेचा संदेश द्यावा. ''गुरु म्हणजे फक्त धडा शिकवणारा नाही, तर जीवन जगायला शिकवणारा असतो. ज्ञान देऊन संपत्ती वाढवणारा नाही, तर संस्कार देऊन आत्मा उंचावणारा असतो.

**निष्कर्ष :** शिक्षक दिन म्हणजे फक्त एक कार्यक्रम नाही, तर हा दिवस आहे आपल्या आयुष्यातील सर्व गुरुंप्रती कृतज्ञतेचा, आदराचा आणि वंदनेचा. चला, या दिवशी आपण ठरवू गुरुंच्या शिकवणीने जीवन समृद्ध करायचं आणि त्यांच्या आदर्शांनी समाज सुंदर घडवायचा!

**शिक्षक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!**




# आपली शिक्षणव्यवस्था फक्त नोकरीसाठी की जीवन घडविण्यासाठी?




प्रासंगिक

प्रा. वैभव कनोजे
अकोला


प्रस्तावना एक वास्तव दृश्य एकदा मी एका कॉलेजमध्ये व्याख्यानाला गेलो. विषय होता ''शिक्षणाचं खरं उद्दिष्ट''. मी विद्यार्थ्यांना विचारलं ''तुमचं पुढचं ध्येय काय आहे?''

अर्ध्याहून जास्त विद्यार्थ्यांनी उत्तर दिलं ''सरकारी नोकरी हवी आहे.''

काही म्हणाले ''कुठलीही चांगली पगाराची नोकरी.'' मी पुढचा प्रश्न विचारला ''आणि देशासाठी काय करणार?''

शांतता कोणाचं उत्तर नव्हतं. हे दृश्य मला जाणीव करून देत होतं. आज आपली शिक्षणव्यवस्था अशी झाली आहे की जणू ती फक्त ''क्लर्क'' तयार करण्यासाठी आहे, नेते, संशोधक किंवा समाजनिर्माते नव्हे. थोडा इतिहास मॅकॉलेचं शिक्षण धोरण १८३५ मध्ये लॉर्ड मॅकॉलेने ब्रिटिश संसदेत भाषण केलं. त्याचं उद्दिष्ट स्पष्ट होतं ''आम्हाला भारतात अशी पिढी तयार करायची आहे जी रक्ताने आणि रंगाने भारतीय असेल, पण विचार, भाषा आणि वर्तनाने इंग्रज असेल.'' त्यासाठी शिक्षणव्यवस्था रचली गेली विचार न करणारे, फक्त आदेश पाळणारे लोक तयार करणं नोकरीसाठी, विशेषतः सरकारी खात्यांसाठी, क्लर्क आणि सहाय्यक तयार करणं परंपरा, संस्कृती, आत्मभान यांना बाजूला सारणं आज २०२५ मध्येही, अनेक बाबतीत आपण त्या जुन्या चौकटीत अडकून आहोत.

आजची समस्या शिक्षण कुठे अडकलेलं आहे? नोकरीपुरतं ध्येय विद्यार्थ्यांच्या स्वप्नात नोकरी ही अंतिम रेषा आहे. नवोन्मेष, उद्योजकता, शोधकार्य या गोष्टी धूसर आहेत. संस्कार आणि राष्ट्रप्रेमाचं दुर्लक्ष इतिहासात शिवाजी महाराज, नेताजी, भगतसिंग शिकवले जातात, पण त्यांचा बाणा आणि त्याग मनात रुजवला जात नाही. कौशल्यांचा अभाव संवाद कौशल्य समस्या सोडवण्याची क्षमता टीमवर्क बदलत्या काळात जुळवून घेण्याची क्षमता हे सर्व विषय पुस्तकात नसतात, आणि नोकरीच्या मुलाखतीत त्यांची उणीव जाणवते. समस्या का गंभीर आहे? (उदाहरण) एका मुलाने १२वी पूर्ण केली. मार्क्स चांगले, पण हाताला कोणतंही कौशल्य नाही. नोकरी मिळवण्यासाठी अर्ज केला, पण स्पर्धा इतकी जास्त की कौशल्याशिवाय कोणी संधी देईना. अखेरीस त्याला नोकरी न मिळाल्याने निराशा, नैराश्य आणि दोषारोपांची साखळी सुरू झाली. ही कथा हजारो युवकांची आहे.

**उपाय शिक्षणात बदलाची पद्धत**

१. कौशल्य + संस्कार आधारित अभ्यासक्रम कौशल्य वर्ग कोडिंग, डिजिटल मार्केटिंग, सर्जनशील लेखन, शेती तंत्रज्ञान मूल्य शिक्षण प्रामाणिकपणा, जबाबदारी, करुणा, टीमवर्क उदाहरण : फिनलंडची शिक्षण पद्धती कमी अभ्यासक्रम, जास्त प्रत्यक्ष अनुभव.

२. राष्ट्रप्रेम जागवणारे उपक्रम विद्यार्थ्यांना सैनिकी छावण्या, ऐतिहासिक स्थळं भेट स्वातंत्र्यसैनिकांशी संवाद ''देश माझा आहे, मी देशाचा आहे'' ही भावना रुजवणारे प्रकल्प

३. उद्योजकता आणि संशोधन प्रोत्साहन स्टार्टअप स्पर्धा ग्रामीण समस्यांचं तांत्रिक निराकरण कॉलेजमध्ये ''इनोव्हेशन लॅब''

४. व्यक्तिमत्त्व विकासावर भर मुलांना फक्त गुण मिळवायला नव्हे, तर नेतृत्व घ्यायला शिकवणं पब्लिक स्पीकिंग आणि क्रिटिकल थिंकिंग हा अभ्यासक्रमात समावेश प्रेरणादायी उदाहरण डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम गरीब कुटुंबातून आले, पण शिक्षण फक्त नोकरीसाठी नव्हतं. त्यांनी विज्ञान, संशोधन आणि देशसेवा हेच ध्येय ठेवलं.

त्यांच्या जीवनातून आपण शिकलो पाहिजे ''नोकरी मिळणं म्हणजे शेवट नव्हे, समाजासाठी काहीतरी निर्माण करणं म्हणजे खरी यशस्वीता.''

**निष्कर्ष :** आज शिक्षण फक्त नोकरीसाठी आहे, पण ते जीवनासाठी असायला हवं.



विद्यार्थी जर कौशल्यवान, संस्कारयुक्त आणि राष्ट्रप्रेमी झाले, तर ते नोकरीसुद्धा मिळवतील आणि देशालाही उंच नेतील.

**लक्षात ठेवा :** ''शिक्षणाचं खरं काम म्हणजे माणूस घडवणं, फक्त कर्मचारी नव्हे.''

# शिक्षक दिन माझ्या आयुष्याची घडण...




चर्चा

रोशनी दाते डोंगरवार
९४०५५१९७९०


बालपण म्हणजे निरागसता, खेळ आणि स्वप्नं. पण त्या निरागसतेतही शिकण्याची एक अनोखी ओढ असते. मला आठवतं, लहानपणी शाळेत जाताना मनात एकाच वेळी आनंद आणि भीती दोन्ही असायचे. आनंद होता मित्रमैत्रिणींसोबत खेळण्याचा, तर भीती होती पुस्तकांची आणि विशेषतः गणित आणि इंग्रजीच्या तासाचा. प्रत्येक वेळी पाटीवर नवीन उदाहरण आलं की माझं डोकंच फिरून जायचं. मला वाटायचं हे माझ्याकडून कधीच होणार नाही. मी इंग्रजी आणि गणित या विषयांना खुप घाबरायची. पण त्या वेळी माझ्या शिक्षकाने माझ्यावर ठेवलेला विश्वासच माझ्या आयुष्याचा महत्वाचा भाग ठरला. ते म्हणायचे अवघड गणित नसतं तर अवघड आपला विचार असतो. ''पूजा तू जर ठरवलंस की जमेल तर काहीही अवघड नाही बाळा.'' त्यांच्या अश्या वाक्याने माझ्यात नवा आत्मविश्वास निर्माण केला. त्यांनी माझ्या चुका कधी हसून झाकल्या नाहीत, पण संयमाने समजावल्या. रोज थोडं शिकवून, रोज थोडा धीर देऊन त्यांनी माझ्या मनातील भीती नाहीशी केली. आणि आज जेव्हा मी आयुष्यातील मोठ्या आव्हानांना सामोरी जाते आहे तेव्हा हाच धडा माझ्या मनात घुमत राहतो. भीती समस्येपेक्षा मोठी असते, ती दूर झाली की काहीही शक्य होतं.

असं म्हणतात की शाळा माणसाला वाचायला, लिहायला शिकवते; पण खरे शिक्षक माणसाला विचार करायला शिकवतात. हेच मला महाविद्यालयात जाऊन कळलं. सोशल वर्कचं शिक्षण घेताना सुरुवातीला मी सगळं पाठ्य पुस्तकापुरतं मर्यादित समजत होती. अभ्यास म्हणजे गाईड्स वाचणे,परीक्षेत तेच लिहिणं आणि निकालाची वाट पाहणं एवढंच वाटायचं. पण माझ्या सगळ्या प्राध्यापकांनी मला शिकवण दिली की खरेखुरे समाजकार्य पुस्तकात नसून, ते लोकांच्या आयुष्यात असते. ते समजून घेणं म्हणजे खर शिक्षण असतं... तेव्हा पासून शिक्षण आणि शिक्षकांबद्दल माझ्या मनात खुप आदर आणि एक वेगळी भावना निर्माण झाली. या वाक्याने माझं आयुष्यच बदलून टाकलं. आता पाठ्यक्रम (सिल्याबस) हा फक्त एक अकॅडमिक टास्क उरला नाही, तर तो माणसांना समजून घेण्याचा प्रवास बनला. गावोगाव जाऊन लोकांच्या समस्या ऐकताना, त्यांच्या नजरेतून जग पाहताना मला समजलं की शिक्षण म्हणजे फक्त डिग्री मिळवणं नाही, तर मनुष्यत्व समजून घेणं आहे.

आज जेव्हा मी माझ्या प्रवासाकडे मागे वळून पाहते, तेव्हा अनेक शिक्षकांची आठवण एकामागून एक मनात येते. कुणी मला शिस्त शिकवली, कुणी संयम. कुणी माझ्या चुका दाखवल्या, तर कुणी माझ्या क्षमतेवर विश्वास ठेवला आणि मला समाजा प्रति काही तरी करण्याची इच्छा शक्ति मिळवून दिली. माझे एक सर नेहमी सांगतात ''पूजा तु स्वतः तील उणीवांवरती काम कर आणि स्व:तला अजून परिपूर्ण कर. याच मार्गाने तुला झपाट्याने पुढे जाता येईल. त्यांच्या या वाक्याने माझ्या विचारांना इतका खोलवर स्पर्श केला की आज ते माझ्या आयुष्याचं ब्रीदवाक्यच बनलं आहे.

आता मी नेहमी स्व:ता वरती काम करायला तत्पर असते. शिक्षकांचं नातं खरं तर अनोखं असतं. आई, वडील आपल्याला जन्म देतात, पण शिक्षक आपल्याला विचार करण्यास प्रवृत्त करतात. आपलं स्वतंत्र व्यक्तिमत्त्व घडविण्यास मदत करतात. त्यांच्या प्रत्येक शब्दात, कृतीत एक बीज असते, जे हळूहळू आपल्या मनात रुजत जाते आणि आपलं आयुष्य घडवत जाते. आज जेव्हा मी शिक्षक दिनाच्या दिवशी त्यांना आठवते, तेव्हा माझ्या डोळ्यासमोर केवळ वर्गातील क्षणच येत नाहीत, तर आयुष्यभरासाठी मार्गदर्शन करणारे ते प्रसंग उभे राहतात. एखाद्या शब्दाने दिलेला धीर, एखाद्या प्रश्नाने जागवलेली जिज्ञासा, एखाद्या उदाहरणातून दाखवलेलं मूल्य हे सगळं माझ्या व्यक्तिमत्त्वात मिसळून गेलं आहे. शिक्षक हा फक्त पुस्तकं शिकवणारा नसतो; तो आयुष्याचा दीपस्तंभ असतो. तो कधी प्रकाशाने आपल्याला दिशा दाखवतो, तर कधी अंधारात आपल्या सोबत शांतपणे उभा राहतो. कधी तो आपल्याला पुढे ढकलतो, तर कधी थांबवून योग्य वेळ येईपर्यंत वाट पाहायला शिकवतो.

आज मी ज्या उच्च शिक्षणाच्या टप्प्यावर आहे, ज्या स्वरूपात आहे, ज्या मूल्यांवर उभी आहे, त्या सगळ्याचा पाया माझ्या शिक्षकांनी घातला आहे. म्हणूनच त्यांच्या आठवणीतून मनात एकच भावना दाटून येते ती म्हणजे कृतज्ञतेची. त्यांना शब्दांनी धन्यवाद देणं शक्य नाही, कारण त्यांचं ऋण हे विविध रूपाने परत फेडण्याचा प्रयत्न करायचा असतो. माझ्या आयुष्यातील माझ्या सगळ्या प्रिय शिक्षकांना शिक्षक दिवसाच्या खुप खुप शुभेच्छा.

# आठवणीतील शिक्षक




विचारमंथन

पूजा पवार
७३५००६६७२६


समाजातील आदर्श माणूस घडविणाऱ्या सर्व गुरुवर्यांना शिक्षक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा...

का कुणास ठाऊक, आपण पुढे कितीही शिकलो, अगदी देश विदेशातून सर्वोच्च पदव्या मिळविल्या, तरी आपल्याला आठवणीत राहतात केवळ आपल्या प्राथमिक शिक्षण दिलेल्या शाळेतील बाई. अंगणवाडी, प्राथमिक आणि माध्यमिक शाळेतील शिक्षकांना तर आपण जन्मात विसरूच शकत नाही. कारण आपल्या व्यक्तिमत्वाची जडणघडण त्यांच्याच हातून झालेली असते. शाळेतील चिमुकल्यांच्या पाखरांना बळ देण्याचं काम त्यांनी केलेलं असतं. कोणता विद्यार्थी कसा आहे? त्याच्या आवडीनिवडी काय? हे ओळखून ज्यांनी आपल्याला प्रगतीपथावर नेऊन घडविले त्यांना कसं बरं विसरताच येत नाही. आपल्याला महाविद्यालयात उत्तम अध्यापक लाभलेले असतात पण प्राथमिकच्या बाई ओल्या कातर संध्याकाळी आठवतात आणि मन त्यांच्या आठवणीत चिंब भिजून जातं. त्या शाळेच्या आठवणी, तिथल्या गमती जमती, मौजमस्ती आणि सोबतची सवंगडी आपल्याला आठवणीत ठेवायला लागते.

आपल प्राथमिक शिक्षण कुठे झालं? कसं झालं? आणि आपण कसं शिकत गेलो? याचा हळूहळू त्यावेळी उलगडा होत जातो. त्यावेळी शिक्षक दिन कसा साजरा व्हायचा? आम्ही काय करायचो? आणि मग आताच्या शिक्षक दिनामध्ये होणारा बदल हळूहळू कळू लागतो. शिक्षक म्हणजे कोण? शि म्हणजे शिस्त, क्ष म्हणजे क्षमता आणि क म्हणजे कर्तव्य या तिन्ही शब्दांचा मेळ असणारा व्यक्ती. शिक्षक म्हणजे एक जादू, जादूगर अस म्हणायला हरकत नाही. शिक्षकांनी कितीतरी लाखो विद्यार्थी आपल्या आचरणातून, अनुभवातून घडविलेले असतात. तीस पस्तीस वर्षा आधी आम्ही जेव्हा शाळेत जायचो तेव्हा आम्ही शिक्षकांना बाई किंवा गुरुजी म्हणायचो. आता मात्र काळानुरूप व्याख्या बदलली आणि बाईच्या मॅडम आणि गुरुजींचे सर झालेत. जसा शब्दांमध्ये बदल होत गेला तसा शिक्षकांच्या राहणीमानात, आचरणात आणि अनुभवात देखील बदल होत गेला. शिकणे आणि शिकवणे या दोन वेगवेगळ्या क्रिया आहेत. आताच्या शिक्षण पद्धती अध्ययन अध्यापन प्रक्रियेत अध्ययन प्रक्रियेला अधिक महत्त्व असल्यामुळे अध्यापनामुळे अध्ययनाला मदत होते. एखादे शिक्षक म्हणत असतील मी पाठ शिकविला, मी कविता शिकविली पण ते एकतर्फी शिकवणे होय. तर त्या शिकवण्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये कितपत ज्ञान उतरलं आणि त्यांनी कसा अनुभव दिला हे खरे शिक्षण. शिक्षक शिकवतात ते आपल्या अनुभव आणि ज्ञानाच्या जोरावर. मातीच्या गोळ्याला आकार देणारा जसा कुंभार असतो. तीच भूमिका शिक्षकांची आहे. घरून येणारा प्रत्येक विद्यार्थी हा मऊ, कोवळा आणि लुसलुशीत मातीचा गोळा आहे. शिक्षक जसे मार्गदर्शन करतील तसा तो घडत जातो. असं म्हणतात ना, इमारतीचा पाया पक्काच असायला हवा. इमारतीचा पाया जर कच्चा असला तर इमारत खचून जाईल. परंतु इमारतीचा पाया जर मजबूत बनला तर ती इमारत कधीच खचणार नाही. कधी बाईनी जर पाणी आणायला लावलं तर धूम ठोकत जाऊन आणि लगेच बाईसाठी कोणाच्यातरी घरून एक ग्लास पाणी घेऊन यायचो. इतकी आपुलकी आम्हा शिक्षक विद्यार्थ्यांत होती. गरीब मुलांना पाटी, पेन्सिल आणि नोटबुक पण त्या घेऊन द्यायच्या. कधी त्यांनी कुणाचे मन दुखावले नाही. मला अजूनही डोळे मिटले की, त्यांचा तो चेहरा आठवतो. त्यांचं ते निखळ हास्य.

राग आला की रागावणं. पण बाईंनी कधी आम्हाला मारलं नाही किंवा कठोर शिक्षा पण केलेली नाही. त्यांचा राग फार कमी यायचा. आलाच तर आम्हाकडे पाहून उडून जायचा. त्याचं विद्यार्थ्यांवर खूप प्रेम होतं. त्यामुळे त्यांचा हात कधी उगाच उगारलाच नाही. पण बाईनी सांगितलेलं काम, दिलेला अभ्यास आम्ही तितकाच नियमाने आणि काटेकोरपणे करायचो. बाईंना कुठलाही त्रास होऊ नये असं नेहमी आम्हा विद्यार्थ्यांना वाटायचं. देशमुख बाई माझ्या आदर्श शिक्षिका आहे. त्यांच्या संस्कारामुळे आज मी आणि कितीतरी विद्यार्थी घडले आणि त्यांच्या ध्येयापर्यंत पोहचले आहेत. देशमुख बाईसारखें जर सर्वांना शिक्षक मिळाले तर विद्यार्थी नक्कीच घडतील आणि शाळाही बनतील. सद्या शिक्षक एखाद्या बाहुलीप्रमाणे झालेला आहे. आदेश आला की, अंमलबजावणी करा. मग तो आदेश दिल्लीपासून गल्लीपर्यंत कुणाचाही असू शकतो. आदेश अमलात आणताना त्याची शाळा, विद्यार्थी मात्र मागे पडले, याची कुणालाही काळजी नाही. सद्या फक्त सर्वजण कागदी घोडे नाचवन्यात मग्न आहे. आजचे विद्यार्थी उद्याचे भावी नागरिक आणि शिल्पकार आहे. पण शिक्षण व्यवस्था मोडकळीस येताना कुणाला दिसत नाही.आपल्या शिक्षकांचे मूळ काम शिकवणे किंवा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे आहे. विद्यार्थ्यांच्या पंखांनाना भरारी देणे आहे. विद्यार्थिरुपी फुलांमध्ये कमी पडलेले रंग भरणे आहे. ही सर्व कामे सोडून त्याला भलत्याच कामात गुंतवून ठेवल्यामुळे आजचा विद्यार्थी मागे पडत आहे, शाळा ओस पडत आहे. या कारणांमुळे विद्यार्थ्यांचा आणि पालकांचा कल इंग्रजी शाळांकडे वाढलेला दिसत आहे. या विद्यार्थ्यांना जर सामोरे आणायचे असेल, मराठी शाळा टिकवायचे असतील, मराठी विद्यार्थी घडवायचे असतील आणि आकाशात भरारी घेण्याचा सामर्थ्य जर विद्यार्थ्यांमध्ये द्यायचे असेल तर शिक्षकांना त्याच्या मूळ कामापासून कोणीही परावृत्त करणार नाही याची खबरदारी घेणे तेवढेच आवश्यक आहे. शिक्षक दिनाच्या दिवशी शिक्षकांचा सन्मान करून, त्यांना शाल आणि श्रीफळ देऊन होत नाही. तर त्यांना विद्यार्थ्यांमध्ये मिसळू द्या. त्यांना शिकवू द्या, मार्गदर्शन करू त्यांच्याशी हितगुज करू द्या. विद्यार्थ्यासोबत त्यांच मैत्रीचं नातं घट्ट करू द्या. तेव्हाच त्यांना त्यांचा शिक्षक दिनाचा खरा पुरस्कार मिळेल. तसेच ज्या दिवशी इतर कामातून सर्व शिक्षक मोकळे होतील आणि आपल्या विद्यार्थ्यांमध्ये गुंततील त्यादिवशी खरा शिक्षक दिन साध्य झाला असे म्हणावे लागेल.

# पत्रकारितेतून शिल्पनिदेशकापर्यंत : शिक्षक दिनाची आठवण




मागोवा

रवींद्र दांडगे
अंजनगाव (सुर्जी)


आज ५ सप्टेंबर. सत्तावीस वर्षांपूर्वी प्रादेशिक दुय्यम सेवा निवड मंडळाची लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा उत्तीर्ण करून व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण खात्यात इलेक्ट्रॉनिक्स व्यवसायाच्या शिल्पनिदेशक या पदावर औद्योगिक प्रशिक्षण संस्था बाभुळगाव जि. यवतमाळ येथे सेवेत रुजू झालो तेही माधा न्यापूर्वी. मला आठवतो तो दिवस शिक्षक दिन होता. त्यापूर्वी अभियांत्रिकी शिक्षण घेत असताना सोबतच पत्रकारिताही मी करीत असल्याने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या समस्या मी ओळखून होतो. माझे पद हें तांत्रिक व्यवसायाचे प्रशिक्षण देणारे असल्याने ग्रामीण भागातील मुलांना इलेक्ट्रॉनिक्स या व्यवसायाचे प्रात्यक्षिक शिकविणे माझ्या साठी फार जिकरीचे होते.त्याला कारण म्हणजे नव्वदच्या दशकात मी अभियांत्रिकी पदवीका घेतली खरी पण पत्रकारिता, साहित्य व समाजकार्य याची आवड असल्याने माझे मन इलेक्ट्रॉनिक्स या मूळ विषयापासून भरकटत गेले. तेव्हा माझी पत्रकारिता ट्रेडल च्या प्रिंटिंग मशीन सारखी संथपणे सुरु होती.त्यावेळी वेब ऑफसेट तंत्रज्ञानाने वृतपत्र क्षेत्रात पदार्पण केले होते.बातम्या तयार करतांना नवीन डेस्क टॉप डॉस २८६ प्रोसेसर संगणकांची मदत घ्यावी लागत होती. हें नवीन तंत्रज्ञान समजून घेण्याची व शिकण्याची आवड माझ्यामध्ये निर्माण झाली.तेव्हा बातमी टाईप करण्यापूर्वी स्क्रिन वर कमांड द्यावी लागायची आणि स्क्रीनवर व्हिव्हू साठी काही वेळ वाट बघावी लागत असायची. हें सोपस्कार पूर्ण केल्यानंतर ट्रेसिंग पेपर वर ती बातमी प्रिंट साठी रेडी राहायची. अशातच १९९३ ला अकोला निवड मंडळाच्या व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण खात्याच्या पद भरतीसाठी जागा निघाल्या. शिल्पनिदेशक या पदासाठी मी अर्ज केला . त्यावेळी शिक्षणासोबतच पत्रकारिता देखील करीत होतो.मला पत्रकारितेमध्ये शहर प्रतिनिधी वार्तांकन करण्यासाठी दरमहा पाचशे रुपये मानधन मिळायचे. मी तेवढ्यात समाधानी होतो. वडील माझेवर रागवायचे.शिक्षण सोडून तू या मागे कशाला लागलास? अशातच मला १९९३ चा नागपूर येथील बाळासाहेब तिरपुडे सामाजिक शोध पत्रकारितेचा पुरस्कार जाहीर झाला. या पुरस्काराच्या बातम्या इंडियन एक्सप्रेस ते दै. लोकमत या वृत्तपत्रात झळकल्याने माझ्या या कामगिरीवर माझे वडील थोडे बहुत सुखावले होते. अशातच घरी पोष्टाने निवड मंडळाच्या परीक्षेचे प्रवेशपत्र प्राप्त झाले. सदरहू पदाची १९९५ ला अकोल्याला लेखी परीक्षा झाली.त्याचा निकाल १९९७ ला जाहीर झाला.मी उत्तीर्ण झालो होतो. दरम्यान पोस्टिंग देण्यासाठी अमरावती विभागाचे माजी उपसंचालक एस बी ठाकरे साहेब यांनी उशीर लावला होता. निमित्य होते अस्थायी शिल्पनिदेशक कर्मचाऱ्यांच्या आंदोलनाचे.शेकडो कर्मचाऱ्यांना सेवेत सामावून घेण्यासाठी निदेशक कर्मचारी संघटनानी येल्गार पुकारला होता. यावेळी हें आंदोलन चांगलेच चिघळले होते. त्याचे वार्तांकन मीच करीत असल्याने मला त्या परिस्थितीची जाणीव होती. जेंव्हा मी काही सहकाऱ्यासह उमेदवार म्हणून तत्कालीन उपसंचालक यांना भेटायला गेलो तेव्हा त्यांचा राग माझ्यावर होता तो पेपर मध्ये आलेल्या बातम्यामुळे. सुरुवातीला त्यांनी माझी दाद ऐकून न घेता आम्हाला बाहेर जायला सांगितले.त्यामुळे माझ्यातील पुढारीपण जागे झाले. तेव्हा मी त्यांना पत्रकाराच्या भाषेत प्रश्न विचारू लागलो तेव्हा ते माझ्यावर जाम भडकले,मी त्यांना म्हटले की साहेब निवड मंडळाने आमची निवड करून तुम्हाला संपर्क करण्याचे आम्हाला मिळालेल्या या अंतर्देशीय पत्रात नमूद केले आहे की या सर्व उमेदवारांची एका महिन्याच्या आत पोस्टिंग करावी. पण आज दोन महिने उलटून गेले पण तुमच्याकडून काहीच हालचाल नाही. तेव्हा म्हणजे ठाकरे साहेबांच्या प्रशासनाचा संपूर्ण विभागात दरारा होता. ते माझ्याकडे रोखून म्हणाले की तुम्हांला पोस्टिंग नाही दिली तरी चालेल? पण अस्थायी लोकांना सामावून घेण्या बाबतच्या युती शासनाच्या सूचना आम्हाला आहेत. असे ते निर्वाणीने बोलले.पण कक्षात उपस्थित असलेले तत्कालीन सेवायोजन अधिकारी श्री तलवारे साहेब यांनी ठाकरे साहेबांना माझ्याबद्दल समजावून सांगितले. ते माझ्या सामाजिक कार्याबद्दल ओळखून होते. त्यावर त्यांनी एकूण १५ इलेक्ट्रॉनिक्स शिल्पनिदेशकांना उशिरा का होईना टप्प्या टप्प्याने आदेश देण्याचे कबूल केले. शेवटी माझ्यासह सर्व १५ जणांचे आदेश त्यांनी १९९८ मध्ये जारी केले व मला यवतमाळ मधील बाभुळगाव ला पाठवले.अखेर मी माझी ऐनभरात आलेली पत्रकारिता सोडून बाभुळगावला शिक्षक दिनाच्या दिवशी सेवेत रुजू झालो. प्रशिक्षणार्थ्यांनी योगायोगाने या शिक्षक दिनाच्या कार्यक्रमात माझे स्वागत केले. भारताचे राष्ट्रपती व थोर शिक्षक सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंती निमित्ताने संपूर्ण देशात हा दिवस साजरा करण्यात येत असतो. मला या संस्थेत पहिल्याच दिवशी शेकडो विद्यार्थ्यासमोर भाषण करण्याचा योग जुळून आला. मी माझ्या भाषणातून क्रांतिज्योती महात्मा फुले ते सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या शिक्षक पदाच्या जीवन प्रवासातील सामाजिक व त्यामागील वैज्ञानिक दृष्टिकोन उपस्थित विद्यार्थ्यांना समजावून सांगितला.विज्ञानाने समाज प्रगत होतो. तंत्रज्ञानाने आपल्या जीवनातील ज्ञानाच्या कक्षा रुंदावतात. आपला व्यवसाय इलेक्ट्रॉनिक्स मेकॅनिक असल्याने येणाऱ्या काळात आपण प्रात्यक्षिकावर अधिक भर देऊन अधिक कौशल्य कसे प्राप्त करता येईल यावर भर देऊ असा विश्वास त्यांना दिला.तेथून ते आजपर्यंतचा प्रवास हा शिक्षक दिनाच्या दिनानिमित्ताने १९९८ मधील इलेक्ट्रॉनिक्स व्यवसायातील डी वी ई टी च्या अभ्यासक्रमातील रेडिओ मधील वाल्व, वाक्युम ट्यूबची माहिती देण्यापासून ते आज २०२५ मधील भारतीय अंतराळ संशोधन विकास इस्त्रोमधील संशोधक विद्यार्थ्यांनी ''विक्रम'' या भारतीय बनावटीच्या मायक्रो चिप निर्मितीचे सामर्थ्य आज बघायला मिळत आहे. मेक इन इंडिया ने आज हें साध्य केले आहे.आय टी आय मधील प्रशिक्षणार्थ्यांना नवीन संशोधनासाठी शासन तत्परतेने पावले उचलत आहे. त्यासाठी या वर्षांपासून सुरु होणारे न्यूयेज कोर्सेस महत्वाचे आहेत.

भारत सरकारने सेमिकंडक्टर क्षेत्रात जी क्रांती केली आहे त्याचे फायदे येणाऱ्या काळात आपणास दिसतीलच.सुरुवातीच्या काळात शिक्षक म्हणून शिकविताना इलेक्ट्रॉनिक्स मधील ट्रांझिस्टर, आय सी, मायक्रोप्रोसेसर चिपपर्यंतचे तंत्रज्ञान व त्यावरील कौशल्ये विद्यार्थ्यांना अवगत करून देण्यात सफल झालो. आज सॉफ्टवेअर डिफाईड रेडिओ, मोबाईल रेडिओ, इंटरनेट रेडिओबद्दल माहिती देताना प्रात्यक्षिकाचा भाग कमी झाला आहे याची खंत देखील आहे.आज विद्यार्थ्यांना मोबाईल रेडिओ, वायफाय, म्युझिक स्ट्रिमिन्ग एकाच डिवाईस मध्ये उपलब्ध होतात.आज शिक्षक दिनी मला एवढेच विद्यार्थ्यांना सांगायचे आहे की शिक्षण फक्त पुस्तकांत मर्यादित नसते, तर प्रत्यक्ष कामातून, अनुभवातून आणि प्रामाणिक प्रयत्नातून ते अधिक घडते. तुम्ही आय.टी.आय. मध्ये शिकत आहात म्हणजेच तुम्ही देशाच्या विकासाचा पाया मजबूत करीत आहात. उद्योगधंदे, कारखाने, तंत्रज्ञान यांना तुमच्या कौशल्याची गरज आहे. म्हणून तुम्ही शिकलेला प्रत्येक धडा मन लावून आत्मसात करा. कौशल्य, शिस्त आणि प्रामाणिकपणा हे तुमचे तीन मोठे शस्त्र आहेत. शिकण्याची वृत्ती कधीही सोडू नका.अपयश आलं तरी धैर्य गमावू नका आणि प्रत्येक कामात उत्कृष्टता मिळवण्याचा प्रयत्न करा.लक्षात ठेवा, हातातील साधनं वापरून तुम्ही भविष्य घडवता आहात. उद्याचा तंत्रज्ञ, अभियंता, उद्योजक आणि कदाचित शिक्षकही तुम्हीच होऊ शकता. तुमचं भविष्य उज्ज्वल आहे, फक्त मेहनतीने आणि प्रामाणिकपणे पुढे चालत राहा.

# ‘‘जो जाई गुरूंच्या पदवाटेस; तो लागे प्रगतीच्या वाटेस’’

भारतीय संस्कृतीत गुरूला देवाप्रमाणे मानले जाते. म्हणूनच शिक्षक दिवस हा खूप उल्हासात साजरा केला जातो. शाळा, कॉलेज, व्यवसायातील शिष्य या दिवशी गुरूंची कृतज्ञता व्यक्त करतात. वर्षभर अथवा आयुष्यभर शिक्षकांनी दिलेल्या ज्ञान आणि मार्गदर्शनामुळे शिष्य जीवनात यशस्वी होत असतात. शिक्षक है इश्वराचे रूप असून प्रत्यक्ष भगवंत गुरुरूपाने आपल्या जीवनाचे सारथ्य करत आहेत. अशी, ज्या शिष्याची भावना असते, त्या शिष्याची जीवनात लवकर प्रगती होते. शिक्षक अथवा गुरूंनी शिकवलेले ज्ञान आत्मसात करून त्याप्रमाणे आचरण करण्याचा ते प्रयत्न करत असतात.

भारतात आधीच्या काळापासून गुरु-शिष्य परंपरा आहे. पूर्वीच्या काळी शिष्य, गुरुकडे गुरुकुलात राहत असत. त्याकाळी ज्ञानसंपादनासाठी-शिष्याला सुखवस्तू जीवनाचा त्याग करावा लागत असे. परंतु आजच्या ऑनलाईन शिक्षणाच्या जगात गुरुकुल पद्धतीचे स्वरूप बदलले आहे. ज्ञानी आणि उच्चशिक्षित शिक्षक हे मोबाईल व ऑनलाईनच्या मदतीने स्वतः गरजू विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचत आहेत. आणि अशा पद्धतीने गुरूकडून ज्ञानप्राप्त करण्याची प्रथा आजही कायम आहे. त्याचप्रमाणे जीवनातील चांगल्या अथवा कठीण प्रसंगी आपल्या गुरूकडून मार्गदर्शन घेण्यासाठी आजही शिष्य आपल्या गुरूंची भेट घेतात.

शिक्षकदिन हा दिवस अशा शिक्षकांना समर्पित आहे. जे आपल्याला योग्य मार्गावर चालायला आणि जिवनात योग्य मार्ग निवडायला शिकवतात. गुरु ही उपमा इतकी वेगळी आहे, की आपण तिला व्यक्तच करू शकत नाही. कारण शिक्षकांची महती गात असताना शब्द देखील अपुरी पडतात.मित्रांनो खरंतर आपले सर्वात पहिले शिक्षक ही आपली ‘‘आई’’ असते अगदी बारीकसारीक गोष्टींपासून ते मोठमोठ्या कामांपर्यंत सर्वच काही ती आपल्याला शिकवते. जगाची पहिली आणि खरी ओळख आपली आईच आपल्याला करून देते. परंतु आपल्या आईवडिलांनंतर आपल्याला सर्वांत जास्त माया लावणारे आणि कायम आपले भले व्हावे हा विचार करणारे हे आपले शिक्षकच असतात. स्वार्थाने चिंब झालेल्या जगात शिक्षक आपल्याला निस्वार्थपणे जिव लावतात आणि सदैव आपल्या चांगल्याचा विचार करतात. आपल्या शुभचिंतकांमध्ये गुरूंचे स्थान हे अग्रगण्य असते.

आजच्या काळात आपण शिक्षकांच्या तोंडून एक वाक्य नेहमी ऐकतो. ते म्हणजे की तुमच्या बॅचसारखी वाईट बॅच मी आजपर्यंत नाही बघितली पण शिक्षकांचे हे मत बदलवून टाकून मी एवढ्या वर्ष कितीतरी बॅचेसना शिकवले पण तुझ्यासारखा प्रामाणिक विद्यार्थी मी आजवर नाही बघितला,’’ असे आपल्या शिक्षकांचे तोंडून जेव्हा आपण ऐकतो ना, तेव्हा आपण खऱ्या अर्थाने शिष्य म्हणवून घ्यायच्या पात्र ठरतो.केवळ आपला विषय शिकवून जाणारे ते खरे शिक्षक नव्हे, तर शिष्याच्या मनाशी समरस होणारे, त्याची प्रगती पाहून आनंदी होणारे व चुक झाल्यास कान पिडणारे, तेच खरे शिक्षक असतात. शिक्षक नेहमीच शिष्याच्या चांगल्या गुणांचे कौतुक करतात आणि त्याच्या वाईट प्रसंगातही त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहतात. आपले अख्खे आयुष्य ते शिष्याला घडवण्यामध्ये व्यतीत करतात. आणि जिवाचे एवढे रान केल्यावर शिष्याकडून आदर, प्रेम, आणि कृतज्ञता मिळाली की तिच त्यांची खरी कमाई आहे. असे मानतात. म्हणूनच म्हणतात ना ‘‘जो जाई गुरूंच्या पदवाटेस; तो लागे प्रगतीच्या वाटेस.’’ अर्थात गुरुच्या पावलांवर जो पाऊल ठेवतो, त्याची प्रगती, ही होणारच. ‘‘म्हणून केल्याने होते आहे रे, आधी केलेचे पाहिजे.’’, ‘‘प्रॅक्टिस मेक्स मॅन परफेक्ट हे इथपासून ते अगदी ‘‘तुमच्या आईने तुमच्यासाठी सकाळी उठून खुप मेहनतीने बनवलेल्या त्या डब्याची किंमत करणे शिका, तुमच्या हातून कुठलेही वाईट काम घडणार’’ इथपर्यंतच्या माझ्या शिक्षकांनी शिकवलेल्या चांगल्या गोष्टी मी माझ्या कायम स्मरणात ठेवलेल्या आहेत.

गुरुंची महिमा अगाध आहे. ‘‘बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाऊले’’ असे म्हणतात. परंतु गुरु ही अशी व्यक्ती असते. जी जेवढे बोलते त्याच्या कितीतरी पटीने जास्तच आपल्याला देण्याचे प्रयत्न करत असते.

एक चांगले शिक्षक आणि चांगला शिष्य मिळायलाही खूप भाग्य लागते. त्यामुळे ज्यांना हे मिळते त्यांनी त्याची किंमत जाणली पाहिजे. कारण ज्याच्या आयुष्यात गुरु असतो. त्याला त्याच्या गुरुंकडून जीवनात चांगल्या-वाईट सर्वच गोष्टींना सामोरे जाण्याचे आत्मबळ मिळत असते,

प्रत्येकाने तीन गोष्टी कायम लक्षात ठेवाव्यात. त्या म्हणजे की ‘‘मातृदेवो भवः पितृदेवो भवः’’, आचार्य देवो भवः ‘‘ आणि ‘‘भारत माझा देश आहे.’’ कारण माता पिता, शिक्षक, आणि आपला देश अर्थात संपूर्ण समाज है तिनही आपले सर्वात मोठे गुरु आहेत. म्हणून त्यांच्याविषयी आपल्या मनात आदर, सन्मान आणि आपलेपणा असणे फार महत्त्वाचे आहे. गुरु ही उपमा केवळ व्यक्तीपूरती सीमित नाही. एखादे चांगले पुस्तक, निसर्ग, समाज, स्वभाव ह्या सर्वापासून आपण चांगले-वाईट अनुभव घेत असतो. त्या अर्थाने हे सर्व देखील आपले गुरुच आहेत. मुळात गुरु म्हणजे एखाद्या सामान्य व्यक्तीपेक्षा अधिक ज्ञानी, आणि आदरणीय अवस्था असते. आणि अशा आपल्या गुरुंनी म्हणजेच शिक्षकांनी दिलेले ज्ञान आत्मसात करणे, शिक्षकांकडून मिळवलेले ज्ञान आचरणात आणण्याचा प्रयत्न करणे, गुरूने दिलेल्या ज्ञानामुळे आपले जिवन यशस्वी झाले. यासाठी सतत गुरुबद्दल कृतज्ञ असणे. आणि याच कृतजतेपोटी गुरूंची सेवा आणि आदर करणे, म्हणजे खरे गुरुपूजन होय. अशा गुरुपूजनातून गुरुला खरी गुरुदक्षिणा मिळत असते. कारण जेव्हा शिष्याची प्रगती होते. तेव्हा ती पाहून गुरुला खरा आनंद होतो. खऱ्या गुरुला म्हणजेच शिक्षकाला हा एक प्रकारचा सन्मानच असतो. शिक्षकांकडून मिळालेले ज्ञान नम्रपणे स्विकारतो. त्या शिष्याला शिक्षकांकडून मिळालेले ज्ञान जसेच्या तसे मिळते. कारण जान ग्रहण करत असताना, शिष्याकडे नम्रपणा नसेल. तर गुरुकडे शिष्याबद्दल प्रेम व आपलेपणा असुनही शिष्याला समजावणे, हे गुरूला कठीण जाते. कारण ज्ञानप्राप्तीमध्ये शिष्याचा अहंकार अडथळा निर्माण करतो. यासाठीच शिष्याची शिक्षकांवर श्रद्धा असणे गरजेचे आहे. त्याचसोबत शिक्षकांकडून मिळवलेले जान आपल्या जीवनात, आचरणात आणण्याचा शिष्याने तंतोतंत प्रयत्न करणे देखील गरजेचे आहे. असे केल्यास शिक्षकांजवळील ज्ञानाच्या बळामुळे आणि साधनेमुळे शिष्यामध्ये सामर्थ्य निर्माण होते. आणि त्याची आयुष्यात प्रगती होत जाते. गुरूने सांगितल्याप्रमाणे आचरण करण्याची इच्छा आणि गुरूंचा वारसा पुढे चालविण्याचौ तळमळ शिष्याच्या मनात असणे गरजेचे आहे.

शिक्षक त्यांच्याजवळील ज्ञान आणि अनुभवातून शिष्याला मार्गदर्शन करत असतात. बरेचदा आपण म्हणतो की कुठल्याही गोष्टीचा स्वतः अनुभव घेतल्याशिवाय आपल्याला योग्य-अयोग्य काय ते कळत नाही. परंतु काही वेळा स्वानुभवातून शिकण्यापेक्षा एखाद्या तज्ञ व्यक्तीचा सल्ला घेतल्यामुळे जीवनातील समस्या लवकर सोडविता येतात. आणि म्हणूनच जीवन जगत असताना शिक्षकांजवळील ज्ञान आणि अनुभवाची प्रत्येकाला गरज भासते. त्यामुळे आपले जीवन सुखी आणि समाधानी होते.

थोडक्यात जीवनात गुरुंशिवाय अर्थातच शिक्षकांशिवाय तरणोपाय नाही. ज्याच्या जीवनात खरे गुरु किंवा सद्गुरु आहेत. त्यांचे जीवन यशस्वी झाल्याशिवाय राहणार नाही. मात्र शिष्याला गुरुप्रती श्रद्धा आणि कृतज्ञता असणे गरजेचे आहे. यासाठी शिक्षक दिन हा मोठा सण असल्यासारखा विचार आणि आचरणातून साजरा केला पाहिजे.

मला सर्व शिक्षकांना सांगायचे आहे की, असे म्हणतात विचारांची समृद्धी आणि प्रगल्भता ही शिक्षकांमुळे लाभते. शिक्षकांनी दिलेले जानाचे दान मोत्यांप्रमाणे टिपण्याचा प्रामाणिक प्रयत्न मी केला आहे. खरंतर हे विचार कितीही टिपले तरीही कमीच आहेत. पण खरच खूप मनापासून सर्व शिक्षकांना शिक्षक दिनाच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा !

**- कु. पायल अरुण वानखडे**
अकोला.
९८३४३९८६८८

## राशी-भविष्य

**मेष :** आज तुम्ही आध्यात्मिक कामात व्यस्त असाल. खोल विचारशक्ती तुम्हाला या कामात मदत करेल. शत्रूंपासून सावध राहा.

**वृषभः** आज तुमचा व्यवसाय वाढण्याची शक्यता आहे. तुम्हाला सामाजिक क्षेत्रात यश आणि प्रसिद्धी मिळेल.

**मिथून :** आज तुम्ही मनोरंजन आणि आनंदात व्यस्त असाल. मित्र आणि कुटुंबासह आनंददायी वातावरण असेल.

**कर्क :** आजचा दिवस तुमच्यासाठी आनंददायी असेल आणि तुम्ही कुटुंबास-ोबत चांगला वेळ घालवाल. आवश्यक कामांवर पैसे खर्च होतील, तरीही आर्थिक लाभासाठी दिवस चांगला आहे.

**सिंह :** आज तुम्हाला कुटुंबातील प्रत्येक सदस्याकडून पाठिंबा मिळेल. प्रेमसंबंधात मिलन होण्याची शक्यता आहे. अस्वस्थता जाणवू शकते.

**कन्या :** आज गाडी चालवताना विशेष काळजी घ्या. कौटुंबिक तणाव वाढू शकतो किंवा वडिलोपार्जित मालमत्तेशी संबंधित समस्या उद्भवू शकतात.

**तुळ :** नवीन काम सुरू करण्यासाठी आजचा दिवस चांगला आहे. तुम्ही तुमच्या प्रिय व्यक्तीला भेटाल आणि तुमचे नशीब वाढेल.

**वृश्चिक :** आज नियोजित काम पूर्ण न झाल्यामुळे तुम्ही निराश होऊ शकता. त्याबद्दल कोणतेही महत्त्वाचे काम किंवा निर्णय घेऊ नका.

**धनु :** आज तुम्ही आवेशात किंवा कोणत्याही प्रकारच्या आवेगात निर्णय घेतल्यास तुम्हाला पश्चात्ताप करावा लागू शकतो.

**मकर :** आज तुम्हाला तुमचे प्रलंबित काम पूर्ण करण्यासाठी खूप मेहनत आणि संघर्ष करावा लागू शकतो. जर तुम्ही एकाच वेळी अनेक कामे हाती घेतली तर तुम्हाला अडचणींचा सामना करावा लागू शकतो.

**कुंभ :** आज कोणाचेही हमीदार बनू नका आणि पैशाचे व्यवहार करू नका. कुटुंबाशी संघर्ष होऊ शकतो, म्हणून ते टाळा. गैरसमजामुळे कोणाशी भांडण होऊ शकते.

**मीन :** आजचा दिवस तुमच्यासाठी फायदेशीर आहे. नोकरी आणि व्यवस-ायाच्या क्षेत्रात उत्पन्न वाढेल. आज तुम्ही नवीन मित्र बनवाल.

आचार्य पं. श्रीकांत पटैरिया: मो. ७८७९३७२९१३

## आपणचं तयार करा हे महाशब्दकोडे 151



### हे कोडे कसे सोडवाल

मित्रांनो
तुम्हाला संकेतामध्ये काही शब्द दिलेले आहेत. हे शब्दच योग्यप्रकारे या बौकटीत लिहून हे महाशब्दकोडे आपणचं तयार करा.

संकेत शब्द :– टीप कागद डक पंचक ममता

अजगर, अराजक, आवड, आवाज, आवेदन, आश्रम, ईद, कटी, कवडसा, कामकाज, गतका,
कळ, कालवा, खजिना, गोरस, चपळ, चित्तवेधक, चितारी, चिंता, जमा, जमाव, टेकाड,
डरकाळी, डोसा, तरबेज, तळ, दडपशाही, दमा, द्रोही, नमाज, नाद, नापास, नामी,
पराजित, पळस, पाद, पाळीव, प्रकाशक, प्रपात, बेरीज, भेद, भेदक, भुज, मनाई,
महिमा, मामी, रकाना, रानवा, राजस्व, रीगन, लता, लाळ, वध, वमन, वाटप,
वाद, वानप्रस्थाश्रम, वामन, विग, विप्र, सडपातळ, सर, सक्षम, साज,
सामना, सौर, स्थावर, शववाहिका, शासक, शेतसारा, शेला पागोटे, क्षमस्व

(उत्तर पुढील अंकी)

### मागील महाशब्दकोडेचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रा | म | | ठ | स | ठ | स | | सा | | मे | वा | | सौ |
| ज | ल | धा | रा | | | म | | पे | | ष | ट | का | र |
| स | म | | वि | प | री | त | ल | क्ष | ण | | ख | | व |
| | ल | | क | | मा | ल | क | | | मा | र्च | | र्ष |
| प्र | | हे | | | ला | | ब | ल | वा | न | | शं | |
| दु | र्मी | ळ | | | गु | ज | | क्ष्या | | प | र | क | र |
| ष | | सां | ग | ड | | य | था | र्थ | | त्र | | र | सा |
| ण | | ड | ल | | क्षु | द्र | | | आ | | | | त |
| | बु | | ता | रा | | थ | ट्टे | वा | ई | क | | व | ळ |
| बु | द्धि | मा | न | | आ | | | र | | बु | र | खा | |
| | | द्री | | ए | का | पा | या | व | र | त | या | र | |
| भा | क | | त | | श | | व | धू | | र | | दा | स |
| क | ल्प | त | रू | | दि | | नी | | क | | सु | र | मा |
| र | क | म | | ट | वा | ळ | | च | र्म | का | र | | स |

Uday Munde - 8446302691

## महाशब्दकोडे 532



**—: आडवे संकेत :—**

१) आन्ध्र प्रदेशची राजधानी
५) सुर्योदयापूर्वी व सुर्यास्तानंतर दिसणारा प्रकाश ७) शोध, मागोवा
९) एक वृक्षविशेष
१०) टरफलासहित असलेले तांदूळ, धान,
११) डोंगर, जंगल, खिंड इत्यादी ठिकाणी राहणाऱ्या व शिकार करून निर्वाह करणाऱ्या लोकांची एक जात
१२) गव्हाचे दाणेदार पीठ
१४) अयोध्या नगरी
१६) युध्द, लढाई,
१७) मनाई, निषेध,
१९) पाटाचे पाणी आंत घेऊन शेतीसाठी केलेला खळगा
२०) उत्तम आंब्याचा एक प्रकार
२१) अंतर्बाह्य, सर्वत्र, चोहोबाजूंनी, काठोकाठ
२२) देवांचे पेय
२३) जुन्याकाळी लुटालूट करणाऱ्या लुटारू लोकांची टोळी
२४) खोडकर मुलगा, ब्रात्य
२५) तांडेल, दर्यावर्दी
२७) देवाला वाहण्यात येणारे आठ सुगंधी द्रव्ये एकत्र करून केलेले द्रव्य
२९) फायदा, प्राप्ती
३०) यज्ञ, हवन, होम
३१) चकित, आश्चर्ययुक्त
३२) मैत्रीण, स्त्रीमित्र, सोबतीण
३५) नाहीसे होणे, दिवा विझविणे
३६) बाजू, पक्ष, एखाद्याची बाजू घेणे
३७) वेंध, झेप, उडी, विळखा
३८) मेहूणा, बायकोचा भाऊ
३९) हत्तीवरील अंबारीत मागे बसण्याची जागा
४०) लाड, प्रेम, जिव्हाळा
४१) भय, भीती (हिं)
४३) उष्णता, गरमपणा
४४) सूक्ष्म व अति सूक्ष्म पदार्थ पाहण्याचे यंत्र
४७) जीवनशक्ती, जीव, प्राणशक्ती
५०) ज्ञाता, जाणणारा, साक्षात्कार झालेला
५१) जन्म देणारा, पिता
५३) संबंध (नात्याचा, स्नेहाचा), पत्ता, ठावठिकाणा
५६) लुटून आणलेले द्रव्य, सढळ हाताने केलेला खर्च
५७) विशाल, फार मोठे,
५९) अस्वल, आळशी व घाणेरडी व्यक्ती
६०) स्तुती करणे, प्रशंसा
६१) हिरा, रत्न
६३) डोकं खाजवायला प्रवृत्त करणारा एक क्षुद्र जीव
६४) रोजचे नियमित खाणे
६६) स्त्रियांनी गळयात घालावयाचा एक अलंकार
६७) मोक्ष, सद्गती
६८) सूर्यकिरणांपासून शरीराला मिळणारे व्हिटॅमिन
६९) गीतांना वाद्यवृंदाचा दिलेला साज

**—: उभे संकेत :—**

१) हिंमत, धैर्य, धाडस
२) अंत्यसंस्काराच्या वेळी लागणारे मातीचे भांडे
३) अंगिकारलेले व्रत, सुताचा धागा
४) जानेवारी महिन्यात येणारा एक सण
५) अरसपाण, एका जातीचा उत्तम प्रतीचा पांढरा दगड, मार्बल
६) निर्माण करण्याची कार्यपद्धती
७) तरतरीत, हुशार
८) मोत्यांची माळ
१३) वारसा हक्क असलेला
१५) जोम, उत्साह, प्रफुल्लित
१८) मेहनतीचे कार्य, अतिशय श्रम
१९अ) ध्वनि, शब्द
२०) हस्तचापल्य, नजरबंदी
२१) जोराची खेचाखेच, मानसिक ताणतनाव
२२) बेकायदेशीर
२४) वाराणसी, बनारस
२५) संगीतातील चीजेचा एक प्रकार, यांत श्रृंगाररस प्रधान असतो
२६) पडीत जमीन शेतीच्या उपयोगाची करणे
२७) बायकोची मोठे बहीण
२८) गंगेचे उगमस्थान
३१) अतिश्रमाने इंद्रियांना येणारी ग्लानी
३२) संपूर्ण, सगळे
३३) निमगोरा
३४) बढाई मारणे, शेखी, प्रौढी, आत्मस्तुती
३५) द्वाड चाळे, वानर थेर
३७) पत्नी, भार्या (सं.)
३९) काळजी, दक्षता सावधगिरी
४२) रममाण झालेला निमग्न
४५) पोलीस कचेरीतील मुख्य अधिकारी
४६) यंत्र चालविणारा, यंत्राद्वारे तयार झालेले
४८) उर्दूत अभिमान
४९) उंचीने कमी असलेला
५०) पैसे नसलेला, कंगाल, गरीब
५२) साठ मिनीटांचा अवधी
५३) रणांगण, समरभूमि
५४) मित्र, सखा (हिं.)
५५) रामायणात सीतेचे हरण करणारा राक्षस, रामायणाचा खलनायक
५८) फुंकून विस्तव फुलविण्याकरिता असलेली बांबू, पितळ इत्यादीची नळी
६२) एक विदेशी मद्य प्रकार
६४) विष्णुपत्नी
६५) व्याधी ग्रस्त, आजारी व्यक्ती

(उत्तर पुढील अंकी)

### मागील महाशब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रा | ण | प | णा | ला | ला | व | णे | | अ | रु | णा | च | ल | | न | त |
| ण | | ति | | म | | प्र | | स्व | रु | चि | | म | | | दी | प |
| वा | घ | | गु | ण | क | | अ | | णो | | | च | प | ळ | | न |
| यू | | अ | ना | दि | | अ | नु | वा | द | | पा | म | र | | गो | |
| | सं | | ह | वा | ला | | ज | | य | | त | | स्वा | र्थी | | अ |
| प्र | वे | श | | | च | व | | द्वा | | | | व्या | धी | | | ग्नि |
| | द | | स्वी | | लु | ड | बु | ड | | सिं | हा | स | न | | गा | शा |
| अ | ना | मि | क | | च | | ब्बु | | प | हा | र | | | छ | | म |
| न | | | र | | प | | ळ | | हा | व | | अ | | पा | ल | क |
| पे | श | वा | | चिं | त | न | | व | ड | लो | पा | र्जि | त | | घू | |
| क्षि | | र्षि | | ता | | क्ष | म्य | | | क | म | त | र | ता | | पं |
| त | ब | क | डी | | गो | त्र | | | वा | न | र | | णे | | ता | क |
| | हु | | | पा | वा | | ग | र | | | | आ | | प | री | |
| स | मू | ह | गी | त | | गु | ल | जा | री | ला | ल | नं | दा | | ख | र्च |
| श | ल्य | | ता | की | द | | ब | | वा | | | द | स | रा | | |
| क्त | | | | | ल | ज्ज | त | | ज | ब | र | | | म | र | ण |

Uday Munde - 8446302691

## महत्वाचे

### डॉ. अतुल वैद्य नवे कुलगुरू

**नागपूर :** लक्ष्मीनारायण अभिनव तंत्रज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अतुल वैद्य यांची कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या प्रभारी कुलगुरूपदी नियुक्ती करण्यात आली आहे. डॉ. वैद्य यांनी केमिकल इंजिनीअरिंगमध्ये पदव्युत्तर पदवी आणि आयआयटी मुंबई येथून पीएच. डी. प्राप्त केली आहे. दीर्घ संशोधन अनुभवासह पर्यावरण, कचरा व्यवस्थापन आणि शाश्वत विकास यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर संशोधन केले आहे. नीरीचे संचालक म्हणून त्यांचा कार्यकाळ विशेषत्वाने गाजला असून, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर पर्यावरण क्षेत्रात २०० हून अधिक प्रकल्प पूर्ण केले आहेत. तसेच, १२ संशोधकांनी त्यांच्या मार्गदर्शनाखाली पीएच. डी. संपादन केली आहे. निगर्वी स्वभाव, प्रशासन कौशल्य, साधेपणा आणि शैक्षणिक विकासाचा ध्यास आदी गुणांमुळे डॉ. वैद्य यांचे शैक्षणिक क्षेत्रात विशेष स्थान आहे.

### पांढरे एलईडी लाईट्स धोकादायक

**नागपूर :** कोणत्याही वाहनासोबत केलेली फशन ही अंगलट येण्याची शक्यता असतानाच पांढरे एलईडी लाईट्स धोकादायक ठरत असल्याचे आढळून येत आहे. आजकाल कार व दोनचाकी वाहनांवर पांढरे एलईडी लाईट बसविण्यात येत आहेत मात्र, त्यांचा प्रकाश अतिशय तीव्र व चमकदार असल्याने वाहन चालवताना डोळ्यांवर ताण येतो. विशेषत: पावसात समोरील काहीच दिसत नसल्यामुळे अपघाताची शक्यता वाढते.

### जागतिक कौशल्य स्पर्धेसाठी नोंदणी

**नागपूर :** जागतिक कौशल्य स्पर्धा ही दर दोन वर्षांनी आयोजित केली जाणारी जगातील सर्वात मोठी व्यवसायिक शिक्षण आणि कौशल्य उत्कृष्टता स्पर्धा आहे. ऑलिम्पिकच्या धर्तीवरीलया स्पर्धेत २३ वर्षांखालील उमेदवार आपले कौशल्य सादर करतात. पुढील जागतिक कौशल्य स्पर्धा पुढील वर्षात शांघाय (चीन) येथे होणार आहे. डिजिटल कन्स्ट्रक्शन, क्लाऊड कन्स्ट्रक्शन, सायबर सेक्युरिटी, आयसीटी नेटवर्क इन्फ्रास्ट्रक्चर, अडीटीव्ह मॅनिफक्चरिंग, इंडस्ट्रियल डिझाईन टेक्नॉलाजी, इंडस्ट्रिज ४.०, मेक्याट्रानिक्स, ऑप्टोईलेक्ट्रानिक, रोबॉट सिस्टीम्स इंटेग्रेशन वॉटर टेक्नॉलाजी, डेंटल प्रोसथेटीकस, ऐअरक्रॉप्ट असे काही विषय आहेत. इच्छुक उमेदवारांनी ३० सप्टेंबरपर्यंत संकेस्थळावर नोंदणी करणे गरजेचे आहे.

### अंतर्गत तक्रार समिती बंधनकारक

**नागपूर :** कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगीक छळापासून संरक्षण अधिनियम २०१३ अंतर्गत नागपूर जिल्हयातील प्रत्येक कार्यालयामध्ये ज्या आस्थापनेवर दहा किंवा दहा पेक्षा जास्त कर्मचारी कार्यरत आहे अशा शासकीय व निमशासकीय कार्यालय व खाजगी संस्थामध्ये ठिकाणी अंतर्गत तक्रार समिती स्थापन करणे बंधनकारक आहे. अंतर्गत तक्रार समीती गठीत करुन त्याबाबतची माहिती केंद्र शासनाच्या महिला व बाल विकास मंत्रालय, शी-बॉक्स या पोर्टलवर अंतर्गत तक्रार समितीची नोंद करणे आवश्यक आहे याकरीता संकेतस्थावरवर जाऊन होम स्क्रीनवर दाखविल्याप्रमाणे आवश्यक त्या सर्व माहितीचा तपशिल भरुन अंतर्गत तक्रार समितीची माहिती नोंदवावी, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी केले आहे.

# आता नागपूरभोवती तिसरा रिंगरोड

**अवजड वाहतूक परस्पर वळविणे शक्य | चार ठिकाणी ट्रक अँड बस टर्मिनल उभारणी | वाहतूक कोंडीचे प्रश्न मार्गी लागणार**

नागपूर, दि. ४ प्रतिनिधी

**नागपूर शहराभोवती तिसरा आउटर रिंगरोड उभारण्यात येणार असून, त्यालगत चार वाहतूक बेट (ट्रक अँड बस टर्मिनल) विकसित करण्यात येणार आहे नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे या प्रकल्पाची जबाबदारी असून, मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.**



संग्रहित

नागपूर शहराभोवतीचा सुमारे १४८ किमी लांबीचा व १२० मी रुंदीचा बाह्यवळण मार्ग व चार ठिकाणी ट्रक व बस टर्मिनल विकसित करण्यात येणार आहे. या प्रकल्पास 'महत्त्वाकांक्षी प्रकल्प' म्हणून घोषित करण्यात आला आहे. या बाह्यवळण रस्त्यामुळे समृद्धी महामार्ग व इतर जिल्ह्यांतून नागपूरकडे येणारी तसेच नागपूर शहरातून समृद्धी महामार्गाकडे होणारी अवजड वाहतूक रहिवासी क्षेत्राच्या बाहेरून परस्पर वळविणे शक्य होणार आहे. यामुळे शहरात उद्भवत असलेले वाहतूक कोंडीचे प्रश्न मार्गी लागण्यास मदत होणार आहे. बाह्य वळण मार्ग, ट्रक व बस टर्मिनल प्रकल्पासाठीच्या करारांसाठी लागणाऱ्या मुद्रांक शुल्कात सुट देण्यात आली आहे. या प्रकल्पासाठी सुसाध्यता अहवालानंतर सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात येणार आहे. प्रकल्पासाठी येणाऱ्या १३ हजार ७४८ कोटी रुपये एवढ्या खर्चास मान्यता देण्यात आली आहे. प्रकल्पाच्या एकूण किंमतीपैकी भूसंपादनासाठी हुडको मार्फत ४ हजार ८०० कोटी रुपये इतके कर्ज उभारण्यास व या कर्जासाठी राज्य शासनाची हमी देण्यासही मान्यता देण्यात आली आहे. प्रकल्पाकरिता उर्वरित आवश्यक रक्कम ८ हजार ९४८ कोटी इतका निधी राज्य शासनामार्फत अर्थसहाय्य म्हणून प्राधिकरणास उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

**कार्यान्वयीन यंत्रणा**

सदर प्रकल्पासाठी नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून काम पाहणार आहे. प्रकल्पाच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव (नवि-१) यांच्या अध्यक्षतेखाली सुकाणू समिती स्थापन करण्यात येणार आहे. या समितीमध्ये विभागीय आयुक्त नागपूर, व्यवस्थापकीय संचालक महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन, आयुक्त नागपूर महानगरपालिका, जिल्हाधिकारी नागपूर, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नागपूर, अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग नागपूर यांच्यासह व्यवस्थापकीय संचालक महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, सह संचालक नगर रचना नागपूर हे सदस्य असतील तर महानगर आयुक्त नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हे सदस्य सचिव असतील.

**हे मार्ग जोडणार**

**नागपूर शहरामध्ये प्रवेश करणारे अमरावती राष्ट्रीय महामार्ग, हिंगणा राज्यमार्ग, समृद्धी महामार्ग, हैद्राबाद राष्ट्रीय महामार्ग, उमरेड राष्ट्रीय महामार्ग, भंडारा राष्ट्रीय महामार्ग, भोपाळ राष्ट्रीय महामार्ग, काटोल राष्ट्रीय महामार्ग, जबलपूर राष्ट्रीय महामार्ग या नागपूरभोवतीच्या सर्व महामार्गांना नवा बाह्यवळण मार्ग असेल.**

## आरोपीकडून चोरीची दुचाकी हस्तगत



बुटीबोरी, दि. ४ प्रतिनिधी

रस्त्याच्या कडेला दुचाकी उभी करून लघुशंकेसाठी थांबलेल्या तरुणाची संधी साधत, अज्ञात चोरट्याने वाहन पळवल्याची घटना बुटीबोरी पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडली. पोलिसांनी या अजब चोरीचा छडा लावत कळमेश्वर येथून आरोपीला अटक केली असून, त्याच्याकडून चोरीची दुचाकी हस्तगत करण्यात यश मिळवले आहे.

नागापूर (वर्धा) येथील संकेत ज्ञानेश्वर राऊत (२६) हे १७ ऑगस्ट रोजी रात्री वर्धा मार्गावरील टेकटाऊन सिटीजवळ थांबले होते. त्यांनी चावी वाहनालाच ठेवल्याची संधी साधत, नवाज इस्माईल शहा (२१, उपरवाही) याने दुचाकी पळवली. तक्रारीनंतर उपविभागीय पोलिस अधिकारी दीपक अग्रवाल व पोलिस निरीक्षक प्रतापराव भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पथक गठीत झाले. सपोनि अजितसिंग देवरे, पोहवा आशिष टेकाम, कुणाल पारधी, युनूस खान, पोशि गौरव मोकडे, माधव गुटटे, दशरथ घुगरे, सैनिक विजय चंद्रावत यांनी खबऱ्याच्या माहितीवरून कळमेश्वर गाठले. तेथे शिवाजी चौकात आरोपी नवाज शहा याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिल्यानंतर वाहन जप्त करण्यात आले. अधिक तपास पोहवा युनूस खान करत आहेत.

## आयुक्तांनी साधला इंग्रजी माध्यमांच्या चिमुकल्यांशी संवाद

### पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद

नागपूर, दि. ४ प्रतिनिधी

नागपूर महानगरपालिका आणि आकांक्षा फाऊंडेशनच्या संयुक्त विद्यमाने सदर येथे सातव्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेचा शुभारंभ झाला. आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांनी गुरुवारी (दि. ४) या शाळेचे उद्घाटन केले. पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून, उत्तम व मोफत शिक्षणाची दारे लहान मुलांसाठी खुली झाली आहेत.

विद्यार्थी स्पर्धेत मागे राहू नयेत, यासाठी ही शाळा सुरू केल्याचे आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी म्हणाले. या शैक्षणिक वर्षापासून ज्युनिअर व सीनिअर केजीचे वर्ग



सुरू झाले असून, पुढील वर्षी इतरही वर्ग सुरू करण्याचा प्रशासनाचा मानस आहे. नागरिकांनी आपल्या पाल्यांना प्रवेश देऊन संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी., जागा दान करणारे कुंजबिहारी अग्रवाल, कुमकुम कुंजबिहारी अग्रवाल, माजी नगरसेवक सुनील अग्रवाल, शिक्षणाधिकारी साधना सयाम, नोडल अधिकारी विनय बगले, शाळा निरीक्षक प्रशांत टेंभुर्णे, सुनील सोनवणे, मुख्याध्यापिका शारदा खंडागळे, आकांक्षा फाऊंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी सौरभ तनेजा, समीर बेंद्रे, संचालक सोमसुर्व चॅटर्जी आदी उपस्थित होते.

## रेशीम शेती उद्योग कार्यशाळा

**नागपूर, दि. ४ :** शेतकऱ्यांनी नगदी पीक म्हणून तुती लागवड करून रेशीम उद्योग करावा, असे आवाहन महाराष्ट्र राज्य वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष अॅड. निलेश हेलोंडे पाटील यांनी केले. 'मेरा रेशम मेरा अभिमान' अभियानांतर्गत एक दिवसीय तुती रेशीम उद्योग कार्यशाळा नरखेड तालुक्यातील मोवाड येथे आयोजित करण्यात आली. यावेळी ते बोलत होते पर्यायी रोख पीक उपलब्ध करून देण्याच्या हेतूने रेशीम उद्योगाची माहिती मुख्य मार्गदर्शक केंद्रीय रेशीम मंडळ भंडाराचे वैज्ञानिक डॉ. प्रवीण गेडाम यांनी दिली. दरम्यान तांत्रिक अडचणींबाबत वेळोवेळी मार्गदर्शन करण्यात येणार असल्याचे आयोजकांनी आश्वस्त केले.

## 'सोलर एक्सप्लोसिव्ह कंपनी'त भीषण स्फोट; कामगार ठार

नागपूर, दि. ४ प्रतिनिधी

अमरावती मार्गावरील बाजारगाव येथील सोलर एक्सप्लोसिव्ह कंपनीत भीषण स्फोट घडून आला. या दुर्घटनेत एका कामगाराचा मृत्यू झाला असून, अन्य १६ जण जखमी झाले आहेत. त्यापैकी चौघांची प्रकृती चिंताजनक असल्याची प्राथमिक माहिती आहे ही दुर्घटना बुधवारी मध्यरात्रीनंतर घडली.

माहितीनुसार, बाजारगाव येथील सोलर एक्सप्लोसिव्ह कंपनीच्या पीपी-१५ युनिटमधील सीबी-१ विभागात बुधवारी रात्री साडेबारा वाजताच्या सुमारास धूर निघताना दिसून आला. सुरक्षा पथकाने तत्काळ 'सायरन' वाजवून इशारा देत कामगारांना कारखान्यातून बाहेर काढण्यास सुरुवात केली. बहुतेक कामगार सुरक्षित बाहेर पडत असतानाच भीषण स्फोट झाला. याचवेळी संशोधन व विकास प्रयोगशाळेत कार्यरत असलेला मयूर गणवीर बाहेर येत असताना स्फोटातून उडालेल्या मोठ्या दगडांच्या तडाख्यात सापडून जागीच ठार झाला. तर, अन्य १६ जण जखमी झाले. त्यापैकी चौघांची प्रकृती चिंताजनक असून, सर्वांवर उपचार सुरू आहेत.





**१० किलोमीटरपर्यंत आवाज**

काही जणांनुसार बुधवारी मध्यरात्री झालेल्या स्फोटाचा आवाज तब्बल १०किलोमीटरवर ऐकू आला. या भीषण घटनेत संपूर्ण इमारत कोसळली आणि मलबा थेट राष्ट्रीय महामार्गावर पडला. याशिवाय कंपनी परिसरातील एचआर आणि सिक्युरिटी ऑफिस तसेच मुख्य इमारतीचे मोठे नुकसान झाले. तर, एका बसची काच फुटली.

**दोन कामगारांचे पाय...**

स्फोटात उडालेल्या मलब्याचा मोठा भाग एका विभागावर कोसळला. या दुर्घटनेत कैलाश वर्मा व मनीष वर्मा गंभीर जखमी झाले. लोखंडी पत्रा पडल्याने त्यांच्या दोन्ही पायाला गंभीर दुखापती झाल्या. दरम्यान, सायरन वाजवून कामगारांना कारखान्यातून बाहेर काढले नसते तर मोठी प्राणहानी झाली असती, असेही सांगण्यात येते.

## डॉ. आर. कृष्णकुमार सुवर्णपदक डॉ. भोंगाडेंना जाहीर

नागपूर, दि. ४ प्रतिनिधी

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या वतीने डॉ. आर. कृष्णकुमार सुवर्णपदक नरखेड तालुक्यातील देवग्राम येथील अंत्योदय महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. देवेंद्र भोंगाडे यांना जाहीर करण्यात आले आहे.

प्रस्तुत सुवर्णपदक ५ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता विद्यापीठाचे गुरूनानक भवन, कॅम्पस चौक ते अंबाझरी टी-पॉइंट माग येथे आयोजित शिक्षक दिन समारंभात प्राचार्य भोंगाडे यांना सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येणार आहे.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान कार्यकारी कुलगुरू डॉ. माधवी खोडे चवरे (भाप्रसे) भूषविणार असून,



प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी संशोधन संस्था (नीरी) नागपूरचे माजी संचालक सतीश वटे उपस्थित राहतील प्र-कुलगुरू डॉ. सुभाष कोंडावार, कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांची प्रमुख उपस्थिती असेल प्राचार्य डॉ. भोंगाडे यांनी केलेल्या उत्कृष्ट कार्याबद्दल यंदाच्या 'डॉ. आर. कृष्णकुमार सुवर्ण पदकाचे मानकरी म्हणून डॉ. माधवी खोडे चवरे (भाप्रसे) यांनी त्यांची निवड केली आहे.

## महावितरणचे अध्यक्ष लोकेश चंद्र यांना 'एनर्जी लीडरशिप अॅवॉर्ड'

नागपूर, दि. ४ प्रतिनिधी

महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांना इंग्लंडच्या 'वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ एक्सलन्स'तर्फे ऊर्जा क्षेत्रातील भरीव कामगिरीबद्दल 'एनर्जी लीडरशिप अॅवॉर्ड २०२५' प्रदान करण्यात आला.

वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ एक्सलन्सचे प्रमुख पाब्लो स्टॅन्ले व अध्यक्ष हेन्री आर. यांच्या स्वाक्षरीने लोकेश चंद्रयांना पुरस्कारस्वरूप प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात आले. 'वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ एक्सलन्स' ही इंग्लंडमधील जागतिक स्तरावर मान्यताप्राप्त संस्था आहे. प्रशस्तीपत्रात म्हटले आहे की, ऊर्जा क्षेत्रातील असामान्य नेतृत्व, प्रशासनातील दूरदृष्टी आणि महाराष्ट्राच्या वीजवितरण क्षेत्रातील असामान्य योगदानाबद्दल मा.



लोकेश चंद्र यांना एनर्जी लीडरशीप अॅवॉर्ड २०२५ प्रदान करण्यात येत आहे. कार्यक्षमता, कल्पकता आणि सेवेबद्दलच्या समर्पित वृत्तीमुळे लोकेश चंद्र यांनी अक्षय्य ऊर्जेच्या वापराला चालना देण्यासोबतच लाखो नागरिकांना भरवशाचा वीज पुरवठा करण्यात प्रमुख भूमिका बजावली आहे. अक्षय ऊर्जेचा वापर करून वीजखरेदी खर्चात मोठी बचत करून वीजदरात कपात करण्याची ऐतिहासिक कामगिरी महावितरणने केली आहे. अशा प्रकारे वीजदरात कपात करणारी महावितरण ही देशातील पहिलीच सार्वजनिक वीज वितरण कंपनी आहे. पुढील पाच वर्षात वीज खरेदीमध्ये अक्षय्य ऊर्जेवर भर दिल्यामुळे महावितरणची सुमारे ६६ हजार कोटी रुपयांची बचत होणार असल्याने पाच वर्षे वीजदरात कपात शक्य झाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्याच्या ऊर्जा क्षेत्रात परिवर्तन चालू असून, त्यांच्या नेतृत्वाखाली केलेल्या कामामुळे हा सन्मान झाला आहे. महावितरणच्या कामगिरीत राज्याच्या ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर व अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. या पुरस्काराचे श्रेय महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना आहे, अशी प्रतिक्रिया लोकेश चंद्र यांनी दिली.

## 'नंदनवनचा राजा' येथे सूरमयी शाम संगीत कार्यक्रम



नागपूर, दि. ४ प्रतिनिधी

'नंदनवनचा राजा' गणेश मंडळ नंदनवन येथे खासदार सांस्कृतिक समितीअंतर्गत 'स्वरवेद' प्रस्तुत बहारदार हिंदी आणि मराठी गाण्यांचा नजराणा सादर करण्यात आला.

कार्यक्रमात गायक हिंडोल पेंडसे, फाल्गुनी खोडे, प्रांजली अग्निहोत्री यांनी अभंग, गोंधळ, भावगीत, हिंदी-मराठी अशी विविध गाणी सादर केली कार्यक्रमात उत्तम अशी साथसंगत करणाऱ्या कलावंतांत रवी सातफळे (तबला), राहुल मानेकर (सिंथेसायझर), रितेश तानेलवार (हार्मोनियम), आशीष सुपारे(ऑक्टोपड) यांचा समावेश होता सर्व कलावंतांनी आपल्या सादरीकरणातून रसिकांची मने जिंकली.

सूत्रसंचालन प्राची भट-मुळे यांनी केले. बाप्पाच्या आरतीने कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गणेश मंडळाचे आदित्य, कपिल आवारे आणि सहकाऱ्यांनी विशेष सहकार्य केले.

**दक्षता ... महत्त्वाचे नियम पाळण्याचे 'महावितरण'चे आवाहन**

# गणेश विसर्जनादरम्यान विद्युत सुरक्षेची काळजी घ्या

नागपूर, दि. ४ प्रतिनिधी

**अनंत चतुर्दशीला गणपती बाप्पाला निरोप देण्याची वेळ जवळ आली आहे. मिरवणुका, डीजे आणि ढोल-ताशांच्या गजरात विसर्जन करत असतानाच विद्युत सुरक्षेची काळजी घेणं खूप महत्त्वाचे आहे अनेकदा विजेच्या तारा, खांब आणि इलेक्ट्रिक उपकरणांमुळे दुर्घटना घडण्याची शक्यता असते. त्यामुळे विसर्जन मिरवणुकीत आणि विसर्जनस्थळी विद्युत अपघात टाळण्यासाठी काही महत्त्वाचे नियम पाळण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.**



संग्रहित

मिरवणूक सुरू करण्याआधी मंडळाने ठरवलेला मार्ग व्यवस्थित तपासा. रस्त्यात असलेले विजेचे खांब, लोंबकळणाऱ्या तारा, ट्रान्सफॉर्मर आणि ओपन जंक्शन बॉक्सची माहिती घ्यावी. शक्य असल्यास विजेच्या तारांना स्पर्श होणार नाही अशा कमी उंचीच्या वाहनांचा वापर करणे अपेक्षित आहे. विद्युत उपकरणे आणि सजावट मंडपातील विद्युत सजावट आणि मिरवणुकीतील लाइटिंगसाठी योग्य दर्जाच्या आणि सुरक्षित उपकरणांचा वापर असावा. निकृष्ट दर्जाच्या तारा किंवा जोडण्या वापरू नका. शक्यतो प्रमाणित असलेली सामग्रीच असावी

**पाण्यात असताना...**

**विसर्जन करताना मूर्तीसोबत कोणतीही विद्युत उपकरणे किंवा लाइटिंगचे साहित्य पाण्यात टाकू नका. पाण्यात उतरून विसर्जन करत असाल, तर शरीराचा विजेच्या कोणत्याही तारांशी संपर्क येणार नाही याची काळजी घ्या. पाण्यात उतरण्याआधी मोबाईल किंवा इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणे काढून ठेवावी.**

जनरेटर किंवा बॅटरीचा वापर करताना ते योग्य ठिकाणी ठेवा आणि त्यांच्या वायर्स सुरक्षित आहेत याची खात्री करा. पाण्यात किंवा ओल्या जागेवर कोणत्याही विद्युत उपकरणांचा वापर टाळावा.

**मिरवणुकीतील सावधगिरी**

मिरवणुकीत जनरेटर ट्रॉलीवर असेल, तर ती इतर वाहनांपासून सुरक्षित अंतरावर ठेवा. मिरवणूक मार्गावर असलेले विजेचे खांब, ट्रान्सफॉर्मर किंवा तारांच्या जवळ येताच, मोठा आवाज किंवा ढोल-ताशांचा गजर थांबवा. मूर्तीची उंची जास्त असेल, तर विजेच्या तारांपासून सुरक्षित अंतर ठेवण्यासाठी मिरवणुकीच्या पुढे जाणारे स्वयंसेवक ठेवावा. त्यांच्याकडे धोक्याची सूचना देणारी साधने असावीत. मिरवणुकीत सहभागी झालेल्या प्रत्यकाला विद्युत सुरक्षेच्या नियमांची माहिती द्यावी.

**विसर्जन स्थळाची निवड**

शक्यतो प्रशासनाने ठरवून दिलेल्या कृत्रिम तलावांमध्येच विसर्जन करावे. विसर्जन स्थळी विजेचे खांब, ओपन स्विचेस किंवा इतर विद्युत उपकरणांपासून दूर रहा. ओल्या जागेवर किंवा पाण्यात पाय ठेवण्याआधी आजूबाजूला तुटलेल्या वायर्स नाहीत ना, याची खात्री करावी.

## कृषी पुरस्कारासाठी प्रस्ताव

**नागपूर, दि. ४ :** कृषि आणि संलग्न क्षेत्र तसेच फलोत्पादन क्षेत्रामध्ये विशेष कार्य करणाऱ्या, कृषि उत्पादन आणि उत्पन्न वाढीकरिता योगदान देणारे शेतकरी तसेच कृषि विस्तारामध्ये बहुमोल कामगिरी करणारे व्यक्ती, संस्था, गट यांच्याकडून कृषी पुरस्कारासाठी प्रस्ताव आमंत्रित केले आहे

दरवर्षी कृषि विभागामार्फत डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न, वसंतराव नाईक कृषिभूषण, जिजामाता कृषिभूषण, कृषिभूषण (सेंद्रिय शेती), वसंतराव नाईक शेतीमित्र, उद्यान पंडीत पुरस्कार, वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी व कृषि विभागातील अधिकारी आणि कर्मचारी यांच्यासाठी पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषि सेवारत्न पुरस्कार राज्यपाल यांच्या हस्ते प्रदान करून सन्मानित करण्यात येते.

महत्त्वाचे

## अमित मिश्राने घेतली निवृत्ती



**नवी दिल्ली** :भारताचा फिरकीपटू अमित मिश्राने व्यावसायिक क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे. त्यानं आपल्या २५ वर्षाचा प्रदीर्घ कारकीर्दीला पूर्णविराम दिला आहे. भारतीय क्रिकेट संघाची दारं बंद झाल्यावर तो आयपीएल खेळत होता. आता त्यानं सर्वच फॉरमॅटमधून निवृत्ती जाहीर केली.अमित मिश्राने भारताकडून २२ कसोटी सामने खेळले आहेत. तर ३६ वनडे सामन्यात देखील त्यानं भारताचं प्रतिनिधित्व केलं. टी २० क्रिकेटच्या बाबतीत बोलायचं झालं तर त्याला देशाकडून १० सामने खेळण्याची संधी मिळाली. त्यानं २००३ मध्ये आपली आंतरराष्ट्रीय कारकीर्द सुरू केली होती. त्याने देशाकडून २०१७ मध्ये शेवटचा सामना खेळला. कसोटीत अमित मिश्राच्या नावावर ७६ विकेट्स आहेत तर वनडेमध्ये ६८ आणि टी २० मध्ये १६ विकेट्स घेतल्या आहेत.

# ऋतुराज गायकवाडचा जलवा

## शतक झळकावत संघासाठी ठरला तारणहार

नवी दिल्ली : दि. ४ प्रतिनिधी

दुलीप ट्रॉफी २०२५ मधील दुसरा उपांत्य फेरीचा सामना खेळवला जात आहे. हा सामना वेस्ट झोन वि. सेंट्रल झोन यांच्यात खेळवला जात आहे. या सामन्यात वेस्ट झोन संघाचा फलंदाज ऋतुराज गायकवाडने शतक झळकावलं आहे. वेस्ट झोन संघाचे दोन्ही फलंदाज १५ धावांच्या आतच बाद झाले होते. त्यामुळे ऋतुराजच्या शतकाने संघाचा डाव सावरत महत्त्वपूर्ण कामगिरी केली होती.

वेस्ट झोन संघाचे दोन फलंदाज श्रेयस अय्यर आणि यशस्वी जैस्वाल अपयशी ठरले. यशस्वी जैस्वाल ४ धावा तर श्रेयस अय्यर मैदानावर स्थिरावल्यानंतर २५ धावा करत बाद झाला. ऋतुराजने मात्र चमकदार कामगिरी करत शतक केलं.दुलीप ट्रॉफीच्या उपांत्य फेरीत ऋतुराज गायकवाडने शानदार स्ट्राइक रोटेट करत त्याचा डाव साकारला. गायकवाडने सावधतेने खेळत ७० पेक्षा जास्त स्ट्राइक रेटने खेळत शतक झळकावलं. गायकवाडसह श्रेयस अय्यरही चांगली फलंदाजी करत होता, त्याने चार चौकार लगावले पण वेगवान फलंदाजी करण्याच्या प्रयत्नात तो २८ चेंडूत २५ धावांवर बाद झाला. पण गायकवाडने मैदानावर कायम राहत लंचब्रेकनंतर आपलं शतक पूर्ण केलं.१४ चौकारांसह ऋतुराजने आपलं शतक झळकावलं. तर गायकवाड २०६ चेंडूत १५ चौकार आणि एका षटकारासह १८४ धावा करण्यात यशस्वी ठरला. त्याच्याशिवाय आर्य देसाईने ६ चौकारांसह ३९ धावांची खेळी केली. तर तनुष कोटियन ११४ चेंडूत ५ चौकारांसह ६१ धावा करत नाबाद राहिला आहे. तर कर्णधार शार्दुल ठाकूरही १५ धावा करत नाबाद आहे.इंग्लंड दौऱ्यानंतर यशस्वी जैस्वाल देखील पहिल्यांदाच मैदानावर दिसला, पण तो फक्त ३ चेंडू खेळून माघारी परतला. डावखुरा वेगवान गोलंदाज खलील अहमदने जैस्वालला पायचीत करत बाद केलं. हार्विक देसाई देखील दीपक चहरचा बळी ठरला, तो एक धाव करत बाद झाला.यानंतर, आर्य देसाईने ऋतुराजसह ८२ धावांची भागीदारी केली, ज्यामुळे वेस्ट झोन संघाला सुरुवातीच्या धक्क्यांनंतर सावरण्यास मदत झाली. महत्त्वाची गोष्ट म्हणजे एकेकाळी गायकवाड भारताच्या कसोटी संघात सामील होणार असल्याची चर्चा होती पण आता तो तिन्ही फॉरमॅटसाठी संघाचा भाग नाहीये. ऋतुराज गायकवाडने बुची बाबू स्पर्धेत महाराष्ट्रासाठी शानदार शतकी खेळी केली.





## भारताच्या युकी भांब्रीने युएस ओपनमध्ये घडविला इतिहास

नवी दिल्ली : दि. ४ प्रतिनिधी

सध्या यूएस ओपन २०२५ स्पर्धा खेळवली जात आहे. या स्पर्धे त भारताच्या टेनिसपटूने इतिहास घडवला आहे.

ज्युनियर गटात ऑस्ट्रेलियन ओपन ग्रँड स्लॅम जिंकणारा भारताचा युकी भांब्रीने त्याचा जोडीदार न्यूझीलंडचा मायकेल व्हीनससह पहिल्यांदाच ग्रँड स्लॅम पुरुष दुहेरीच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे.

युकी आणि व्हीनस यांनी ११ व्या मानांकित निकोला मेकटिक आणि राजीव राम यांचा ६-३, ६-७, ६-३ असा पराभव केला. यापूर्वी त्यांनी केव्हिक क्रॉविट्झ आणि टिम पुएट्झ या चौथ्या मानांकित जर्मन जोडीचा पराभव केला होता. दुखापतींमुळे टेनिस एकेरी सोडल्यानंतर ३३ वर्षीय भांब्री दुहेरीवर लक्ष केंद्रित करत आहे. जगातील माजी ज्युनियर नंबर वन खेळाडू भांब्रीची ही सिनियर ग्रँड स्लॅममधील सर्वोत्तम कामगिरी आहे. यासह, भांब्रीने लिएंडर पेस, महेश भूपती आणि रोहन बोपण्णा यांच्यानंतर पुरुष दुहेरीत भारताचे वर्चस्व कायम ठेवले आहे.

## झिम्बाब्वेचा ‘रझा’ आयसीसी वनडे रँकिंगमध्ये ‘सिकंदर’



नवी दिल्ली : दि. ४ प्रतिनिधी

आयसीसीने नुकतीच नवीन एकदिवसीय () रँकिंग जाहीर केली आहे, ज्यात मोठी उलथापालथ झाली आहे. झिम्बाब्वेचा अष्टपैलू खेळाडू सिकंदर रझा आता जगातील नंबर १ एकदिवसीय अष्टपैलू खेळाडू बनला आहे. त्याने अफगाणिस्तानच्या दोन खेळाडूंना मागे टाकून हे स्थान पटकावले आहे.याआधी, अफगाणिस्तानचा अष्टपैलू खेळाडू अझमतुल्ला उमरझाई पहिल्या स्थानावर होता, पण तो आता एका स्थानाने घसरून दुसऱ्या क्रमांकावर पोहोचला आहे. तर, अफगाणिस्तानचाच आणखी एक अष्टपैलू खेळाडू मोहम्मद नबी दुसऱ्यावरून तिसऱ्या स्थानावर आला आहे. श्रीलंकेविरुद्ध हरारे येथे झालेल्या दोन सामन्यांमधील दमदार कामगिरीमुळे सिकंदर रझाला हे यश मिळाले आहे. त्याने दोन्ही सामन्यांमध्ये अर्धशतके झळकावली आणि एक विकेटही घेतली. या अप्रतिम कामगिरीमुळे त्याचे रेटिंग ३०२ वर पोहोचले आहे, तर मोहम्मद नबी आणि अझमतुल्ला उमरझाई यांचे रेटिंग अनुक्रमे २९२ आणि २९६ आहे.

रझा फलंदाजांच्या रँकिंगमध्येही ९ स्थानांनी पुढे सरकत २२ व्या क्रमांकावर आला आहे.टॉप-१० अष्टपैलू खेळाडूंच्या यादीत बांगलादेशचा मेहदी हसन मिराज चौथ्या, तर न्यूझीलंडचा मायकेल ब्रेसवेल पाचव्या स्थानावर कायम आहेत. टॉप-१० मध्ये सिकंदर रझा व्यतिरिक्त मिचेल सँटनर (न्यूझीलंड) आणि रशीद खान (अफगाणिस्तान) यांनाही फायदा झाला आहे. सँटनरला एका स्थानाचा फायदा झाला आहे. तो सहाव्या, तर रशीद खान सातव्या स्थानावर पोहोचला आहे. रवींद्र जडेजा नवव्या स्थानावर कायम आहे. न्यूझीलंडचा रचिन रवींद्र दोन स्थानांनी पुढे सरकत १० व्या स्थानावर पोहोचला आहे. एकदिवसीय गोलंदाजी रँकिंगमध्येही मोठे बदल झाले आहेत. श्रीलंकेचा महेश तीक्षणा पहिल्या स्थानावरून घसरून दुसऱ्या स्थानावर आला आहे. याआधी तो केशव महाराजसोबत संयुक्तपणे पहिल्या क्रमांकावर होता. विशेष म्हणजे, भारताचा रवींद्र जडेजा कोणताही सामना न खेळताही त्याला एका स्थानाचा फायदा झाला आहे.

## धवन अडकला ईडीच्या कचाट्यात



नवी दिल्ली : दि. ४ प्रतिनिधी

भारताचा क्रिकेट संघाचा माजी कर्णधार आणि सलामीचा फलंदाज शिखर धवन अडचणीत सापडला आहे. सक्तवसुली संचालनालयाने शिखर धवनला नोटीस पाठवली आहे. ऑनलाइन सट्टा आणि मनी लाँड्रिंग प्रकरणात त्याला चौकशीसाठी बोलवण्यात आले आहे. काही दिवसांपूर्वी हरभजन सिंग आणि सुरेश रैना यांना ईडीने नोटीस पाठवली होती. अशातच आता शिखर धवन देखील ईडीच्या कचाट्यात सापडला आहे.ऑनलाईन बेटिंग प्लॅटफॉर्मशी संबंधित पैशांच्या गैरव्यवहाराची ईडी चौकशी करत आहे. याच प्रकरणात धवनने सोशल मीडियावर या अॅपचा प्रचार केल्याचा आरोप आहे. त्यामुळे ईडीकडून धवनची चौकशी केली जाणार आहे.आर्थिक गैरव्यवहार प्रतिबंधक कायद्याअंतर्गत ईडीकडून १ नावाच्या अवैध सट्टेबाजी अॅपसंदर्भातील प्रकरणाचा तपास सुरु आहे. संबंधित बेटिंग अॅपच्या माध्यमातून अनेक लोक आणि गुंतवणूकदारांची फसवणूक करण्यात आली आहे. या अॅपच्या जाहिरातीमध्ये दिसल्यामुळे या प्रकरणात शिखर धवनचा जबाब नोंदवला जाणार आहे.ऑनलाईन गेमिंग अॅपसंदर्भातील प्रकरणात शिखर धवन आधी अन्य काही क्रिकेटर्सही ईडीच्या रडारवर आल्याचे पाहायला मिळाले आहे. यात भारताचा माजी अष्टपैलू आणि स्पेशलिस्ट सुरेश रैनासह हरभजन सिंग आणि युवराज सिंग यांचीही ईडीनं चौकशी केली होती. क्रिकेटर्सशिवाय अन्य काही सेलिब्रिटींही ईडीच्या चौकशीच्या फेऱ्यात आले आहेत. या यादीत विजय देवरकोंडा, राणा दग्गुबाती, प्रकाश राज, हरभजन सिंग, उर्वशी रौतेला यांचाही समावेश आहे.दरम्यान, केंद्र सरकारने अलीकडेच ऑनलाइन रिअल मनी गेमिंग प्लॅटफॉर्म्सवर बंदी घालण्यासाठी नवीन कायदा लागू केला आहे.

## लिटन दासचा टी-२० मध्ये मोठा कारनामा!

**नवी दिल्ली** : बांगलादेश आणि नेदरलँड्स यांच्यात तीन सामन्यांची टी-२० मालिका खेळवण्यात आली. या मालिकेतील तिसऱ्या सामन्यात बांगलादेशचा कर्णधार लिटन दासने इतिहास रचला आहे. लिटन दा टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात बांगलादेशसाठी सर्वाधिक अर्धशतके ठोकणारा पहिलाच खेळाडू ठरला आहे.पावसामुळे टी-२० मालिकेतील तिसरा सामना रद्द झाला. पण तरी देखील, लिटन दासने बांगलादेशचा माजी कर्णधार शाकिब अल हसनचा विक्रम मोडीत काढला आहे. शाकिब अल हसनने बांगलादेशसाठी टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये १३ अर्धशतकी खेळी साकारल्या आहेत. आता लिटन दासच्या नावावर टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये १४ अर्धशतकं जमा झाली आहे.नेदरलँड्सविरुद्धच्या तिसऱ्या टी-२० सामन्यात लिटन दासने ४६ चेंडूचा सामना करत ७३ धावांची खेळी केली.

## महिला विश्वचषकासाठी दक्षिण आफ्रिकेचा संघ घोषित

नवी दिल्ली : दि. ४ प्रतिनिधी



महिला विश्वचषक २०२५ साठी दक्षिण आफ्रिकेच्या संघाची घोषणा करण्यात आली आहे. या संघात १७ वर्षीय तरुण यष्टीरक्षक-फलंदाज कराबो मेसोचा देखील समावेश करण्यात अल आहे. ३० सप्टेंबरपासून महिला विश्वचषक २०२५ स्पर्धेला सुरुवात होणार आहे. त्यासाठी आफ्रिकन महिला संघ जाहीर करण्यात आला आहे.

संघात संधि देण्यात आलेल्या १७ वर्षीय मेसोने या वर्षी मार्चमध्ये श्रीलंकेविरुद्धच्या टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात वरिष्ठ संघात पदार्पण केले होते. त्यानंतर तिने आतापर्यंत दक्षिण आफ्रिकेसाठी दोन एकदिवसीय आणि पाच टी-२० सामने खेळलेले आहेत. २०२३ आणि २०२५ मध्ये दोन अंडर-१९ महिला टी-२० विश्वचषक स्पर्धेत सहभागी झाल्यानंतर मेसो तिच्या पहिल्या वरिष्ठ विश्वचषकात खेळणार आहे.दक्षिण आफ्रिका क्रिकेटकडून महिला विश्वचषकासाठी १५ सदस्यीय संघ जाहीर करण्यात आला आहे. दक्षिण आफ्रिकेची माजी कर्णधार डेन व्हॅन निकर्कचा या संघात स्थान देण्यात आले नाही. ती नुकतीच निवृत्तीनंतर सक्रिय झाली होती. तिला संघात स्थान देण्यात येणार नाहीत, याबाबत आधीच अंदाज लावण्यात आला होता. नीकर्कने निवृत्तीनंतर विश्वचषक खेळण्यासाठी परतण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

## जीएसटी २.० मुळे ब्रँडेड कपडे आणखी महागणार?

ब्रँडेड किंवा प्रिमियम कपडे घालण्याचा छंद असलेल्या ग्राहकांच्या खिशाला आता आणखी झळ पोहोचणार आहे. कारण जीएसटीच्या नव्या दर रचनेत आता २,५०० रुपये किंमतीच्या वर असलेल्या ब्रँडेड कपड्यांवर १२ टक्क्यांऐवजी १८ टक्के इतका जीएसटी द्यावा लागणार आहे. या नव्या निर्णयामुळे मार्क्स अँड स्पेन्सर, लेव्हीज, झारा आणि एच अँड एम सारख्या जागतिक फॅशन ब्रँडवर परिणाम होऊ शकतो, अशी शक्यता आहे.सामान्य ग्राहकांना दैनंदिन आयुष्यात लागणाऱ्या अनेक वस्तूंवरील जीएसटी दर कमी करण्यात आला आहे. यामुळे केंद्र सरकारला ९३ हजार कोटी रुपयांची महसुली तूट सोसावी लागणार आहे. ही तूट भरून काढण्यासाठी सरकारने महागड्या कपड्यांवरील कर वाढवला आहे. त्यामुळे ब्रँडेड आणि प्रिमियम कपड्यांसाठी ग्राहकांना आता अधिक खर्च करावा लागणार आहे. उद्योग तज्ज्ञांनी व्यक्त केलेल्या अंदाजानुसार, यामुळे मध्यम ते प्रीमियम श्रेणीतील ग्राहकांकडून मागणी कमी होऊ शकते.ब्रँडेड कपड्यांवरील कर वाढला असला तरी सरकारने मानवनिर्मित तंतूंवरील जीएसटी १८ टक्क्यांवरून ५ टक्क्यावर आणला आहे. मानवनिर्मित धाग्यावरील जीएसटी १२ वरून ५ टक्क्यांपर्यंत कमी केल्यामुळे आता देशांतर्गत कापड उत्पादकांना चालना मिळेल. त्यामुळे भारतातील कृत्रिम कापड उद्योग जागतिक स्तरावर अधिक स्पर्धात्मक होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे रोजगार वाढतील

## उद्योग आणि वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांचे मत

नवी दिल्ली : दि. ४ प्रतिनिधी

केंद्रीय उद्योग आणि वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांच्या मतानुसार कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानामुळे अनेक नव्या संधी उपलब्ध होणार. तसेच यामुळे देशात रोजगार निर्मिती वाढण्यास मदत होणार आहे. गोयल यांनी सांगितले की मी, माझ्या कार्यालयाच्या संचालकांना अशी सूचना केली आहे की, कार्यालयातील प्रत्येकाकडे ए आय आणि चॅटजीपीटीचे आधुनिक मॉडेल उपलब्ध असणे गरजेचे आहे. या तंत्रज्ञानाचा वापर संगणक किंवा मोबाईल वरून करण्यास आपण मुभा दिलेली आहे.

आमचे कार्यालय आणि कार्यालयातील प्रत्येक व्यक्ती कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर करत आहे. मात्र हे तंत्रज्ञान वापरताना काळजी घेण्याचीही तितकीच गरज आहे. किमान सुरुवातीच्या काळात तरी फेरपडताळणी करून हे तंत्रज्ञान वापरण्याची गरज आहे.



गोयल यांनी सांगितले की, कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रावर गेल्या वीस वर्षांपासून मोठ्या प्रमाणात काम होत आहे. मात्र त्याचा प्रत्यक्ष वापर करण्याइतके हे तंत्रज्ञान विकसित झाले नव्हते. आता या तंत्रज्ञानाची वेळ आली आहे आणि आपण याचा वापर करण्याची गरज आहे. भारताने सदैव नव्या तंत्रज्ञानाचा स्वीकार केला आहे. माहिती तंत्रज्ञान सुरू झाल्यानंतर भारतातील तरुणांनी हे तंत्रज्ञान स्वीकारल्यामुळे आता या क्षेत्रात भारत आघाडीवर आहे. याच क्षेत्रातील तरुण कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात अग्रेसर राहतील असा आपल्याला विश्वास आहे. या तंत्रज्ञानाबाबत काहीजण नकारात्मक वातावरण निर्मिती करत आहेत.

ते करत राहण्याची शक्यता आहे. मात्र असा प्रकार वेळोवेळी नव्या तंत्रज्ञानाबाबत होत आलेला आहे.हे तंत्रज्ञान स्वीकारणाऱ्यांची संख्या सध्या जास्त आहे. ही समाधानाची बाब असल्याचे मत त्यांनी वक्त केले. नकारात्मक वक्तव्याकडे दुर्लक्ष करून हे तंत्रज्ञान स्वीकारण्याचे आवाहन गोयल यांनी केले. भारतात जास्त लोकसंख्या असताना हे तंत्रज्ञान वापरावे काय याबाबत चर्चा होत आहे. मात्र गोयल म्हणाले की, या तंत्रज्ञानामुळे नवे रोजगार मिळतील आणि त्याचा सध्याच्या रोजगारावर परिणाम होणार नाही असा मला विश्वास आहे. तंत्रज्ञानाचा नैतिक पद्धतीने वापर करण्याबाबत प्रयत्न करण्याची गरज असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

निर्णय | पीएमआय निर्देशांक ५९.३ अंकावर

# मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्राची उत्पादकता वाढली

नवी दिल्ली : दि. ४ प्रतिनिधी

मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रातील मरगळ आता संपुष्टात आल्याची लक्षणे दिसून येत आहेत. ऑगस्ट महिन्यात मनुफॅक्चरिंग क्षेत्राची उत्पादकता मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे या क्षेत्राचा परचेसिंग मॅनेजर इंडेक्स वाढून ५९.३ अंकावर गेला आहे. जुलै महिन्यात हा निर्देशांक ५९.१ अंकावर होता. ही आकडेवारी या क्षेत्रातील उत्पादकता १७ वर्षांच्या उच्चांकावर असल्याचे नमूद करीत आहेत.

जागतिक व्यापार युद्ध आणि इतर कारणामुळे जागतिक वातावरण खराब झाले असतानाच भारताची स्थूल अर्थव्यवस्था कमालीची बळकट असल्याची आकडेवारी समोर येत आहे. भारत सरकार मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्राची उत्पादकता वाढवावी यासाठी प्रयत्न करत आहे. त्यासाठी मेक इन इंडिया मोहीम राबविण्यात आली आहे. त्याअंतर्गत विविध उद्योगांना उत्पादकता आधारित अनुदान जाहीर केले जाते.





भारताच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नात मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्राचा वाटा केवळ १८% आहे. तो नजीकच्या काळात २५% पर्यंत वाढविण्याची सरकारची योजना आहे. मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रातील उद्योगांना देशातून तसे परदेशातून ऑर्डर वाढत आहेत. त्याचबरोबर या क्षेत्राची कार्यक्षमता वाढत आहे. अशा परिस्थितीत या क्षेत्राकडून गुंतवणूक आणि रोजगार निर्मिती होत असल्याचे दिसून येत आहे.

हा निर्देशांक तयार करणाऱ्या एचएसबीसी या कंपनीच्या अर्थतज्ज्ञ प्रांजूल भंडारी यांनी सांगितले की, अमेरिकेने भारताविरोधात शुल्क लावण्याअगोदरची ही आकडेवारी आहे. आगामी काळात अमेरिकेतून मिळणाऱ्या ऑर्डरवर काही प्रमाणात परिणाम अपेक्षित आहे. भारताने अगोदरच पर्याय बाजारपेठा उपलब्ध करण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. भारतातील मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रातील उद्योग रशिया, आशियाई देश आणि मध्यपूर्व येथील देशाकडून जास्तीत जास्त ऑर्डर मिळण्याचा प्रयत्न करीत आहे.कोरोनानंतर या क्षेत्राच्या उत्पादकतेवर परिणाम झाला होता. ऑर्डर कमी झाल्या होत्या. मात्र आता देशातील ग्राहकांनी मागणी वाढविण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे देशांतर्गत मागणी वाढत आहे. ही अतिशय समाधानाची बाब आहे. पहिल्या तिमाईचा विकासदर ७.८% इतका जाहीर झाल्यानंतर अर्थ मंत्रालयाचे मुख्य सल्लागार व्ही अनंत नागेश्वरन यांनी सांगितले की, अमेरिकेच्या निर्णयाचा दुसऱ्या तिमाहीच्या आकडेवारीवर काही प्रमाणात परिणाम होण्याची शक्यता आहे. मात्र यातून मार्ग काढण्यासाठी भारत प्रयत्न करीत आहे.

## जीएसटी दर कपातीनंतर सिमेंट होईल स्वस्त





नवी दिल्ली : दि. ४ प्रतिनिधी

केंद्र सरकारने १२ टक्के आणि २८ टक्क्याचे जीएसटी स्लॅब रद्द करून देशातील सामान्य नागरिकांना मोठा दिलासा दिला आहे. आतापासून देशात फक्त ५ टक्के आणि १८ टक्के जीएसटी दर असतील. जे २२ सप्टेंबर २०२५ पासून लागू होतील. सरकारने सिमेंट इत्यादी अनेक बांधकाम साहित्यांवरील जीएसटी दर देखील कमी केला आहेसरकारने सिमेंटवरील जीएसटी दर २८ टक्क्या वरून १८ टक्क्या पर्यंत कमी केला आहे. जेएम फायनान्शियल इन्स्टिट्यूशन सिक्युरिटीजचा असा विश्वास आहे की या बदलामुळे उद्योगाला संरचनात्मक दिलासा मिळेल. जेएम फायनान्शियलच्या मते जीएसटी कपातीनंतर सिमेंट क्षेत्रावर मोठा परिणाम होईल, परिणामी बांधकाम क्षेत्रावरही परिणाम होईल.

# कामगारांच्या कामांच्या तासांमध्ये कोणताही बदल नाही - फुंडकर

## कामगार अधिनियम दुरुस्ती : राज्य मंत्रिमंडळाने मंजुरी दिल्याची चर्चा

। धनंजय कपाले ।

**वाशिम, दि. ४ :** कामगारांच्या अधिनियम दुरुस्तीला राज्य मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. यावरुन राज्यात विविध चर्चांना उधाण आलं होतं. आता कामगारांना ९ तासां ऐवजी १२ तास काम करावं लागेल, अशा निर्णयाला राज्य मंत्रिमंडळाने मंजुरी दिल्याची चर्चा होती. यामुळे कामगार आठवड्यात ४७ ऐवजी ६० तास काम करतील, काय ? या प्रश्नावर अखेर कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी असा कोणताही बदल होणार नसल्याचे वाशिम येथे पत्रकारांशी संवाद साधताना विधान करून संभ्रम दूर करण्याचा प्रयत्न केला.



कामगारांच्या अधिकाऱ्यांवर कुठेही गदा येणार नाही, असं फुंडकर यांनी सांगितलं. तसेच कामगारांच्या कामांच्या तासांमध्ये कोणताही बदल केला नसल्याची माहिती त्यांनी दिली. केवळ काही नियमांमध्ये सुधारणा केल्याचं ते म्हणाले. ही जी सुधारणा आपण केली आहे त्यातून कामगारांच्या कामाच्या तासांमध्ये फ्लेक्झिब्लिटी आणत आहोत. बऱ्याचदा आपण पाहतो, दिवाळीच्या सणामध्ये बरेचसे असे प्रोडक्ट्स असतात, ज्याचं उत्पादन वाढवण्याची गरज असते. त्या वाढवण्यासाठी जास्त काम करण्याची आवश्यकता असते. मग अशा आपात्कालीन परिस्थितीत कामगारांना जास्त काम करुन घेणे, किंवा नवीन कामगार भरणे हा एक पर्याय कंपन्यांसमोर असतो. अशावेळेस आम्ही एक मुभा कंपन्यांना देतोय. त्यांनी कामगारांच्या लेखी संमतीने कामगारांच्या कामाचे तास त्यांना वाढवता येतील. त्यामध्ये त्यांना कामगारांच्या कामाची जी ४८ तासांची मर्यादा आहे ती त्यांना वाढवता येणार नाही'', असं मंत्री आकाश फुंडकर यांनी स्पष्ट केलं.

समजा चार दिवसांत त्यांचे कामाचे ४८ तास होतात, जो पाचवा आणि सहावा दिवस उरेल त्यासाठी त्यांना पेड लिव्ह देण्यात येईल. त्यांच्याकडून जे मर्यादापेक्षा जास्त काम होणार आहे त्याचा दुप्पट मोबदला कामगारांना मिळणार आहे. संभ्रमाची कोणतीही बाब नाहीय. आपण ४८ तासांची मर्यादा कायम ठेवतोय. सोबतच यामध्ये कामगारांचा लेखी परवानगी आवश्यक आहे. तसेच सरकारची देखील परवानगी घ्यावी लागणार आहे. त्यामुळे कोणत्याही कामगारावर अन्याय होईल, अशी बाब नाही'', असं आकाश फुंडकर यांनी स्पष्ट केलं.

''हा निर्णय कर्नाटक, तेलंगणा, उत्तर प्रदेश, त्रिपुरा, आसाम या सर्व राज्यांनी जिथे इंडस्ट्री जास्त आहे, अशा सर्व राज्यांनी लागू केला आहे. जगामध्ये काही देशांमध्ये सुद्धा हा निर्णय लागू आहे आणि तो अत्यंत फायद्याचा आहे. कारण ठरल्यापेक्षा जितके जास्त तास कामगार काम करतील त्याच्या दुप्पट पैसे कामगारांना मिळू शकणार आहे. याआधी मिळत नव्हता. आपण कित्येक फॅक्ट्रीत चेक करा, अजूनही कामगारांना दहा ते बारा तास काम करुन घेण्यात येते आणि मोबदला आठ तासांचा मिळतो. त्यामुळे आता हा कामगारांचा फायद्याचा निर्णय आपण घेतलाय. कामगारांच्या परवानगी नंतर हा निर्णय लागू होईल'', अशी प्रतिक्रिया कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी दिली.

## महत्त्वाचे

### सण उत्सवाच्या अनुषंगाने शहरात पोलिसांचा रूट मार्च

**मानोरा :** गणेश उत्सव आणि ईद या अनुषंगाने पोलिस स्टेशन मनोरा ते दिग्रस चौक, डिग्रस रोड, वसंतनगर पर्यंत व याच मार्गाने दिग्रस चौक पर्यंत रूट मार्च पार पडला. उपविभागीय पोलीस अधिकारी कारंजा पाडवी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक नैना पोहेकर आणि पोलिस अधिकारी,कर्मचारी उपस्थितीत काढण्यात आला. सदर रूट मार्च मध्ये ६ अधिकारी २४ अंमलदार, १५ होमगार्ड व १ आर सी पी पथक , २ सरकारी जीप,१ मोठे वाहन,१ मोटार सायकल सहभागी करण्यात आले होते.

### स्वराज्य सरपंच सेवा संघटनेचा गंभीर इशारा

**चंद्रपूर :** गावाचा विकास व शासनाच्या विविध योजना नागरिकांपर्यंत पोहचवण्याचा मुख्य दुवा ग्राम पंचायत चा सरपंचच असतो.मात्र चिमूर तालुक्यासह पूर्ण जिल्ह्यात सरपंच,उपसरपंच यांच्या अनेक समस्या आजही आवासून उभ्या आहेत. या समस्या सोडविण्यासाठी सरपंच स्वराज्य सेवा संघटनेचे सरपंच दिनांक. १ सप्टेंबर ला ग्राम पंचायत कार्यालयाला ताला ठोकणार असल्याचा गंभीर ईशारा जिल्हाधिकारी, मुख्य कार्यपालन अधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून दिला आहे,त्यामुळे प्रशासनात आता मोठी खळबळ उडाली आहे. गावातील नागरिकांना नाली, रस्ते,विद्युत,पाणी या प्राथमिक सुविधा पूरवण्याचे काम ग्राम पंचायत स्तरावरून केले जाते. मात्र या प्राथमिक सुविधा पुरविण्यासाठीही राजकीय हस्तक्षेप होत आहे. विविध ग्राम पंचायत चे सरपंच हे फक्त नाममात्र राहिले आहेत. त्यामुळे सरपंच यांच्या अधिकारात हस्तक्षेप टाळावा व गावाचं विकास व्हाव या करिता स्वराज्य सरपंच संघटना आक्रमक झाली असून गावाच्या विकासासाठी व नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी ग्राम पंचायत कार्यालयाला एक सप्टेंबरला पूर्णतः ताला ठोको आंदोलन तालुक्यात करणार असल्याचे निवेदन जिल्हाधिकारी, मुख्य कार्यपालन अधिकारी यांना सरपंच संघटनेचे अध्यक्ष प्रशांत कोल्हे यांनी शुक्रवारी संवर्ग विकास अधिकारी यांचे मार्फत दिले आहे. यावेळी सावरी येथील सरपंच लोकनाथ रामटेके,सरपंच रामदास चौधरी, उपसरपंच अशोक चौधरी, उपसरपंच प्रिती दिडमुठे, उपसरपंच वैभव ठाकरे आदी सरपंच यावेळी उपस्थित होते.

# महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या कोअर बँकिंग प्रणालीचे एकत्रीकरण

## सप्टेंबरमध्ये काही दिवस सेवा विस्कळित होण्याची शक्यता

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. ४ :** केंद्र शासनाच्या अर्थ मंत्रालय आणि वित्तीय सेवा विभागाने ७ एप्रिल २०२५ रोजी प्रसिद्ध केलेल्या राजपत्रानुसार, तत्कालीन महाराष्ट्र ग्रामीण बँक आणि विदर्भ कोकण ग्रामीण बँक यांचे एकत्रीकरण होऊन एक मे २०२५ पासून संपूर्ण महाराष्ट्रासाठी नवीन 'महाराष्ट्र ग्रामीण बँक' अस्तित्वात आली आहे. पूर्वीप्रमाणेच ही बँक पूर्णतः शासकीय मालकीची असून, यामध्ये भारत सरकार, महाराष्ट्र राज्य सरकार आणि बँक ऑफ महाराष्ट्र यांचे भागभांडवल आहे. या एकत्रीकरणाच्या अनुषंगाने, विदर्भ कोकण ग्रामीण बँकेच्या कोअर बँकिंग प्रणालीचे महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या कोअर बँकिंग प्रणालीसोबत विलीनीकरण करण्याची प्रक्रिया दि. १३ सप्टेंबर ते १६ सप्टेंबर २०२५ या कालावधीत नियोजित करण्यात आली आहे. या प्रक्रियेदरम्यान बँकेच्या एटीएम, मोबाईल बँकिंग, इंटरनेट बँकिंग, यूपीआय, आरटीजीएस, एनईएफटी, आयएमपीएस, डीबीटी, व्हीकेवायसी, आधार-आधारित पेमेंट प्रणाली, धनादेश वटविणे, स्थायी सूचना यासारख्या सर्व डिजिटल व इतर बँकिंग सेवा तात्पुरत्या स्वरूपात विस्कळित किंवा खंडित होऊ शकतात. एकत्रीकरणाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सर्व सेवा पुन्हा पूर्ववत सुरू होतील, असे बँकेने कळविले आहे. बँकेने ग्राहकांना होणाऱ्या गैरसोयीबद्दल दिलगिरी व्यक्त केली आहे. तसेच, या काळात संभाव्य तातडीच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी ग्राहकांनी पूर्वतयारी करावी, असे आवाहनही केले आहे. कोणतीही अडचण, शंका किंवा तक्रार असल्यास ग्राहकांनी बँकेच्या नजीकच्या शाखेशी किंवा www. mahagramin.in या अधिकृत संकेतस्थळावर संपर्क साधावा. दि.१५ सप्टेंबरपासून सर्व सेवा ग्राहकांसाठी पुन्हा सुरळीत होतील आणि त्या अधिक तत्पर व सोयीच्या असतील, असेही बँकेतर्फे सांगण्यात आले आहे.

# पगारदार पतसंस्थांचे राज्यस्तरीय अधिवेशन लातूरला

## १४ सप्टेंबर रोजी आयोजन ; धोरणात्मक बदलांवर होणार विचारमंथन

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. ४ :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काळानुरूप नागरी सहकारी व पगारदार सहकारी पतसंस्थांच्या कायद्यात आणि कामकाजात बदल करण्याची गरज व्यक्त केली आहे. या पार्श्वभूमिवर, महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फ ेडरेशनने रविवार, दिनांक १४ सप्टेंबर २०२५ रोजी लातूर येथे राज्यातील पगारदार सहकारी पतसंस्थांचे एकदिवसीय विचार मंथन अधिवेशन आयोजित केले आहे.

आंतरराष्ट्रीय सहकार वर्षाचे औचित्य साधून शासन पगारदार सहकारी पतसंस्थांच्या उपविधीमध्ये बदल करण्याच्या विचारात आहे. यासाठी नेमलेल्या समितीत महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे यांची निवड झाली आहे. या दोन्ही विषयांच्या अनुषंगाने हे अधिवेशन महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या अधिवेशनाचे उद्घाटन लातूर जिल्हा भाजप अध्यक्ष व माजी मंत्री बसवराज पाटील यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमास राज्याचे सहकारमंत्री बाबासाहेब पाटील आणि सहकार आयुक्त दीपक तावरे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. तसेच, लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष धीरज देशमुख आणि लातूरचे आमदार अमित देशमुख हे देखील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. या अधिवेशनात पगारदार पतसंस्थांसमोरील विविध महत्त्वाच्या विषयांवर चर्चा होणार आहे. पतसंस्थांच्या उपविधीमध्ये आवश्यक नवीन बदल, कामकाजामध्ये सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा सहभाग असावा का?, पतसंस्थांना नाममात्र सभासदांच्या ठेवी स्वीकारण्यास परवानगी द्यावी का?, पतसंस्थांसाठी उपलब्ध असलेले विविध व्यवसायांचे पर्याय, जिल्हा मध्यवर्ती बँकांमधील गुंतवणूक बंधनकारक असावी का?, नागरी व सहकारी बँकांकडून कर्ज घेण्याचा पर्याय उपलब्ध असावा का?, विविध जिल्हा मध्यवर्ती बँकांमध्ये अडकलेले भागभांडवल व ठेवी, पतसंस्थांचे थकीत कर्ज वसुलीचे प्रश्न, आयकर, जीएसटी आणि पीएफ संबंधित समस्या, आदी विषयांवर चर्चा होणार आहे.

### दीपस्तंभ पुरस्काराचे वितरण

या चर्चासत्रासोबतच राज्यातील निवडक पतसंस्थांना 'दीपस्तंभ पुरस्कार'आणि ५ अध्यक्षांना 'बेस्ट चेअरमन ऑफ द इंटरनॅशनल को-ऑप ऑफ द इयर' पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे. राज्यातील सर्व पगारदार पतसंस्थांचे अधिकारी आणि कर्मचारी यांनी या अधिवेशनात मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन राज्य फेडरेशनचे अध्यक्ष ओमप्रकाश दादाप्पा, काका कोयटे आणि राज्य समन्वयक राजूदास जाधव यांनी केले आहे.

# 'रक्तचंदन' समजून कोटी घेतले, आता परत करण्याची वेळ

## शेतकऱ्याची याचिका अन् अजब 'वृक्ष'पुराण, उच्च न्यायालयात रंजक खुलासा

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. ४ :** 'चमकते ते सारे सोने नसते' या म्हणीचा प्रत्यय जिल्ह्यातील एका शेतकऱ्याला आला आहे. शासनानेच 'रक्तचंदन' म्हणून नोंदविलेल्या वृक्षापोटी मिळालेल्या कोट्यवधी रुपयांच्या आनंदावर, एका वैज्ञानिक अहवालाने विरजण घातले आहे. आता मिळालेली ५० लाखांची रक्कम परत करण्याची वेळ आल्याने, या शेतकऱ्याची अवस्था एखाद्या विनोदी चित्रपटातील नायकासारखी झाली आहे.

हा अजब घटनाक्रम मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठासमोर आला आहे. जिल्ह्यातील पुसद तालुक्यातील



खर्शी येथील शेतकरी केशव तुकाराम शिंदे यांची जमीन वर्धा-यवतमाळ-नांदेड रेल्वे प्रकल्पासाठी अधिग्रहित करण्यात आली. अधिग्रहणाच्या वेळी शासकीय अधिकाऱ्यांनी शिंदे यांच्या शेतातील शंभर वर्षे जुन्या वृक्षाची नोंद 'रक्तचंदन' म्हणून केली. जमिनीचा मोबदला मंजूर झाल्यावर, शिंदे यांनी या मौल्यवान वृक्षाच्या मोबदल्यासाठी न्यायालयात धाव घेतली. शासनाचीच नोंद ग्राह्य धरून न्यायालयाने रेल्वे प्रशासनाला शेतकऱ्याच्या नावे कोट्यवधी रुपये जमा करण्याचे आदेश दिले. इतकेच नव्हे, तर त्यातील अर्धी रक्कम काढण्याची परवानगीही शिंदे यांना मिळाली. क्षणार्धात नशिबाने कलाटणी घेतल्याने शिंदे यांचे आयुष्य बदलून गेले. मात्र, उर्वरित रक्कम देण्यापूर्वी न्यायालयाने वृक्षाचे वैज्ञानिक मूल्यांकन करण्याचा महत्वपूर्ण आदेश दिला. या एका निर्णयाने प्रकरणाला अनपेक्षित वळण मिळाले. न्यायालयाच्या आदेशानुसार, वन विभागाने बंगळूर येथील काष्ठ विज्ञान आणि तंत्रज्ञान संस्थेमार्फत वृक्षाची तपासणी केली. या संस्थेने दिलेल्या अहवालाने सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला. हा वृक्ष बहुमूल्य रक्तचंदनाचा नसून, सामान्य औषधी गुणधर्म असलेल्या 'बिजासाला'चा असल्याचे सिद्ध झाले. यामुळे जिथे कोट्यवधी रुपयांच्या मोबदल्याची अपेक्षा होती, तिथे शेतकऱ्याच्या हाती काही हजारांची रक्कम येणार असल्याचे स्पष्ट झाले. या अनपेक्षित खुलाशाने शिंदे यांच्या आनंदावर पूर्णपणे पाणी फेरले गेले. आता रेल्वे प्रशासनाने शेतकऱ्याला दिलेली रक्कम व्याजासह परत मिळावी, यासाठी न्यायालयात विनंती केली आहे. मध्य रेल्वेतर्फे ॲड. नीरजा चौबे या प्रकरणात बाजू मांडत आहेत.

# सोलार कंपनीत स्फोट: बच्चू कडू घटनास्थळी

## मालकावर गुन्हा नोंदवला नाही तर ...



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**नागपूर, दि. ४ :** बुधवारी मध्यरात्री नंतर नागपूर जिल्ह्यातील बाजारगाव येथील सोलर एक्सप्लोसिव कंपनीत भीषण स्फोट झाला. यात एका कामगाराचा मृत्यू झाला असून १६ जण जखमी झाले आहेत. त्यापैकी चौघांची प्रकृती चिंताजनक आहे.

दरम्यान प्रहार संघटनेचे प्रमुख व माजी मंत्री बच्चू कडू यांनी सोलार कंपनी परिसराला भेट दिली असून कंपनीच्या प्रवश्व्दारापुढे निदर्शने सुरू केली आहे. स्फोट प्रकरणात कंपनीच्या मालकावर गुन्हा दाखल करावा, अशी मागणी कामगार, त्यांचे नातेवाईक यांच्यावतीने कडू यांनी केली आहे.

बुधवारी मध्यरात्री झालेल्या स्फोटाचा आवाज दूरपर्यंत गेल्याने परिसरील शेकडो गावकरीआणि कंपनीत काम करणाऱ्या कामगारांचे नातेवाईक बाजारगावमधील कंपनीच्या प्रवेशव्दारापुढे जमा झाले होते. त्यांना कंपनीत प्रवेश नाकारल्याने व आतमध्ये काय झाले याची माहिती देत नसल्याने ते संतप्त झाले होते. दरम्यान गुरुवारी या घटनेची माहिती कळताच प्रहार संघटनेचे प्रमुख व माजी मंत्री बच्चू कडू घटनास्थळी दाखल झाले. त्यांच्यासोबत मोठ्या संख्येने प्रहारचे कार्यकर्ते होते. त्यांनी कंपनीच्या प्रवेशव्दारापुढे जोरदार निदर्शने केली. या प्रकरणी कंपनीच्या मालकावर गुन्हे दाखल करा, अशी मागणी केली. दरम्यान व्यवस्थापनाने कडू यांच्या नेतृत्वाखालील एका शिष्टमंडळाला भेटीसाठी बोलवले. कडू हे त्यांच्या शिष्टमंडळासह चर्चेसाठी गेले. पण थोड्या वेळाने ते परत आले.

काय म्हणाले कडू - दोन दिवसात जर स्फोट प्रकरणात कंपनीच्या मालकावर गुन्हे दाखल झाले नाही तर, पोलीस ठाणे आणि मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानाला घेराव घातला जाईल, असा इशारा बच्चू कडू यांनी दिला.

शिक्षक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा



श्री निलेश खेंडकर
सचिव: श्री गजानन महाराज शिक्षण व क्रीडा व्यायाम प्रसारक मंडळ, कळंबेश्वर ता. जि. अकोला
मुख्याध्यापक: विष्णुपंत खेंडकर विद्यालय

श्री मनीष गावंडे
जिल्हाध्यक्ष: भाजपा (ओबीसी) मोर्चा, अकोला जिल्हा
प्रदेश अध्यक्ष: म.रा. खाजगी शिक्षण संघटना

श्री अल्केश खेंडकर
उपाध्यक्ष: म.रा. खाजगी शिक्षक संघटना,
उपाध्यक्ष: श्री गजानन महाराज शिक्षण व्यायाम प्रसारक मंडळ, कळंबेश्वर ता.जि. अकोला
मुख्याध्यापक: यमुनाबाई खेंडकर मराठी प्राथमिक शाळा, अकोला

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा



शुभेच्छुक
हरिश्चंद्र इटकर
शिक्षणाधिकारी
अकोला महानगरपालिका

शिक्षक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा



मोहम्मद जाकीर मोहम्मद कासम
मुख्याध्यापक
इकरा उर्दू माध्यमिक शाळा, अकोला

''बेस्ट प्रिंसिपल ऑफ दि इयर''




प्राचार्या रचना गोरडवार या 23 ऑगस्ट 2025 रोजी नवी दिल्ली येथे '' बेस्ट प्रिंसिपल ऑफ दि इयर'' या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने सन्मानित झाल्या असून, त्याची नोंद लंडनच्या गिनीज बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये होणार आहे.

अभिनंदन!




बार्शीटाकळी तालुक्यातील महान ते पिंजर मार्गावरील हातोला येथे गरीब शेतकरी कुटुंबातील मुलांसाठी दर्जेदार शिक्षणाचे दालन उघडून अल्पावधीतच शिक्षण क्षेत्रात आपल्या अतुलनीय कार्याचा ठसा उमटविणाऱ्या

दि सेंट जोसेफ इंग्लीश मंडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजने २०२५ या वर्षीच्या

बेस्ट स्कूल फॉर सोशल इम्पॅक्ट इन रुलर एरिया

या राष्ट्रीय पातळीवरील पुरस्कारावर आपले नाव कोरल्याने या शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

- ३ ऑगस्ट २०२५ रोजी नवी दिल्ली येथे आयोजित नॅशनल स्कुल अवॉर्डच्या वतीने आयोजित शानदार सोहळ्यात सेंट जोसेफ इंग्लीश मीडियम स्कुल अँड ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या तथा करुणा मायनॉरिटी मल्टीपर्पज सोसायटी, महानच्या सचिव रचना वसंत गोरडवार यांनी बेस्ट स्कुल फॉर सोशल इम्पॅक्ट इन रुलर एरिया पुरस्कार स्वीकारला.
- शासनाच्या सर्व नियमांचे काटेकोरपणे पालन करीत या शाळा आणि कॉलेजची यशस्वी वाटचाल सुरु आहे.




- या शाळेने ग्रामीण भागात प्रथमच मुलांसाठी स्कुल बस आणल्याने गरीब शेतकऱ्यांच्या मुलांचा आनंद ओसंडून वाहात आहे.
- ग्रामीण भागातील सुमारे २५ गावांमध्ये दि सेंट जोसेफ इंग्लीश मीडियम स्कुल अँड ज्युनिअर कॉलेजच्या वतीने सर्वप्रथम एक स्कुल बस उपलब्ध करुन देण्यात आली आहे. त्यामुळे विद्यार्थी आणि पालक वर्ग आनंदीत झाला आहे.

शुभेच्छुक

संगीता नारखंडे मॅडम • कांचन भगत मॅडम • मंगला राठोड मॅडम • लक्ष्मी लोडम मॅडम • ज्योती गुप्ता मॅडम • गुलाम हैदर खान सर • विजय इंगळे सर • विनोद देशमुख सर आणि समस्त हातोलावासी नागरिक

Mrs Sunita Jatal Madam's
SHREE G-SQUARE GUIDANCE
9767930223
11th/ 12th | 8th, 9th, 10th
NEET /JEE /MHT- CET STATE BOARD | STATE BOARD / CBSE FOUNDATION
•SBI बँकेच्या बाजूला भारत पेट्रोल पंप समोर,कौलखेड अकोला.
•चैतन्य कॉलनी,एकविरा ग्राउंड मागे, गौरक्षण रोड,अकोला

अजिंक्य भारत
# आपलं अकोला
अकोला, शुक्रवार, दि. ५ सप्टेंबर २०२५ www.ajinkyabharat.com

OM COACHING CLASSES
COMPUTER SCIENCE
11th & 12th
Behind Tathod Mangal Karyalaya, Shastri Nagar, Akola,
Mrs. Anjali mam 9404845492

## महत्त्वाचे

### अकोल्यात तरुणावर जीवघेणा हल्ला

**अकोला :** सिव्हिल लाईन पोलीस ठाण्याच्या हद्दीत मध्यरात्री तरुणावर चाकू व बांबूने जीवघेणा हल्ला झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. संशयास्पद अनैतिक संबंधाच्या कारणावरून हा हल्ला घडल्याचे पोलिस तपासात स्पष्ट झाले असून चार आरोपींवर गुन्हा दाखल केल्यानंतर अवघ्या काही तासातच आरोपींना जेरबंद करण्यात आले आहे. फिर्यादी रमेश उत्तमराव कपले (४२) रा. गुरुदेव नगर, मोठी उमरी, अकोला) यांनी दिलेल्या माहितीनुसार, दिनांक ४ सप्टेंबर रोजी मध्यरात्री १२.०० ते १२.३० वाजताच्या दरम्यान त्यांचा भाचा अजिंक्य बोडके याला आरोपी गणेश उर्फ गण्या गजानन तिडके व त्याच्या साथीदारांनी संगणमत करून फोनवर बाहेर बोलावले. एका युवकाच्या आईसोबत अनैतिक संबंध असल्याचा संशय आरोपींना होता. त्यामुळे रागाच्या भरात गणेश तिडके, प्रथमेश उर्फ जॅक छोटू आरी, गौरव उर्फ राबर्ट दिपके व दीपक उर्फ डी वानखडे सर्व रा. महाकाली मंदिराजवळ, मोठी उमरी, अकोला) यांनी संगणमत करून अजिंक्य वर हल्ला चढवला. या दरम्यान आरोपींनी चाकू, बांबू व फरशीच्या सहाय्याने अजिंक्यच्या डोक्यावर, पोटावर व हातावर मारहाण करून गंभीर जखमी केले.

### रेल्वेखाली चिरडून इसमाचा मृत्यू

**अकोला :** शिवनी शिवापुर रेल्वे स्थानकाजवळ एका अनोळखी इसमाचा रेल्वेखाली मृत्यू झाल्याची घटना घडली असून याबाबत रेल्वे पोलीस ठाणे अकोला येथे नोंद घेण्यात आली आहे. दिनांक ३ सप्टेंबर रोजी रात्री १० वाजण्याच्या सुमारास रेल्वे अपघातात सुमारे ३० ते ३५ वर्षे वयोगटातील अज्ञात व्यक्ती ठार झाली. ऑन ड्युटी स्टेशन मास्टर यांनी घटनेची माहिती रेल्वे पोलिसांना दिल्यानंतर म.पो. हवा./८६९ सुनंदा राऊत यांनी घटनास्थळी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी जिल्हा सामान्य रुग्णालय, अकोला येथे पाठविला.

# लालफितशाहीत अडकला 'आदर्श शिक्षक पुरस्कार'वितरण सोहळा

## जि. प. शिक्षक गौरव पुरस्कार सोहळा पुढे ढकलला

। श्रीकांत पाचकवडे ।

**अकोला, दि. ४ :** ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून त्यांचा शैक्षणिक विकास करणाऱ्या जिल्ह्यातील शिक्षकांना जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडून देण्यात येणारा आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण सोहळा यंदा अधिकाऱ्यांच्या वेळकाढूपणाच्या धोरणामुळे लालफितशाहीत अडकला आहे. विभागीय आयुक्तांकडून आदर्श शिक्षकांच्या प्रस्तावास अद्यापही मान्यता मिळाली नसल्याने दरवर्षी शिक्षण दिनी म्हणजेच ५ सप्टेंबर रोजी दिला जाणारा आदर्श शिक्षक पुरस्कार सोहळा यावर्षी लांबणीवर पडला आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणासह भौतीक सुविधा उपलब्ध करून देत त्यांचा सर्वांगीण शैक्षणिक विकास करण्यासाठी




केंद्र व राज्य शासनाकडून विविध योजना राबविण्यात येत आहेत. कोट्यावधी रुपये खर्चाच्या या योजनांची यशस्वी अंमलबजावणी करून विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास साधण्याची महत्वपूर्ण जबाबदारी शिक्षकांची आहे. जिल्ह्यातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक विकास करीत आपली कर्तव्यपुर्ती करणाऱ्या ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील उत्कृष्ट शिक्षकांना जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडून ५ सप्टेंबरला शिक्षक दिनी आदर्श शिक्षक पुरस्काराने सपत्नीक गौरविण्यात येते. या पुरस्कारासाठी जिल्ह्यातील सात पंचायत समितीमधून प्रत्येकी एक, माध्यमिक शाळांमधील पंचायत समिती निहाय एक आणि जिल्ह्यास्तरावरून एक विशेष शिक्षकांची पुरस्कारासाठी निवड करण्यात येते. यावर्षी जिल्ह्यातील प्राथमिक शाळांमधील १४ आणि माध्यमिक शाळांमधील तीन अशा १७ शिक्षकांचे पुरस्कारासाठी प्रस्ताव प्राप्त झाले होते. मात्र, प्रशासकीय यंत्रणेच्या वेळकाढूपणाच्या धोरणामुळे पुरस्कार सोहळ्याच्या एक दिवस आधीपर्यंत म्हणजे चार सप्टेंबरपर्यंत पुरस्कार प्राप्त शिक्षकांना विभागीय आयुक्त कार्यालयाकडून मान्यता मिळाली नसल्याची माहिती सुत्रांनी दिली. त्यामुळे यावर्षीचा पुरस्कार वितरण सोहळा लालफितशाहीत अडकल्याने शिक्षकांमध्ये नाराजी पसरली आहे.

### घोंगडे झटकण्याचा प्रयत्न

जिल्ह्यातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्काराने दरवर्षी शिक्षक दिनी गौरविण्यात येते. यंदा मात्र, पुरस्कार वितरण सोहळ्याच्या आठ दिवस आधी पुरस्कारासाठी प्राप्त प्रस्तावाची जिल्हा निवड समितीने २५ ऑगस्ट रोजी निवड करून विभागीय आयुक्त कार्यालयाकडे मान्यतेसाठी पाठविला. त्यावर विभागीय आयुक्त कार्यालयाकडून या प्रस्तावाला अद्यापही मान्यता मिळाली नसल्याने हा कार्यक्रम पुढे ढकलण्यात आला आहे. मात्र, शिक्षण विभागाकडून पाच सप्टेंबर रोजी सार्वजनिक सुट्टी, त्यानंतर शनिवार, रविवारी सुट्या आल्याचे कारण सांगत हा पुरस्कार सोहळा पुढे ढकलण्यात आल्याचे सांगत आपल्यावरील घोंगडे झटकण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

### हा तर अधिकाऱ्यांचा वेळकाढूपणा- गोपाल कोल्हे

विभागीय आयुक्तांची प्रस्तावास मान्यता नसणे, सार्वजनिक सुट्टी आहे म्हणुन पुरस्कार वितरण सोहळा पुढे ढकलणे हा उत्कृष्ट काम करून देशाचे उज्वल भविष्य घडवणाऱ्या शिक्षकांचा अपमान करण्यासारखेच आहे. राष्ट्रीय सणाच्या दिवशी सार्वजनिक सुट्टी असते म्हणुन काय तो सण साजरा करायचा नाही काय? असा संप्तत सवाल करीत प्रशासनाच्या अशा वेळकाढूपणाचा जिल्हा परिषदेचे माजी सदस्य गोपाल कोल्हे यांनी तीव्र शब्दात निषेध व्यक्त केला. ग्रामीण भागातील शाळांमधील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास साधणाऱ्या शिक्षकांचा शिक्षक दिनी पुरस्कार वितरण सोहळा न होणे, ही फार मोठी शोकांकिता आहे, असेही गोपाल कोल्हे म्हणाले.

# 'जलप्रदाय'चा बेताल कारभार चव्हाट्यावर

## नियमित देयकाचा अभाव; नळधारक वेठीस

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ४ :** नियमित पाणी देयके वितरित करण्यात महापालिका पाणीपुरवठा विभागाने कुचराई केल्याचा परिमाण आता दिसू लागला आहे. पाणीपट्टी धारकांच्या माथी आता हजारो रुपयांची देयके मारली जात असून उलट देयक न भरल्यास नळ जोडणी कापण्याची जाहीर नोटीस दिली आहे. हे कमी म्हणून की काय अनेकांना नळ जोडणी नसतानाही देयके वितरित करण्यात आली आहे. पाणी पुरवठा विभागाच्या नियोजन शून्य कारभारामुळे नळधारक संताप व्यक्त करीत आहेत.

महापालिका पाणीपुरवठा विभागाच्या भोंगळ कारभारामुळे पुरते नियोजन कोलमडले आहे. उच्चपदस्थ अधिकाऱ्यांची धाव केवळ मालमत्ता कर जमा करण्याकडे असल्याने पाणीपुरवठा विभागाकडे दुर्लक्ष झाले आहे. परिणामी, मीटर रिडींग घेण्यापासून तर देयके वितरित करण्यापर्यंत नियोजन शून्य कारभार सुरू आहे. यामुळे कोट्यवधी रुपयांची पाणीपट्टी थकीत असल्याची परिस्थिती आहे. अवैध नळ जोडण्या वाढल्या असून कारवाई नसल्याने हे प्रमाण आणखी वाढत चालले आहे. यामुळे वैध नळ जोडणी धारकांना पूर्ण क्षमतेने पाणीपुरवठा होत नसून पाणी चोरीचे प्रमाण वाढले आहे. उच्चपदस्थ अधिकाऱ्यांना ही बाब माहीत असतानाही पाणीपुरवठा विभागाची विस्कटलेली घडी बसवण्याची कुणीही तसदी घेत नाही, केवळ मालमत्ता कर अधिकाधिक कसा वसुल होईल यावरच भर दिला जात आहे. आताही तीच परिस्थिती असून अद्यापही पाणीपुरवठा विभागाचे नियोजन कोलमडलेलेच आहे.

बहुतांश नळ धारकांकडे मीटर असतानाही त्यांना अद्यापही एकही देयक प्राप्त झालेले नाही. याबाबत सर्च मोहीम राबविण्याची गरज अधिकाऱ्यांना वाटली नाही. आता मात्र, परिस्थिती आवाक्या बाहेर गेल्याने नळ धारकांना थकीत पाणीपट्टी भरण्यासाठी जाहीर नोटीस बजावण्यात आली आहे, थकीत पाणीपट्टी न भरल्यास नळ जोडणी कापण्याचा इशारा देण्यात आला आहे. या परिस्थितीसाठी प्रशासन स्वतः जबाबदार असून नियोजन नसल्याने नळ धारकांना अवाजवी देयके वितरित करण्यात आली आहेत.

### नळ जोडणी नसतानाही दिले देयक

गत ३ ते ४ महिन्यापूर्वी प्रभाग क्र. १४ मध्ये गजानन नगर, नर्सिंग महाविद्यालयाच्या पाठीमागे नवीन जलवाहिनी टाकण्यात आली. मात्र, पूर्वीच्या जलवाहिनीवर वैध नळ जोडणी असलेल्या नागरिकांना अद्यापही नवीन जलवाहिनीवर नळ जोडणी देण्यात आली नाही. यानंतरही या नळ धारकांना ६ ते ७ हजार रुपयांची देयके देण्यात आली. ही बाब अतिशय गंभीर असून देयक भरणार नसल्याचा पवित्रा मीना राजू घाटोळकर यांनी घेतला आहे.


अकोला महानगरपालिका, अकोला
(पाणीपुरवठा विभाग)
महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे प्रकरण ११ कलम १२८(१) अन्वये मागणी बिल
पाणीपुरवठा मागणी बिल
बिल दिनांक: 08/30/2025 12:19:05
झोन क्र : D
प्रभाग क्र : 10
मालमत्ता क्र : 2256
ग्राहक क्र : D2025674799527
नवीन नळ जोडणी क्र : 92404
मीटर क्र : 38257
नळ जोडणी धारकाचे नाव : मीना राजू घाटोळकर
पत्ता : गजानन नगर मलकापूर अकोला

| शुल्क विवरण | थकीत मागणी | चालू मागणी | एकूण देयक |
| --- | --- | --- | --- |
| पाणीपट्टी शुल्क | 6008 | 360 | 6368 |

### महापालिका म्हणते नळांना मीटर बसवा

महापालिकेतर्फे नियमित पाणी देयकाचे वितरण करण्यात येत आहे परंतु, नागरिकांनी रीतसर नळ कनेक्शन घेऊन नळाला मीटर बसविलेले नाहीत. अशा नागरिकांना ३०० रुपये प्रतिमाह प्रमाणे नो मीटरचे देयक देण्यात येत आहे. नियमित नळ धारकांना १० युनिट पर्यंत प्रतिमाह कमीत-कमी १२० रुपये प्रमाणे आणि १० यूनिट पेक्षा अधिक वापर असल्यास मीटर रिडिंग घेऊन प्रति युनिट १२ रुपये प्रमाणे आकारणी करण्यात येत आहे. नागरिकांनी नळ कनेक्शनला तात्काळ मीटर बसवून त्याची रीतसर नोंद महापालिका पाणीपुरवठा विभागात करावी, असे आवाहन कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा विभाग यांनी केले आहे.

## अकोला श्री गणेश दर्शन...


मित्र शक्ती गणेश उत्सव मंडळ पिल कॉलनी मलकापूर अकोला. वर्ष.१०
(छाया. संजय ताथुरकर)

# निर्देशांकात प्रथम क्रमांक मिळविलेले जिल्हा स्त्री रुग्णालय अंधारात!

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ४ :** आरोग्य विभागाच्या नोव्हेंबर महिन्यातील निर्देशांक मूल्यांकनात प्रथम क्रमांक पटकावलेल्या अकोल्यातील जिल्हा स्त्री रुग्णालयातील प्रत्यक्ष परिस्थिती पाहता गंभीर निष्काळजीपणाचे धक्कादायक चित्र समोर आले आहे. ४ सप्टेंबर रोजी अजिंक्य भारत टीमने दुपारी रुग्णालयाची पाहणी केली असता, दुपारी ३.२३ वाजता अचानक वीजपुरवठा खंडित झाला. काही क्षणांतच रुग्णालयातील बहुतांश वॉर्डात अंधारात पसरल्याने रुग्णांना याचा फटका सहन करावा लागला. फक्त एसएनसीयू (जन्मजात कमजोर बाळांना ठेवण्याची युनिट) येथेच वीजपुरवठा सुरू होता, तर इतर वॉर्डमध्ये तब्बल २० मिनिटे रुग्ण व नातेवाईकांना काळोखात बसावे लागले.

अकोला जिल्ह्यातील ग्रामीण भागातील तसेच शेजारच्या जिल्ह्यातील गावांमधून महिला प्रसूतीसाठी या रुग्णालयात येतात. अशा वेळी पाच मिनिटेसुद्धा



लाईट नसेल, तर आई-बाळाचा जीव धोक्यात येऊ शकतो. या परिस्थितीकडे रुग्णालय प्रमुख लक्ष का देत नाहीत, असा प्रश्न निर्माण झाला आहे. आम्ही इथे सहा दिवसांपासून आहोत. दिवसातून दोन-तीन वेळा लाईट जाते. त्यावेळी संपूर्ण वॉर्ड काळोखात बुडतो. भीतीमुळे कोणी तक्रार करत नाही, असे एका रुग्णाच्या नातेवाईकाने नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले. रुग्णालयात चार इन्व्हर्टर असतानाही ते सुरू नसल्याने नातेवाईकांकडून संताप व्यक्त होत आहे. पाहणीदरम्यान वीज विभागातील तांत्रिक सहाय्यक यांना विचारले असता, एक इन्व्हर्टर बंद पडलेले आहे, तर उर्वरित तीन इन्व्हर्टर सुरू आहेत, असे सांगण्यात आले. मात्र प्रत्यक्ष पाहणी केली असता, रुग्णालयाची लाईट गेल्यावरही तीनही इन्व्हर्टर बंद असल्याचे स्पष्टपणे दिसून आले. येथील तांत्रिक सहाय्यक वाघ यांना उर्वरित तीन इन्व्हर्टर का सुरू नाहीत, याबाबत विचारले असता त्यांनी कोणतेही स्पष्ट उत्तर न देता फक्त काम सुरू आहे, एवढेच सांगितले. एवढ्या गंभीर विषयावर जबाबदारी न घेणे म्हणजे रुग्णांच्या जीवाशी थेट खेळ असल्याचा आरोप होत आहे.

# सुफियान हत्येतील आरोपीची पोलिसांनी काढली धिंड

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ४ :** जिल्हा हादरवून टाकणाऱ्या व्यापारी सुफियान खान हत्येतील मुख्य आरोपीला पकडल्यानंतर पोलिसांनी आज शिवनी परिसरात धाडसी पाऊल उचलत त्याची धिंड काढली. आरोपीला राहत्या घरापासून गल्लीबोळात पर्यंत फिरवून पोलिसांनी स्पष्ट संदेश दिला की, गुन्हेगार कितीही चलाख असला तरी कायद्याच्या पंजातून सुटू शकत नाही.

या कारवाई दरम्यान परिसरात प्रचंड लोकसमुदाय जमा झाला होता. पोलिसांचा विजय असो, खुन्यांना फाशी द्या, सुफियानला न्याय मिळालाच पाहिजे, अशी घोषणाबाजी सुरू होती. महिलांनी घराच्या गॅलरीतून आरोपीवर संतापाचा वर्षाव केला. आरोपीला पाहताच नागरिकांनी शिव्या-शाप देत प्रचंड संताप व्यक्त केला. या दृश्यामुळे उपस्थितांच्या अंगावर काटा आला. आरोपींसाठी गावात जागा नाही, असेच चित्र धिंडीदरम्यान दिसून आले. गुन्हेगारी प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी व समाजात कायद्याबद्दल आदर निर्माण व्हावा, म्हणून पोलिसांनी उचललेले हे पाऊल ऐतिहासिक ठरले आहे. अकोला जिल्ह्यात अशा प्रकारे आरोपीची धिंड काढून समाजाला त्यांचा खरा चेहरा दाखवण्याची गरज असल्याचे नागरिकांनीही मत व्यक्त केले. दरम्यान, सुफियान हत्येच्या या भीषण प्रकरणाचा तपास जलदगतीने सुरू असून आरोपीला कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी होत आहे. सूफियान हत्या प्रकरण अत्यंत गंभीर असून समाज हादरून गेला आहे. आरोपींना कोणतीही सवलत दिली जाणार नाही. तपास जलदगतीने सुरू असून कायदेशीर मार्गाने त्यांना कडक शिक्षा होईल. न्याय मिळेपर्यंत अकोला पोलिस शांत बसणार नाहीत, अशी ठाम भूमिका पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांनी व्यक्त केली.

# अकोल्यातील बनावट जन्म प्रमाणपत्र घोटाळा प्रकरणी किरीट सोमय्या आक्रमक

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ४ :** बनावट जन्म प्रमाणपत्र घोटाळ्याला गुरुवारी नवे वळण मिळाले. भाजप नेते किरीट सोमय्या यांनी रामदासपेठ पोलिस ठाण्यात धडक देत तब्बल १३३ संशयास्पद नागरिकांची यादी पोलिसांना सादर केली. या नागरिकांच्या आधारकार्ड, शपथपत्रे व तहसीलदारांच्या आदेशातील जन्मतारखांमध्ये १० ते १२ वर्षांचा फरक असल्याचे गंभीर पुरावे त्यांनी अधिकाऱ्यांसमोर ठेवले. सोमय्या यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, ''हा प्रकार थेट बनावटगिरीकडे निर्देश करणारा असून, १३३ जणांवर तातडीने गुन्हे दाखल करावेत,'' अशी मागणी पोलिस प्रशासनाकडे केली आहे. जिल्हा प्रशासन आणि पोलिसांनी तपास करून १५ सप्टेंबरपर्यंत कारवाई करण्याचे आश्वासन दिल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. अकोला जिल्ह्यात सुमारे ५ हजार उशिरा दाखल झालेले जन्मनोंदीचे अर्ज संशयास्पद असल्याचे समोर आले आहे. त्यातीलच १३३ प्रकरणांमध्ये बोगस कागदपत्रे वापरल्याचे उघड झाले आहे. या वेळी खासदार अनुप धोत्रे व आमदार रणधीर सावरकर उपस्थित होते.

समस्त शिक्षक बंधू-भगिनींना
शिक्षक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!




प्रविण बजरंग रावणकर
प्राचार्य,
श्री भाऊसाहेब पोटे विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, अकोट

सौ.वंदना प्रविण रावणकर
सहा.शिक्षिका
श्री शिवाजी उच्च माध्यमिक विद्यालय, अकोट

## भक्तिभाव

### अष्टविनायक मंडळाचा भव्य गणेशोत्सव!

# महादेव रूपात भाविकांसाठी गणरायाचे दर्शन

। शरद शेगोकार ।

**अकोला, दि. ४:** बाळापूर रोडवरील सोपीनाथ नगरात अष्टविनायक गणेशोत्सव मंडळ गेली १६ वर्षे भक्तिभाव आणि उत्साहात गणेशोत्सव साजरा करत आहे. २००९ साली अध्यक्ष भूषण उज्जेनकर, उपाध्यक्ष कार्तिक कदम आणि त्यांच्या मित्रमंडळींनी मंडळाची स्थापना केली. एक गाव, एक उत्सव या संकल्पनेतून समाजातील एकोपा वाढवणे आणि सामाजिक बांधिलकी जपणे हा या मंडळाच्या स्थापनेमागचा प्रमुख उद्देश आहे.




दहा दिवसांच्या या उत्सवात सामाजिक जाणीव जागवणारे उपक्रम राबवले जातात. लहान मुलांसाठी रंगभरण, संगीत खुर्ची यांसारख्या स्पर्धा घेऊन त्यांना प्रोत्साहनपर बक्षिसे दिली जातात. विशेष म्हणजे दरवर्षी नवविवाहित दांपत्याच्या हस्ते गणपतीची स्थापना केली जाते, ही परंपरा मंडळाने सातत्याने जपली आहे.



गणेश मूर्ती कापशी येथून विशेष आणली जाते. दरवर्षी वेगळ्या रूपातील १० फूट उंचीची भव्य मूर्ती भक्तांच्या दर्शनासाठी बसवली जाते. यंदा मंडळाने महादेवाच्या अद्वितीय रूपात सजावटीसह गणरायाची प्रतिष्ठापना केली आहे. विसर्जनाच्या आदल्या दिवशी महाप्रसादाचे आयोजन होणार असून, विसर्जन दिनी ढोल-ताशांच्या गजरात मिरवणुकीने गणरायाला बाळापूर येथील मन नदीत विसर्जन केले जाईल.

यंदाच्या आयोजनासाठी अध्यक्ष भूषण उज्जेनकर, उपाध्यक्ष गौरव कदम, सचिव कार्तिक कदम, शुभम टोपरे, कोषाध्यक्ष विजय सोनी, तसेच कार्यकर्ते योगेश थोटांगे, अमर खोटरे, बालू जोशी, निलेश थोटांगे, नितीन देशमुख, कल्पेश अलोने, संतोष ठाकरे, राहुल ठाकूर, सुमित जैन यांच्यासह शेकडो तरुण परिश्रम घेत आहेत.

गेल्या १६ वर्षांत अष्टविनायक मंडळाने भक्तिभाव, सामाजिक कार्य आणि परंपरेचा संगम साधत गणेशोत्सवाला एक आगळीवेगळी ओळख निर्माण केली आहे.

### रक्तदानातून शासनाला इशारा!

**अकोला :** गेल्या २० वर्षांपासून शासनाच्या सेवेत कार्यरत असलेल्या राष्ट्रीय आरोग्य अभियान (एनएचएम) कर्मचाऱ्यांना अद्याप नियमित सेवेत समाविष्ट करण्यात आलेले नाही. मार्च २०२४ मध्ये शासनाने नियमितीकरणाचा निर्णय घेतला होता, मात्र आजतागायत तो अंमलात न आल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर, गेल्या १७ दिवसांपासून सुरू असलेल्या राज्यव्यापी आंदोलनाला गुरुवारी (४ सप्टेंबर) तीव्र स्वरूप प्राप्त झाले. अकोल्यातील जिल्हा कचेरीसमोर एनएचएम कर्मचाऱ्यांनी अनोखी आंदोलन पद्धत अवलंबत रस्त्यावरच रक्तदान करून शासनाला इशारा दिला. या वेळी आंदोलनकर्त्यांनी रक्ताच्या थेंबातून हमरा खून नहीं है सस्ता, समायोजन यही है एकमेव रस्ता, तो बदल देंगे आपका रस्ता असे शब्द लिहून शासनाविरोधातील संताप प्रकट केला.

पी एम श्री जि. प. मराठी शाळा
तामसी तालुका बाळापूर



अजिंक्य भारत • आपलं अकोला / वाशिम

अकोला, शुक्रवार, दि.५ सप्टेंबर २०२५ www.ajinkyabharat.com



## गणेश दर्शन



स्व. वसंतराव पाटील युवा गणेशोत्सव मित्र मंडळ, येवता



श्री अष्टविनायक गणेशोत्सव मित्र मंडळ केला प्लॉट, जठारपेठ अकोला



गोपीनाथ गणेशोत्सव मंडळ सस्ती



राजे छत्रपती गणेशोत्सव मंडळ सस्ती



शिवाजी गणेशोत्सव मंडळ सस्ती

# वेध निवडणुकीचे: मतदारांबरोबर संपर्क साधण्यासाठी उत्तम संधी



## नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर इच्छुकांची उत्सवात हजेरी

। फुलचंद भगत ।

**मंगरुळपीर, दि. ४ :** नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर होत असलेला गणेशोत्सव निवडणूक लढवू इच्छिणाऱ्यांच्या पथ्यावर पडला आहे. एकाच वेळी असंख्य मतदारांबरोबर संपर्क साधण्याची ही नामी संधी चुकू नये यासाठी बहुसंख्य इच्छुकांनी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांसाठी आपल्या थैल्या मोकळ्या सोडल्या आहेत. आर्थिक मदतीबरोबरच कार्यकर्त्यांना सर्व प्रकारचा आश्रय इच्छुकांकडून दिला जात आहे.

सलग पाच वर्षे नगरपरिषदेची निवडणूकच झालेली नाही. दरम्यानच्या कालावधीत दोन ते तीन वेळा महापालिका निवडणूक होणार अशा वावड्या उठल्या. त्याही वेळी दिवाळी बरोबर अन्य सणांमध्ये इच्छुकांनी मतदारांसाठी फराळ वाटप, देवदर्शनाच्या सहली, मनोरंजनाचे जाहीर कार्यक्रम असा धुरळा उडवला. काहींनी जनसंपर्क कार्यालये सुरू केली. तिथे कार्यकर्त्यांबरोबरच मतदारांचीही बसण्या-उठण्याची व्यवस्था केली. मात्र त्यांचा खर्च झाला व नगरपरिषद,महापालिका निवडणूक झालीच नाही. त्यामुळे इच्छुकांनी आपल्या थैल्यांची तोंडे आवळली होती. लोकसभा विधानसभा निवडणुकांमध्येही त्यांनी खर्चाला आवर घातला. काहींनी तर थेट व्यवसाय, उद्योग याकडे लक्ष देण्यास सुरुवात केली. प्रभागामध्ये फिरण्याचा दिनक्रम तर बऱ्याच इच्छुकांनी बंदच करून टाकला.

> बहुतेक इच्छुकांची त्यांच्या हक्काच्या परिसरात स्वत:ची सार्वजनिक मंडळे आहेतच, मात्र एका प्रभागात चार नगरसेवक निवडून द्यायचे असल्याने प्रभागाचे क्षेत्रफळ बरेच मोठे झाले आहे. मतदारांची संख्याही वाढली दरम्यान आहे. इतक्या मोठ्या क्षेत्रफळात संख्यने जास्त असलेल्या मतदारांबरोबर संपर्क साधायचा तर त्यासाठी उत्सवासारखी दुसरी संधी नाही हे ओळखूनच इच्छुकांनी ही मोर्चेबांधणी सुरू केली आहे. त्यामध्ये प्रमुख राजकीय पक्षांच्या इच्छुकांबरोबरच स्वतंत्र लढू इच्छिणाऱ्या तसेच लहान पक्षांकडून उमेदवारीची अपेक्षा करणाऱ्या इच्छुकांचा समावेश आहे. माजी नगरसेवकही त्यामध्ये आघाडीवर आहेत. त्यांच्या अर्थशक्तीसमोर कमी पडू नये यासाठी इच्छुकांनाही कंबर कसली आहे.

आता मात्र सर्वोच्च न्यायालयाचाच आदेश असल्याने महापालिका निवडणूक होणारच आहे, त्यामुळेच पुन्हा एकदा त्यांनी खर्च करण्यास सुरुवात केली आहे. त्यातच गणेशोत्सव आल्याने एकाच वेळी असंख्य मतदारांशी संपर्क करण्याची संधी म्हणून या उत्सवाकडे पाहिले जात आहे. प्रारूप प्रभाग रचना जाहीर झाल्याने इच्छुकांसमोर आता आपापला प्रभाग जवळपास निश्चित झाला आहे. त्यामुळेच या परिसरातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या कार्यकर्त्यांना भेटणे, त्यांची मागणी लक्षात घेणे, त्याप्रमाणे त्यांची व्यवस्था करणे असे प्रकार सुरू झाले आहेत. त्या बदल्यात मंडळ परिसरात छायाचित्रांसहित फ्लेक्स लावू देणे, कार्यक्रमांना प्रमुख उपस्थिती ठेवणे, मतदारांबरोबर ओळखी करून देणे अशा अपेक्षा ठेवल्या जात आहेत.

## संभाजी ब्रिगेड पक्षातर्फे कार्यकर्ता सन्मान दिवस साजरा



**अकोला:** संभाजी ब्रिगेड प्रदेशाध्यक्ष ॲडो. मनोज आखरे यांच्या जन्मदिवसनिमित्त संभाजी ब्रिगेडच्या वतीने कार्यकर्ता सन्मान दिन म्हणून संपूर्ण महाराष्ट्रभर साजरा केला. जगभरातील कार्यकर्त्यांचा सन्मान व्हावा आणि कार्यकर्त्यांचे महत्त्व जगाला समजावे नेत्याला आपल्या कार्यकर्त्याच्या कष्टाची आणि पक्ष संघटनेसाठी त्यांनी दिलेल्या योगदानाची जाणीव व्हावी यासाठी हा दिवस आहे. त्या अनुषंगाने फिरोज खान महानगर अध्यक्ष पश्चिम व आकाश कराळे जिल्हा अध्यक्ष युवक आघाडी यांच्या संकल्पनेतून अकोला विभागीय कार्याध्यक्ष गणेश अंदुले यांच्या मार्गदर्शनात जिल्हाध्यक्ष ॲड.नमन आंबेकर यांच्या उपस्थितीत जिल्हा स्त्री रुणालय व जिल्हा सामान्य रुणालय अकोला येथे रुग्णांना फळे व बिस्कीट वाटप करण्यात आले. यावेळी यश कराळे,शेख शकील,मो.उमर फारुख,आसिफ शेख,महानगर अध्यक्ष युवक आघाडी पंकज हरणे, महानगर सचिव ऋषभ काळे, शिवा पाटील इत्यादी कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

## गणेश विसर्जनासाठी पोलिसांची सज्नता ; कुरुम येथे माना पोलिसांचा रूट मार्च

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**मुर्तिजापूर, दि. ४ :** ग्राम कुरुम येथे शांतता, कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी माना पोलीस स्टेशनच्या वतीने रूट मार्च दिनांक ३ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी ४.४५ ते ५.३० वाजेपर्यंत पार पडला.श्री गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मुर्तिजापूर उपविभागीय पोलिस अधिकारी वैशाली मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच माना पोलीस स्टेशनचे ठाणेदार गणेश नावकार यांच्या उपस्थितीत रूट मार्च काढण्यात आला.

रूट मार्चमध्ये माना पोलीस स्टेशनचे २ अधिकारी व १२ कर्मचारी, २१ होमगार्ड तसेच चे १ अधिकारी व २२ कर्मचारी सामील झाले होते. ग्रामस्थांनी यावेळी पोलिसांचे स्वागत करत कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिस प्रशासनास सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर घेतलेल्या या रूट मार्चमुळे गावकऱ्यांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण झाली असून पोलिस प्रशासनाच्या सतर्कतेचे कौतुक होत आहे.

## एक पेड माँ के नाम मोहिमेअंतर्गत श्री. शिवाजी महाविद्यालयात वृक्षारोपण

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोट, दि. ४ :** स्थानिक श्री.शिवाजी कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, दर्यापूर रोड, अकोट येथे कनिष्ठ महाविद्यालय विभागाच्या वतीने महाराष्ट्र शासनाच्या वृक्ष लागवड मोहिमेप्रमाणे तसेच एक पेड माँ के नाम या उपक्रमाअंतर्गत महाविद्यालयाच्या प्रांगणात विविध वनस्पतींचे वृक्षरोपण करण्यात आले.

या उपक्रमाला प्राचार्य डॉ. सुनील पांडे, उपप्राचार्य डॉ.संजय कोल्हे यांचे मार्गदर्शन लाभले.यावेळी कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा.संजय पट्टेबहादुर, प्रा.प्रफुल्ल देशमुख, प्रा.परीक्षित मेतकर, प्रा.निलेश रहाटे,प्रा.आशिष वनकर,प्रा.मंगेश अवचट, प्रा.मंगेश राऊत, प्रा.सौदागर भिसे, प्रा.चेतन चुने यांची उपस्थिती होती. उपक्रमात कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला.उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना वृक्षांचे महत्त्व सांगून कार्यक्रमाचा समारोप झाला.

## कुंभार समाजाच्या प्रतिनिधींची आमदार अमोल मिटकरी यांच्याशी चर्चा



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ४ :** विधान परिषद आमदार अमोल मिटकरी यांची कुंभार समाज विकास परिषदेचे अध्यक्ष रामकुष्ण साविकर यांच्या नेतृत्वाखाली प्रतिनिधी मंडळाने सदिच्छा भेट घेऊन समाजाच्या नानविध प्रश्नांवर विस्तृत चर्चा केली.

समाजाच्या अडीअडचणी, अपेक्षा आणि विकासाच्या दिशा यावर खुलेपणाने संवाद साधण्यात आला.या भेटीमध्ये महाराष्ट्र कुंभार समाज विकास परिषदेचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ नेते रामकृष्ण सावीकर,प्रा. दिलीप आप्तुरकर,ॲड.अरुण सौदागर, संजय वाडकर,रामचंद्र मेहरे, रामेश्वर मेहरे,सुनिल साविकर, तुळशीदास तळोकार,योगेश इंगळे,अशोक मांगुळकर,महादेव लाहुलकर, सोनवणे बाळापूर,रामदास गाडेकर ईत्यादी समाजबांधव प्रामुख्याने उपस्थित होते.

## राजकुमार वानखडे सपत्नीक रेडिओ श्रोता पुरस्काराने सन्मानित

**मुडगाव :** अकोट तालुक्यातील वारुळा येथील पत्रकार राजकुमार वानखडे व त्यांची पत्नी कविता वानखडे यांना बागपत उत्तरप्रदेश येथील एका सम्मेलनात रेडिओ श्रोता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

या वर्षीचा रेडिओ श्रोता पुरस्कार त्यांना बागपत उत्तर प्रदेश येथील वात्सायान ब्राह्मण समाज सभागृहात सहपत्नीक मुंबई विविध भारती उदघोषीका शेफाली कपुर, दिल्ली उर्दु सर्व्हिसचे उदघोषक इरफान आजमी,तारीक जमील, रेडिओ धडकन उदघोषीका निता अग्रवाल, ललीत कुमार,बरेली उदघोषक गुरूदेव मिश्रा,मधुर तिवारी,संजय धिंगीया, मास्टर एस.के. पाटील, परसराम साहु,सतिष मिगलाणी, यांच्या हस्ते सन्मानपत्र, शिल्ड,फेटा, मिठाई, गुलाब पुष्प देऊन गौरविण्यात आले.

## मंगरुळपीर येथे महिलांकडून गौरींना उत्साहात निरोप

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**मंगरुळपीर, दि. ४ :** मंगरुळपीर शहरासह ग्रामीण भागात महीलां जगतात अनन्यसाधारण महत्त्व असणारा व गणपती उत्सवा दरम्यानेच येणारा सण म्हणजे गौरीचा सण हा सण अगदी उत्साहात संपन्न झाला. सोनपावलांनी कायम गणेश चतुर्थीच्या तिसऱ्या किंवा चौथ्या दिवशी येणारी गौरी चालू वर्षी मात्र पाचव्या दिवशी आली.

गौरीचे आगमन हे एखाद्या पाणवठ्याच्या ठिकाणावरुन केले जाते.महीलाही छोटी कळशी, फुले,आघाडा,डहाळे,चाफ्याची पाने,पाच खड्डे घेऊन तेथे जातात.तिथे तिची विधीवत पुजा करून त्या घरी आणल्यानंतर तिला गणपतीसाठी केलेल्या सजावटीसह रोषणाईच्या ठिकाणीच त्यांची प्रतिष्ठापना केली जाते.यावेळी तिला साडीचोळीसह विविध अलंकाराने सजवुन तिची विधीवत पूजा केली होती.यावेळी महीलावर्गात अमाप उत्साह ओसंडून वाहत होता. पहिल्या दिवशी भाजी भाकरी,दुसर्या दिवशी पुरणपोळी व तिसऱ्या दिवशी गौरी विसर्जन या सारखे कार्यक्रम पार पडले जातात.या कार्यक्रमा दरम्याने गौरी गणपती समोर महीला पारंपारिक झिम्मा फुगडी बरोबरच गौरी मध्ये गवर बाई मंगळा गवर,घागर घुमू दे,घुमू दे, आला शंकरुबा,गवर माझी नाचू दे,आली गौराई अंगणी यासारखी पारंपरिक गीते गात झिम्याचा फेर,पिंगा,काटवटपणा,चुईफुई घोडा या सारख्या पारंपरिक क्रीडाने तर चक्क राताच जागविल्या होत्या.या गीतांमध्ये माहेर-सासर यातील भावनिक जिव्हाळ्याचे द्वंद्व दिसत होते.मंगळवारी दुपारनंतर गौरीचे पारंपरिकपणे विसर्जन करण्यात आले.



# रानकसायांच्या उच्छादामुळे तालुक्यातील पर्जन्यवृष्टी कमी होत आहे

## थेंबा थेंबासाठी करावी लागणार प्रतीक्षा; सामाजिक जनजागृती व अधिकाऱ्यांची कर्तव्यनिष्ठा गरजेची

वार्तापत्र

स्वप्निल सुरवाडे
तालुका प्रतिनिधी





**पातूर :** गेल्या अनेक दिवसांपासून शहरासह पातूर तालुका परिसरातील शेतशिवारांमध्ये राजरोसपणे व कोणाचाही धाक न बाळगता हिरव्यागर्द झाडांची मोठ्या प्रमाणात कत्तल सुरु आहे. शेतीच्या बांधांवर उभे असलेले हिरवीगार मोठ- मोठी झाडे तोडली जात आहेत. जर परिसरात अशीच मोठ्या प्रमाणात वृक्षतोड सुरु राहिली तर परिसर लवकरच भकास व उजाड व्हायला वेळ लागणार नाही. एकूणच या वृक्षतोडीच्या भयावह चित्राकडे संबंधित वनविभागाचे या वृक्षतोडीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष का होत आहे ? असा प्रश्न वृक्षप्रेमी नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. रानकसायांचा उच्छादामुळे पातूर तालुक्यातील पर्जन्यवृष्टी दिवासेंदिवस कमीकमी होत आहे. ही स्थिती अशीच राहिली तर तालुक्यातील जनतेला पावसाच्या पाण्याच्या थेंबा थेंबासाठी करावी प्रतीक्षा लागणार आहे. तालुक्याची ही स्थिती बदलण्यासाठी सामाजिक जनजागृती व अधिकाऱ्यांची कर्तव्यनिष्ठा गरजेची आहे.

एकीकडे शासनाच्या वनविभागाकडून पावसाळ्यात झाडे व जंगले वाचवण्यासाठी तसेच झाडे लावण्यासाठी व जगवण्यासाठी कोट्यावधी रुपये खर्च करून विविध कार्यक्रम राबवले जात असतात. व या गोष्टीचा जाहिरातींद्वारे मोठा उहापोह केला जात असतो. मात्र दुसरीकडे पातूर तालुक्यात अगदी पावसाळ्यात सुद्धा राजरोसपणे व वनविभागाच्या अधिकाऱ्यांच्या नाकावर टिच्चून हिरव्यागर्द झाडांची कत्तल मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या वृक्षतोडीमुळे परिसरातील जंगले दिवसेंदिवस कमी होत आहे. याचा थेट परिणाम पावसावर झालेला आहे. गेल्या काही वर्षांपासून पावसाचे प्रमाण कमी होत असल्याचे जाणवत आहे. या वृक्षतोडीमध्ये लिंब, बाभूळ, सागवान व इतर आड जातींच्या मोठ-मोठ्या झाडांची सर्रासपणे वृक्षतोड चालू असून रात्रीच्या अंधारात तोडलेल्या झाडांच्या लाकडांची वाहतूक सुरू असते.

या वृक्षतोडीच्या व्यवसायांमध्ये काही गल्लीछाप पुढारी, स्वतः ला सामाजिक कार्यकर्ते म्हणवून घेणारे पंटर अवैध लाकूड व्यवसायात गुंतले असून अगदी राजरोसपणे व कोणालाही न घाबरता अवैधपणे सुरू असलेल्या वृक्षतोडीच्या व्यवसायातून पुढारी व लाकूड व्यावसायिक हे सर्वजण मोठी ' मोहमाया ' जमवीत आहेत, तर आपल्या वैयक्तिक स्वार्थापोटी निसर्गाला मोठी हानी पोहोचत आहे. मात्र अवैधरित्या सुरु असलेल्या वृक्षतोडीकडे संबंधितांचे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे या सर्व अवैध लाकूड तोडीच्या व्यवसायाला वनविभागाच्या अधिकाऱ्यांचा आशीर्वाद (?) आहे का ? असा संतप्त प्रश्न निसर्गप्रेमींकडून उपस्थित केला जात आहे.पातूर तालुक्यातील संरक्षित जंगलं उजाड केल्यानंतर या रानकसायांनी आपला मोर्चा आता महामार्गावर असलेल्या कडूलिंबाच्या झाडांकडे वळविला असून उन्हाळ्यात महामार्गाच्या कडेला असलेल्या झाडाच्या बुडाशी आग लावून झाड पडले की अत्यंत अल्प किंमतीत विकत घेण्याचा सपाटा लावला होता.मात्र आता पावसाळ्याचे दिवस असल्याने रानकसायांनी नवी शक्कल लढवत झाडाच्या बुंध्याभोवतीची साल काढून त्या झाडाला हळूहळू मात्र निश्चितपणे मारण्याची नवी पद्धत अंमलात आणल्याचे पातूर तालुक्यातील आगीखेड ग्रामपंचायतच्या हद्दीत निदर्शनास आले. आगीखेड सर्वे क्रमांक १२ व १३ ला लागून असलेल्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या हद्दीतील सुमारे ५० झाडे साल काढून गंभीररित्या खराब करण्यात आली असून हे कृत्य आगीखेड येथील रहिवासी असलेल्या एका इसमाने केले असून त्याविरोधात ग्रामपंचायत आगीखेडचे सरपंच गजानन टप्पे यांनी पातूर पोलिसांत तक्रार देखील केली आहे. परिसरात होणाऱ्या बिनबोभाट वृक्षतोडीमुळे पातूर परिसरातील पावसाचे प्रमाण गेल्या काही वर्षांपासून कमी झालेले असून हीच वृक्षतोड सर्रासपणे सुरू राहिली तर तालुक्यातील जंगल नष्ट होऊन परिसर भकास व्हायला वेळ लागणार नाही. अशी चिंता वृक्षप्रेमींकडून व्यक्त केली जात आहे. परिसरातील अवैध वृक्षतोड तात्काळ थांबविली जावी व वृक्षतोड करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी पर्यावरण प्रेमींकडून केली जात आहे.

अजिंक्य भारत

# आपलं वाशिम

३

अकोला, शुक्रवार, दि. ५ सप्टेंबर २०२५ www.ajinkyabharat.com

## महत्त्वाचे

### धनगर समाजातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी संधी

**वाशिम :** धनगर समाजातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने शासनाने ''पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजना'' राबविण्याचा निर्णय घेतला आहे. या योजनेअंतर्गत सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात खालीलप्रमाणे लाभ मिळणार आहे. इयत्ता १२ वी नंतर मान्यता प्राप्त व्यवसायिक अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयामध्ये केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश घेतलेले विद्यार्थी शासकीय वसतिगृहामध्ये प्रवेश न मिळालेल्या धनगर समाजातील विद्यार्थी अशा विद्यार्थ्यांना भोजन, निवास व शैक्षणिक साहित्य खरेदीसाठी लागणारी रक्कम थेट त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा करण्यात येईल. विद्यार्थ्यांनी अटी व शर्तीसाठी सहाय्यक संचालक दीपा हेरोळे कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### शेतकरी व संस्थांना कृषी पुरस्कारासाठी प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

**वाशिम :** महाराष्ट्र शासन कृषी विभागामार्फत राज्यातील कृषी व संलग्न क्षेत्रात तसेच फलोत्पादन क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकऱ्यांना दरवर्षी विविध कृषी पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात येते. यामध्ये डॉ. पंजाबराव देशमुख कृषी रत्न पुरस्कार, वसंतराव नाईक कृषिभूषण पुरस्कार, जिजामाता कृषी भूषण पुरस्कार, सेंद्रिय शेती कृषी भूषण पुरस्कार, उद्यान पंडित पुरस्कार, वसंतराव नाईक शेती मित्र पुरस्कार, वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार, युवा शेतकरी पुरस्कार तर कृषी विभागात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी सेवारत्न पुरस्कार अशा नामांकित पुरस्कारांचा समावेश आहे. सन २०२५-२६ करिता या पुरस्कारांसाठी प्रस्ताव मागविण्यात आले असून इच्छुक शेतकरी, संस्था किंवा गट यांनी आपले प्रस्ताव १५ सप्टेंबर २०२५ पर्यंत आपल्या नजीकच्या तालुका कृषी अधिकारी कार्यालयाकडे सादर करावेत. अधिक माहितीसाठी नजीकच्या तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी अनिसा महाबळे यांनी केले आहे.

### ग्रामरोजगार सहाय्यकाचे विविध मागण्यासाठी कामबंद आंदोलन

**मानोरा :** महाराष्ट्र राज्यात ग्रामरोजगार सहायक यांची संख्या २८५०० आहेत मात्र शासनाने ३ ऑक्टोबर २०२४ चा जि.आर.ची अमलबजावनी केली नसल्याने ग्रामरोजगार सहाय्यक यांच्यात नाराजी व्यक्त होत आहे.त्यामुळे मानोरा तालुका ग्रारोजगार सहायक संघटना यांच्या वतीने दि.२ सप्टेंबर पासून काम बंद आंदोलन सुरू केले आहे . या बाबत गटविकास अधिकारी यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले की, दि.३ ऑक्टोंबर २०२४ रोजीच्या शासन निर्णय त्वरीत अंमलबजावणी करण्यात यावी.हा निर्णय होऊन १० महिने झाले. मात्र त्याची अंमलबजावणी झाली नाही. ग्रामीण भागातील प्रत्येक कुटूंब समृद्ध व लखपती कसे होईल याचा रोजगार सेवक कटाक्षाने प्रयत्न करीत आहे. ग्राम रोजगार सहाय्यक यांनी गेल्या १५ वर्षापासून आपल्या मागण्या साठी अनेक प्रकारचे आंदोलन केले आहे.ग्राम रोजगार सहाय्यकांना शासन निर्णयानुसार माहे ऑक्टोंबर २४ पासून मासिक मानधन ग्रामरोजगार सहाय्यक यांच्या वैयक्तिक खात्यात देण्याचे तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी देण्याचे ठरविले होते.

# संतप्त ओबीसी समाज धडकला तहसीलवर

## ओबीसी आरक्षण धोक्यात आल्याची भीती







**ओबीसी समाजाने मांडलेले प्रमुख मुद्दे :**
मराठा समाजाला दिलेले आरक्षण हे ओबीसींच्या हक्कांमधून देण्यात आले आहे. संविधानावर घाला घालणारा हा निर्णय असून कायद्याचा भंग करण्यात आला आहे. कायद्यात कुठलीही तरतूद नसताना दिलेले आरक्षण हे अन्यायकारक आहे. तात्काळ हैद्राबाद गॅजेट रद्द करावे. मराठा समाजाला आरक्षण देण्याचा मार्ग स्वतंत्रपणे शोधावा. ओबीसींच्या विद्यमान आरक्षणात कोणत्याही प्रकारे कपात किंवा हस्तक्षेप होऊ नये. ओबीसी बांधवांवर अन्याय होणार नाही याची राज्य सरकारने स्पष्ट हमी द्यावी. या आंदोलनावेळी समस्त ओबीसी समाजाचे मोठ्या संख्येने उपस्थितीत प्रचंड घोषणाबाजी करत शासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. ''ओबीसींच्या हक्कांवर गदा आणली तर समाज शांत बसणार नाही,'' असा इशारा निवेदनातून देण्यात आला.

**दै. अजिंक्य भारत** । प्रतिनिधी

**शिरपूर जैन, दि. ४ :** मालेगाव तहसील कार्यालयावर समस्त ओबीसी समाजाच्या वतीने दि. ४ सप्टेंबर रोजी यल्गार मोर्चाचे आयोजन करण्यात आले. ओबीसी समाजावर झालेल्या अन्यायाचा निषेध करत मोठ्या संख्येने नागरिक तहसीलवर एकत्र जमले होते. महाराष्ट्रातील ओबीसी बांधवांनी आरक्षणाच्या जोरावर शिक्षण, नोकरी व इतर क्षेत्रात प्रगती साधली आहे. मात्र, गेल्या काही दिवसांपासून ओबीसी आरक्षण धोक्यात आल्याची भीती निर्माण झाली आहे. मराठा समाजालाही आरक्षण मिळावे, हा आम्हा सर्वांचा न्याय्य व मानवतावादी दृष्टिकोन आहे. पण मराठा समाजाला आरक्षण देताना ओबीसी समाजाच्या हक्कावर गदा येईल अशी परिस्थिती निर्माण होऊ नये, हीच आमची प्रमुख मागणी आहे. सरकारने काढलेल्या जीआरमुळे ओबीसींचे आरक्षण धोक्यात आले असून, या अन्यायाविरोधात संताप व्यक्त करण्यात आला. शिरपूरसह मालेगाव तालुक्यातील समस्त ओबीसी समाजाच्या वतीने तहसील कार्यालयाला निवेदन सादर करण्यात आले.

## ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना: विद्यार्थ्यांसाठी नवी संधी

**दै. अजिंक्य भारत** । प्रतिनिधी

**वाशिम, दि. ४ :** उच्च शिक्षण घेणाऱ्या इतर मागास वर्ग, विमुक्त जाती-भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शासनाने मोठा दिलासा दिला आहे. सन २०२४-२५ पासून कार्यान्वित झालेल्या ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना भोजन, निवास व निर्वाह भत्याकरिता थेट आर्थिक सहाय्य त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये जमा केले जाणार आहे. या योजनेचा लाभ सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील इयत्ता १२ वी नंतरच्या प्रथम वर्षातील व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना मिळणार आहे. मात्र, लाभ मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांना इतर मागास बहुजन कल्याण विभाग, आदिवासी विकास विभाग, सामाजिक न्याय विभाग किंवा संबंधित शैक्षणिक संस्थेच्या वसतिगृहात मोफत प्रवेश मिळालेला नसावा ही अट बंधनकारक आहे. शासनाच्या या निर्णयामुळे शिक्षण घेताना होणाऱ्या भोजन व राहणीमान खर्चाचा मोठा भार विद्यार्थ्यांवरून हलका होणार असून, ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी ही योजना मोठा आधार ठरणार आहे. योजनेचा जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, वाशिम यांनी केले आहे.

## ओबीसी बांधवांची जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक!

**दै. अजिंक्य भारत** । प्रतिनिधी

**वाशिम, दि. ४ :** लोकसंख्येच्या प्रमाणात ओबीसींना आरक्षण नसल्यामुळे ओबीसी आरक्षणाची मर्यादा वाढविण्याची गरज असताना शासनाने शासन निर्णय काढून मराठा समाजाला ओबीसीत समाविष्ट करण्याचा मार्ग मोकळा केला आहे. हा समस्त ओबीसी बांधवांवर मोठा अन्याय आहे. हा अन्याय कदापीही खपवून घेणार नाही. असा इशारा देत जिल्ह्यातील सकल ओबीसी समाज बांधव दि. ४ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकले.

सकल ओबीसी समाजाच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी यांच्यामार्फत मुख्यमंत्र्यांना मागण्यांचे निवेदन सादर केले.



निवेदनानुसार, दि. ०२ सप्टेंबर २०२५ रोजी शासनाने शासन निर्णय काढून मराठा समाजाचा ओबीसी मध्ये समाविष्ट करण्याचा मार्ग मोकळा केला आहे. हा निर्णय मूळचे समस्त ओबीसी असलेल्या बांधवांवर मोठ्या प्रमाणात अन्याय करणारा आहे. हा शासन निर्णय तात्काळ रद्द करावा अशी मागणी या निवेदनातून करण्यात आली आहे. हा शासन निर्णय पूर्णपणे अन्यायकारक, बेकायदेशीर व असंवैधानिक आहे. या निर्णयामुळे ओबीसी समाजातील सुमारे ४०० हून अधिक जातींच्या हक्कांवर गदा येणार असून, त्यांना शिक्षण व नोकरीच्या क्षेत्रात मिळणारे प्रतिनिधित्व गंभीर स्वरूपात घटणार आहे. याबाबत घेतलेल्या हरकतीमध्ये अनुच्छेद १५(४) व १६(४) प्रमाणे आरक्षण हे फक्त सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासवर्गीयांना देता येते. मराठा समाजाचा समावेश हा या तत्वांचा भंग आहे. अन्यायकारक परिणाम आधीच मर्यादित संधी असलेल्या ओबीसी समाजातील घटकांना आणखी मागे ढकलले जाईल. सर्वोच्च न्यायालय व विविध आयोगांनी स्पष्ट केले आहे की केवळ राजकीय दबावाखाली जातींचा समावेश आरक्षणात करता येत नाही. त्यामुळे दि. ०२ सप्टेंबर २०२५ चा शासन निर्णय तात्काळ मागे घ्यावा. ओबीसी आरक्षणामध्ये कोणत्याही समाजाचा अन्याय्य समावेश होऊ नये. ओबीसी समाजाचे प्रतिनिधित्व, हक्क आणि आरक्षण संरक्षित रहावे यासाठी शासनाने ठोस धोरण जाहीर करावे. हा निर्णय मागे घेतला गेला नाही तर आम्हाला लोकशाही मार्गाने व्यापक आंदोलन उभारावे लागेल. असा थेट इशारा या निवेदनातून शासनाला देण्यात आला आहे. निवेदन देताना सकल ओबीसी समाजातील विविध जातींचे तसेच संघटनांचे प्रतिनिधी तसेच अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद, सत्यशोधक समाज, गोरसेना, सावता परिषद, बारा बलुतेदार महासंघ, न्हावी समाज संघ, समनक जनता पार्टी, शिवसेना उबाठा चे पदाधिकारी, माळी युवा मंच, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे शहरातील पदाधिकारी, केकत उमरा येथील ग्रामपंचायत चे पदाधिकारी आदींसह सकल ओबीसी समाजाचे बहुसंख्य प्रतिनिधी उपस्थित होते.

## गणेशोत्सवात विठ्ठलनामाची गोडी असलेला देखावा ठरला आकर्षण



**दै. अजिंक्य भारत** । प्रतिनिधी

**मंगरुळपीर, दि. ४ :** मंगरुळपीर शहरातील शॉपिंग सेंटरमध्ये सर्व व्यापाऱ्यांनी मिळुन गणपती प्रतिष्ठापना केली . या ऊत्सवामध्ये विठ्ठलनामाची गोडी असल्याचा अनोखा देखावाही साकारण्यात आला असल्याने सर्वत्र कौतुक होत आहे.
मंगरुळपीर शहरात गणेत्सवाची मोठी धामधुम पाहावयास मिळत आहे. या ऊत्सवामध्ये व्यापारी आघाडीही सक्रीय झाली असुन मोठ्या ऊत्साहात यावर्षी सहभाग नोंदवत अनोखा वारकरी देखावा साकारुन आनंदात भर घातली आहे.यावेळी मंडळाने भेटी लागे जीवा चा प्रसंग रेखाटत वारकरी पंढरीकडेकडे प्रस्थान आणी आषाढीचा आनंदोत्सवही साकारला आहे.यामध्ये शहरातील व्यापारी लाईन गणेश मंडळातील सचिन गर्दे, अतुल फुके,शंकर शुभम राऊत, भेंडेकर, बंडू भेंडेकर, महिंद्रा ठाकरे, पवन ठाकरे, मनोज, विठ्ठल,मानेकार ,व्यवहारे पियुष भुतडा,अभिजीत भुतडा, बबलू पांडे ,आदित्य मिसाळ, भीमा अप्पा साखरे, मनोज गव्हाणे, कृष्णा बेंद्रे,चंचल खिराडे जय टाले व सर्व व्यापारी गणेश मंडळ सदस्य नगरपरिषद शॉपिंग सेंटर मंगरूपीर यांनी सक्रीय सहभाग नोंदवला.

## मंगरुळपीर तालुक्यात तीन ठिकाणी नवीन आधार केंद्र सुरु होणार

**दै. अजिंक्य भारत** । प्रतिनिधी

**मंगरुळपीर, दि. ४ :** मंगरूळपीर तालुक्यात रिक्त असलेल्या तीन महसुल मंडळाच्या मुख्यालयी नवीन आधार सेवा केंद्र सुरू करण्यात येणार आहेत. यासाठी इच्छुक आपले सरकार सेतु सेवा केंद्र चालकांकडून अर्ज मागविण्यात आले असून संबंधित वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे.यामध्ये मंगरुळपीर तालुक्यातील पोटी,पार्डी ताड व कवठळ या गावांचा समावेश आहे.
जाहिरनामा व नमुना अर्ज प्रसिद्धी : जिल्हाधिकारी कार्यालय, नोटीस बोर्ड तसेच संकेतस्थळ वर,अर्ज स्वीकारण्याची मुदत : ११ सप्टेंबर २०२५ पर्यंत (कार्यालयीन दिवशी व वेळेत) पात्र/अपात्र व निवड यादी : जिल्हाधिकारी कार्यालय, नोटीस बोर्ड व संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येणार आहे. इच्छुकांनी अर्ज व आवश्यक कागदपत्रांच्या छायाप्रमाणपत्रांसह जिल्हाधिकारी कार्यालय, आधार शाखा वाशिम येथे प्रत्यक्ष ११ सप्टेंबर २०२५ रोजी सायं ४ वाजेपर्यंत सादर करावेत. ई-मेल किंवा पोस्टाने आलेले तसेच मुदतीनंतर प्राप्त अर्ज ग्राह्य धरले जाणार नाहीत. अटी व शर्तीसाठी आधार शाखा येथे संपर्क साधावा.असे निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे यांनी कळविले आहे.




## उपचार

### महात्मा फुले जन आरोग्य योजनेमधून रुग्णांना मिळाला आर्थिक दिलासा

# मोफत उपचारातून 'लाईफ लाईन' वाढविणारे देवदूत

**दै. अजिंक्य भारत** । प्रतिनिधी

**वाशिम, दि. ४ :** आरोग्य ही प्रत्येकाची प्राथमिक गरज असताना, दर्जेदार व परवडणाऱ्या दरात उपचार मिळावेत अशी अपेक्षा नेहमीच नागरिकांकडून केली जाते. वाशीम शहरातील लाईफ लाईन हॉस्पिटल हे याच अपेक्षेला न्याय देत नागरिकांच्या सेवेत कार्यरत आहे. अल्पावधीतच या दवाखान्याने जिल्ह्यात आपली वेगळी ओळख निर्माण केली असून, दररोज हजारो नागरिक येथे उपचाराकरिता गर्दी करत आहेत.
शासनमान्य सवलतींचा लाभनागरिकांना देत असतानाच हॉस्पिटल प्रशासनाने उच्च दर्जाची आरोग्यसेवा पुरविण्याचा ध्यास घेतला आहे. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या सक्षम नसलेल्या रुग्णांनाही येथे स्वस्त दरात उपचार मिळत असून, त्यांचा विश्वास दवाखान्यावर दुपटीने वाढतो आहे. या हॉस्पिटलमध्ये आधुनिक यंत्रसामग्रीसह अनुभवी डॉक्टर, प्रशिक्षित नर्सेस व सेवाभावी कर्मचारी कार्यरत आहेत. तपासणीपासून उपचारांपर्यंत रुग्णांच्या प्रत्येक गोष्टीकडे काटेकोर लक्ष दिले जाते. त्यामुळे रुग्णांना समाधानकारक सेवा मिळत असून, ग्रामीण भागातूनही लोक दुरून दुरून उपचाराकरिता येथे येत आहेत.
''इतर ठिकाणी प्रचंड खर्च करूनही योग्य सेवा मिळत नाही, मात्र लाईफ लाईन हॉस्पिटलमध्ये परवडणाऱ्या दरात दर्जेदार उपचार मिळतात,'' असे मत अनेकांनी व्यक्त केले. त्यामुळे या हॉस्पिटलचे नाव केवळ वाशीम पुरतेच मर्यादित न राहता संपूर्ण जिल्ह्यात नावारूपास आले आहे. अनेक सामाजिक संघटनांनी देखील हॉस्पिटल प्रशासनाच्या सेवाभावाचे कौतुक केले असून, शासनाच्या सवलतीं बरोबरच सेवा व दर्जा या दुहेरी फायद्यामुळे नागरिकांचा विश्वास अधिकाधिक वाढत आहे. ''लाईफ लाईन'' हे खऱ्या अर्थाने वाशीम जिल्ह्यातील आरोग्य क्षेत्रातील एक विश्वसनीय नाव पुढे आले आहे.



### आमदार संतोष बांगर यांच्याकडून कौतुक

शिवसेनेचे आमदार संतोष बांगर यांनी अलीकडेच वाशिम शहरातील डॉ. सौरभ भुतडा यांचे लाईफ लाईन हॉस्पिटल ला सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांनी डॉक्टर भुतडा आणि त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचे कौतुक केले. डॉ . भुतडा यांनी गोरगरीब रुग्णांना विविध योजनेच्या माध्यमातून जी मोफत सेवा दिली ती सेवा खरोखरच अभिनंदनास पात्र ठरते. असे गौरवोद्गार आमदार संतोष बांगर यांनी काढले.

## विवेकानंद हायस्कुलचे दोन विद्यार्थी जिल्हा स्तरावर



**दै. अजिंक्य भारत** । प्रतिनिधी

**कारंजा, दि. ४ :** क्रिडा व युवक सेवा संचालनालय, जिल्हा क्रिडा परिषद, जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालय व तालुका क्रिडा कार्यालय कारंजा यांच्या संयुक्त विद्यमाने तालुका क्रिडा संकुल येथे आयोजित कुस्ती स्पर्धेत विवेकानंद हिन्दी हायस्कुल, कारंजा येथील दोन विद्यार्थ्यांनी यश संपादन केले.
शालेय क्रिडा स्पर्धेत १४ वर्ष वय गटातील ३५ किलो वजन गटात अली शकील गारवे तसेच १७ वर्ष वय गटातील ४८ किलो वजन गटात समशेर शब्बीर पप्पुवाले यांनी उत्तम खेळाची चमक दाखवत जिल्हा स्तरावर प्रवेश मिळविला आहे.
या यशामागे कुस्ती प्रशिक्षक तौफीक हसन पटेल व महेबुब गारवे यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच शाळेचे मुख्याध्यापक रशिद चौधरी व शिक्षक मनोज शिवाल, चंदा राठोड , रामेश्वर काजे, हसन जानीवाले यांचेही मोलाचे सहकार्य लाभले.

अजिंक्य भारत
आपलं अकोला / वाशिम
अकोला, शुक्रवार, दि. ५ सप्टेंबर २०२५ www.ajinkyabharat.com


## गणेश दर्शन


अष्टविणायक गणेश मंडळ नविन बसस्थ्यांड सस्ती


लोकमान्य गणेश उत्सव मंडळ जुने बसस्थ्यांड सस्ती


आपला अंगद गणेश उत्सव मंडळ मनाडी(गायगाव)


बाल गणेश उत्सव मंडळ हनुमान नगर आपातापा


रामदल मित्र मंडळ उरळ बु.


जय गजानन गणेश मंडळ पाटील पुरा हिरपूर

# बाळापूर - पातूर रस्त्यावर पडलेल्या खड्ड्याकडे सा.बां.विभागाचे दुर्लक्ष

## गणपती मिरवणूक उत्सवाच्या आधी खड्डे बुजविण्यात येणार

**दै. अजिंक्य भारत** । प्रतिनिधी

**बाळापूर, दि. ४ :** तालुक्यातिल उपराष्ट्रीय महामार्ग क्र महामार्ग रस्त्यावर गेल्या दोनच वर्षात रस्त्याची चाळणी झाली असून पारस फाटा येथे रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडलेले आहेत.बाळापूर नाक्यावर असलेल्या वळणावर खड्ड्यामुळे कित्येकदा अपघात झाले तर त्याच रस्त्याने येत असताना मांडवा फाट्यावर रस्त्या मधोमध उखडलेल्या रस्त्यामुळे चालकाला मोठी कसरत करावे लागते. वाडेगाव या ठिकाणी गावाच्या सुरवाती पासून तर गावसंपेपर्यंत रस्त्याची



चाळणी झालेली आहे. अशी दयनीय अवस्था रस्त्याची झालेली असूनही सार्वजनिक बांधकाम विभागाने पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे. याबाबत दै. अजिंक्य भारतने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभियंता यांना बोलते केले असता त्यांनी गणपती मिरवणूक उत्सवाच्या आधी खड्डे बुजवण्यात येतील. असे दै. अजिंक्य भारतला सांगितले.

वाडेगाव मोठे बाजारपेठ असल्यामुळे या ठिकाणी बाहेर गावावरून दळणवळण मोठ्या प्रमाणात होते. लोक व गावातिल नागरीक रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यामुळे चालताना कसरत करीत आहेत.

विद्यार्थी शाळेत जा ये करत असताना बसस्थानकावर पडलेल्या खड्ड्यामुळे कित्येक वेळा वाहतूक प्रभावीत होते. गणेशोत्सवात ह्या मार्गे मिरवणूक तसेच भिमजयंतीची मिरवणूकही याच मार्गाने निघत असते. या पडलेल्या खड्ड्यामुळे अनुसूचित प्रकार घडला तर याला जबाबदार कोण? असा प्रश्न उपस्थित होत आहे. बाळापूर तालुक्यातिल उपराष्ट्रीय महामार्ग क्र महामार्ग रस्त्यावर गेल्या दोनच वर्षात रस्त्याची चाळणी झाली असून रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडलेले आहेत. वळणावर खड्ड्यामुळे कित्येकदा अपघात झाले तर त्याच रस्त्याने येत असताना मांडवा फाट्यावर रस्त्या मधोमध उखडलेल्या रस्त्यामुळे चालकाला मोठी कसरत करावे लागते. अश्या दयनीय अवस्थेत असलेल्या रस्त्याकडे सार्वजनिक बांधकाम विभागाने पूर्णपणे दुर्लक्ष केलेले असून उद्या गणेश विसर्जन होत असतानाही सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता फक्त गणपती मिरवणूक उत्सवाच्या आधी खड्डे बुजवण्यात येतील याचे नियोजन करीत आहेत. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाला रस्त्याचे किती गांभीर्य आहे हे दिसून येते.

> ❑ सार्वजनिक बांधकाम विभागा मधील अभियंता पाठवून संपूर्ण खड्डे पाहणी करून गणपती मिरवणूक उत्सवाच्या आधी डब्ल्यू पी सी करून गड्डे बुजवण्यात येतील.
>
> - **संदिप वासनिक,** अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग

## जिल्ह्यात १४ महसूल मंडळात नवीन आधार केंद्र सुरु होणार

**दै. अजिंक्य भारत** । प्रतिनिधी

**वाशिम, दि. ४ :** जिल्ह्यातील रिक्त असलेल्या एकूण १४ महसुल मंडळाच्या मुख्यालयी नवीन आधार सेवा केंद्र सुरू करण्यात येणार आहेत. यासाठी इच्छुक आपले सरकार सेतु सेवा केंद्र चालकांकडून अर्ज मागविण्यात आले असून संबंधित वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे.

तालुका व महसुल मंडळे : वाशिम तालुका : राजगांव, पार्डी आसरा, मालेगाव तालुका : चांडस, मेडशी, करंजी रिसोड तालुका : कवठा मंगरुळपीर तालुका : पोटी, पाथर्डी ताड,कवठळ मानोरा तालुका : गिरोली कारंजा तालुका : येवता, पोहा,उंबर्डा बाजार,कामरगांव अशी एकूण १४ महसुल मंडळे यामध्ये आधार केंद्र सुरू होणार आहेत. यासाठी अर्ज स्वीकारण्याची मुदत ११ सप्टेंबर २०२५ पर्यंत वाढविण्यात आली. पात्र अपात्र व निवड यादी ही जिल्हाधिकारी कार्यालय, नोटीस बोर्ड व संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येणार आहे. इच्छुकांनी अर्ज व आवश्यक कागदपत्रांच्या छायाप्रमाणपत्रांसह जिल्हाधिकारी कार्यालय, आधार शाखा वाशिम येथे प्रत्यक्ष ११ सप्टेंबर २०२५ रोजी सायं ४ वाजेपर्यंत सादर करावेत. अटी व शर्तीसाठी आधार शाखा येथे संपर्क साधावा.असे निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे यांनी कळविले आहे.

## लहान मुलांच्या भांडणावरून मारहाण

**कारंजा (लाड) :** कारंजा येथील मंगलवारा येथे २ सफ्टेंबर रोजी लहान मुलांच्या भाडणावरून फिर्यादी अब्दुल बिलाल अब्दुल सलाम(२८) यास आरोपी वासिम खान हाफीज खान(४५),समीर खान हाफीज खान(४८) रा. टीचर कॉलनी कारंजा, तौसिफ खान असद खान(३२) व सोहेल खान असद खान(२७) दोन्ही राहणार दारव्हा वेस कारंजा यांनी काठीने डोक्यावर व डाव्या हाताचे कोनीवर मारहाण करून शिवीगाळ केली व तसेच लाता बुक्यांनी मारहाणा करून जिवाने मारण्याची धमकी दिली अशा जबानी रिपोर्ट व मेडीकल सर्टीफिकेत वरून आरोपी विरुद्ध कारंजा शहर पोलिस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती मिळाली आहे. ठाणेदार दिनेशचन्द्र शुक्ला यांच्या मार्गदर्शन खाली पोहेका संदीप बर्डे करीत आहे.

## गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा आणि बक्षीस वितरण



**दै. अजिंक्य भारत** । प्रतिनिधी

**अकोलखेड, दि. ४ :** जय गणेश बहुउद्देशीय समितीच्या वतीने गणपती उत्सव निमित्य गावातील१० वी १२ वीमधील गुणवंत विद्यार्थी यांना प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. तसेच सरकारी निमसरकारी २०२५ मध्ये नोकरीं वर लागलेले उमेदवार यांचा सत्कार करण्यात आला. सामान्य ज्ञान स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.त्यामध्ये प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकाच्या विद्यार्थ्यांना मेडल व प्रमाणपत्र देण्यात आले. कार्यक्रमसाठी समितीची सर्व कार्यकारिणी मंडळाचे सर्व कार्यकर्ते व परिसरातील स्त्री व पुरुष यांची उपस्थिती होती.

## बोरगाव मंजूमध्ये अतिक्रमण काढण्यास सुरुवात

### गणपती विसर्जन मिरवणुकीच्या मार्गात येत होती अडचण



**दै. अजिंक्य भारत** । प्रतिनिधी

**बोरगाव मंजू, दि. ४ :** पोलीस स्टेशनच्या शांतता कमिटीच्या मीटिंगमध्ये मिरवणुक मार्गावर येत असलेल्या अडचणीचा मुद्दा चांगलाच गाजला होता. याच पार्श्वभूमीच्या आधारावर प्रशासनाने याची गंभीर दखल घेत अतिक्रमण धारकांवर बुधवार रोजी पहाटे कारवाई करण्यास सुरुवात केली.

बोरगाव मंजू गाव मोठे असल्यामुळे गणपतींची संख्या सुद्धा जास्त आहे. त्यामुळे विसर्जन मिरवणूकीला मोठेस्वरुप प्राप्त होते. परंतु मिरवणुक ज्या मार्गाने जाते त्या मार्गावर काही लोकांनी अतिक्रमण केल्यामुळे मिरवणुकीसाठी अडचण येण्याची शक्यता होती. यामुळे सामाजिक तणावाची परिस्थिती निर्माण होऊन कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला असता. गांभीर्य लक्षात घेऊन स्थानिक ग्रामपंचायत प्रशासन आणि पोलीस प्रशासनाने अतिक्रमणधारकांना कायदेशीर नोटिस दिल्या होत्या. परंतु नोटिस देऊनही अतिक्रमण धारकांनी अतिक्रमण न हटवल्यामुळे आज बुधवार रोजी महसूल विभागाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांसह, स्थानिक ग्रामपंचायत प्रशासनाच्या उपस्थितीत अतिक्रमण काढण्यास सुरुवात करण्यात आली. यावेळी पोलीस उपविभागीय अधिकारी वैशाली मुळे, स्थानिक पोलीस स्टेशनचे ठाणेदार अनिल गोपाळ यांच्या नेतृत्त्वाखाली पोलीस कर्मचाऱ्यांसह दंगल नियंत्रण पथक तैनात करण्यात आले होते.

## बोर्डीतील गणेश उत्सव शांततेत पार पाडा

### ७ सार्वजनिक मंडळांनी केली स्थापना

**दै. अजिंक्य भारत** । प्रतिनिधी

**अकोट, दि. ४ :** तालुक्यातील सातपुड्याच्या पायथ्याशी वसलेल्या ग्राम बोर्डी येथे गणेश मंडळानी गणपती बाप्पाची स्थापना केली आहे.अकोट ग्रामीण पोलिसांनी गणेशोत्सव शांततेत पार पाडण्याबाबत मार्गदर्शन करून योग्य त्या सूचना दिल्या आहेत.बोर्डीमध्ये एकूण सात ठिकाणी सार्वजनिक मंडळानी गणपती बाप्पाची स्थापना केली आहे.यामध्ये नागास्वामी महाराज मंदिर,मरी माता मंदिर,दुर्गा माता मंदिर,एकता गणेशोत्सव मंडळ,वीर भगतसिंग गणेशोत्सव मंडळ,आनंद बाल गणेश मंडळ,शिवप्रेमी गणेश मंडळ,अशा साथ गणेश मंडळानी गणपती बाप्पाची विधिवत व भक्तिमय वातावरणात,गणपती बाप्पा मोरयाच्या गजरात वाजत, गाजत, श्री. गणेशाची स्थापना केली. अकोट ग्रामीण पोलिस स्टेशनचे ठाणेदार किशोर जुनघरे यांचे प्रमुख उपस्थितीत उमरा बिट जमदार उमेश सोळंके व इतरही कर्मचाऱ्यांनी प्रत्येक गणेश मंडळाला भेट देऊन मार्गदर्शक सूचना दिल्या व गणेशोत्सव शांततेत पार पडण्याचे आवाहन केले. यावेळी सातही मंडळाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य, तंटामुक्तीचे अध्यक्ष, पत्रकार बांधव, व गावातील प्रतिष्ठित नागरिकांची उपस्थिती होती.




अजिंक्य भारत
# आपलं बुलडाणा

बुलडाणा, शुक्रवार,दि.५ सप्टेंबर २०२५

# ‘शाळा आहे पण शिक्षक नाही’ बेलगाव येथील विद्यार्थ्यांची व्यथा!

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**देऊळगाव माळी दि ४. :** ''आम्हाला शिक्षक द्या हो, आम्हाला शिकायचे आहे!'' अशा टाहो देत बेलगाव (ता. मेहकर) येथील जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी थेट पंचायत समिती कार्यालय गाठले. चार सप्टेंबर रोजी घडलेल्या या आंदोलनात ग्रामस्थ आणि विद्यार्थी एकदिलाने सहभागी झाले. शाळा असली तरी शिक्षक नसल्यामुळे शिक्षणाचे नुकसान होत असल्याचा गंभीर प्रश्न उपस्थित करत विद्यार्थ्यांनी थेट पंचायत समिती कार्यालयात शाळा भरवली. ग्रामीण भागातील शिक्षण व्यवस्थेतील त्रुटींवर बोट ठेवणारे हे आंदोलन ठरले आहे.

**शाळा आहे पण शिक्षक कुठे?**

बेलगाव गावातील जिल्हा परिषद शाळा अनेक वर्षांपासून कार्यरत आहे. मात्र, गेल्या काही महिन्यांपासून शिक्षकांच्या कमतरतेमुळे शाळेचे कामकाज ठप्प होत असल्याचे पालकांनी सांगितले. ''शाळा आहे, पण आमच्या लेकरांना शिकवायला शिक्षक नाहीत. दररोज आमची मुले शाळेत जातात, पण तिथे शिकवायला कोणीच नसते. अशाने मुलांचे भविष्य अंधारात जाणार नाही का?'' असा सवाल पालकांनी संतापाने केला.




**पंचायत समितीत विद्यार्थ्यांचा मोर्चा**

या पार्श्वभूमीवर बेलगावच्या जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी चार सप्टेंबर रोजी पंचायत समिती कार्यालयात मोर्चा नेला. ''आम्हाला शिक्षक द्या'', ''शिक्षण हक्काचा, शिक्षक आमचाच'' असे घोषवाक्ये देत विद्यार्थ्यांनी कार्यालय परिसर दणाणून सोडला. काही वेळ तर विद्यार्थ्यांनी थेट पंचायत समिती कार्यालयात शाळा भरवली. हातात पाटी, वही, पुस्तके घेऊन कार्यालयाच्या सभागृहात बसलेल्या विद्यार्थ्यांचे दृश्य पाहून अधिकारी अवाक झाले.

**शिक्षणाचा हक्क वंचित**

भारतीय संविधानाने प्रत्येक मुलाला मोफत आणि सक्तीचे शिक्षण दिले आहे. यासाठी सरकार दरवर्षी बजेट तर करतेच, पण अनेक योजना देखील राबवते. मात्र, प्रत्यक्षात ग्रामीण भागातील परिस्थिती याच्या विरुद्ध दिसत आहे. बेलगावसारख्या छोट्या गावातील मुलांना आज शिक्षक मिळत नाहीत, हे वास्तव गंभीर आहे. ''आमच्या मुलांना शाळेत नुसते चार भिंती दिसतात. वर्गात बसून वेळ जातो, पण शिकवायला शिक्षक नाहीत. हे कोणते शिक्षण?'' असा संताप पालकांनी व्यक्त केला.

**अधिकारी गप्प ग्रामस्थ संतप्त**

विद्यार्थ्यांच्या आंदोलनाने पंचायत समिती तिच्या अधिकाऱ्यांची चांगलीच धावपळ उडाली. मात्र, तातडीने शिक्षकांची नियुक्ती होईल की नाही, याबाबत प्रशासनाने ठोस भूमिका घेतली नाही. त्याामुळे ग्रामस्थांचा संताप अधिकच वाढला. ''आमच्या मुलांचे भविष्य धोक्यात घालून प्रशासन हातावर हात धरून का बसले आहे? जोपर्यंत शिक्षक मिळत नाहीत तोपर्यंत आम्ही शांत बसणार नाही,'' असा इशारा ग्रामस्थांनी दिला.

**आंदोलन म्हणजे व्यवस्थेला धक्का**

या आंदोलनाने ग्रामीण भागातील शिक्षण व्यवस्थेवर मोठा प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. सरकार डिजिटल शाळा, स्मार्ट क्लासरूम, इंग्रजी माध्यमाच्या योजना राबवत असताना एखाद्या गावात प्राथमिक शिक्षकच उपलब्ध नसतील, तर त्या सगळ्या योजना कागदोपत्री राहतात. बेलगावच्या विद्यार्थ्यांचा आवाज म्हणजे संपूर्ण ग्रामीण महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचा आक्रोश आहे.

**पुढील पाऊल**

विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान थांबवण्यासाठी ग्रामस्थ आता मोठे आंदोलन करण्याच्या तयारीत आहेत. ''जोपर्यंत शिक्षकांची नेमणूक होत नाही, तोपर्यंत आम्ही पंचायत समिती कार्यालयाच्या दारात बसून राहणार. प्रशासनाने दुर्लक्ष केले तर आम्ही जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक देऊ,'' अशी भूमिका पालकांनी घेतली आहे.

बेलगावमधील विद्यार्थ्यांचे हे आंदोलन शिक्षण व्यवस्थेतील असमानता आणि बेफिकिरी अधोरेखित करणारे ठरले आहे. ग्रामीण भागातील शाळा शिक्षकांअभावी उद्ध्वस्त होत असताना विद्यार्थ्यांनीच शाळा बंद करून आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागतो, ही स्थिती दुर्दैवी आहे. सरकार आणि प्रशासनाने या विद्यार्थ्यांचा टाहो ऐकून तातडीने पावले उचलली नाहीत, तर अशा प्रकारचे आंदोलन राज्यभर उग्र स्वरूप धारण करण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## शिवणी आरमाळ नगरीत भटके विमुक्त दिन साजरा

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**देऊळगाव दि.४ :** तालुक्यातील कै. लक्ष्मीबाई माध्यमिक आश्रम शाळा व यशवंतराव पाटील कनिष्ठ महाविद्यालय शिवणी आरमाळ यांच्या संयुक्त विद्यमाने विविधांगी उपक्रमांनी भटके मुक्त दिन साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुनिल आरमाळ तर मुख्याध्यापक एन.के.पडघान, प्राचार्य डि.पी.आरमाळ उपस्थित होते. यावेळी विमुक्त भटके दिन दिवस उपक्रमामध्ये अंतर्गत विविध शाळेमध्ये रांगोळी स्पर्धा, निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा आणि वेगवेगळ्या पारंपरिक वेशभूषा करून



विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.मान्यवरांच्या हस्ते शाळेच्या परिसरामध्ये विविध प्रकारची झाडे लावण्यात आली. सुनिल आरमाळ यांनी मनोगत व्यक्त करतांना आजच्या धकाधकीच्या जीवनात व स्पर्धेच्या युगात सजग राहण्याची गरज आहे. विद्यार्थ्यांनी संस्कृतीचे अनुकरण व चांगले गुण जोपासण्याची अपेक्षा व्यक्त केली. भटके विमुक्त दिन कार्यक्रमाच्या निमित्ताने घेण्यात आलेल्या विविध स्पर्धा मधील विजेत्या विद्यार्थ्यांना कार्यक्रमाचे अध्यक्ष सुनील आरमाळ यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे संचलन प्रा.आरमाळ सर तर आभार प्रदर्शन प्रा.काळे सर यांनी केले व कार्यक्रमांमध्ये उपस्थित शिक्षक व कर्मचारी विद्यार्थी विद्यार्थिनी नागरिक उपस्थित होते.

## हिंदू व मुस्लिम बांधवांनी दोन्ही सण उत्सव म्हणून साजरे करावे

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**साखरखेर्डा दि.४ :** येथील श्रीगणेश उत्सव साजरा केला जात असताना आज ३ सप्टेंबर रोजी रात्री जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांनी साखरखेर्डा येथील काही मंडळांना भेटी दिल्या आणि मिरवणूक भागाची पाहणी केली.

सर्वप्रथम साखरखेर्डा येथील श्री पलसिध्द महास्वामी मठात त्यांनी भेट देऊन समाधी दर्शन घेतले. यावेळी मठाचे दिवानजी विश्वनाथ आप्पा जितकर यांनी मठाची माहिती दिली. त्यानंतर पोलिस स्टेशनमध्ये गणेश मंडळाचे अध्यक्ष आणि ईद मिलाद कमेटीचे सदस्य यांची बैठक घेऊन काही सुचना देत मार्गदर्शन केले. हिंदू व मुस्लिम बांधवांनी दोन्ही सण मोठ्या उत्साहात साजरे करताना इतर व्यक्तींना, रुग्णांना त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी. प्रत्येक समाजात काही लोक अफवा पसरवून गोंधळ कसा निर्माण होईल यासाठी प्रयत करतात, अशा लोकांवर प्रत्येक मंडळातील अध्यक्षांनी लक्ष द्यावे. असे मार्गदर्शन जिल्हा पोलिस अधीक्षक निलेश तांबे यांनी केले. त्यानंतर सर्वप्रथम १०० वर्षांची परंपरा असलेल्या श्री शिवाजी व्यायाम शाळा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ येथे सार्वजनिक आरती केली. त्यावेळी मंडळाचे अध्यक्ष अशोक इंगळे यांनी त्यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार केला. श्री बालनाथ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाला भेट दिली. त्याठिकाणी श्री प्रल्हाद महाराज संस्थानचे उपाध्यक्ष रावसाहेब देशपांडे



यांनी सत्कार केला. दगडी मज्जीत, गुजरी चौक, माळी पुरा, गणपती चौक भागाची पाहणी केली. त्यांच्या समवेत उपविभागीय पोलिस अधिकारी प्रदीप पाटील, ठाणेदार गजानन करेवाड यासह चार पोलिस अधिकारी यांचा समावेश होतो. सरपंच पती अमित जाधव, अंकुर देशपांडे, अर्जून गवई, संतोष मंडळकर, गजानन इंगळे, राहुल नालिंदे सह आदी बैठकीला उपस्थित होते.

## शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गावर गतिरोधक बसवा : मागणी

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**देऊळगाव राजा ४ :** शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गावर अपघाताचे प्रमाण वाढले आहेत. या महामार्गावर रोज अपघात होत असल्याने अनेकांना आपला जीव गमवावा लागला असून काहींना कायमस्वरूपी अपंगत्व आले आहे. त्यामुळे शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गावर कुंभारी चौफुली ते मिश्रीकोटकर पेट्रोल पंप दरम्यान महतत्वाच्या ठिकाणी गतिरोधक टाकावे, अशी मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी मुख्याधिकारी अरुण मोकळ यांच्याकडे केली आहे.

राष्ट्रवादीने दिलेल्या निवेदनात नमूद आहे की, देऊळगाव राजा शहरातून नागपूर - पुणे हा कायम वाहनांची वर्दळ असलेला राष्ट्रीय महामार्ग जातो. या महामार्गावरून रात्रंदिवस मोठ्या प्रमाणात वाहनांची वर्दळ असते. या रस्त्याचे कॉंक्रिटीकरण करण्यात आल्याने रस्त्यावरून सर्वच वाहनांचा वेग वाढलेला आहे. महतत्वाचे म्हणजे या रस्त्यावर शासकीय ग्रामीण रुग्णालय,



खाजगी दवाखाने, शाळा असल्याने विद्यार्थी व नागरिकांची मोठ्या प्रमाणात गर्दी असते. त्यामुळे या रस्त्यावर रोज छोटे-मोठे अपघात होत आहे. अपघातामध्ये अनेक नागरिकांचा जीव गेला असून काहींना कायमस्वरूपी अपंगत्व आले आहे. सध्या हा रस्ता नगरपालिकेकडे हस्तांतरित असल्याने नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने अपघात रोखण्यासाठी उपयोजना करणे पालिका प्रशासनाची जबाबदारी आहे. तरी महतत्वाच्या ठिकाणी डांबरी गतिरोधक किंवा सिमेंटचे गतिरोधक अथवा ड्रबल्स बसवावे.

## अमडापूर येथे तरुणाचा नदीत बुडून मृत्यू

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**अमडापूर दि.४:** गावाजवळील नदीकाठावर झालेल्या दुर्दैवी घटनेत अरुण दिघोजी वानखेडे (वय ३५) यांचा पाय घसरून नदीत बुडून मृत्यू झाला. या अचानक घडलेल्या घटनेने संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दिनांक २ सप्टेंबर रोजी पहाटेच्या सुमारास फिर्यादी अजय वानखेडे यांना त्यांचे मित्र रितेश अंभोरे व इतरांनी माहिती दिली की, अरुण वानखेडे हे गावातील नदीकाठावर फिरत असताना पाय घसरून ते नदीत पडले. काही वेळाने त्याांचा मृतदेह नदीकाठावर आढळून आला. घटनेची माहिती मिळताच नातेवाईक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने घटनास्थळी धावले. मात्र तोपर्यंत अरुण वानखेडे यांचा मृत्यू झाला होता. त्यांच्या अचानक निधनाने कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून गावात शोककळा पसरली आहे. या प्रकरणी अमडापूर पोलिसात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे. दरम्यान, या नदीकाठावरून विद्यार्थी तसेच ग्रामस्थांची ये-जा सुरू असते. येथून सुरक्षितपणे ओलांडता यावे यासाठी नागरिकांनी वारंवार पूल बांधण्याची मागणी केली होती. मात्र प्रशासनाकडून ठोस उपाययोजना न झाल्याने अशा दुर्दैवी घटना घडत आहेत. भविष्यात पुन्हा अशी दुर्घटना होऊ नये यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी ग्रामस्थांतून जोर धरत आहे.



## शेतकऱ्यांच्या हक्कासाठी रस्त्यावर उतरण्याचा कॉँग्रेसचा इशारा

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**चिखली दि.४ :** अस्मानी सुलतानी संकटाशी झुंजणाऱ्या शेतकऱ्यांवर सातत्याने संकटे ओढावत आहे. अजूनही शेतकऱ्यांना पीक विमा मिळाला नसल्याचे विदारक चित्र आहे. चिखली तालुका कॉंग्रेस किसान सेलचे अध्यक्ष समाधान आकाळ यांनी तहसिलदारांना निवेदन देऊन चिखली तालुक्यातील शेतकऱ्यांना खरीप हंगाम २०२४ चा पिक विमा तातडीने मिळावा, अशी ठाम मागणी केली आहे.

तहसिलदारांना दिलेल्या निवेदनात नमूद आहे की, खरीप हंगामात तालुक्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या खर्चाने पेरणी केली होती. मात्र, ऑगस्ट ते ऑक्टोबर या काळात झालेल्या अतिवृष्टीमुळे सोयाबीनसह इतर पिकांचे प्रचंड नुकसान झाले. शेतकऱ्यांनी एआयसी कंपनीकडे पिक विमा काढला असून,



नुकसान झाल्यानंतर तक्रारी दाखल करून पंचनामेही करण्यात आले आहेत. तरीदेखील आजतागायत अनेक शेतकऱ्यांना विमा रकमेचा लाभ मिळालेला नाही. काही शेतकऱ्यांना अत्याल्प मदत मिळाली असून बहुतांश शेतकरी अजूनही भरपाईपासून वंचित आहेत. ही परिस्थिती अत्यंत चिंताजनक असून शेतकऱ्यांवर आर्थिक संकट कोसळले आहे. कर्ज, व्याजाचा वाढता बोजा आणि वारंवार होणाऱ्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकरी हतबल झाले आहेत. त्यामुळे शासनाने जाहीर केलेली पिक विम्याची रक्कम तातडीने वितरित करणे गरजेचे आहे. किसान सेलचे अध्यक्ष समाधान आकाळ यांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, जर शासन व प्रशासनाने तात्काळ कार्यवाही करून शेतकऱ्यांना न्याय दिला नाही तर चिखली तालुका कॉंग्रेस किसान सेलच्या वतीने तीव्र आंदोलन छेडले जाईल. कॉंग्रेस पक्ष सदैव शेतकऱ्यांच्या पाठीशी उभा राहिला आहे आणि पुढेही उभा राहील. शेतकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी आम्ही रस्त्याावर उतरून लढा देऊ, असेही समाधान आकाळ यांनी सांगितले.

## गणपती मिरवणूक मार्गाची आणि विसर्जन स्थळाची ठाणेदारांनी केली पाहणी

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**अंढेरा दि.४ :** सध्या सगळीकडे गणेशोत्सवाची धूमधुम सुरू आहे. स्थानिक प्रशासनाच्या आणि पोलिसांच्या वतीने गणपती विसर्जन जवळ आले असल्याने प्रशासनाकडुन ठिक ठिकाणी गणेश विसर्जनाची जय्यत तयारी सुरू असुन यामध्ये प्रामुख्याने ठिक ठिकाणच्या गावांमधील गणपती विसर्जन मार्गाची ठाणेदार रुपेश शक्करगे आणि सुरेश जारवाल यांनी पाहणी केली.

मिरवणूक मार्गावर काही अडथळा किंवा अडचण असल्यास त्या तात्काळ दुर करण्याच्या सुचना स्थानिक ग्रामपंचायत प्रशासनाला देण्यात आल्या. यावेळी सोबत सरपंच प्रतिनिधी गणेश आंबिलकर सोबत होते. तसेच अंढेरा येथील बरेच गणेश मंडळ हे आपल्या लाडक्या गणेशाचे विसर्जन हे शिवणी आरमाळ येथील धरणात करत असतात.यावर्षी या भागात दमदार पाऊस झाल्याने परिसरातील जवळपास सर्वच



**डि.जे.वर पुर्णपणे बंदी**

जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांनी सर्वानी गणेशोत्सव सगळीकडे शांततेने आणि प्रशासनाचे नियम पाळत साजरा करावा असे आवाहन करण्यात आले असुन गणेश विसर्जन मिरवणुकीत कोणत्याही गणेश मंडळाने डि.जे.लावु नये किंवा वाजवू नये.जिल्हा पोलिस अधीक्षक निलेश तांबे यांच्या आदेशानुसार सर्वांना स्पष्ट सुचना देण्यात आल्या असुन कोणत्याही गणेश मंडळाने डि.जे.वाजविल्यास संबंधित गणेश मंडळाचे अध्यक्ष तसेच पदाधिकारी आणि संबंधित डि.जे.जप्त करुन सर्वांवर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल असा इशारा अंढेरा ठाणेदार रुपेश शक्करगे यांनी दिला आहे.

धरणे ओव्हरफ्लो झाले असुन शिवणी आरमाळ प्रकल्प सुध्दा पुर्ण क्षमतेने भरला आहे.अशा वेळी पोलिसांना खबरदारी घेत शिवणी आरमाळ येथील विसर्जन ठिकाणची स्वताहा पाहणी केली.आणि विसर्जन ठिकाणी साफ सफाई करुन याठिकाणी रात्रीच्या वेळी विसर्जन होणार म्हणून खबरदारी घेत याठिकाणी विद्युत पुरवठा करावा अशी आदेश देताच ग्रामपंचायत प्रशासनाने ठाणेदार रुपेश शक्करगे यांना तात्काळ विसर्जन ठिकाणी विद्युत पुरवठा घेऊन दोन मोठे फोकस लावण्याचे आश्वासन दिले. यावेळी महावितरणचे जरन राऊत, पप्पू चव्हाण, पोलिस शिपाई शिवानंद खार्डे आणि चालक रोरे उपस्थित होते.

**नागरिकांनी विसर्जन ठिकाणी गर्दी करु नये.**

येत्या सहा सप्टेंबर ला सगळीकडे गणेश विसर्जन होणार असुन त्या दिवशी दिवसभर ठिक ठिकाणी मिरवणूक निघणार असुन रात्रीला दहा वाजेपर्यंत गणेश विसर्जन होणार असुन यावेळी अंढेरा ठाणेदार रुपेश शक्करगे यांनी परिसरातील सर्व नागरिकांना तसेच सरपंच आणि पोलिस पाटील यांनी विसर्जन ठिकाणी नागरिकांनी मोठ्या संख्येने गर्दी करु नये असे आवाहन करण्यात आले असुन टप्याटप्याने नागरिकांनी आणि गणेश मंडळांनी आपल्या बाप्पाचे शांततेने विसर्जन करावे. असे आवाहन करण्यात आले असुन मिरवणूक आणि विसर्जन ठिकाणी चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येणार असल्याचे ठाणेदार रुपेश शक्करगे यांनी सांगितले.

## महत्त्वाचे

### अंगणवाडी मदतनीस महिलेचा उपचारा दरम्यान मृत्यू

**खामगाव :** गॅस सिलिंडरचा स्फोट अंगणवाडी होवून मदतनीस महिला व तिचा मुलगा गंभीर जखमी झाले होते. त्यांच्यावर संभाजीनगर येथे रुणालयात उपचार सुरु होते. मात्र जखमी महिलेचा ३ सप्टेंबर रोजी उपचारादरम्यान मृत्यू झाला. चिखली तालुक्यातील मलगी येथील रहिवाशी अंगणवाडी मदतनीस श्रीमती शोभाबाई रमेश परिहार वय ४५ वर्ष ह्या २६ ऑगस्ट रोजी सायंकाळी घरात स्वयंपाक करत असतांना अचानक गॅस सिलिंडरचा स्फोट झाला. आणि या गॅस स्फोटामध्ये श्रीमती शोभाबाई रमेश परिहार व मुलगा राजेश रमेश परिहार हे दोघे गंभीररित्या जखमी झाले होते. त्यामुळे गावातील तंटामुक्ती अध्यक्ष श्रीकांत राऊत विनायक सरपंच सिताराम साप्ते, दिलीप शंकर शितोळे यांनी लगेच त्यांना उपचारासाठी पुढील संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात हलवण्यात आले होते. संभाजी नगर येथे उपचार सुरु असतांना श्रीमती शोभाबाई रमेश परिहार यांचा उपचार दशम्यान मृत्यू झाला आणि मुलावर उपचार सुरू आहे.

### ११० जणांची जन्म मृत्यूची नोंद रद्द

**खामगाव :** बांगलादेशींच्या घुसखोरीचा मुद्दा उचलत भाजप नेते किरीट सोमय्या यांनी नव्याने नोंद करण्यात आलेल्या जन्म मृत्यू प्रमाणपत्रावर आक्षेप घेतला आहे. या संदर्भात किरीट सोमय्या हे बुलढाणा येथे येऊन गेले आणि बुलडाणा तहसील प्रशासनाने ११० नागरिकांची जन्म-मृत्यूची नोंद रद्द केली आहे. यात नायब तहसीलदार यांच्या स्वाक्षरीने देण्यात आलेल्या प्रमाणपत्राचा समावेश असून तहसीलदार यांच्यामार्फत दिलेले जन्म मृत्यूचे प्रमाणपत्र कायम आहे. महत्वाची बाब म्हणजे रद्द झालेल्या जन्म मृत्यू प्रमाणपत्र फक्त मुस्लिम समाजाचेच नव्हे तर इतर समाज बांधवांचे देखील रद्द झाले आहे. प्रमाणपत्र रद्द करण्यात आलेल्या लोकांची नावे यादी मध्ये तपासून घ्या आणि ज्यांचे प्रमाणपत्र रद्द झाले आहे ते पुन्हा आपला प्रस्ताव बुलडाणा तहसील कार्यालयात सादर करू शकतात.

### गणेश विसर्जन व ईदनिमित्त रूटमार्च

**खामगाव :** शहरात ईद मिलादुन्नबी तसेच गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर कायदा सुव्यवस्था अबाधित व राखण्यासाठी मेहकर पोलिस प्रशासनाच्या वतीने रूटमार्च काढण्यात आला. या रूटमार्चमध्ये पोलीस अधीक्षक निलेश तांबे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक डी. वाय. एस. पी. प्रदीप पाटील, ठाणेदार आलेवार यांच्यासह मोठ्या संख्येने पोलीस अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते. यावेळी इमामवाडा चौकात मुस्लिम बांधवांच्या वतीने या मान्यवरांचे स्वागत व सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात पत्रकार सय्यद हारुण, फारुख पठाण, माजी नगरसेवक तौफिक कुरेशी, शोहेब अली, इरफान पैलवान, फिरोज आतार, सोफियान कुरेशी, अजम कुरेशी यांनी पोलीस अधिकारी व मान्यवरांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. शहरात शांतता, एकता आणि बंधुभावाचे प्रतीक म्हणून झालेल्या या रूटमार्च व सत्कार सोहळ्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### कृषी उत्पन्न बाजार समिती, खामगाव बाजार भाव

| वान | भाव |
| --- | --- |
| ज्वारी | १६०० - २१५५ |
| गहू | २२५० - २५७५ |
| तुर | ४६०० - ६३५५ |
| हरभरा | ३२०० - ५९५० |
| सोयाबीन | ३९०० - ४५८० |
| उडीद | ५१०० - ५१०० |
| मका | २६६५ - २६६५ |
| भुईमुग | ३५०० - ४५०० |




## महत्त्वाचे

### सुटाळा बु. ते नांदुरा दिंडी सोहळा उत्साहात

**खामगाव :** संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्या सुवर्ण अमृत शहोत्सवानिमित्त नुकतेच सुटाळा बु. ते नांदुरा दिंडी सोहळा उत्साहात संपन्न झाला. सुटाळा बु. येथून निघालेली दिंडी नांदुरा नगर परिषद येथे पोहचली. यावेळी आमदार चैनसुख संचेती, हभप तुकाराम महाराज, हभप रामभाऊ झामरे, भागवताचार्य सी. बनमाला भोपळे यांची प्रमुख उपस्थिती होती. या दिंडी सोहळ्यात बनकर, मोडके, भोपळे, आढाव, धोटे, बडोकार, तांगडे, लाहुडकर, उमाळे, धोटे, बॉबटकार, काळपांडे, वानखडे, बोचरे, क्षिरसागर, देवकाबाई हे सहभागी झाले होते..

### फोटोग्राफर संघटनेच्या अध्यक्षपदी इंगळे

**चिखली:** बुलडाणा शहर आणि ग्रामीण भागातील फोटोफर्सची संघटना अधिक मजबूत करण्यासाठी नुकतीच एक बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीमध्ये सर्वानुमते विठोबा पुंडलिक इंगळे यांची संघटनेच्या अध्यक्षपदी करण्यात आली. या निवडीला उप स्थितांनी एकमताने पाठिंबा दिला. या महतत्त्वपूर्ण बैठकीला बुलडाणा शहरातील आणि ग्रामीण भागातील १० हुन अधिक फोटोग्राफर्सनी उप-स्थिती लावली होती. या निवडीनंतर बोलताना नवनिर्वाचित अध्यक्ष विठोबा इंगळे यांनी सर्व सदस्यांचे आभार मानले. ते म्हणाले की, सर्व फोटोग्राफर्सना एकत्र घेऊन त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी आणि त्यांच्या निवड हकांसाठी लढण्यासाठी संघटना अधिक प्रभावीपणे काम करेल. या निवडीमुळे संघटनेच्या कार्याला नवी दिशा मिळेल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### दोनच तालुक्यांचा कृती आराखडा अपलोड

**बुलडाणा :** राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्व जिल्ह्यांना शंभर दिवसांचा कृती आराखडा तयार करून तो शासनाकडे सादर करण्याचे निर्दे श दिले होते. यानुसार, बुलखाणा जिल्हाने जिल्हास्तरावर कृती आराखडा तयार करून ती संबंधितांकडे पाठवला असून, त्याचबरोबर प्रत्याक तालुक्यांनीही आरामांची आखणी केली आहे. मात्र, अधिकृत संकेतस्थावर पाहता जिल्हास्तर, विखाली आणि मलकापूर वा तीन यंत्रणांचेच कृती आराखडे अपलोड लालुक्यांचे कृती संतस्थान नाहीत आराखडे नार, जिल्हा आमि तालुकास्तरावर कोणकोणते प्रकल्प, उपक्रम वा उपाययोजना पुढील शंभर दिवसांत येणार आहेत,

### पाच खेळाडूंची विभागीय वुशू स्पर्धेसाठी निवड

**देऊळगावराजा:** जिल्हाक्रीडापरिषद आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शालेय जिल्हास्तरीय वुशू क्रीडास्पर्धेत स्किल डेव्हलपमेंट अकॅडमी, देऊळगाव राजा येथील खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी केली. त्यांच्या या चमकदार कामगिरीमुळे पाच खेळाडूंची शालेय विभागीय वुशू क्रीडास्पर्धे साठी निवड झाली आहे. निवड झालेल्या खेळाडूंमध्ये मैथिली तायडे, मयुरी थेटे, राघव झोरे, अरुण शिवरकर आणि हरिओम रामाने यांचा समावेश आहे. या विद्यार्थ्यांच्या यशामुळे देऊळगाव राजा शहराचे नाव जिल्ह्यात उजळले असून, पालक, शिक्षक आणि स्थानिक क्रीडाप्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# पोलीस अधीक्षक विश्व पानसरे यांनी बंगला खाली करावा अन्यथा ताबा घेऊ: आझाद हिंदचा एल्गार

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**बुलडाणा दि.४ :** जिल्ह्यातील ज्वलंत समस्यांच्या निवारणार्थ १० मागण्यांच्या पूर्ततेसाठी आझाद हिंद सह विविध सामाजिक संघटनांच्या संयुक्त विद्यमानाने ३ सप्टेंबरला आक्रोश निषेध आंदोलन करीत तीव्र आंदोलन करण्याचा एल्गार इशारा दिला आहे. आज जिल्हाधिकारी कार्यालय आणि पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर तीव्र धरणे निदर्शने करीत जिल्हा प्रशासनामार्फत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, महसूल मंत्र्यांना निवेदन सादर केले आहे.

शेत रस्ते,पांदण रस्त्यासाठी अध्यादेशाची अंमलबजावणी करावी. मातृतीर्थ बुलढाणा पॅटर्न महाराष्ट्रात सुरू करावा.उपोषण आंदोलनाच्या जिजामाता प्रेक्षागर प्रांगणात सुविधा आणि सुरक्षेच्या दृष्टिकोनातून बैठक लावावी. युवकांना रोजगार आणि व्यसनमुक्ती पासून लांब ठेवत सैनिकी ट्रेनिंग द्यावे,यासाठी ग्राम रक्षक दलाची स्थापना करावी. तत्कालीन पोलीस अधीक्षक विश्व पानसरे यांनी बंगला खाली करावा जेणेकरून कर्तव्यदक्ष पोलिसांचे मानसिक खच्चीकरण होणार नाही. बुलढाणा शहरातील बंद पडलेल्या ट्राफिक सिग्नल चे त्वरित लोकार्पण करावे. ग्राम डोंगर शेवली, सारोळा मारोती यासह जिल्ह्यातील अनधिकृत दारूबंदीला लगाम लावावा. बुलढाण्यातील नेताजी चौकाचा फलक चोरट्यांचा शोध घ्यावा. बुलढाणा फरदापुर,सारोळा मारोती, काळेगाव येथील रस्त्यांच्या अनुषंगाने दिलेल्या मागणीची पूर्तता करावी. यासह विविध मागण्यांसाठी आझाद हिंद नेजिल्हा पोलीस अधीक्षक डॉ.निलेश तांबे,अप्पर जिल्हाधिकारी सुधीर खांदे,एसडीओ शरद पाटील, यांच्यामार्फत निवेदन सादर करीत मागण्यांच्या पूर्ततेच्या अनुषंगाने मॅरेथॉन बैठक घेतली.

**इन्कलाब जिंदाबाद च्या घोषणांनी परिसर दणाणला**

चोख पोलीस बंदोबस्तात आझाद हिंद चे आक्रोश निषेध आंदोलन इन्कलाब जिंदाबाद,भारत माता की जय घोषणांनी लक्षवेधी ठरले. जिल्हाधिकारी कार्यालयात नगरपरिषद प्रभाग रचनेचे अनुषंगाने सुरू असलेली सुनावणी आणि आझाद हिंद च्या आंदोलनाने जिल्हाधिकारी परिसर दणाणून सोडला.

आझाद हिंद चे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड सतीशचंद्र रोठे पाटील, जिल्हा कार्याध्यक्ष रामभाऊ व्यवहारे, राष्ट्रीय बजरंग दलाचे प्रांत उपाध्यक्ष भूपेश पाटील, जिल्हाध्यक्ष सुशांत पाटील, रमाई ब्रिगेडच्या प्रदेशाध्यक्ष सुरेखाताई निकाळजे, ग्राम स्वराज्य समितीचे कमलाकर व्यवहारे, उल्हास काकर, सिद्धार्थ वानखेडे, सुधाकर गायकवाड, आत्माराम इंगळे, संजय येंडोले, भारतीताई अवचार यांच्यासह जिल्ह्यातील विविध सामाजिक संघटनांच्या बहुसंख्य पदाधिकारी, शेतकऱ्यांनी आंदोलनात सक्रिय सहभाग घेत मागण्यांची पूर्तता न झाल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा यावेळी दिला आहे.

# गणेशोत्सव आणि ईद ए मिलादच्या पार्श्वभूमीवर मेरा बु. येथे पोलिसांचा रुटमार्च



अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**अंढेरा दि.४ :** सध्या सगळीकडे गणेशोत्सवाची धूम सुरू आहे. आगामी होऊ घातलेल्या ईद ए मिलाद आणि गणेश विसर्जनच्या पार्श्वभूमीवर सणासुदीच्या काळात शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी आणि सुरक्षेच्या दृष्टीने अंढेरा पोलिस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या मेरा बु येथे दि.०४ सप्टेबर २०२५ रोजी दुपारी दोन वाजता गावातुन पोलिसांचा रुट मार्च काढण्यात आला.

यावेळी अंढेरा ठाणेदार रुपेश शक्करगे यांच्या नेतृत्वाखाली दुय्यम ठाणेदार सुरेश जारवाल, १२ पोलिस अंमलदार, पोलीस स्टेशन देऊळगाव राजा येथील स्ट्रायकिंग फोर्सचे १६ पोलिस अंमलदार तसेच बंदोबस्तासाठी तैनात करण्यात आलेले ३३ पुरुष आणि महिला होमगार्डच्या टीमने संपूर्ण गावातुन रूट मार्च करण्यात आला. या रूट मार्चचा मुख्य उद्देश जनतेमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करणे आणि समाजविघातक कृत्य करणाऱ्यांना कडक संदेश देणे हा होता. कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता, संशयास्पद हालचालींची माहिती तात्काळ पोलिसांना देण्याचे आवाहन केले. रूट मार्च दरम्यान पोलीस अधिकाऱ्यांनी स्थानिक नागरिक आणि व्यापाऱ्यांशी संवाद साधला. पोलिसांनी सणाच्या काळात शांतता व सलोखा राखण्याचे आवाहन केले. तर ठाणेदार रुपेश शक्करगे यांनी रुट मार्च सारख्याया उपक्रमांमुळे पोलीस आणि जनता यांच्यात समन्वय वाढतो, ज्यामुळे सण शांततेत आणि सुरक्षितपणे साजरे करता येतात. आगामी सणाच्या काळात कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आल्याचे सांगितले.

# गणेशोत्सवा निमित्त मंडळाच्यावतीने कर्मचाऱ्यांना वृक्षांचे वाटप

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी




**बुलडाणा दि.४ :** दरवर्षी प्रमाणे याही वर्षी बुलडाणा अर्बन परिवाराकडून बुलडाणा अर्बन कर्मचारी गणेशोत्सव मंडळाची स्थापना करण्यात आली. बुलडाणा अर्बन कर्मचारी गणेशोत्सव मंडळाचे वतीने दरवर्षी गणेश उत्सवानिमि त्त विविध सांस्कृतिक व मनोरंजनात्मक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.

गणेश मंडळाचे यावर्षी २४ वे वर्ष असून यावर्षी २७ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर २०२५ या कालावधीत गणेशोत्सव साजरा करण्यात येणार आहे. गणेश उत्सवानिमित्त संस्थेने गणेश उत्सव मंडळाचे प्रमुख मार्गदर्शक संस्थापक अध्यक्ष राधेश्याम चांडक उपाख्य भाईजी, संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुकेश झंवर, बुलडाणा अर्बन चॅरिटेबल सोसायटीच्या अध्यक्षा सौ. कोमल सुकेश झंवर, अनंत देशपांडे संस्थेचे सरव्यवस्थापक कैलास कासट यांच्या मार्गदर्शनाखाली दि. ३ सप्टेंबर २०२५ रोजी संस्थेच्या गोवर्धन इम रतीच्या तळमजल्यावरील पार्किंगमध्ये कर्मचाऱ्यांसाठी वृक्षारोपण आंबा या वृक्षांचे वाटप करण्यात आले. यावेळी बुलडाणा अर्बन कर्मचारी गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष उपाध्यक्ष कार्यकारिणीचे सर्व सदस्य उपस्थित होते. संस्थेच्या वतीने देण्यात येणाऱ्या आंबा वृक्षांचे वृक्षमित्र म्हणून कर्मचाऱ्यांनी त्यांचे वर्षभर संगोपन करण्यात येणार असल्याचे कर्मचाऱ्यांनी सांगितले.

# डोणगावमध्ये मच्छरांचा कहर; ग्रामपंचायतीकडे धूरफवारणीची मागणी

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**डोणगाव दि. ४ :** डोणगाव गावात गेल्या काही दिवसांत म च्छरांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली असून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. डेंग्यू, मलेरिया, चिकुनगुनिया यांसारख्या आजारांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता वाढली आहे. लहान मुले, शालेय विद्यार्थी, वृद्ध नागरिक यांना याचा विशेष त्रास होत असून गावकऱ्यांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर झाला आहे.

या पार्श्वभूमीवर रहेमतिया सोशल ग्रुप डोणगाव तर्फे ग्रामविकास अधिकारी व सरपंच ग्रामपंचायत डोणगाव यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनात गावातील प्रत्येक वार्डात तातडीने धूरफवारणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, "गावातील वातावरण दूषित झाले असून मच्छरांच्या प्रचंड वाढीमुळे लोक त्रस्त झाले आहेत. यामुळे मुलांपासून ते वृद्धांपर्यंत सर्वांना आजारांचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे ग्रामपंचायतीने तात्काळ धूरफवारणी करून गाव स्वच्छ आणि सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी पार पाडावी. निवेदन देताना रहेमतिया सोशल ग्रुपचे अध्यक्ष ज़ैनुल आबेदीन शेख, आवेज़ खान पठाण, उस्मान कुरैशी, अतीक खान, इरशाद खान शहानुर खान , शेख शोएबोदिन, हमीद खान, साहिल खान, यांच्यासह इतर पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. ग्रामपंचायतीने लवकरात लवकर कारवाई करून गावकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी सर्वसामान्य नागरिकांचीही अपेक्षा आहे.

# राजलक्ष्मी अर्बनचे केंद्रीय मंत्री जाधव यांच्या हस्ते उद्‌घाटन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि.४ :** महिला बचत गट ठेव संचय संकल्पनेतून निर्माण झालेल्या राजलक्ष्मी अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीचा उद्‌घाटन सोहळा आज ५ सप्टें.रोजी केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते होणार आहे.

भारतात स्वयंरोजगार महिला संघटनाच्या माध्यमातून १९७० च्या दशकात बचत गट कार्य सुरू झाले. बचत गटाच्या माध्यमातून महिलांचे आर्थिक स्वावलंबन निर्माण करून त्यांच्या जीवनात सुधारणा घडवून आणण्यासाठी बचत गटाची निर्मिती करण्यात आली आहे. बुलढाण्यात एम्पायर महिला बचत गटातील महिलांनी जमा झालेल्या ठेव संचय संकल्पनेतून राजलक्ष्मी अर्बन महिला को-ऑपरेटिव्ह सोसायटीची स्थापना करण्यात आली आहे. या महिला सहकारी पतसंस्थेचा उद्‌घाटन सोहळा ५ सप्टेंबरला केंद्रीय आयुष (स्वतंत्र प्रभार ) आरोग्य कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी, बुलढाणा विधानसभा मतदारसंघाचे आ.संजय गायकवाड, बुलढाणा अर्बनचे अध्यक्ष राधेश्याम चांडक हे प्रमुख म ार्गदर्शक तर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, आ.धीरज लिंगाडे, माजी मंत्री राजेंद्र शिंगणे, भाजपाचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार विजयराज शिंदे, माजी आमदार घृपतराव सावळे, शेतकरी नेते रविकांत तुपकर, उबाठा शिवसेनेच्या प्रवक्त्या जयश्री शेळके, जिल्हाप्रमुख जालिंदर बुधवत, तलाठी पटवारी मंडळ अधिकारी समन्वयक महासंघाचे अध्यक्ष विजय टेकाळे, जिल्हा उपनिबंधक डॉ.महेंद्र चव्हाण, तालुका निबंधक गजानन आमले उपस्थित राहणार आहेत. बचत गटाच्या ठेव संचयातून निर्मित झालेल्या या महिला पतसंस्थेच्या कार्यक्रमाला

# माधव पाटीलला ५ दिवसांची पोलीस कोठडी

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**खामगाव दि.४ :** तालुक्यातील गवंढाळा येथील माघव मोतीराम पांढरे (पाटील) याने अटाळी येथील मोहन लक्ष्मण फाळके यांच्यासह ७ शेतकऱ्यांना शेडनेट कमी किमतीत बांधून देतो व अनुदानही मोठ्या प्रमाणात मि ळवून देतो, असे सांगून सदर शेतकऱ्यांच्या कर्जखात्याम धील रक्कम शेतकरी भगवान तुळशीराम महानकर रा. अटाळी यांच्या नावे असलेल्या माऊली फर्म तसेच भारत सावळे यांचे नावे असलेल्या भारत एरिगेशन यांचे नावे दाखवून त्यामधून रकम वळती केली व शेडनेट बांधण्यास विलंब केला. त्यामुळे रामेश्वर आत्माराव वाळके, भगवान तुळशीराम महानकर, कैलास सोपान डिक्कर व अमीर अतीफ शेख अनीस सर्व रा. अटाळी यांची प्रत्येकी १३ लाखाने फसवणूक करून सदर रकम स्वतःच्या फायद्यासाठी वापरून सदर शेतकऱ्यांची ५२ लाखाने फसवणूक केली. तसेच मोहन फाळके यांचे नावे मंजूर असलेले २५ लाख रुपयांचे कर्ज माऊली एरिगेशन या कंपनीमध्ये वळती होईल अशी व्यवस्था करून फाळके यांच्या नावावर कर्जाचा बोजा वाढेल अशी व्यवस्था केली. त्यामुळे व्याजासह १४ लाख ८० हजार २२९ रुपये व इतर शेतकऱ्यांचे ५२ लाख असा एकूण ६६ लाख ८० हजार २२९ रुपयांचे फसवणूक केल्याची तक्रार मोहन फाळके यांनी २७ ऑक्टोबर २०२१ ते ४ फेब्रुवारी २०२५ दरम्यान केल्याचे २ सप्टेंबर २०२५ रोजी केलेल्या तक्रारीत नमूद केले आहे. त्यामुळे खामगाव ग्रामीण पोलिसांनी आरोपी माधव पांढरे (पाटील) यांचे विरुध्द कलम ३१८ (४) भादंविनुसार गुन्हा दाखल केला.

# शेतकऱ्यांनो खचू नका, नव्या उमेदीने शेती करा!

## अतिवृष्टीचा देखावा अन् गौराईचा संदेश

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**बुलडाणा दि.४ :** यंदाच्या पावसाळ्यात जिल्ह्यातील पाच तालुक्याना अतिवृष्टीने जबर तडाखा दिला. यामध्ये मेहकर, लोणार, सिंदखेड राजा, देऊळगावराजा आणि चिखली तालुक्याचा समावेश आहे. चिखलीचा ग्रामीण भाग तर सोडाच पण जांबुवती नदीला आलेल्या पुरामुळे चिखली शहर जलमय झाले होते. चिखली तालुक्यात यंदा झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. अनेक शेतकऱ्यांची जमीन खरडून गेली असून, एन बहरात असलेली खरीप पिके उध्वस्त झाली. हजारो शेतकऱ्यांच्या डोळ्यात अश्रूचा महापूर साचला. तो अजूनही कायम आहे.

या पार्श्वभूमीवर चिखली तालुक्यातील केळवद येथील गाडेकर परिवार प्रामुख्याने वैष्णवी रविकांत गाडेकर यांनी गौरी महालक्ष्मी जवळ अतिवृष्टीचा जिवंत देखावा साकारला आहे. या देखाव्यात अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान, वाहून गेलेली शेते आणि शेतकऱ्यांची बिकट अवस्था याचे हुबेहूब चित्रण करण्यात आले आहे. हा देखावा पाहून अतिवृष्टीच्या कटू आठवणी, जाग्या होतात. मात्र या देखाव्यातून त्यांनी एक सकारात्मक संदेश देखील दिला आहे "अतिवृष्टी झाली तरी खचून न जाता शेतकरी बळीराजांनी नव्या जोमाने, नव्या उमेदीने शेतीला सुरुवात करावी असा तो संदेश आहे. गाडेकर परिवाराने गौराई च्या माध्यम ाने हा संदेश दिला आहे. कितीही संकटे आली तरी शेतकऱ्यांनी हिम्मत हरू नये, खचू नये हा दिलासादायक संदेश यातून देण्यात आला आहे.

शेतकऱ्यांचे मनोबल वाढवण्याबरोबरच शेतीसाठी त्यांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न या देखाव्यातून केला आहे. तसेच तेथे लावलेल्या फलकाद्वारे शासनाने सर्व शेतकऱ्यांना सरसकट मदत करावी अशी मागणी देखील करण्यात आली आहे. हा देखावा केवळ धार्मिक उत्सवापुरता मर्यादित न राहता समाजाला सकारात्मकतेचा, धैर्याचा आणि पुनर्निर्मितीचा संदेश देणारा ठरला पाहणाऱ्यांकडून त्याचे भरभरून कौतुक होत आहे.

# पैगंबर मोहम्मद साहेब हे जागतिक शांतीचे प्रतीक - मुफ्ती आरिफ अजहरी

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी




**बुलडाणा दि.४ :** हजरत मोहम्मद पैगंबर यांच्या जयंतीनिमित्त, बुधवार, ३ सप्टेंबर रोजी संध्या-काळी ७ते रात्री १० वाजेपर्यंत अल मदीना एज्युकेशन फाउंडेशनतर्फे इक्बाल चौक, जामा मशिद-ाजवळ अकोला येथील मुफ्ती आरिफ अजहरी यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

यावर्षी, पैगंबर मोहम्मद साहेब यांच्या १५०० व्या ईद मिलादुन्नबीनिमित्त, अल मदिना एज्युकेशन फाउंडेशनतर्फे २७ ते ५ सप्टेंबर या कालावधीत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दरम्यान, बुधवार, ३ सप्टेंबर रोजी पैगंबर मोहम्मद हे सर्व मानवजातीसाठी शांती, सुरक्षा आणि एकतेचे प्रतिक या विषयावर व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला संबोधित करण्यास-ाठी मुफ्ती आरिफ अजहरी अक-ोला येथून बुलढाणा येथे आले होते. पैगंबर मोहम्मद साहेब यांच्या जीवनावर प्रकाश टा-कतांना मुफ्ती साहेब म्हणाले की पैगंबर मोहम्मद साहेबांनी सर्व लोकांसाठी चांगुलपणा आणि शांतीचा संदेश दिला आहे, त्यांनी जात, रंग किंवा सामाजिक स्थितीच्या आधारावर भेदभाव करणे पाप म्हटले आहे, त्यांनी मानवांमध्ये प्रेम, सहानुभूती आणि बंधुत्वाचा उपदेश दिला आहे, त्यांचा संदेश असा होता की प्रत्यकाशी न्याय आणि समान वागले पाहिजे, विशेषत, त्यांनी इतरांना दुखवू नये आणि नेहमी इतरांचे कल्याण करावे अशी शिकवण दिली. ते कोणीही असो, मुफ्ती साहेबांनी माहिती दिली की कुराण (ईश्वरीय आदेश) आणि सुन्नत (पैगंबरांची जीवनशैली) आहे,जर त्यांचे पालन केले तर ते कधीही पाप करणार नाहीत.

**भाषण स्पर्धेतील विद्यार्थ्यांचा सन्मान!**

अल मदिना फाउंडेशनने शालेय विद्यार्थ्यांसाठी अजान आणि भाषण स्पर्धा आयोजित केली होती. शहरातील विविध शाळांम धील विद्यार्थ्यांनी यात भाग घेतला होता. अजान स्पर्धेसाठी गट अ मध्ये २१ आणि गट ब मध्ये १० मुलांनी भाग घेतला होता तर भाषण स्पर्धेत १७ मुलांनी भाग घेतला होता. विशेष म्हणजे निष्पक्ष आणि योग्य विद्यार्थ्यांची निवड करता यावी म्हणून स्पर्धेसाठी बाहेरील जजेसची नियुक्ती करण्यात आली होती. स्पर्धेनंतर मुफ्ती आरिफ साहेब आणि शहरातील मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले.

अजिंक्य भारत

# आपलं खामगाव

बुलडाणा, शुक्रवार, दि.५ सप्टेंबर २०२५






## महत्त्वाचे

### रामदल मंडळाचा आकर्षक देखावा

**खामगाव :** स्थानिक शिवाजी वेस भागातील रामदल क्रीडा, सांस्कृतिक व शारीरिक व्यायाम प्रसारक मंडळाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज वेस या पुरातन वास्तूमध्ये संत रूपातील गणरायाची मुर्ती स्थापन करून आकर्षक देखावा साकारण्यात आला आहे. यामध्ये ऐतिहासिक व आध्यात्मिकतेचा सुंदर संगम पाहायला मिळतो. मंडळाने साकारलेला आकर्षक देखावा, विद्युत सजावट, गौमाता राज्यमाता बचेगी गाय तो बचेगा गोपाल प्रतिकृती गणेशभक्तांचे विशेष लक्ष वेधून घेत आहे. गणेशभक्तांनी दर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन रामदल मंडळाचे अध्यक्ष अमोल जोशी यांनी केले आहे.

### कर्जसुविधेसाठी सोमब्रेरो फायनांन्सचे उद्घाटन

**खामगाव :** जिल्ह्यातील नागरिक व व्यावसायिकांना कर्ज सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी स्थानिक नेहरू मार्केट मधील पहिल्या मजल्यावरील दुकान नं ६ येथे चे कार्यलय उघडण्यात आले आहे. या कार्यालयाचे उद्घाटन आज ४ सप्टेंबर २५ रोजी सकाळी करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहणे म्हणून सरीताताई पंजवाणी, रवि जगनानी, सौ. सलोनी जगनानी उपस्थित होते. या कार्यालयाच्या माध्यमातून गृहकर्ज, मालमत्तेवर कर्ज, कॅश क्रेडिट, प्लॉट खरेदी कर्ज, व्यवसाय कर्ज, वाहन तारण कर्ज यासारख्या विविध कर्ज सेवा ग्राहकांना देण्यात येणार आहेत. कार्यक्रमाला बँकांचे अधिकारी, व्यापारी, नागरिक आदी मान्यवर उपस्थित होते.

### गांजा तस्कर हैदरखान अनवरखान एक वर्षासाठी स्थानबध्द

**खामगाव:** शहर पोस्टेच्या अभिलेखावरील अंमली पदार्थ (गांजा) तस्कर म्हणुन नोंद असलेल्या हैदरखान अनवरखान (३६ रा. हरीफैल) याला जिल्हाधिकारी बुलढाणा यांनी एमपीडीए कायद्याखाली १ वर्षासाठी स्थानबध्द करण्याचे आदेश दिला आहे. जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार पोलिस प्रशासनाने काल ३ सप्टेंबर २५ रोजी हैदरखान अनवरखान याला ताब्यात घेऊन त्याची ३ आठवडचाकरीता जिल्हा मध्यवर्ती कारागृह बुलढाणा येथे स्थानबध्द करण्यासाठी खाना केले. यानंतर त्याला येरवडा कारागृह पुणे येथे स्थलांतरीत करण्यात येणार आहे. अंमली पदार्थ संबंधाने जिल्ह्यातील ही पहिलीच कारवाई आहे.

### घंटागाडी कर्मचाऱ्यांचे आंदोलन मागे

**खामगाव:** घंटागाडी व डंम्पिंग ग्राऊंडवरील कामगारांना कंत्राटदाराकडून वेळेवर वेतन मिळत नव्हते. त्यामुळे त्यांनी मागणी रेटून धरली होती. मात्र काल ३ सप्टेंबर २५ पर्यंत त्यांना वेतन न मिळाल्यामुळे त्यांनी सकाळपासून कामबंद आंदोलन सुरू केले होते. कंत्राटदाराकडून दरमहा ३ तारखेच्या आत पगार देण्यात येत नव्हता. तसेच किमान वेतन कायद्यानुसार कोणतीही सवलत मिळत नाही. तर ईपीएफ व ईएसआयसी नियमानुसार भरण्यात येत नाही. गणपती वेतन विसर्जनाच्या पार्श्वभुमिवर ३ तारखेच्या आत देण्याबाबत कंत्राटदाराला २५ ऑगस्ट २५ रोजी कल्पना दिली होती. मात्र दखल घेण्यात आली नव्हती. त्यामुळे काल ३ सप्टेंबर २५ रोजी घंटागाडी व इंम्पिंग ग्राऊंडवरील कामगारांनी जोमात कामबंद आंदोलन सुरू केले होते. तर आज ४ सप्टेंबर २५ रोजी घंटागाड्या शहरात दिसू लागल्या होत्या. यावेळी एका घंटागाडीच्या चालकाला वेतन मिळाले काय? याबाबत विचारणा केली असता तो उदास झाला होता व सांगितले की, वेतन मिळाले नाही व पगार कापल्या जाणार या भितीने एका दिवसातच आंदोलन मागे घेतले असल्याचे सांगितले. सुदैवाने एका दिवसातच आंदोलन मागे घेण्यात आले. त्यामुळे नागरिकांनी व व्यापाऱ्यांनी सुटकेचा श्वास सोडला आहे. आधिच वैतागले आहेत.

# जनुना तलावावरील विसर्जन घाटाचे आज ना. फुंडकर यांच्या हस्ते लोकार्पण

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी




**खामगाव दि.४ :** शहरातील ऐतिहासिक जनुना तलाव परिसरात भाविकांसाठी सुरक्षित, सोयीस्कर आणि आधुनिक सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी राज्याचे कामगार मंत्री व अकोला जिल्ह्याचे पालकमंत्री ना. आकाश फुंडकर यांच्या हस्ते उद्या (दि. ५ सप्टेंबर) सकाळी ११ वाजता नव्याने उभारण्यात आलेल्या विसर्जन घाटाचे लोकार्पण सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न होणार आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून गणेशोत्सव, नवरात्रोत्सव तसेच जगदंबा विसर्जनाच्या वेळी भाविकांना थेट तलावाच्या काठावरूनच मूर्ती विसर्जन करावे लागत होते. पायऱ्या, रॅम्प किंवा चौथऱ्यांचा अभाव असल्याने विसर्जनाच्या वेळी गर्दी वाढून अनेकदा अपघाताचा धोका निर्माण होत असे. वृद्ध, महिला आणि लहान मुलांना पाण्याच्या काठावर उतरून मूर्ती विसर्जन करणे ही धोकादायक आणि त्रासदायक प्रक्रिया ठरत होती. या सर्व समस्यांची दखल घेऊन स्थानिक प्रशासन व जनप्रतिनिधींच्या पुढाकारातून जनुना तलाव परिसरात आधुनिक घाट उभारण्याचे काम हाती घेण्यात आले. सुमारे एक कोटी रुपयांचा निधी खर्च करून जनुनाकिन्ही महादेव मुख्य रस्त्यापासून थेट तलावाच्या काठापर्यंत सिमेंट काँक्रीट रस्ता तयार करण्यात आला आहे. या रस्त्यामुळे मोठ्या मूर्ती घेऊन जाणाऱ्या वाहनांना सोय झाली आहे. याशिवाय घाट परिसरात मजबूत चौथरे, पेव्हर ब्लॉक, पायऱ्या आणि मोठ्या मूर्तीसाठी स्वतंत्र रॅम्पची व्यवस्था करण्यात आली आहे. या सर्व सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध झाल्याने विसर्जन प्रक्रिया अधिक सुलभ, सुरक्षित आणि सुव्यवस्थित पार पडणार आहे. नवीन घाटाच्या बांधकामामुळे शहरातील प्रमुख धार्मिक उत्सवांना वेगळीच शोभा मिळणार आहे. गणेशोत्सव, नवरात्रोत्सव आणि जगदंबा उत्सवाच्या काळात विविध मंडळांकडून मोठ्या संख्येने मूर्तींचे विसर्जन होत असते. या वेळी निर्माण होणारी गर्दी, कचरा व पाण्यातील प्रदूषण यांवर नियंत्रण ठेवण्यासाठीही घाट उपयुक्त ठरणार आहे. सुरक्षित पायऱ्या आणि रॅम्पमुळे जलप्रेमी नागरिकांना थेट पाण्यात उतरायची गरज भासणार नाही. त्यामुळे अपघाताचा धोका कमी होऊन, भाविकांचा उत्साह आणि श्रद्धा यांना सुरक्षिततेची जोड मिळणार आहे. लोकार्पण सोहळा हा केवळ घाटापुरता मर्यादित नसून शहराच्या विकासाचा एक महत्वाचा टप्पा असल्याचे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे. कारण अनेक दशकांपासून घाटाच्या अभावाची समस्या मांडली जात होती. अखेर ती समस्या मार्गी लागल्याने शहरातील नागरिक आणि उत्सव समित्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. या लोकार्पण सोहळ्याला भाजपचे पदाधिकारी, शहरातील गणेशोत्सव मंडळांचे प्रतिनिधी, नवरात्रोत्सव व जगदंबा उत्सव मंडळांचे पदाधिकारी, विविध सामाजिक संघटनांचे कार्यकर्ते तसेच सर्वसामान्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. भाविकांनी या सोहळ्यात सहभागी होऊन नव्याने उभारलेल्या सुविधांचा लाभ घ्यावा, असे आवाहन भारतीय जनता पक्षाच्यावतीने करण्यात आले आहे. स्थानिक प्रशासनानेही लोकार्पण सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर आवश्यक तयारी पूर्ण केली आहे. कार्यक्रमस्थळी मंडप, ध्वनीप्रक्षेपण, वाहतूक व्यवस्था, तसेच स्वच्छतेची विशेष काळजी घेण्यात आली आहे. शहरातील अनेक मान्यवर व नागरीक या सोहळ्यास उपस्थित राहणार असल्याने वातावरणात उत्साहाचे स्वर उमटू लागले आहेत. नवरात्रोत्सव आणि गणेशोत्सवाची वेळ जसजशी जवळ येत आहे, तसतसा या घाटाचा वापर सुरू होईल. भाविकांना एकाचवेळी धार्मिक श्रद्धा आणि सुरक्षिततेचा संगम अनुभवता येणार आहे. शहराच्या सांस्कृतिक परंपरेत आणखी एक महत्वाचा टप्पा जोडणारे हे काम खामगावच्या प्रगतीचे प्रतीक मानले जात आहे.

# जन्म मृत्यूचे आदेश पारित करण्यासाठी तहसीलदारांना निवेदन




अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**मलकापूर दि ४ :** शहरातील नागरीकांचे, विद्यार्थ्यांचे शासकीय कामासाठी उपयुक्त असणारे जन्म-मृत्यू चे जवळपास दिड ते दोन हजार आदेश संबंधितांनी कागदपत्राची पूर्तता करून,नोटरी करीत वर्तमानपत्रांमध्ये जाहिराती देऊन दिड ते दोन हजार रुपये खर्च करून गेल्या वर्षभरापासून तहसील कार्यालयात धूळ खात पडून आहे. वर्षभरापासून, विद्यार्थी ,नागरिक या दाखल्यांसाठी तहसील कार्यालय चकरा मारुन मानसिक शारीरिक व आर्थिक भुर्दंड सोसावा लागत असल्याने याबाबतची माहिती संबंधितांनी शिवसेना (उबाठा) उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर यांना दिल्याने आज शिवसेना(उबाठा) पदाधिकाऱ्यांनी तहसीलदार राहुल तायडे यांना निवेदन देत प्रलंबित आदेश तात्काळ पारीत करण्याची मागणी केली आहे. अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलनाचा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. निवेदनावर शिवसेना उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर, विधानसभा संघटक राजेशसिंह राजपूत, शिवसेना शहरप्रमुख हरीदास गणबास, किसानसेना शहरप्रमुख सै.वसीम सै.रहीम, युवा सेना शहरप्रमुख मंगेश सातव, किसन पाटील, किशोर राऊत, विभागप्रमुख सत्तार शाह, अनिल श्रीखंडे, शेख मोहसीन शेख छोटू, ईमाम ,शेख ऐजाज शेख बुढन, युसूफ खान आझाद खान, नावेदखान मुसाखान, अब्दुल जमील अब्दुल कदीर,शेख आसिफ ईसाकखान, मोहम्मद इक्बाल, शेख जावेद सह शिवसेना पदाधिकाऱ्याच्या स्वाक्षऱ्या नमूद आहे.

# वान धरणाचे दोन दरवाजे उघडले

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**संग्रामपूर दि.४:** सातपुडा पर्वतीय क्षेत्रात सतत पाऊस सुरू असल्याने वाण धरणाचे दोन दरवाजे प्रत्येकी ५० सें. मी. ने उघडण्यात आले आहेत. त्यामुळे वाण नदीला पूर आला आहे. ८४.४९ क्युसेक प्रतिसेकंद पाण्याचा विसर्ग सध्या धरणातू न होत आहे. वान नदीला पूर असल्याने नदी काठावरील गावकऱ्यांनी सतर्क रहावे, असे आवाहन तहसीलदार प्रशांत पाटील यांनी केले आहे.

वारी हनुमान मंदिर जवळ बुलढाणा अकोला जिल्ह्याचे सीमेवर असलेले हे वाणधरण ९३ टक्के भरले आहे. पाऊस सुरू च असल्याने सहा पैकी धरणाचे दोन दरवाजे सोमवारी सकाळी ८ वाजता पासूनच उघडण्यात आल्याने वाण नदीला पूर आला आहे. धरणात सध्या ७५.५२ दलघमी पाणी साठा जमा झाला आहे. धरणात पाण्याचा येवा सुरूच असल्याने दोन दरवाजे उघडण्यात आल्याचे वाण धरण शाखा अभियंता लोणारे यांनी बोलताना सांगितले.

# शेगांव पोस्ट ऑफिसमध्ये महिलांकरिता शौचालयाची मागणी

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी




**शेगाव दि. ४ :** शेगांव मधील पोस्ट ऑफिसमध्ये महिलांचे लाडकी बहिण योजनेचे खाते हे मोठ्या संख्येने असल्याने महिन्याला महिला ह्या लाडकी बहिण योजनेचे १५००/- रुपये काढण्याकरीता पोस्ट ऑफिसमध्ये अतोनात गर्दी करतात. बऱ्याच वेळा सदरची गर्दी ही ऑफिस मधुन परिसरात सुध्दा येते. महिलांना तासनतास लाईन मध्ये उभे राहावे लागते असे असतांना आपल्या पोस्ट ऑफिसमध्ये महिलांकरीता मुतारी तसेच शौचालय नसल्यामुळे महिलांना अग्रेसर त्रास सहण करावा लागत आहे. आपल्या कार्यालयामध्ये महिलांसाठी मुतारी आणि शौचालय नाही हे अतिशय गंभीर बाब आहे. आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळून बरीच वर्ष झाली तरी अजुनपर्यंत महिलांसाठी मुलभूत हक्क मिळाले नाहीत याची खंत आहे. आपले शेगांव शहर हे तालुका असल्याकारणाने पोस्ट ऑफिस मध्ये महिलांची गर्दी मोठ्या प्रमाणात राहते आणि अशातच जर महिलांना फक्त मुतारी आणि शौचालयाकरीता त्रास सहन कराया लागतो तर ही खुप गंभीर स्वरुपाची बाब आहे. तरी मा. महोदय, आपणास नम्र विनंती आहे की, सदर समस्येकडे आपण जातीने लक्ष देवून पोस्ट ऑफिसमध्ये महिलांसाठी मुतारी व शौचालयाची व्यवस्था करावी अशी मागणी शेगाव युवा मंच चे अध्यक्ष अजय शेगोकार तसेच आकाश हिवराळे शुद्ध धन शेगोकार संगपाल इंगळे शैलेंद्र सुरळकर विजय राऊत गजानन अशोक शेगोकार अतुल शेगोकार अशोक शिरसाट निशान गवांदे आदी युवा मंचच्या कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत पोस्ट ऑफिस मास्टर यांना निवेदन देण्यात आले

# जळगावात ओबीसी आरक्षण बचाव समितीचे धरणे

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**जळगाव जा दि.४:** मराठा समाजाला ओबीसी मधून आरक्षण देण्यात येऊ नये. ओबीसी मधून आरक्षण दिल्यास तो सरळ सरळ ओबीसींवर अन्याय होईल याकरिता ३ सप्टेंबर रोजी महाराष्ट्र राज्य ओबीसी आरक्षण बचाव समितीच्या वतीने स्थानिक उपविभागीय कार्यालयासमोर एक दिवशीय धरणे आंदोलन करण्यात आले. त्यानंतर उपविभागीय अधिकारी यांचे मार्फत महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन पाठविण्यात आले.

मराठा समाजा तर्फे मनोज जरांगे यांनी मुंबई येथे ओबीसी मधुन आरक्षण मिळणे बाबत उपोषण आंदोलन सुरू केलेले होते. त्यामध्ये त्यांची मराठयांना ओबीसी मधुनच आरक्षण द्यावे ही आग्रही मागणी होती. वास्तविक मा. उच्च न्यायालय व काही समित्यांनी आता पर्यंत मराठा व कुणबी वेगळे असल्याचे निर्णय दिलेले आहेत. महाराष्ट्र सरकारने मराठ्यांना एसईबीसी व ईडब्ल्युएस मधुन स्वतंत्र आरक्षण दिलेले आहे. तरीही दबाव तंत्राचा वापर करून मराठ्यांना राजकिय लाभासाठी कुणबी समजुन ओबीसी मधुनच आरक्षण पाहिजे आहे. मुळातच ओबीसीची संख्या आरक्षणाच्या प्रमाणापेक्षा जास्त आहे. पुन्हा त्यामध्ये मराठ्यांना ओबीसी मधुन आरक्षण दिल्यास खऱ्या ओबीसींवर तो अन्याय होईल. फडणवीस सरकार मराठा आंदोलकांच्या दबावाखाली येवून त्याांनी हैद्राबाद गॅझेटिअरचा संदर्भ घेवुन मराठ्यांना ओबीसी मधून जात प्रमाणपत्र देणेबाबत ०२ सप्टेंबरला शासन निर्णय काढला आहे. सदर आदेश रद्द करण्यात यावा ही सर्व ओबीसीची एकमुखी मागणी आहे. आंदोलनामध्ये आरक्षण बचाव समितीचे अध्यक्ष ओ. पी तायडे, रघुनाथ कौलकार, वाल्मीकराव ठाकरे, राम वानखडे, अविनाश उमरकर, सुभाष गवळी, प्रभाकर भुमरे, अर्जुन घोलप, श्रीकृष्ण केदार, ज्योतीताई ढोकणे, प्रकाश पाटील, डॉ. सतीश शिरेकर, डॉ. संदीप वाकेकर, अरुण देवकर, बाळू वानखडे, किसन राऊत, शेख अन्सार बाबू, एम. आर वानखडे, शाम इंगळे, शरद जाधव, नंदकिशोर सातव, संजय इंगळे, परीक्षित ठाकरे, गजानन सरोदे, अनिल देऊळकार, प्रवीण भोपळे आदींची उपस्थिती होती.

# कंटेनरमध्ये जाणारा २५ लाखाचा गुटखा पकडला

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**खामगाव दि.४:** स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पोलिसांना एका वाहनातुन प्रतिबंधीत गुटख्याची वाहतुक होत असल्याची गोपनिय माहिती मिळाली असता काल ३ सप्टेंबर २५ रोजी दुपारी ४.३० वाजताच्या सुमारास पथकाने पारखेड फाट्याजवळ नाकाबंदी करून कंटेनर क्र. जीजे-०१-डीएक्स-७३४१ ची तपासणी केली. यावेळी कंटेनर मध्ये महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेला व मानवी आरोग्यास अपायकारक असलेला गुटखा व सुगंधीत तंबाखु ११ गोण्यांमध्ये भरलेला मिळून आला. एकूण २५ लाख ३५ हजाराचा मुद्देमाल मिळून आला. पोलिसांनी कंटेनर व गुटखा जप्त करून अन्न व औषध प्रशासन विभागाला माहिती दिली. याप्रकरणी अन्न सुरक्षा अधिकारी गुलाबसिंग वसावे यांनी ग्रामीण पोस्टेला फिर्याद दिली. फिर्यादीवरून पोस्टेमध्ये कंटेनर चालक रामराज दुलारे (वय ४९, रा. सिकरोढी, पो. रेवाडी बु. जि. फतेहपुर उ.प्र.) व मोहम्मद नासीर (रा. अहमदाबाद) या दोघांविरूध्द कलम २२३, २७४, २७५, १२३, ३ (५) भारतीय न्याय संहिता सह कलम अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६ चे कलम २६ (२) सह वाचन कलम २६ (२) ह वाचन कलम २७ (३) सह वाचन कलम २७ (३) सह वाचन कलम ३(१) , शिक्षापात्र कलम ५९ नुसार गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई जिपोअ निलेश तांबे, एएसपी श्रेणीक लोढा, एएसपी अमोल गायकवाड, स्थागुशा पोनि. सुनिल अंबुलकर यांच्या मार्गदर्शनात पीएसआय अविनाश जायभाये, पोहेकॉ. दिपक लेकुरवाळे, चांद शेख, गणेश पाटील, पोकॉ. गजानन गोरले, चालक निवृत्ती पुंड यांच्या पथकाने केली.

# आर.सी.सी. भिंतीमुळे नागरिक त्रस्त; शेतकऱ्यांचे मंत्री रक्षाताई खडसे यांना निवेदन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**मलकापूर दि.४ :** मलकापूर रेल्वे स्थानकावरील प्लॅटफॉर्म क्र. २ च्या बाजूला उभारण्यात आलेल्या आर.सी.सी. भिंतीमुळे प्रवासी व नागरिकांना प्रचंड गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. पंतनगर, एकतानगर, हाश्मी नगर, कुंड खुर्द, भालेगाव, देवधाबा, धरणगाव, नरवेल, म्हैसवाडी, अनुरावाद, झोडगा, धुपेश्वर, दसरखेड, तालसवाडा, रुईखेड, तिघरा, शिवनी, रणगाव या गावांतील नागरिकांना स्थानकात प्रवेश मिळवण्यासाठी तब्बल दोन किलोमीटरचा फेरा मारावा लागत असल्याने प्रवाशांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. या गंभीर समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी समतेचे निळे वादळ संस्थापक अध्यक्ष भाई अशांत वानखेडे यांच्या नेतृत्वात प्रवाशांच्या वतीने केंद्रीय राज्यमंत्री श्रीमती रक्षाताई खडसे यांना निवेदन देण्यात आले. प्लॅटफॉर्म क्र. २ वरील भिंतीत प्रवाशांच्या सोयीसाठी मोठे गेट तयार करणे. तसेच प्लॅटफॉर्म क्र. २ वर स्वतंत्र बुकिंग विंडो उपलब्ध करणे अशा प्रमुख दोन मागण्या निवेदनात नमूद करण्यात आल्या आहेत, प्रवाशांनी स्पष्ट इशारा दिला की, या मागण्या तातडीने मान्य न झाल्यास लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन उभारले जाईल आणि अखेर रेल रोको सारख्या टोकाच्या पावलाचाही अवलंब करावा लागेल. सदर निवेदन केंद्रीय राज्यमंत्री रक्षाताई खडसे यांच्यामार्फत केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांना पाठविण्यात आले असून, त्याची प्रत भुसावळ विभागीय रेल्वे व्यवस्थापकांनाही देण्यात आली आहे. या वेळी जिल्हा प्रवासी सेवा संघाचे अध्यक्ष अँड. महेंद्रकुमार बुरड, एन. के. हिवराळे, सतीश नाईक, दीपक मेश्राम, समाधान सुरवाडे, अनिलदादा झोपे, अनिल अहूजा, डॉ. अशोक सुरडकर, शेख इमरान आदी मान्यवर उपस्थित होते.

# गो. से. महाविद्यालयात रसायनशास्त्र मंडळाचे उद्घाटन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी




**खामगाव दि.४:** स्थानिक विदर्भ शिक्षण प्रसारक मंडळ द्वारा संचालित गो. से. महाविद्यालयामध्ये रसायनशास्त्र मंडळाचे उद्घाटन संपन्न झाले. प्रास्ताविकामध्ये प्रा. डॉ दीपक नागरिक यांनी रसायनशास्त्र व समाज यामधील संबंधांवर प्रकाश टाकला. तद्वतच विद्यार्थी जीवनामध्ये रसायनशास्त्र मंडळाची भूमिका विशद केली. या समारंभाकरिता प्रमुख अतिथी व उद्घाटक म्हणून न्यायवैद्यक शास्त्र प्रयोगशाळा, नाशिक येथील श्री अनुप देशमुख लाभले होते. त्यांनी उपस्थितांना सरकारी क्षेतील रसायनशास्त्रामधील संधी या विषयावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाकरिता लाभलेले इजराइल येथील आचार्यउत्तर पदवीप्राप्त मार्गदर्शक डॉ अभिजीत अग्रवाल यांनी रसायनशास्त्र व संशोधन या विषयावर मार्गदर्शन केले. रसायनशास्त्र विभाग हा उत्कृष्ट विद्यार्थी घडवण्याकरता कटिबद्ध असून ज्ञानदानाचे अविरत काम रसायनशास्त्र विभागामार्फत सतत सुरू राहील असे प्रतिपादन यावेळी रसायनशास्त्र विभागप्रमुख प्रा डॉ हेमंत चांडक यांनी केले. रसायनशास्त्र विभाग हा भविष्यातही आदर्श विद्यार्थी घडवेल असे यावेळी प्राध्यापिका डॉ रोहिणी धरमकर यांनी सांगितले.

याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. धनंजय तळवणकर यांनी रसायनशास्त्र विभागाच्या उज्वल निकाल परंपरेचे कौतुक केले. सत्र २०२४ च्या उन्हाळी परीक्षेत रसायनशास्त्र विभागाच्या चार विद्यार्थिनी मेरिट आल्या. यामध्ये प्रामुख्याने अंजू पालीवाल, ऋतुजा यादगिरे, रूपाली भालेराव व ऐश्वर्या धोपटे यांचा समावेश होता. त्याचप्रमाणे श्री पवन कुमार चव्हाण यांच्यासह तीन विद्यार्थी गेट परीक्षेमध्ये उत्तीर्ण झाल्याबद्दल त्यांचे सुद्धा अभिनंदन केले गेले. कु. तृप्ती नेमाने यांच्यासह इतरही तीन विद्यार्थ्यांचा नेट-सेट परीक्षेमध्ये उत्तीर्ण झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. उच्च शिक्षणाकरिता आयआयटी व आईसर सारख्या प्रतिष्ठित संस्थांमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे सुद्धा या निमित्ताने कौतुक केले गेले. रसायनशास्त्र विभागामार्फत उन्हाळी संशोधन प्रकल्प यशस्वीरित्या राबविल्याबद्दल मान्यवरांनी विभागाबद्दल गौरवोद्गार काढले. आतापर्यंत अनेक विद्यार्थ्यांना समर रिसर्च प्रोग्राम, नेट-सेट व गेट सारख्या स्पर्धा परीक्षा करिता दिले जाणारे मार्गदर्शन व उपलब्ध असलेली स्वतंत्र ग्रंथालय व अद्यावत प्रयोगशाळा व्यवस्था या यशामागचे गमक असल्याचे उपस्थितांनी बोलून दाखवले. याप्रसंगी रसायनशास्त्र मंडळाच्या पदाधिकाऱ्यांच्या नावाची घोषणा करण्यात आली.

यामध्ये अध्यक्षा रोजीना शेख हरून, उपाध्यक्ष गायत्री गणोरकर, सचिव श्रद्धा मोहिते, सहसचिव आधीबा मुसरत तहसीन उल्ला खान, कोषाध्यक्ष सलेहा फिरदोस मोहम्मद शब्बीर यांची नियुक्ती सदर सत्रासाठी करण्यात आली आहे. रसायनशास्त्र विभागाचे सर्व यश विदर्भ शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सुभाषजी बोबडे व सचिव श्री प्रशांत बोबडे यांनी व्यवस्थापन स्तरावरून केलेल्या मदतीमुळे प्राप्त झाल्याचे मत विभागाच्या शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी व्यक्त केले. सदर कार्यक्रम यशस्वी होण्याकरता बीएससी व एम एस सी च्या विद्यार्थ्यांसह रसायनशास्त्र प्रयोगशाळेतील सुरेंद्रजी पवार, नरेंद्रजी वाघ, लक्ष्मण पालवे व विनायक शास्त्री यांनी मेहनत घेतली. असे प्रसिद्धी पत्रकाद्वारे डॉ. रागीब देशमुख यांनी कळविले आहे.

अजिंक्य भारत
# आपलं अमरावती
अमरावती, शुक्रवार दि. ५ सप्टेंबर २०२५

## थोडक्यात

### युवकाची गळफास लावून आत्महत्या

**अमरावती :** राहुल नगर येथे राहत्या गरी गळफास लावून युवकाने आत्महत्या केली. संदीप श्रीकृष्ण शेंडे (३८, रा. राहुल नगर) असे मृतकाचे नाव आहे. याबाबत फ्रेजरपुरा पोलिसांनी चैतन्य रमेशराव शेंडे (२९, रा. कलोती नगर) यांच्या तक्रारीवरून मर्ग नोंदवला.

### क्षुल्लक कारणावरून एकाला मारहाण

**चांदूर रेल्वे :** घरी महालक्ष्मी पूजनाचा कार्यक्रम असल्याने एका शेजाऱ्याने दुसऱ्याला दोन ते तीन दिवस दारूचा धंदा बंद कर अशी विनंती केली. त्यामुळे चिडलेल्या शेजाऱ्याने काठीने डोक्यावर मारीत जखमी केले. ही घटना पळसखेड येथे घडली. याबाबत जखमी विलास वासुदेवराव भोगे (४०) यांनी चांदूर रेल्वे पोलिसात तक्रार दिली. पोलिसांनी प्रमोद वासूदेव भोने (४४) व एक महिला अशा दोघांविरुद्ध गुन्हा नोंदवला. पुढील तपास चांदूर रेल्वे पोलीस करीत आहे.

### वृद्धाचे एक लाख रुपये हिसकाविले

**अंजनगाव सुर्जी :** घरकामासाठी शहरातील स्टेट बँक ऑफ इंडियामधून फिर्यादी चिंतामण दत्तुजी तंतरपाळे (६७, रा. महेश नगर) यांनी एक लाख रुपये काढले. पैसे घेवून ते पायदळ घराकडे निघाले. दरम्यान दोन अज्ञातांनी त्यांच्या हातातील पैशांची बॅग हिसकावून पळ काढला. याबाबत त्यांनी दिलेल्या तक्रारीवरून अंजनगाव सुर्जी पोलिसांनी दोन अज्ञातांविरुद्ध गुन्हा नोंदवला.

### महिलेला मारहाण करून केले जखमी

**आसेगाव :** क्षुल्लक कारणावरून संतापलेल्या एकाने महिलेच्या पतीला शिवीगाळ केली. इतकेच नव्हे, तर तिला मारहाण करीत जखमी केले. ही घटना खैरी येथे घडली. महिलेच्या तक्रारीवरून आसेगाव पोलिसांनी अवधुत हरिदास अमझरे (३२) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### ओंकारखेडा येथून दुचाकी लंपास

**नांदगाव खंडेश्वर :** रस्त्याच्या कडेला उभी केलेली दुचाकी अज्ञाताने चोरून नेल्याची घटना ओंकारखेडा येथील पारधी बेड्यावर घडली. तिची अंदाजे किंमत ५० हजार रुपये आहे. याबाबत दिलीप रामाजी गजभिये (४८, रा. सातरगाव) यांनी दिलेल्या तक्रारीवरून नांदगाव खंडेश्वर पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### ट्रकवर दुचाकी आदळून एकाचा मृत्यू

**माहुली जहाँगीर :** रस्त्यात बंद पडलेल्या ट्रकवर मागून आलेली भरधाव दुचाकी धडकली. त्यात युवकाचा मृत्यू झाला. दिगांबर शेषनारायण शेळके (३०, रा. जालना) असे मृतकाचे नाव आहे. ही घटना अमरावती ते मोर्शी मार्गावरील चिचखेड येथे घडली. घटनेच्या चिचखेड नजिक ट्रक (यूपी ७८-डीएन २८५६) बंद पडला होता. दरम्यान तो ट्रक बंद असल्याने इतर वाहन चालकांच्या जीविताचे हित लक्षात घेता ट्रक चालकाकडून कोणतीही खबरदारी घेण्यात आली नव्हती. अशातच मृतक दिगांबर शेळके हा घटनेच्या वेळी त्याच मार्गाने जात होता. अंधार असल्याने त्याला ट्रक रस्त्यात उभा असल्याचे दिसले नाही. त्याची दुचाकी थेट ट्रकला मागून जावून धडकली. त्यात तो जखमी झाला. त्यातच त्याचा मृत्यू झाला.

# एका महिन्यातच निखळते एचएसआरपी नंबर प्लेट

## ठरवलेल्या दरापेक्षा अतिरिक्त वसुली | वाहनसुरक्षेला बसतोय फटका

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. ४ :** एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या वाहनांवर उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी (एचएसआरपी) बसवणे बंधनकारक आहे. मात्र, अनेक वाहनधारकांच्या तक्रारीनुसार फिटमेंट सेंटरवर बसवणी प्रक्रियेत मोठा हलगर्जीपणा होत आहे. अतिरिक्त पैसे आकारले जात आहेत. वाहनधारकांकडून १५० ते ३०० रुपयांपर्यंतची वसुली करून काळ्या रंगाची प्लास्टिक फ्रेम दिली जाते. 'प्लेट कोपरे वाकू नयेत म्हणून फ्रेम आवश्यक आहे' असे सांगितले जाते. पण या फ्रेममुळे नंबरप्लेट नीट बसत नाही, परिणामी महिनाभरातच प्लेट निखळते. वाहनाच्या सुरक्षेवर यामुळे मोठा




प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. नियमांनुसार स्टेनलेस स्टील किंवा ॲल्युमिनियमचे परमनंट रिव्हेट्स वापरणे बंधनकारक आहे.

साधे स्क्रू, बोल्ट किंवा फ्रेम लावणे बेकायदेशीर आहे. तरीदेखील जादा कमाईसाठी हीच पद्धत वापरली जात असल्याचे चित्र आहे. परिवहन विभागाकडून तपासणी न झाल्याने ही लूट सुरू असल्याची वाहनधारकांची नाराजी आहे.

### ५३ लाखाहून अधिक ऑर्डर्स

- राज्यात झोननुसार एचएसआरपी बसवणी सुरू
- आतापर्यंत ३० लाखांहून अधिक वाहनांवर प्लेट बसवली
- ५३ लाखांहून अधिक ऑर्डर्स प्रलंबित

### शासनाने ठरवलेले दर

- दुचाकी : ५३१
- चारचाकी : ८७९
- फिटमेंट सेंटरवर १५० ते ३०० रुपये अतिरिक्त वसुली
- परमनंट रिव्हेटऐवजी प्लास्टिक फ्रेम बसवली जाते

### एचएसआरपी बसविण्याची योग्य पद्धत

- जुनी नंबरप्लेट नुकसान न करता काढणे
- स्टेनलेस स्टील, ॲल्युमिनियम परमनंट रिव्हेट्स वापरणे
- साधे स्क्रू, बोल्ट वापरणे
- प्लेट सरळ बसवणे, तिरपी नसावी



# गुलाबी ई-रिक्षाची योजना कागदावरच

## ६०० रिक्षांचे उद्दिष्ट, ४०० अर्जदार

## वर्ष उलटूनही महिलांना लाभ नाही

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. ४ :** महिलांना रोजगाराची नवी दिशा देण्यासाठी राज्यातील महायुती सरकारने गतवर्षी मोठ्या गाजावाजात गुलाबी (पिंक) ई-रिक्षा योजना जाहीर केली होती. प्रायोगिक तत्त्वावर ही योजना आठ जिल्ह्यांमध्ये सुरू करण्यात आली. मात्र, प्रत्यक्षात वर्ष उलटूनही एकाही लाभार्थी महिला रस्त्यावर गुलाबी ई-रिक्षा चालवताना दिसत नाही, हे वास्तव आहे. जिल्ह्यातील महिलांना रोजगाराची संधी मिळावी, यासाठी सरकारने ६०० रिक्षांचे उद्दिष्ट ठेवले होते. या योजनेसाठी शहर आणि ग्रामीण भागातून आतापर्यंत तब्बल ४०० महिलांनी अर्ज दाखल केले. त्यातील अनेक अर्जांची महिला व बालकल्याण विभागामार्फत छाननीही झाली. निवड समितीने काही प्रस्ताव पात्र ठरवले असून

> शासनाने महिलांना स्वयंरोजगार कण्यासाठी गुलाबी पिंक ई-रिक्षा योजना सुरू केली आहे. यासाठी जिल्ह्याला ६०० रिक्षांचे उद्दिष्ट आहे. जिल्हाभरातून आतापर्यंत सुमारे ४०० अर्ज प्राप्त आहेत. यातील पात्र असलेल्या महिलांना प्रशिक्षण दिले जात आहे. वाहन चालविण्याचा परवाना काढण्याची प्रक्रिया आटोपताच पात्र लाभार्थ्यांना योजनेचा लाभ दिला जाणार आहे.
>
> **अतुल भडांगे, महिला व बालविकास अधिकारी.**

जिल्ह्यातील १५४ महिलांनी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केली आहे. यामध्ये काही महिलांना शिकाऊ परवाने देण्यात आले असून ४२ महिलांना तात्पुरता, तर १३ महिलांना कायमस्वरूपी वाहन चालविण्याचा परवाना मिळाला आहे.

### स्वयंरोजगाराचे स्वप्न अधुरेच

महिला व बालविकास विभागाने या योजनेसाठी संपूर्ण राज्यभर १० हजार गुलाबी ई-रिक्षा वाटपाचे उद्दिष्ट ठेवले होते. विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर लाडकी बहीण, तीर्थक्षेत्र दर्शन, वयोश्री यासारख्या महिलांसाठीच्या इतर योजनांसोबतच गुलाबी ई-रिक्षा ही योजना जाहीर करण्यात आली होती. महिलांना स्वत:च्या पायावर उभे करण्यासाठी आणि त्यांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी या योजनेला महत्त्व होते. मात्र, आजवर एकाही लाभार्थ्याला ई-रिक्षा प्रत्यक्ष मिळाली नसल्याने अर्ज केलेल्या महिलांमध्ये नाराजी आहे. रोजगाराची गोड आशा दाखवून वर्षभर लोटल्यानंतरही योजना कागदोपत्रीच राहिल्याचे दिसून येते. त्यामुळे जिल्ह्यातील महिलांच्या स्वावलंबनाचे स्वप्न अजूनही अधुरे आहे.

### महिलेशी लैंगिक अत्याचार व आर्थिक फसवणूक

**अमरावती :** राजापेठ पोलिस ठाण्याच्या हद्दीत एका ३८ वर्षीय विवाहित महिलेशी चाकू दाखवून जबरदस्तीने शारिरिक संबंध प्रस्थापित करण्यात आले. तसेच तिच्या २१ वर्षीय मुलाला कंपनीत डायरेक्टर बनविण्याचे आमिष दाखवून ९१ लाख ५० हजार रुपयांची फसवणूक करण्यात आल्याचे उघड झाले. पोलिसांनी आरोपी राहुल संतोषकुमार सिंह (४६, नंदनवन, औरंगाबाद) यांच्याविरुद्ध बलात्कार, धमकी आणि फसवणुकीसह संबंधित कलमांखाली गुन्हा नोंदविला आहे.

# कत्तलीसाठी जाणारे गोवंश पकडले

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. ४ :** नागपूरी गेट पोलिस स्टेशन अंतर्गत असलेल्या लालखडी ते पन्नीपुरा रोडवर एका मोठ्या ट्रकमध्ये कत्तलीसाठी ६२ जनावरे कोंबून नेल्या जात होती. ही माहिती पोलिसांना मिळताच पोलिसांनी धाड टाकून ट्रक थांबविला मात्र ट्रक चालक ट्रक सोडून पडून गेला. पोलिसांनी ट्रकमधील जनावरे ताब्यात घेतले असून ११ जनावरे मृतावस्थेत मिळून आली. ट्रक चालकाविरूद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. लालखडी रिंगरोड पन्नीपुरा रोड कडे ट्रक क्रमांक एमएच-२७




एक्स-८८८६ मध्ये अवैधरित्या गोवंश कोंबून नेल्या जात होते. ही माहिती नागपूरी गेट पोलिसांना मिळाली होती. पोलिसांनी सापडा रचुन लालखडी रिंग रोड ट्रक थांबविला असता ६२ जनावरे मिळून आली. ट्रक मध्ये जनावरे अत्यंत निर्दयतेने कोंबून होती.




ट्रकमधील ११ जनावरे मृतावस्थेत मिळून आली. पोलिसांना पहाताच ट्रक चालक हा घटनास्थळावरून पडून गेला. पोलिसाी जनावरे ताब्यात घेतली असून पशुवैद्यकीय अधिकारी, गौरक्षण संस्था यांच्या समक्ष पंचनामा करून जनावरे गौरक्षण संस्थेत दाखल केली. नागपूरी गेट पोलिसांनी ट्रकसह २७ लाख २५ हजार रूपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे. गेल्या काही दिवसापासून मोर्शी-वरूड भागातून मोठ्या प्रमाणात कत्तलीसाठी जनावरे अमरावतीत येत आहे. ही जाडे दिवसेंदिवस वाढत असून यामध्ये गायींचीही कत्तल केली जात आहे. याप्रकरणी नागपूरी गेट पोलिस अधिक तपास करीत आहे.

# देशी कट्टे, पिस्तुलसह जिवंत काडतुसे जप्त

## अवैध शस्त्र विक्रेत्यांवर गुन्हे शाखेची कारवाई | १.५८ लाखांचा मुद्देमाल जप्त

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. ४ :** शहरात देशी कट्टे (पिस्तूल) विक्री करणाऱ्या दोन सराईत गुन्हेगारांना अमरावती शहर गुन्हे शाखेच्या पथकाने ताब्यात घेतले असून, त्यांच्या जवळून एकूण ५ अग्नीशस्त्रे व ८ जिवंत काडतुसे असा १,५८,०००/- किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांच्या आदेशानुसार सराईत गुन्हेगारांवर पाळत ठेवून कारवाई करण्यासाठी गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथक तयार करण्यात आले होते. ३ सप्टेंबर रोजी पथकाला गोपनीय माहिती मिळाली की, अहफाज



खान उर्फ ओटू (रा. नूर नगर) हा नवसारी ते लालखडी रिंगरोडवरील खाली लेआउटमध्ये अवैध देशी कट्टे विक्रीसाठी उभा आहे. त्यानुसार सपोनि महेश इंगोले, सपोनि मनीष वाकोडे यांच्यासह पथकाने तत्काळ छापा टाकला. यावेळी दोन इसम संशयास्पदरीत्या उभे असल्याचे दिसून आले. पोलिसांची चाहूल लागताच ते पळून जाण्याचा प्रयत्न करीत असताना पथकाने शिताफीने त्यांना पकडले. ताब्यात घेतलेल्या आरोपींची नावे अहफाज खान उर्फ ओटू शफाकत खान (वय ३१, रा. नूर नगर, अमरावती) व अमन कैलास चंडाले (वय ३२, रा. रतनगंज, अमरावती) अशी आहेत, त्यांच्या जवळून ४ देशी कट्टे (पिस्तूल), १ देशी बनावटीचा रिव्हॉल्वर, ८ जिवंत काडतुसे, असा एकुण १,५८,००० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही धडक कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे व रमेश धुमाळ, सहाय्यक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली सपोनि अमोल कडू, महेश इंगोले, मनीष वाकोडे यांच्यासह सुनील लासूरकर, दीपक सुंदरकर, गजानन ढेवले, फिरोज खान, सतीश देशमुख, मंगेश लोखंडे, आस्तीक देशमुख, मनोज ठोसर, जहीर शेख, सवीन बहाळे, संग्राम भोजने, मंगेश शिंदे, अतुल संभे, नईम बेग, विकास गुडधे, नाझीमोद्दीन, विशाल वाकपांजर, राहुल ढेंगेकर, सागर ठाकरे, राजीव रायलीवाले, रंजीत गावंडे, निलेश वंजारी, संदीप खंडारे, राहुल दुधे, चेतन शर्मा, अलीमोद्दीन खतीब आदींचा समावेश होता.

# स्वस्त धान्य दुकानदाराचे मार्च महिन्यापासून कमिशन रखडले

## स्वस्त धान्य दुकानदार संघटनेचे तहसीलदार यांना निवेदन

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नांदगाव खंडेश्वर, दि. ४ :** नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील सहकारी स्वस्त धान्य दुकानदार संघटनेच्या वतीने नांदगाव खंडेश्वर तहसील कार्यालय मध्ये तहसीलदार यांना संघटनेच्या वतीने निवेदन देण्यात आले फेब्रुवारी महिन्यापासून धान्य वाटप झालेले असून धान्य कमिशन मिळाले नाही त्यामुळे तालुक्यातील १३४ दुकान असुन सर्व परवानाधारक असुन ते अध्यापयी पैसे मिळालेले नाही त्यामुळे दुकानदार संघटनेचे मार्फत तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले यावर तरी उपायोजना करून



कमिशन मिळून देण्यात यावे असे सांगण्यात आले.

कमिशन न मिळाल्यास सोमरील येणाऱ्या महिन्यातील राशन कार्ड धारकांना राशन मिळण्यात दिरंगाई झाल्या सर्वश्री शासन जबाबदार राहणार आहे त्यामुळे सर्वांचे कमिशन लवकरात लवकर जमा व्हावी असे सांगण्यात आले त्यावेळी नरेन्द्र तिडके तालुका अध्यक्ष, विनोद कडू,सचिव, कृष्णराव पोपळघाटे, सुरेश कणसे, जयप्रकाश राणे, मारोतराव रामटेके, नितीन तह्लेकर सचिन ठाकरे, जितेंद्र घोडे,बगळे इत्यादी उपस्थित होते

# वाघाच्या हल्ल्यात वनमजूर ठार

## महिन्याभरातील दुसरी घटना

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**धारणी, दि. ४ :** वाघाकडून हल्ला करण्याच्या घटनांची श्रृंखला थांबण्याचे नाव घेत नाही . वाघाच्या हल्ल्यात कुलंगना येथील युवकाचा मृत्यू झाल्याचा घटनेची शाई वाळते न वाळते पुन्हा वाघाने एक नर भक्ष केल्याची घटना बुधवारी (दि.३) ला बाहेर आली, यावेळी वन विभागाचा रोजंदारी मजुरच वाघाची शिकार ठरला. ही घटना चिखलदरा रेंजमधील खोंगडा वर्तुळ अंतर्गत धामणीखेडा बीट मधील वनखंड क्र. ९४४ राजदेव बाबा कॅम्पजवळ घडली. या घटनेमुळे पुन्हा मेळघाट मध्ये भीतीचे सावट अधिकच गडद झाले आहे. मृत मजुराचे नाव प्रेम राजेश कासदेकर (वय अंदाजे ३०, रा. तारुबांदा) असे असून तो व्याघ्र प्रकल्पात रोजंदारीवर कार्यरत होता. रविवारी सायंकाळी कासदेकर आपल्या नित्याच गस्तीसाठी जंगलात गेला होता. तेव्हाच वाघाने त्याला उचलून नेले. वनविभागाच्या पथकाने रात्री उशिरापर्यंत त्याचा शोध घेतला, रात्री साडेतीनच्या सुमारास त्याचे कपडे, मोबाईल व काही अवशेष सापडले. त्यानंतर सोमवारी सकाळी दहाच्या सुमारास मृतदेहाचे पूर्ण अवशेष सापडले. घटनेची माहिती मिळताच वनपरिक्षेत्राधिकारी राहुल दाइत व वनपरिषद अधिकारी चिखलदरा



यांच्यासह वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. चिखलदरा पोलिसही घटनास्थळी पोहोचले. वारंवार होणाऱ्या घटनांमुळे भय इथले संपत नाही हे वास्तव पुन्हा अधोरेखित झाले आहे.

ही घटना घडली तेव्हा दोन गटांमध्ये चार मजूर जंगलात गस्त घालत होते. एका गटातील दोन मजुरांपैकी पुढे जाणारा मजूर सुरक्षित राहिला, तर मागे चालणाऱ्या प्रेम कासदेकरवर वाघाने झडप घातली. अचानक झालेल्या या हल्ल्यामुळे साथीदार आरडाओरड करू लागला, परंतु वाघाने त्याला जंगलात खेचून नेले.

मृत मजुराच्या नातेवाईकांनी शासनाने तातडीने मदत जाहीर करून आर्थिक आधार द्यावा, अशी मागणी केली आहे. तसेच जंगलात रोजंदारीवर गस्त घालणाऱ्या मजुरांना संरक्षणाची साधने उपलब्ध करून द्यावीत, अन्यथा कामगारांचा जीव सतत धोक्यात राहील, असे स्थानिकांचे म्हणणे आहे.

### एका वर्षात पाच ठार

काही दिवसांपूर्वीच कुंलगना खुर्द येथे वाघाच्या हल्ल्यात एक जण ठार झाला होता. अवघ्या महिनाभरात ही दुसरी घटना घडली असून, गेल्या वर्षभरात अशा पाच घटनांमध्ये मजुरांना आपले प्राण गमवावे लागले आहेत. त्यामुळे व्याघ्र प्रकल्पातील कर्मचारी व रोजंदारी मजूर यांच्यात प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

### आमदारांचे वन मंत्र्यांना पत्र

मेळघाट विधानसभा मतदार संघाचे आमदार केवलराम काळे यांनी राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांना एक पत्र देत सांगितले की, व्याघ्र प्रकल्पातील जामली (आर) वनपरिक्षेत्रात वाघाची दहशत प्रचंड वाढली. मागील दोन महिन्यांत 3 निरपराध नागरिकांचा बळी यामध्ये गेला आहे, या घटनेमुळे ग्रामस्थांमध्ये भीती व मानसिक तणावाचे वातावरण आहे.शेतकरी, महिला, विद्यार्थी व वनकर्मचारी प्रचंड असुरक्षिततेत वावरत आहे. त्यामुळे या नरभक्षी वाघाला तात्काळ जेरबंद करावे, त्याला व्याघ्र प्रकल्पाबाहेर हलवावे, गावांमध्ये विशेष पथके तैनात करून नागरिकांच्या सुरक्षेची व्यवस्था करावी.

अजिंक्य भारत

# आपलं अमरावती

२

अमरावती, शुक्रवार दि. ५ सप्टेंबर २०२५

## थोडक्यात

### संशयावरून युवकाची अंगझडती; आढळले शस्त्र

**अमरावती :** संशयाच्या आधारे नागपुरी गेट पोलिसांनी एका युवकाची अंगझडती घेतली. त्या वेळी त्याच्यजवळ एक स्टिलचा धारदार चाकू आढळून आला. पोलिसांनी तो जप्त केला. त्याच्यावर पोलिसांनी मपोका दाखल केला असून ही कारवाई अकबर नगर परिसरात नागपुरी गेट पोलिसांनी केली. आसीफ पठाणा अजीम खान (३१) असे गुन्हा दाखल केलेल्या युवकाचे नाव आहे.

### खाद्य पदार्थ विक्रेत्यावर कारवाई

**अमरावती :** जमील कॉलनी परिसरात खाद्य पदार्थाची लोटगाडी लावणाऱ्या एका विक्रेत्यावर नागपुरी गेट पोलिसांनी कारवाई करीत गुन्हा दाखल केला. तो सार्वजनिक रस्त्यावर निष्काळजीपणे सिलेंडर वापरता दिसून आला. मोहम्मद आजम मोहम्मद असलम (३४, रा. अलहिलाल कॉलनी) असे गुन्हा दाखल झालेल्या युवकाचे नाव आहे. ही कारवाई नागपुरी गेट पोलिसांनी केली.

### वाहन चालकावर गुन्हा दाखल

**अमरावती :** वलगाव ते दर्यापूर मार्गावर निष्काळजीपणे दुचाकी चालवून स्टंटबाजी करणाऱ्या दोन युवकांवर गुन्हा दाखल करण्यात आला. त्यासाठी त्यांनी एमएपी १०-झेडई ४४६३ व एमएच २७-झेड ४२७१ या दुचाकींचा वापर केला. वलगाव पोलिसांनी कमल राजाराम टाकीया (१९) व गणेश संतोष चंदेल (१९) दोघेही रा. वलगाव यांच्यावर गुन्हा दाखल केला.

### महिलेच्या बॅगेतून २८ हजार लंपास

**अमरावती :** ग्रामीण भागातून नमुना गल्लीत खरेदीसाठी आलेल्या महिलेच्या बॅगेतून अज्ञात व्यक्तीने २८ हजार ८०० रुपये चोरून नेले. दुकानातून घेतलेल्या सामानाचे पैसे देताना ही बाब महिलेच्या लक्षात आली. याबाबत तिने कोतवाली पोलिसात तक्रार नोंदवली असून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### वाहन चालकावर गुन्हा दाखल

**अमरावती :** लहान मुलगा व भाच्यासह महिला दुचाकीने (एमएच २७-डीवाय ८२५५) वडुरा येथून अमरावतीकडे येत होती. दरम्यान शिराळाजवळ मागून भरधाव आलेल्या ट्रिपल सीट दुचाकीने (एमएच ६८-झेडसी ४२६५) धडक दिली. त्यात महिलेला गंभीर दुखापत झाली. याबाबत तिने उपचारांती वलगाव पोलिसात तक्रार नोंदवली. पोलिसांनी अपघाताला कारण ठरलेल्या दुचाकी चालकावर गुन्हा नोंदवला.

### पोलिसांची जुगार अड्ड्यावर धाड

**अमरावती :** वलगाव पोलिसांनी चांदूर बाजार फाट्यानजिक सुरू असलेल्या जुगारावर कारवाई करीत दोघांवर गुन्हे दाखल केले. सागर ओमप्रकाश तिवारी (३६) व अन्य एक जण अशा दोघांवर गुन्हा नोंदवला. त्यापैकी दुसरा फरार झाला. कारवाईदरम्यान पोलिसांनी एकूण २ हजार ७६० रुपयांचे साहित्य जप्त केले. या घटनेचा पुढील तपास वलगाव पोलीस ठाण्याचे ठाणेदार यांच्या मार्गदर्शनाखाली वलगाव पोलीस करीत आहे.

### देशी दारू जप्त

**अमरावती :** वडनेरा व नांदगाव पेठ पोलिसांनी केलेल्या दोन वेगवेगळ्या कारवाईत पोलिसांनी एकूण १ जिार ५२० रुपयांची देशी दारू जप्त करीत गुन्हा दाखल केला.

# गणेशोत्सवात डीजे वाजणार नाही

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. ४ :** गणेशोत्सव जवळ आला की प्रशासनाकडून डीजे साऊंडवर बंदीचे फर्मान जारी केले जाते. मात्र ड्रग्ज, गांजा, गुटखा, दारू, जुगार यांसारख्या समाजघातक व्यसनांवर कायमस्वरूपी बंदी असतानाही त्यांच्यावर कठोर कारवाई होताना दिसत नाही. उलट फक्त डीजे वरच हंगामी निर्बंध आणले जातात. त्यामुळे नागरिक व डीजे व्यवसायिक यांच्यात नाराजीची भावना निर्माण झाली आहे. डीजे साऊंड म्हणजे फक्त गोंगाट नव्हे, तर उत्सवांना रंगत आणणारे, आनंदाचे वातावरण निर्माण करणारे एक महत्त्वाचे साधन आहे. दिंडी, कावड यात्रा, दहीहंडी, गणेशोत्सव, दुर्गोत्सव, ईद, मोहरम, शिवजयंती, आंबेडकर जयंती, लग्नसोहळा, वाढदिवस यांसारख्या अनेक कार्यक्रमात डीजे साऊंड ही एक अविभाज्य परंपरा बनली आहे. संगीत लोकांना एकत्र आणते, भावनिक बंध घट्ट करते आणि आनंदाची लाट पसरवते.

प्रशासन वर्षभर डीजेकडे दुर्लक्ष करते. मात्र गणेशोत्सव आला की अचानक बंदीचे आदेश काढले जातात. डीजे धारकांमधे दहशत पसरवून पोलिसांकडून हायकोर्टाच्या आदेशांची चुकीची माहिती नागरिकांमध्ये पसरवली जाते, असा आरोप आहे. प्रत्यक्षात, न्यायालयाने सकाळी 6 ते रात्री 10 या वेळेत ठराविक डेसीबल मर्यादेत डीजे वाजविण्यास परवानगी दिली आहे. त्यामुळे पूर्ण बंदी हा मनमानी निर्णय असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. एकीकडे ड्रग्ज, गुटखा, दारू, जुगार यामुळे कित्येकांचे संसार उद्ध्वस्त झाले



आहेत. तरुणाई आहारी जात आहे, कॅन्सरसारखे आजार पसरत आहेत. तरीसुद्धा या व्यसनांवर कायमस्वरूपी आणि कडक बंदी घालण्यात आलेली नाही. उलट डीजेमुळे कुणाचे आयुष्य आजपावेतो तरी उद्ध्वस्त झालेले ऐकीवात नाही, असे असतानाही त्यालाच खतरनाक ठरवले जाते. ही बाब सर्वसामान्यांच्या मनात प्रश्न निर्माण करते.

डीजे साऊंड म्हणजे केवळ गोंगाट नव्हे, तर सण-उत्सवांचा आनंद वाढवणारे साधन आहे. त्यावर मनमानी बंदी घालणे म्हणजे लोकशाही मूल्यांचे व नागरिकांच्या हक्कांचे हनन होय. त्यामुळे प्रशासनाने संतुलित, सकारात्मक आणि सर्व बाजूंनी विचार करूनच निर्णय घ्यावा, अशी सर्वांची माफक अपेक्षा आहे.

### ध्वनी प्रदूषणाचा मुद्दा

15 वर्षांहून जुनी डिझेल वाहने दररोज धूर सोडून वातावरण प्रदूषित करतात. अशा वाहनांवर कारवाई करण्याऐवजी डीजे सारख्या तात्पुरत्या साधनावर निर्बंध आणले जातात. ध्वनीप्रदूषणाचा प्रश्न गंभीर आहे, पण त्यावर तोडगा म्हणजे पूर्ण बंदी नसून शिस्तबद्ध नियमांची अंमलबजावणी, असे नागरिकांचे मत आहे.

### रोजगारावर गदा

डीजे व्यवसायावर लाखो लोकांचा रोजगार व कुटुंबांचा उदरनिर्वाह अवलंबून आहे. बंदी म्हणजे थेट उपासमारीची व आत्महत्येची वेळ अनेकांवर येणार आहे. ड्रग्ज, गुटखा, दारू, जुगार यामुळे कित्येकांचे संसार उद्ध्वस्त झाले आहेत. तरुणाई आहारी जात आहे, कॅन्सरसारखे आजार पसरत आहेत. तरीसुद्धा या व्यसनांवर कायमस्वरूपी आणि कडक बंदी घालण्यात आलेली नाही. उलट डीजेमुळे कुणाचे आयुष्य उद्ध्वस्त झालेले नाही, असे असतानाही त्यालाच खतरनाक ठरवले जाते. ही बाब सर्वसामान्यांच्या मनात प्रश्न निर्माण करते.

### नागरिकांची अपेक्षा व समर्थन

नियम मोडणार्या डीजेवाल्यांवर कारवाई करण्यात हरकत नाही. मात्र संपूर्ण उद्योगावर बंदी घालणे हा अन्यायकारक व एकतर्फी निर्णय ठरतो. प्रशासनाने डीजे व्यवसायिकांची सभा घेऊन नियम स्पष्ट करावेत, डेसीबल मर्यादा काटेकोरपणे पाळली जावी, पण नागरिकांना आनंद देणाऱ्या या व्यवसायावर गदा आणू नये, अशी सर्वांची रितसर मागणी आहे. सरकारच्या या निर्णयाच्या काही नागरिकांनी स्वागत ही केले.

## सार्वजनिक गणेशोत्सव शांततेत पार पाडा

### एसडीपीओ अशोक थोरात यांचे प्रतिपादन

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**खोलापुर, दि. ४ :** स्थानिक खोलापूर पोलीस स्टेशन सभागृह येथे श्री गणपती उत्सव तसेच ईद-ए-मिलाद समंधाने बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

बैठकीला प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपविभाग अमरावती ग्रामीणचे उपविभागीय पोलीस अधिकारी श्री अशोक थोरात, भातकुली तहसीलदार अजित येडे, ठाणेदार सुलभा राऊत मॅडम, सरपंच शेख नाझीमुद्दीन भाई यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलताना अशोक थोरात म्हणाले की आगामी गणपती उत्सव



मिरवणुकीत कायदा सुव्यवस्था व राखून गुण्या गोविंदाने उत्सव साजरा करावा.

गणपती मंडळाने शासनाने दिलेल्या अटी शर्तीचे पालन करून मिरवणुकी दरम्यान कुठलेही गालबोट लागणार नाही यासाठी दक्ष राहुन नियमांचे योग्य पालन करून गणपती उत्सव साजरा करावा. दरम्यान बैठकीला संबोधित करताना खोलापूर पोलीस स्टेशनच्या ठाणेदार सुलभा राऊत यांनी गणपती मंडळाच्या पदाधिकाऱ्यांना श्री गणपती उत्सव संबंधाने शासनाकडून निर्गमित आदेश यांचे पालन करण्याबाबत विसर्जन मिरवणुकीमध्ये पारंपारिक वाद्याचा वापर करून ध्वनी प्रदूषण कायद्याचे तंतोतंत पालन करण्याबाबत तसेच मूर्ती सुरक्षेबाबत धर्मदाय आयुक्त यांची परवानगी घेण्याबाबत व सदर उत्सवा दरम्यान आक्षेपार्य पोस्टर, बॅनर, घोषणा, नारबाजी, वादग्रस्त गाणे वाजू नये याबाबत सूचना दिल्या व सर्व गणेश मंडळांना विसर्जन तारखेबाबत अवगत करण्यात आले असून विसर्जन मार्ग व दिलेल्या तारखेत कोणताही बदल न करण्याबाबत योग्य मार्गदर्शन करण्यात आले. बैठकीला सरपंच, ग्रामसेवक, मंडल अधिकारी, तलाठी, ग्रामपंचायत सदस्य, तसेच पोलीस स्टेशन हद्दीतील शांतता समिती सदस्य, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे कर्मचारी व सार्वजनिक गणेश मंडळाचे पदाधिकारी बहुसंख्येने उपस्थित होते.

## तालुका साप्ताहिक महाआरती चिंतन बैठक

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**खोलापुर, दि. ४ :** येथून जवळच असलेल्या खालखोनी या गावातील भातुकली तालुका साप्ताहिक महाआरती संचालक ह.भ.प. भागवताचार्य रविंद्र महाराज पाटील खालखोनीकर यांची भातकुली तालुका प्रतिनिधी म्हणून रविवार, दि. २४ ऑगष्टला व्यासपीठावर निमंत्रित करण्यात आले होते.

साप्ताहिक महाआरती चिंतन बैठक मेहरबाबा लॉन, भातकुली रोड येथे दर्यापूर तालुका साप्ताहिक महाआरती समिती तर्फे आयोजित करण्यात आली होती. आणी या बैठकीत कुशल मार्गदर्शक ह.भ.प. परम पुजणीय गुरुवर्य विदर्भ रत्न संजय महाराज पाचपोर यांच्या संकल्पनेतून संपुर्ण महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात साप्ताहिक महाआरती गेल्या अनेक वर्षांपासून सुरू केल्या आहे. त्यांचाच आढावा म्हणून अमरावती जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील प्रतिनिधीला निमंत्रित करण्यात आले होते.

या सभेला ४०० पुरुष व १०० महिला मंडळी उपस्थित होते. कार्यकमाचे संचालन ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज तिडके गुरुजी यांनी केले. ह.भ.प. परम पुजणीय विदर्भ रत्न गुरुवर्य संजय महाराज पाचपोर यांचे स्वागत ह.भ.प. सागर महाराज परिहार, राजेंद्र धोटे गुरु, गजानन कोकाटे गुरुजी, सुनिल



भारसाकळे, मंगेश गावंडे, ह.भ.प. धनेश महाराज ढोके, ह.भ.प. विष्णू महाराज गावंडे, ह.भ.प. ॠषिकेश सरोदे व वैभव महाराज तराळ यांनी महाराजांना नारळ व श्रीफळ देऊन स्वागत करण्यात आले आहे. त्यानंतर ह.भ.प. गुरुवर्य संजय महाराज पाचपोर यांनी मार्गदर्शन केले. धर्म रक्षती रक्षत:, धर्माचे पालन/करणे पाखांडी खंडन हेची आम्हा करने काम/ बिज वाढावया नाम या संत वचणानुसार आपल्या संस्कृतीचे धर्माचे रक्षण करण्यासाठी लहान मुला मुलींना व समाजाला संस्कार व सुस्कृतीचे धडे देने अनिवार्य आहे.

### वाल्मिकपूर येथे कृषी विभागातर्फे शेतीशाळा

**अचलपूर :** नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा दोन अंतर्गत तालुका कृषी अधिकारी अक्षय क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली साहाय्यक कृषी अधिकारी सुनील ठाकरे यांनी वाल्मीकपूर येथे शेतकरी सुनंदा काळपांडे यांच्या शेतात कपाशी या पिकाची महिला शेतीशाळा शनिवारी घेण्यात आली. या शेतीशाळेत उपस्थित महिला शेतकऱ्यांना कृषी विभागामार्फत प्रवीण मडगे उपकृषी अधिकाऱ्यांनी कापूस पीक परिसंस्था संकल्पना, पीक निरीक्षणे, चित्रीकरण, सादरीकरण, चर्चा करून निष्कर्ष, पिकावर आढळून येणाऱ्या रोग व किडी ओळख, एकात्मिक तन व्यवस्थापन इत्यादी विषयावर मार्गदर्शन केले. शेती शाळेस साहाय्यक कृषी अधिकारी रवींद्र कासट, रोहित गावंडे यांच्यासह सुनंदा काळपांडे आदी महिला उपस्थित होत्या.

## अमरावती-पुणे विमानसेवा लवकरच सुरू होणार?

### बावनकुळे यांनी दिले विमानसेवेच्या विस्ताराचे संकेत




दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. ४ :** अमरावती विमानतळावरून अमरावती पुन, अमरावती-कोल्हापूर-गोवा आणि अमरावती-हैदराबाद-तिरूपती या तीन मार्गावर विमानसेवा सुरू करण्याची मागणी जिल्हा नियोजन समितीने केली आहे. अमरावती विमानतळावरून अमरावती-पुणे, अमरावती-कोल्हापूर-गोवा आणि अमरावती-हैदराबाद-तिरूपती या तीन मार्गावर विमानसेवा सुरू करण्याची मागणी जिल्हा नियोजन समितीने केली आहे. यासंदर्भात प्रस्ताव सादर केला जाणार असल्याचे सांगून जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विमानसेवेच्या विस्ताराचे संकेत दिले आहेत.

खा. बलवंत वानखडे यांनी ८ सप्टेंबर ला विमान वाहतूक मंत्रालयासोबत बैठक होणार असून या बैठकीत संपूर्ण ब्लूप्रिंट सादर केली जाईल. विद्यमान विमान कंपन्यांनी जर या उपक्रमात रस दाखवला नाही, तर आम्ही स्टार एअरलाइन्सशी संपर्क साधून पुढील प्रक्रिया राबवण्याचा प्रयत्न करू.

जर जिल्ह्यातून या क्षेत्रांसाठी विमान सेवा सुरू झाल्या, तर तर जिल्ह्यात विकासाची गंगा वाहू लागेल. लवकरच संबंधित विभाग व मंत्रालयाशी संपर्क साधण्यात येईल. या अनुषंगाने आम्ही सर्व संबंधितांना पत्र देखील पाठवले आहे.

**बळवंत वानखडे, खासदार**

### नाईट लैंडिंगची मागणी

हौशी पर्यटक समुहाने अमरावती विमानतळावर रात्रीच्या वेळ विमानांना उतरण्याची म्हणजेच 'नाइट लैंडिंग'ची सुविधा सुरू करण्याची मागणीही केली आहे. तर अकोला, यवतमाळ, बुलढाणा, वाशीम यांसारख्या शेजारील जिल्ह्यांतील प्रवाशांसाठीही फायदेशीर ठरतील.

**विजय शिंदे,**
**संयोजक, हौशी पर्यटक समूह**

## गरिबीतून यशाच्या शिखराकडे; अविस्मरणीय शैक्षणिक प्रवास

दै. अजिंक्य भारत | भारत वरठे

**धारणी, दि. ४ :** शिक्षण हा प्रत्येकाचा मूलभूत अधिकार असला तरी, काहींसाठी तो एक आव्हानात्मक स्वप्न असतो, ज्यासाठी त्यांना दारिद्र्य आणि संघर्षाच्या अनेक अग्निपरीक्षांमधून जावे लागते. अशीच एक असामान्य, जिद्दी आणि प्रेरणादायी कथा आहे धनश्याम अनोखीलाल वाघमारे यांची, ज्यांनी गरिबीच्या अंधाराला भेदून पीएच.डी. पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले आणि समाजासमोर एक आदर्श निर्माण केला.मेळघाटातील धारणी तालुक्यातील साद्राबाडी या दुर्गम ग्रामीण भागातून आलेल्या धनश्यामने बालपणापासूनच दारिद्र्याचा कडवट अनुभव घेतला. कुटुंबाची आर्थिक परिस्थिती इतकी हलाखीची होती की, दोन वेळच्या जेवणाची सोय करणेही कठीण होते. अशा परिस्थितीत शिक्षणाचा खर्च उचलणे हे तर एक मोठे आव्हानच होते. तरीही, धनश्यामच्या मनात शिक्षणाची तीव्र ओढ होती; त्याला खात्री होती की शिक्षण हेच त्याच्या कुटुंबाचे भवितव्य बदलू शकते.वयाच्या अवघ्या १० व्या वर्षापासून त्याने वडिलांना त्यांच्या छोट्या हॉटेलमध्ये मदत करण्यास सुरुवात केली. सकाळी ११ वाजेपर्यंत हॉटेलमध्ये काम करून शाळेत जाणे आणि संध्याकाळी ५ नंतर पुन्हा वडिलांना मदत करणे हा त्याचा दिनक्रम होता. रात्री दिव्याखाली अभ्यास करणे, प्रसंगी मजुरी करून शिक्षणाचा खर्च भागवणे हे त्याच्या आयुष्याचा अविभाज्य भाग बनले होते. इतर मुलांकडे पुस्तके, वह्या आणि शाळेचे साहित्य असले तरी, धनश्यामला अनेकदा जुन्या पुस्तकांवर आणि इतरांच्या मदतीवर अवलंबून राहावे लागले. पण या अडचणींनी त्याला कधीच खचू दिले नाही, उलट त्यातून त्याला अधिक कठोर परिश्रम करण्याची प्रेरणा मिळाली.

दहावी आणि बारावीत त्याने उत्तम गुण मिळवले. त्याला वैद्यकीय क्षेत्रात जायचे होते, परंतु सीईटी परीक्षेची ८०० रुपये फी भरू न शकल्याने त्याचे ते स्वप्न अपुरे राहिले. महाविद्यालयीन



शिक्षणासाठी त्याला आणखी संघर्ष करावा लागला. वाघमारे यांनी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातून शिक्षणशास्त्र विषयात "Development of Teaching Learning Strategies and its Effectiveness on the Academic Achievement of Students with Dysgraphia and Dyscalculia" या विषयावर पीएच.डी. पदवी प्राप्त केली आहे.हा प्रवास केवळ धनश्यामचा एकट्याचा नाही, तर दारिद्र्यामुळे शिक्षण पूर्ण करू न शकणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांसाठी तो एक प्रेरणास्त्रोत आहे. धनश्याम वाघमारे यांनी हे सिद्ध केले आहे की, दृढनिश्चय, कठोर परिश्रम आणि जिद्द असेल तर कोणतीही आर्थिक अडचण यशाच्या मार्गात अडथळा ठरू शकत नाही.सध्या धनश्याम वाघमारे संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात पदव्युत्तर शिक्षण विभाग येथे सहाय्यक प्राध्यापक पदावर कार्यरत आहेत आणि इतरांनाही शिक्षणासाठी प्रेरित करत आहेत. त्यांनी स्वबळावर अमरावतीतील पंचवटी चौकात 'EDUCARE CLASSES' सुरू करून, शिक्षण क्षेत्रातील शिक्षक पदासाठी आवश्यक परीक्षांकरिता मार्गदर्शन करत आहेत, ज्यामुळे नवीन पिढी घडविली जात आहे. त्यांच्या या प्रवासातून हेच शिकायला मिळते की, इच्छाशक्ती असेल तर कोणतीही गोष्ट अशक्य नाही.धनश्याम वाघमारे यांनी त्यांच्या या यशाचे श्रेय त्यांचे प्रेरणास्त्रोत आजोबा स्व. रामुजी वाघमारे व आजी स्व. यशोदाबाई वाघमारे, वडील श्री. अनोखीलाल वाघमारे, आई सौ. लक्ष्मीबाई वाघमारे, मोठे वडील श्री. लखनलाल वाघमारे, पत्नी सौ. दीपा वाघमारे, भाऊ - बहीण, मुलगा, शिक्षक, मित्रपरिवार आणि विद्यार्थी यांना दिले.

# चंद्रभागा नदीकाठी बाप्पांच्या विसर्जनाकरिता भक्तांना प्रशासनाने सोडले वाऱ्यावर

### जीवितहानी टाळण्याकडे प्रशासनाचा कानाडोळा | विसर्जनावेळी नदीकाठी बंदोबस्ताची मागणी

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**दर्यापूर, दि. ४ :** यावेळी राज्यामध्ये गणपती बाप्पा विराजमान झाले आहे. अशातच काही भाविक भक्त आपल्या घरी दीड दिवसाचे, अडीच दिवसाचे, पाच दिवसाचे, सात दिवसाचे तसेच दहा दिवसाचे व सार्वजनिक गणपती बाप्पा यांची स्थापना करतात, तत्पश्चात त्यांचं विसर्जन सुद्धा करतात. पावसाळ्याचे दिवस असल्यामुळे नदी-नाले भरून वाहत आहे. अशातच बाप्पाचं विसर्जन नदीमध्ये करण्याचे म्हटलं तर खूप वेळा भाविक भक्तांना आपला जीव गमवावा लागला आहे. ज्यामुळे संबंधित प्रशासन बाप्पांचं विसर्जन करणाऱ्या ठिकाणी बंदोबस्त किंवा



कर्मचारी तैनात करतात. मात्र दर्यापूर तालुक्यातील खल्लार गावामधल्या एका भाविक भक्ताच्या घरी अडीच दिवसाकरिता गणपती बाप्पांची स्थापना करण्यात आली होती, त्यांच्या विसर्जनाकरिता भाविक भक्त चंद्रभागा नदीपात्रावरील पूल ओलांडून पलीकडे नदीकाठी आले होते, परंतु यावेळी संबंधित प्रशासनाचे एकही कर्मचारी बंदोबस्ताकरिता किंवा मार्गदर्शनाकरिता या ठिकाणी दिसून आले नाही. एकीकडे या नदीवरील असलेल्या पुलाला दोन्हीकडून कसल्याच प्रकारचे बॅरिगेट्स नाही, ज्यामुळे पाय घसरून नदीमध्ये पडून वाहून जाण्याचा संकट मोठ्या प्रमाणात उभा ठाकत आहे. दुसरीकडे चंद्रभागा नदी दोन्ही काठ भरून वाहत आहे,अशातच विसर्जनाच्या वेळी विसर्जन यात्रेत मुले, वृद्ध नागरिक सामील होते. मात्र संबंधित प्रशासनाकडून असली घोडचूक दिसून आल्यामुळे उर्वरित पुढील विसर्जनाच्या वेळी योग्य तो बंदोबस्त प्रशासनाने ठेवावा अशी मागणी परिसरातील नागरिक करीत आहे.

खल्लार येथील लोखंडे यांच्या घरी अडीच दिवसाची गणपती स्थापना दरवर्षीप्रमाणे यावर्षी करण्यात आली होती,मात्र विसर्जनाच्या वेळेस नदीकाठी महसूल विभाग तसेच संबंधित प्रशासनाकडून कसल्याच प्रकारचा बंदोबस्त ठेवण्यात आलेला नव्हता, ज्यामुळे आता होणाऱ्या उर्वरित विसर्जना करिता प्रशासनाने बंदोबस्त ठेवावा ज्यामुळे कुठल्याही प्रकारची जीवित हानी होऊ नये अशी प्रशासनाकडे मागणी करतो.

**महेश कुरळकर**
**काँग्रेस सामाजिक कार्यकर्ते**

## महत्वाचे



यवतमाळ : बालगणेश मंडळ, शिंदेनगर येथील श्री. गणेश मूर्तीची आरती करताना सामाजिक कार्यकर्ते संजय शिंदे पाटील व माजी जिल्हा परिषद सदस्य रेणू शिंदे पाटील.



यवतमाळः तालुक्यातील धानोरा (बोदगव्हाण) येथील शेतनिष्ठ शेतकरी पंजाबराव झिंजे आणि येथील वसंतराव नाईक वैद्यकीय महाविद्यालयाचे प्रशासकीय अधिकारी संतोष झिंजे यांच्या अवधूतवाडी येथील निवासस्थानी विराजमान श्री. गणेश मूर्ती.



नेते अण्णासाहेब पारवेकर देशमुख यांच्या वाड्यातील गणेशोत्सव. वर्ष : १०८ वर्ष

**नागरिक भयभीत : रुग्णालयांची झाली दुरवस्था, रुग्णांना नाईलाजाने खाजगी दवाखान्यांचा आधार**

# पूरानंतर साथीच्या आजारांचा उद्रेक

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**उमरखेड, दि. ४ :** तालुक्यातील जनता महापूर आणि अतिवृष्टीच्या संकटातून सावरत असतानाच, आता विषाणूजन्य तापाच्या साथीने डोके वर काढले आहे. मात्र, अशा गंभीर परिस्थितीत संरक्षण देणारी शासकीय आरोग्य यंत्रणाच विकलांग झाल्याने, नागरिकांना वाचविण्यासाठी कोणीच वाली उरला नसल्याचे चित्र आहे.

उमरखेड तालुक्यात नुकत्याच झालेल्या अतिवृष्टी आणि दोन वेळच्या महापुराने अक्षरशः होत्याचे नव्हते केले. या जलप्रलयामुळे शहरासह ग्रामीण भागात ठिकठिकाणी पाण्याची डबकी साचली आहेत, तर पुरासोबत वाहून आलेला कचरा गावालगत साचल्याने दुर्गंधी पसरली आहे. वातावरणातील बदलामुळे आणि या अस्वच्छतेमुळे संपूर्ण तालुक्यात विषाणूजन्य तापाने थैमान घातले आहे. सर्दी, ताप, खोकला आणि अंगदुखी यांसारख्या डेंगूसदृश्य आजारांची लागण अनेकांना झाली असून, यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. रुग्णांना वेळेवर उपचार मिळत नसल्याने आणि आरोग्य केंद्रांची अवस्था अतिशय बिकट असल्याने, गरीब आणि गरजू रुग्णांनाही नाईलाजाने खाजगी दवाखान्यांची वाट धरावी लागत आहे. पुरामुळे आधीच आर्थिक कणा मोडलेला असताना, आता उधार-उसनवारी करून महागडे खाजगी उपचार घेण्याची वेळ आल्याने अनेक कुटुंबे उद्ध्वस्त झाली आहेत. तालुक्यातील अनेक प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचारी मुख्यालयाच्या ठिकाणी राहत नसल्याने ते वेळेवर उपलब्ध होत नाहीत. तर अनेक उपकेंद्रांमधील सामुदायिक आरोग्य अधिकारी (सीएचओ) सतत गैरहजर राहत असल्याने, ही उपकेंद्रे केवळ शोभेची वास्तू बनली आहेत.

### असून अडचण, नसून खोळंबा

**उमरखेड शहरात कोट्यवधी रुपये खर्च करून राजाराम प्रभाजी उत्तरवार उपजिल्हा रुग्णालय उभारण्यात आले. मात्र, अपुरे कर्मचारी आणि सोयीसुविधांचा अभाव यामुळे या रुग्णालयाची अवस्था 'असून अडचण, नसून खोळंबा' अशी झाली आहे. मोठी इमारत असूनही रुग्णांना अपेक्षित सेवा मिळत नाही. त्यामुळे शहरासह तालुक्यातील हजारो रुग्णांना या रुग्णालयाचा कोणताही फायदा होत नसून, त्यांना उपचारासाठी दुसरीकडे धाव घ्यावी लागत आहे, हे एक धक्कादायक वास्तव आहे.**

### आई जेवू घालीना, बाप भीक मागू देईना

**पूरस्थितीमुळे आर्थिकदृष्ट्या खचलेल्या नागरिकांची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. शासकीय आरोग्य यंत्रणा वेळेवर आणि दर्जेदार उपचार देत नसल्याने त्यांना खाजगी रुग्णालयांचा आधार घ्यावा लागतो. मात्र, खासगी रुग्णालयांचा खर्च त्यांना परवडणारा नाही. त्यामुळे 'आई जेवू घालीना आणि बाप भीक मागू देईना' या म्हणीप्रमाणे, सरकार मोफत उपचार देत नाही आणि खासगी रुग्णालयांचा खर्च करण्याची ऐपत नाही, अशा दुहेरी कात्रीत गरीब रुग्ण सापडले आहेत.**

### नावालाच आरोग्य मंदिरे

**उमरखेड तालुक्यात एक उपजिल्हा रुग्णालय आणि सात प्राथमिक आरोग्य केंद्रे (विडुळ, ढाणकी, सोनदाबी, थेरडी, कोरटा, मुळावा, ब्राह्मणगाव) आहेत. मात्र, यातील बहुतांश केंद्रांची प्रचंड दुरवस्था झाली आहे. अनेक ठिकाणी वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी गैरहजर असतात, तर अनेक उपकेंद्रे केवळ नावालाच उरली असल्याची तक्रार नागरिक करत आहेत.**

## गणेश मंडळांना साहित्याचे वाटप

### गणेश विसर्जन मिरवणूक एकत्रित काढण्याचे केले आवाहन



दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**दिग्रस, दि. ४ :** 'समाजाचे काहीतरी देणे लागतो' या उदात्त भावनेतून तालुक्यातील आरंभी येथील सुपुत्र तथा मुंबईस्थित शासकीय कंत्राटदार सुभाष चव्हाण यांनी सामाजिक कार्याचा वसा जपला आहे. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी तालुक्यातील तब्बल तीस गावांमधील गणेश मंडळांना स्वखर्चाने विविध आवश्यक साहित्याचे वाटप करून मदतीचा होत पुढे केला आहे.

त्यांच्या या औदार्याबद्दल विविध मंडळांनी शाल व श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार केला. यावेळी बोलताना चव्हाण यांनी, गणेशोत्सव हे सामाजिक एकोपा जपणारे पर्व असून, सर्वांनी एकत्रितपणे भव्य विसर्जन मिरवणूक काढावी, असे आवाहन केले. चव्हाण हे वर्षभर विविध सामाजिक उपक्रम राबवतात. गत तीन वर्षांपासून ते बैलपोळ्याच्या दिवशी आरंभी येथील शेकडो बैलजोड्यांना सुकामेव्याची मेजवानी देतात, तसेच सजावटीचे साहित्यही मोफत पुरवितात. धार्मिक कार्यक्रमांसाठी मोफत टँकरने पाणीपुरवठा करण्याचा त्यांचा उपक्रमही अविरत सुरू असतो. त्यांच्या या कार्यामुळे त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. यावेळी ज्योतीसिंग राठोड, विशाल राठोड, पंकज राठोड आदी उपस्थित होते.

## सण-उत्सवांनिमित्त पोलिसांचे शक्तीप्रदर्शन

### गणेशोत्सव व ईद-ए-मिलादनिमित्त चोख बंदोबस्त

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**आर्णी, दि. ४ :** आगामी गणेशोत्सव आणि ईद-ए-मिलाद सणाच्या पार्श्वभूमीवर शहरात बुधवारी (दि. ३) पोलिसांच्यावतीने 'रूट मार्च' काढण्यात आला. शहरातील शांतता व सुव्यवस्था अबाधित राखण्याच्या दृष्टीने हे शक्तीप्रदर्शन करण्यात आले. यामध्ये राज्य राखीव पोलिस दलाची (एसआरपीएफ) तुकडीही सहभागी झाली होती, हे विशेष.

सकाळी साडेअकराच्या सुमारास सुरू झालेल्या या संचलनात आर्णी पोलिस ठाण्याचे सहा अधिकारी, ३० कर्मचारी, २० होमगार्ड आणि एसआरपीएफ गट क्रमांक १३ ची एक प्लाटून (एक अधिकारी व २० अंमलदार) सहभागी झाले होते. हा रूट मार्च शहरातील मिश्र वस्ती, जुनी वस्ती, गणपती मंदिर, गौसपाक दर्गा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, मोमीनपुरा, माहुर चौक आणि शिवनेरी चौक यासह दोन्ही सणांच्या प्रमुख मिरवणूक मार्गांवरून काढण्यात आला. आगामी उत्सवांदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये आणि नागरिकांनी निर्भयपणे सण साजरे करावेत, हा यामागील उद्देश होता. या संचलनाद्वारे पोलिसांनी आपल्या सज्जतेचा आढावा घेतला असून, नागरिकांनी शांतता राखण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## महत्वाचे



### वेडशी येथे गणेश मंडळाचा पर्यावरणपूरक उपक्रम

**राळेगाव :** गणेशोत्सव 'जल्लोषात पण जबाबदारीने' साजरा व्हावा, या उद्देशाने राबविण्यात येत असलेल्या 'ऑपरेशन प्रस्थान' उपक्रमाला वेडशी येथे सामाजिक कार्याची जोड देण्यात आली. येथील ओम बाल गणेश मंडळाने गुरुवारी (दि. ४) जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या आवारात वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. या कार्यक्रमाला वडकी पोलिस ठाण्याचे ठाणेदार भोरकडे यांची प्रमुख उपस्थिती होती. महाराष्ट्र शासनाच्या 'रजोत्सव' घोषणेच्या अनुषंगाने हा उपक्रम राबवण्यात आला. यावेळी वेडशीच्या सरपंच हिरा चोपडा, माजी पोलिस पाटील पुरुषोत्तम निमरड, सुनील निमरड, सदस्य सुनील चोपडा, नंदकिशोर फुटाणे, शाळेचे मुख्याध्यापक, रोजगार सेवक महेश गुरुनुले, पर्यावरण संवर्धन विकास समितीचे तालुकाध्यक्ष आशिष भोयर, जिल्हा संघटक कैलास कोडापे, जमादार सचिन नेहारे, दीपक मडकम यांच्यासह ओम बाल गणेश मंडळाचे कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. गणेशोत्सवाच्या काळात सामाजिक आणि पर्यावरणपूरक उपक्रम राबवून मंडळाने एक आदर्श निर्माण केला आहे, अशा भावना मान्यवरांनी व्यक्त केल्या.

### कृष्णापुरात आठ दिवसांपासून अंधार

**बाभूळगाव :** तालुक्यातील कृष्णापूर (गट ग्रामपंचायत पंचगव्हाण) येथे गेल्या आठ दिवसांपासून पथदिवे बंद असून, नळांनाही पाणी येत नसल्याने ग्रामस्थ त्रस्त झाले आहेत. ग्रामपंचायत प्रशासनाच्या या अक्षम्य दुर्लक्षाविरोधात सामाजिक कार्यकर्ते रत्नपाल डोफे यांनी थेट गटविकास अधिकाऱ्यांकडे धाव घेत, दोषींवर कारवाईची आणि समस्या निवारणाची मागणी केली आहे. गावातील जुन्या वस्तीपासून नवीन प्लॉट भागापर्यंतचे पथदिवे आठ दिवसांपासून बंद असल्याने सर्वत्र अंधाराचे साम्राज्य पसरले आहे. गावात तीन पाण्याच्या टाक्या असूनही नागरिकांना आठ-आठ दिवस पाण्याविना राहावे लागत आहे. या गंभीर समस्येकडे सरपंच, सचिव व सदस्य जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. वारंवार तक्रारी करूनही दखल घेतली जात नसल्याने, रत्नपाल गोवर्धन डोफे यांनी गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन दिले. यात संबंधित पदाधिकाऱ्यांच्या कारभाराची चौकशी करून कठोर कारवाई करावी आणि वीज व पाणीपुरवठा तात्काळ सुरळीत करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. मूलभूत सुविधांपासून नागरिकांना वंचित ठेवणा?्या या प्रकाराची प्रशासनाने तातडीने दखल घ्यावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## बाबाराव मडावी यांना 'परिवार पुरस्कार' जाहीर

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. ४ :** येथील प्रख्यात साहित्यिक, वक्ते आणि सामाजिक कार्यकर्ते बाबाराव मडावी यांच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. त्यांच्या उत्कृष्ट साहित्य व सामाजिक कार्याची दखल घेत मुंबईतील फिल्मसिटी दादासाहेब फाळके चित्रनगरीतर्फे त्यांना प्रतिष्ठेचा 'परिवार पुरस्कार २०२५' देऊन सन्मानित करण्यात आले आहे.



फिल्म सिटीचे सचिव डॉ. प्रफुल्ल आगवणे यांच्याहस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुरस्कारावर अध्यक्ष डॉ. सुधीर तारे, उपाध्यक्ष डॉ. सय्यद खालीद आणि जनरल सचिव शशी दीप यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. 'आकांतकार' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बाबाराव मडावी यांचे साहित्य सहा विविध विद्यापीठांच्या अभ्यासक्रमात समाविष्ट आहे. त्यांच्या अनेक साहित्यकृतींचे राष्ट्रीय भाषा हिंदीत भाषांतर झाले असून, त्यांच्या साहित्यावर अनेक अभ्यासकांनी एम.फिल. व पीएच.डी. पदवी मिळविली आहे. एक प्रभावी वक्ते आणि सामाजिक कार्यकर्ते म्हणूनही त्यांची वेगळी ओळख आहे. या प्रतिष्ठेच्या पुरस्काराबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत असून, त्यांच्या कार्याचा गौरव झाल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

## हातगावच्या युवा कलावंताची थेट पुण्यात गगनभरारी

### उमेश चारोळे यांची व्यंगचित्रे बालगंधर्व कलादालनात झळकणार!

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी




**दारव्हा, दि. ४ :** जिल्ह्यातील हातगाव येथील युवा व्यंगचित्रकार उमेश गुलाबराव चारोळे यांनी आपल्या कलेच्या जोरावर थेट पुण्यापर्यंत गगनभरारी घेतली आहे. पुणे फेस्टिव्हलअंतर्गत आयोजित राज्यातील दिग्गज व्यंगचित्रकारांच्या प्रदर्शनात त्यांच्या राजकीय व्यंगचित्रांचा समावेश झाला असून, ज्येष्ठ व्यंगचित्रकार शि. द. फडणीस यांच्याहस्ते आज (दि. ४) त्याचे उद्घाटन होत आहे.

पुण्यातील बालगंधर्व कलादालन, शिवाजीनगर येथे ३७ व्या पुणे फेस्टिव्हल आणि कार्टून्स कम्बाईन यांच्या संयुक्त विद्यमाने या प्रतिष्ठित प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. आज, गुरुवारी सकाळी दहा वाजता ज्येष्ठ व्यंगचित्रकार शि. द. फडणीस यांच्याहस्ते या प्रदर्शनाचे थाटात उद्घाटन होणार आहे. हे महत्वपूर्ण प्रदर्शन शुक्रवार, दिनांक ५ सप्टेंबरपर्यंत सर्व कलाप्रेमींसाठी विनामूल्य खुले राहणार आहे, अशी माहिती आयोजकांनी दिली आहे. या प्रदर्शनामध्ये महाराष्ट्राची समृद्ध व्यंगचित्रकला परंपरा दर्शविणाऱ्या चित्रांचा समावेश आहे. यात शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्यासारख्या दिग्गजांपासून ते आजच्या पिढीतील प्रतिभावान नवोदित कलावंतांपर्यंतच्या विविध राजकीय, सामाजिक आणि अर्कचित्रांचा समावेश आहे. अशा दिग्गजांच्या पंक्तीत जिल्ह्यातील हातगावसारख्या एका लहानशा गावातील उमेश चारोळे यांच्या धारदार राजकीय व्यंगचित्रांना स्थान मिळणे, ही जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवणारी घटना आहे. उमेश चारोळे यांनी कोणत्याही मोठ्या शहरात न राहता, आपल्या ग्रामीण भागात राहूनच व्यंगचित्रकलेची साधना केली आहे. त्यांच्यातील प्रतिभेची दखल यापूर्वी सुप्रसिद्ध अभिनेते अमिताभ बच्चन यांनीही घेतली होती. चारोळे यांनी साकारलेल्या व्यंगचित्राची खुद्द बच्चन यांनी प्रशंसा केल्याने त्यांना राष्ट्रीय स्तरावर ओळख मिळाली होती. त्यांच्या याच सातत्यपूर्ण आणि दर्जेदार कलेमुळे त्यांना पुणे फेस्टिव्हलसारखे मोठे व्यासपीठ मिळाले आहे. या महत्वपूर्ण प्रदर्शनाचे आयोजन पुणे फेस्टिव्हलचे अध्यक्ष सुरेश कलमाडी, कृष्णकुमार गोयल, सुभाष सणस, अभय छाजेड यांच्यासह आयोजन समितीचे संजय मिस्त्री, विश्वास सूर्यवंशी, योगेंद्र भगत, चारुहास पंडित, प्रशांत कुलकर्णी आणि कार्टून्स कम्बाईन यांनी केले आहे.

## ग्रहणाचे ग्रहण दूर सारून बघा आपल्याच ग्रहाची सावली!

### 'ब्लड मून'चा खगोलीय सोहळा, ७ सप्टेंबरला तांबूस रंगात न्हाऊन निघणार चंद्र

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. ४ :** येत्या रविवारी (दि. ७) आकाशात एक अनोखा खगोलीय सोहळा रंगणार आहे. पौर्णिमेचा तेजस्वी चंद्र हळूहळू पृथ्वीच्या छायेत शिरून तांबूस-लाल रंगाची शाल पांघरेल. 'ब्लड मून' म्हणून ओळखली जाणारी ही खग्रास चंद्रग्रहणाची विलोभनीय घटना पाहण्याची संधी खगोलप्रेमींसह सर्वसामान्यांना मिळणार आहे. ही घटना संपूर्ण भारतातून उघड्या डोळ्यांनी पाहता येणार आहे.

भारतीय वेळेनुसार, रविवारी रात्री ९ वाजून ५७ मिनिटांनी चंद्र पृथ्वीच्या सावलीत प्रवेश करण्यास सुरूवात करेल. रात्री ठीक ११ वाजून १ मिनिटांनी पृथ्वीची सावली चंद्राला पूर्णपणे व्यापून टाकेल आणि खग्रास स्थिती सुरू होईल. ही स्थिती रात्री १२ वाजून २३ मिनिटांपर्यंत राहील, ज्यात चंद्र पूर्णपणे लाल-तांबूस दिसेल. यानंतर चंद्र हळूहळू छायेतून बाहेर पडण्यास सुरुवात करेल आणि उत्तर रात्री १ वाजून २७ मिनिटांनी पूर्णपणे मोकळा होईल. एकूण ३ तास २४ मिनिटांचा हा ग्रहणाचा खेळ आशिया, युरोप, आफ्रिका आणि अमेरिका खंडांतूनही अनुभवता येणार आहे. सूर्य, पृथ्वी आणि चंद्र एका सरळ रेषेत आल्याने घडणाऱ्या या घटनेबद्दल समाजात अनेक गैरसमज आहेत. मात्र, ही केवळ सावल्यांची एक खगोलीय रचना असून, ती पाहण्याचा आनंद घ्यावा, असे आवाहन स्काय वाच ग्रुपचे अध्यक्ष रविंद्र खराबे, प्रमोद जीरापुरे, जयंत कर्णिक, उमेश शेंबाडे, भूषण ब्राह्मणे, पुजा रेकलवार, मानसी फेंडर व शुभांगी झिलपे यांनी केले आहे.

### 'ब्लड मून'मागे दडले आहे विज्ञान

**चंद्रग्रहणावेळी चंद्र लाल का दिसतो, यामागे वैज्ञानिक कारण आहे. जेव्हा चंद्र पूर्णपणे पृथ्वीच्या छायेत येतो, तेव्हा सूर्याचा थेट प्रकाश त्याच्यापर्यंत पोहोचत नाही. मात्र, पृथ्वीच्या वातावरणातून काही प्रकाशकिरणे अपवर्तित होऊन चंद्रावर पडतात. या प्रक्रियेत वातावरणातील धुळीकण निळ्या रंगाचा प्रकाश विखुरतात आणि केवळ लालसर रंगाचा प्रकाश चंद्रापर्यंत पोहोचतो. त्यामुळे चंद्र आपल्याला रक्तासारखा लाल दिसू लागतो.**

### गैरसमज अनेक, पण सत्य एकच

**ग्रहण काळात अन्न-पाणी दूषित होते, गर्भवती महिलांनी फळे चिरल्यास बाळ अपंग जन्मते किंवा हा काळ अशुभ असतो, यांसारख्या अनेक निराधार कल्पना समाजात रूढ आहेत. मात्र, शास्त्रज्ञांनी हे सिद्ध केले आहे की, चंद्रग्रहण ही केवळ एक सावलीची खगोलीय घटना आहे. तिचा मानवी जीवनावर किंवा वातावरणावर कोणताही शुभाशुभ परिणाम होत नाही. त्यामुळे निर्भयपणे हा सोहळा अनुभवायला हवा.**

## 'आपले सरकार' केंद्रासाठी लेखी परीक्षा रविवारी

**यवतमाळ, दि. ४ :** जिल्ह्यातील 'आपले सरकार' सेवा केंद्रांसाठी अर्ज केलेल्या पात्र उमेदवारांची लेखी परीक्षा रविवार, ७ सप्टेंबर रोजी होणार आहे. ही परीक्षा जिल्ह्यातील सर्व १६ तालुक्यांतील केंद्रांवर सकाळी ११ ते दुपारी १२ या वेळेत घेण्यात येईल. उमेदवारांना सकाळी १०.३० वाजता केंद्रावर हजर राहावे लागेल आणि १०.४५ नंतर कोणालाही प्रवेश दिला जाणार नाही. परीक्षेचे स्वरूप बहुपर्यायी असून त्यात लोकसेवा हक्क अधिनियम, संगणक, सामान्य ज्ञान, तांत्रिक ज्ञान व व्यक्तिमत्व या विषयांचा समावेश असेल. परीक्षेत नकारात्मक गुणांकन नाही. उमेदवारांनी प्रवेशपत्र, मूळ ओळखपत्र व सामाजिक कार्याचा अनुभव असल्यास त्याच्या छायांकित प्रतींसोबत आणाव्यात, अशी माहिती निवासी उपजिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी यांनी गुरुवारी दिली.

अजिंक्य भारत
यवतमाळ जिल्हा
शुक्रवार, दि. ५ सप्टेंबर २०२५ www.ajinkyabharat.com


# गणेश विसर्जनासाठी पोलिस सज्ज

## समाजकंटकांवर करडी नजर; यवतमाळ पोलिसांचा विसर्जन काळात 'अ‍ॅक्शन प्लॅन'!

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**यवतमाळ, दि.४ :** 'वेळेआधी सावध बरे' या उक्तीप्रमाणे, श्री. गणेशोत्सव विसर्जन काळात कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी यवतमाळ जिल्हा पोलिस दलाने कंबर कसली आहे. शांततेत उत्सव साजरा करणाऱ्यांना पूर्ण सहकार्य आणि कायदा हातात घेणाऱ्यांवर कठोर कारवाई, या दुहेरी रणनीतीसह पोलिसांनी संपूर्ण जिल्ह्यात अभूतपूर्व बंदोबस्ताची तयारी केली असून, समाजविघातक घटकांवर आतापासूनच कारवाईचा बडगा उगारला आहे.

यवतमाळ जिल्ह्यात सार्वजनिक गणेशोत्सवाची परंपरा मोठी असून, विसर्जन मिरवणुकांमध्ये लाखो भाविक सहभागी होतात. हा सोहळा शांततेत आणि निर्विघ्नपणे पार पडावा, यासाठी जिल्हा पोलिस दलाने एक व्यापक सुरक्षा योजना आखली आहे. केवळ बंदोबस्तच नव्हे, तर संभाव्य धोके आणि गुन्हेगारी प्रवृत्तींना वेळीच रोखण्यावर पोलिसांनी लक्ष केंद्रित केले आहे. याचाच एक भाग म्हणून, जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्थेला बाधा आणू शकणाऱ्या प्रवृत्तीवर पोलिसांची करडी नजर आहे. मिरवणुकीदरम्यान गोंधळ घालणे, जातीय तणाव निर्माण करणे किंवा इतर समाजविघातक कृत्ये करणाऱ्यांचा बंदोबस्त करण्यासाठी पोलिसांनी त्यांची पार्श्वभूमी तपासण्यास सुरुवात केली आहे. जिल्ह्यातील पुसद, यवतमाळ, दारव्हा आणि उमरखेड हे उपविभाग अधिक संवेदनशील मानले जातात. या भागांमध्ये कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी विशेष आणि अतिरिक्त पोलिस बंदोबस्त तैनात करण्याची योजना आखण्यात आली आहे. केवळ कर्मचारीच नव्हे, तर वरिष्ठ अधिकारीही या काळात रस्त्यावर उतरून परिस्थितीवर नियंत्रण ठेवणार आहेत. जिल्हा पोलिस अधीक्षक कुमार चिंता आणि अपर पोलिस अधीक्षक अशोक थोरात हे स्वतः या संवेदनशील भागांमध्ये कर्तव्य बजावणार असल्याने, पोलिस यंत्रणा किती गांभीर्याने तयारी करत आहे, याचा अंदाज येतो. याशिवाय, विसर्जन मिरवणुकांदरम्यान वाहतुकीची मोठी कोंडी होते. ही समस्या टाळण्यासाठी वाहतूक पोलिसांनी स्वतंत्र नियोजन केले असून, प्रमुख मार्गावरील वाहतूक पर्यायी मार्गावर वळविण्यात येणार आहे. तसेच, शहरांच्या व जिल्ह्याच्या सीमांवर कडक नाकाबंदी करून प्रत्येक संशयास्पद वाहनाची तपासणी केली जाणार आहे.

### ५००० हून अधिक फौजफाटा

| | |
|---|---|
| सार्वजनिक मंडळे | २,७००, |
| एकूण पोलिस बळ | ५,००० पेक्षा जास्त |
| वरिष्ठ अधिकारी | २ (पोलिस अधीक्षक, अप्पर पोलिस अधीक्षक) अधिकारी (पीआय, एपीआय, पीएसआय) ५८७ |
| पोलिस अंमलदार | २,३५५ |
| होमगार्ड | २,००० |
| एसआरपीएफ जवान | १,२०० |
| विशेष पथके | १७ स्ट्रायकिंग फोर्स, ६ आरसीपी प्लाटून, १ बॉम्बशोधक पथक |

गणेशोत्सव-२०२५




श्री समर्थ मराठा सार्वजनिक गणेश उत्सव मंडळ,
शिवाजी चौक, माहेर कापड केंद्राजवळ, वणी




## महत्वाचे

### राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांचा जिल्हा दौरा



**यवतमाळ :** राज्याचे गृह, गृहनिर्माण, शालेय शिक्षण, सहकार व खनिकर्म राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर येत्या शनिवारी (दि. ६) सप्टेंबर रोजी यवतमाळ जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा हा दौरा संक्षिप्त असला तरी महत्वपूर्ण मानला जात आहे. प्रसिद्ध आध्यात्मिक गुरू मोरारी बापू यांच्या रामकथा महोत्सवासाठी ते विशेष उपस्थित राहणार आहेत. दुपारी ३ वाजता त्यांचे यवतमाळात आगमन होईल. त्यानंतर ते थेट चिंतामणी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या यार्डमधील कार्यक्रमात सहभागी होतील. हा कार्यक्रम भोयर बायपासजवळील एमआयडीसी लोहारा येथे आयोजित करण्यात आला आहे. सायंकाळी ५.३० वाजता ते वर्ध्याकडे प्रयाण करतील. त्यांच्या या दौऱ्याची माहिती जिल्हा माहिती कार्यालयामार्फत गुरुवारी प्रसारित करण्यात आली असून, प्रशासकीय वर्तुळात तयारीला वेग आला आहे.

### मुलाच्याच हाताने वडिलांची हत्या

**घाटंजी :** तालुक्यातील येरंडगाव येथे कौटुंबिक वादातून एका तरुणाने आपल्याच जन्मदात्या पित्याची फावड्याच्या दांड्याने बेदम मारहाण करून हत्या केली. ही गंभीर घटना मंगळवारी (दि. २) सायंकाळी घडली. वडिलांच्या दारूच्या व्यसनामुळे घरात सतत वाद होत असत, त्यातूनच हा भीषण प्रकार घडल्याचे समोर आले आहे. याप्रकरणी पोलिसांनी मुलगा आदर्श पुंडलिक कांबळे (२५) याला अटक केली असून, मृत व्यक्तीचे नाव पुंडलिक दाऊजी कांबळे (५५) आहे. मंगळवारी सायंकाळी वडील-मुलामध्ये पुन्हा वाद झाला. यात रागाच्या भरात आदर्शने वडिलांना फावड्याच्या दांड्याने छातीवर व पोटावर जबर मारहाण केली, ज्यात त्यांचा मृत्यू झाला. कुटुंबीयांनी बुधवारी सकाळी अंत्यसंस्काराची तयारी सुरू केली होती. मात्र, पारवा पोलिसांना माहिती मिळताच त्यांनी घटनास्थळ गाठून मृतदेह शवविच्छेदनासाठी ताब्यात घेतला. याप्रकरणी शेजारी राहणारे शंकर हसन्ना मोलगुलवार यांच्या तक्रारीवरून पारवा पोलिसांनी आरोपी आदर्श कांबळे याच्याविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करून त्याला अटक केली.

# 'तो' शासन निर्णय तत्काळ मागे घ्या

## यवतमाळात ओबीसी संघटना आक्रमक, 'समता परिषदे'चा पुन्हा आंदोलनाचा इशारा

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**यवतमाळ, दि.४ :** मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याचा मार्ग मोकळा करणारा २ सप्टेंबरचा शासन निर्णय (जीआर) हा 'ओबीसीं'वर घोर अन्याय करणारा असून तो तत्काळ मागे घ्यावा, या मागणीसाठी अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद आणि इतर ओबीसी संघटनांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. बुधवारी (दि. ३) शेकडो महिला, पुरुष आणि लहान मुलांसह पालकमंत्र्यांना निवेदन देत, हा निर्णय रद्द न केल्यास पुन्हा तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला.

अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या नेतृत्वात विविध ओबीसी संघटनांचे प्रतिनिधी जिल्हाधिकारी कार्यालयात एकत्र आले होते. त्यांनी राज्याच्या सामाजिक न्याय विशेष साहाय्य विभागाने २ सप्टेंबर २०२५ रोजी जारी केलेल्या शासन निर्णयावर तीव्र आक्षेप नोंदवला. या निर्णयामुळे मराठा समाजातील काही व्यक्तींना कुणबी प्रमाणपत्र मिळवून ओबीसी आरक्षणात प्रवेश देण्याचा मार्ग खुला झाला आहे. हा निर्णय पूर्णपणे बेकायदेशीर आणि असंविधानिक असून, त्यामुळे ओबीसी प्रवर्गातील सुमारे ४०० जातींच्या हक्कांवर गदा येईल, अशी भीती निवेदनातून व्यक्त करण्यात आली. केवळ राजकीय दबावाखाली असा निर्णय घेणे हे सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचे उल्लंघन असून, यामुळे आधीच मर्यादित संधी असलेल्या ओबीसी घटकांचे मोठे नुकसान होईल, असा दावा संघटनांनी केला. यावेळी परिषदेच्या महिला जिल्हाध्यक्ष सुनयना येवतकर (अजात) यांनी आक्रमक भूमिका घेतली. 'ओबीसी आरक्षणाचे रक्षण झालेच पाहिजे, अन्यथा महाराष्ट्रातील पहिली ओबीसी उपोषणकर्ती महिला म्हणून मी पुन्हा उपोषणाला बसेन,' असा सज्जड इशारा त्यांनी दिला. निवेदन देताना चिमुकल्या समर्पण येवतकर याने, 'आमचे न्याय हक्क वाचविण्याची जबाबदारी तुमची आहे, आमचे भविष्य तुमच्या हाती आहे,' असे भावनिक आवाहन पालकमंत्र्यांना केले. यावेळी जिल्हाध्यक्ष विनोद इंगळे, सुनयना येवतकर (अजात), नीलिमा पाटणकर, माया गोबरे, शीतल घावडे, सुषमा बर्डे, कविता पांढरकर, वर्षा लोखंडे, योगिता कठाळे, सविता हजारे, ज्ञानेश्वर गोबरे, विलास काळे, अविनाश घाटे, गजानन बीहीरमकार, विजय पाटणकर, गजानन राऊत, प्रथमेश बत्तलवार, प्रवीण घावडे, गोविंद चव्हाण, अभिषेक निवास, पायल घाटे, अशोक मोहुर्ले, विद्या गाथरवार, मनोज भबुतकर, करुणा भबुतकर, संध्या लोणारकर, दीपाली चौधरी, नंदरज ठाकरे, जानराव राठोड, दीपक वाघ आणि निर्मिक वाघ आदी उपस्थित होते.

### सीएसपी केंद्रांवर ग्राहकांची लूट

**महागाव, दि. ४ :** तालुक्यातील फुलसावंगी येथील सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या शाखेत दहा हजार रुपयांपेक्षा कमी रक्कम काढण्यास नकार दिला जात असल्याने ग्राहक त्रस्त झाले आहेत. ग्राहकांना ग्राहक सेवा केंद्राकडे (सीएसपी) पाठवून तिथे प्रत्येक हजारामागे दहा रुपये शुल्क आकारले जात असल्याने, या आर्थिक लुटीविरोधात संताप व्यक्त होत आहे.

या मनमानी कारभाराविरोधात स्थानिक नागरिक ओमप्रकाश वसंतराव कृष्णापुरे यांनी ग्रामसभेत ठराव घेण्याची मागणी केली आहे. बँक व्यवस्थापक यासंदर्भात लेखी तक्रार अर्ज स्वीकारण्यासही नकार देत असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला. बँकेच्या निर्देशानुसार, सीएसपी केंद्रावर असे कोणतेही शुल्क आकारले जात असल्याचे फलक लावलेले नाही, त्यामुळे ही गोरगरिबांची फसवणूक आहे, असे कृष्णापुरे यांनी म्हटले. बँकेत सेवा नाकारणे आणि सीएसपी केंद्रांवर अतिरिक्त शुल्क आकारणे, हे दोन्ही प्रकार नियमबाह्य आहेत. या आर्थिक लुटीवर प्रशासनाने तात्काळ नियंत्रण मिळवून ग्राहकांना न्याय द्यावा, अशी मागणी जोर धरत आहे. या प्रकारामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र असंतोष पसरला असून, ग्रामपंचायत काय भूमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# 'ईद-ए-मिलाद'निमित्त नागरिकांना शांतता राखण्याचे आवाहन

## एसपींनी दिली उपाययोजनांची माहिती

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**यवतमाळ, दि.४ :** यंदाच्या ईद-ए-मिलाद उत्सवाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा पोलिस अधीक्षक कुमार चिंता यांनी मुस्लिम बांधवांना 'ईद-ए-मिलाद'च्या शुभेच्छा देत नागरिकांना शांतता आणि सुव्यवस्था राखण्याचे आवाहन केले आहे. कोणताही अनुचित प्रकार टाळण्यासाठी पोलिस प्रशासनाने विशेष खबरदारी घेतली असून, विविध उपाययोजना राबवल्या जात असल्याची माहिती जिल्हा पोलिस अधीक्षक कुमार चिंता यांनी आज, गुरुवारी (दि.४) पोलिस अधीक्षक कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

पोलिस प्रशासनाच्या वतीने सणादरम्यान शांतता आणि सलोखा राखण्यासाठी अनेक पावले उचलली जात आहेत. यामध्ये पोलिस अधीक्षक स्वतः मिरवणुकीच्या मार्गाची पाहणी करत आहेत. सुरक्षिततेच्या दृष्टीने रूट मार्च काढून संवेदनशील भागांवर लक्ष ठेवले जात आहे. पोलिस अधीक्षकांनी ईद-ए-मिलादचा सण शांततेत साजरा करण्याचे आवाहन केले आहे, जेणेकरून कोणत्याही धर्माच्या भावना दुखावल्या जाणार नाहीत. सण सुरळीत पार पडावा, यासाठी पोलिस अधिकारी समाजातील प्रमुख व्यक्तींसोबत बैठका घेतल्या आहेत. या बैठकांमध्ये शांतता आणि सुरक्षिततेच्या उपायांवर चर्चा केली केली आहे. समाजात तेढ निर्माण करणाऱ्या किंवा अफवा पसरविणाऱ्या पोस्टवर लक्ष ठेवण्यासाठी पोलिसांची सायबर सेल सक्रिय आहे. अशा पोस्टसवर कठोर कारवाई केली जाईल. गर्दीचे व्यवस्थापन आणि सुरक्षेसाठी मिरवणुकीच्या मार्गावर ड्रोन कॅमेरे आणि सीसीटीव्ही कॅमेरे वापरले जात आहेत. यामुळेप्रत्येक हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवता येईल. कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी उत्सवाच्या काळात पोलिस दल विशेष काळजी घेत आहे. गर्दीच्या ठिकाणी अतिरिक्त पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे.

### डिजेवर प्रतिबंधात्मक कारवाई

**विसर्जन मिरवणुकीत कर्णकर्कश डीजे वाजवून ध्वनी प्रदूषण करणाऱ्या मंडळांवर पोलिस कडक कारवाई करणार आहेत. कायद्याचे उल्लंघन केल्यास केवळ डीजे मालकावरच नव्हे, तर संबंधित गणेश मंडळाच्या अध्यक्षावरही गुन्हा दाखल केला जाईल, असा स्पष्ट इशारा पोलिसांनी दिला आहे. यासंबंधीचे सूचनापत्र प्रत्येक पोलिस स्टेशनकडून सर्व सार्वजनिक गणेश मंडळांना देण्यात आले आहे. डीजेऐवजी पारंपरिक वाद्यांच्या गजरात बाप्पाला निरोप द्यावा, असे आवाहनही पोलिसांनी केले आहे.**

## आरती संग्रहाचे कौतुक...





**नेर (परसोपंत) : दैनिक 'अजिंक्य भारत'ने श्री गणेश भक्तांसाठी सण व उत्सवानिमित्त 'आरती संग्रह' प्रकाशित केला. त्यात विविध आरत्यांचा समावेश असल्याने या 'आरती संग्रहा'चे कौतुक सर्वत्र होत आहे. नेर (परसोपंत) येथील जागृत देवस्थान म्हणून सार्वजनिक गणपती मठातील गणपती संपूर्ण महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे. या संस्थानचे अध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र चिरडे यांना 'आरती संग्रह' भेट देताना दैनिक 'अजिंक्य भारत'चे नेर तालुका प्रतिनिधी उमेश इंगोले. (दुसऱ्या छायाचित्रात) नेर अर्बन बँकेचे संचालक पवन परळीकर यांना आरती संग्रह भेट देताना उमेश इंगोले. राजेंद्र चिरडे व पवन परळीकर यांनी आरती संग्रहाचे कौतुक करीत हा आरती संग्रह संग्रही ठेवण्यासारखा असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली.**

# दिग्रसमध्ये रक्तदानाने साजरी होणार ईद !

## डॉ. कलाम फोरम आणि गोदावरी अर्बनचे संयुक्त आयोजन; नागरिकांना रक्तदान करण्याचे आवाहन

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**दिग्रस, दि.४ :** इस्लाम धर्माचे अंतिम प्रेषित हजरत महंमद पैगंबर यांची जयंती अर्थातच ईद-ए-मिलादच्या पावन पर्वावर, शिक्षक दिनाचे औचित्य साधून डॉ. एपीजे अब्दुल कलाम फोरम, गोदावरी अर्बन मल्टिस्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी व सफिया-रेहमान शैक्षणिक व सांस्कृतिक प्रतिष्ठान आणि दिग्रस तालुका पत्रकार संघ यांचे वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात समाजातील सर्व जाती धर्माच्या युवक, युवती, महिला व पुरुषांनी रक्तदान करण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

ईद-ए-मिलादच्या पवित्र पर्वावर रक्तदान शिबिर आयोजित करण्याचे हे डॉ. कलाम फोरमचे पाचवे वर्षे आहे. आतापर्यंत सुमारे चारशे रक्त पिशव्यांचे संकलन करून शासकीय रक्तपेढी यवतमाळ यांना देण्यात आल्या आहेत. शिवाय वर्षभर गरजूंना मोबाईल रक्तदाते उपलब्ध करून देण्याचे कार्यही ही संस्था करीत आहे. डॉ. कलाम फोरमचे मुख्य कार्यवाह मिर्झा अफजल बेग, अध्यक्ष फिरोज खान, सचिव आमीन चौहान, प्रकल्प प्रमुख फारुक अहेमद, आमीन नौरंगाबादे, कार्याध्यक्ष मिर्जा नासीर बेग, उपाध्यक्ष अजीम खान, आसिफ शेख, फारुक चव्हाण, गोदावरी अर्बन बँकेचे राहुल कोल्हे पाटील, दिग्रस तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष पी. पी. पप्पुवाले, सफिया-रेहमान शैक्षणिक, सांस्कृतिक प्रतिष्ठानचे मजहर अहेमद खान यांनी शिबिरात रक्तदान करून सक्रिय सहभाग घेण्याचे आणि शिबिर यशस्वी करण्याचे आवाहन केले आहे. दिग्रस येथील ग्रामीण रुग्णालय (सरकारी दवाखाना) येथे शुक्रवार शुक्रवारी (दि.५) दुपारी ११ ते ४ या वेळात आयोजित रक्तदान शिबिरात दिग्रसकरांनी मोठ्या संख्येत रक्तदान करून या पवित्र, जीवनदायी महान कार्यात सहभागी होण्याची विनंती आयोजकांनी केली आहे. शिबिर यशस्वी करण्यासाठी डॉ. कलाम फोरमचे सर्व सदस्य परिश्रम घेत आहेत. तसेच शिबिर आयोजनात गोदावरी अर्बन बँकेचे कर्मचारी, आर. डी. एजंट, गुरुकुल इंग्लिश स्कूलचे शरीफ शेख, प्रियंका मेमोरियलचे सदानंद आठवले, विमा सल्लागार अभय नानोटे, दिग्रस तालुका पत्रकार संघटनेचे पदाधिकारी, लक्षवेध क्रीडा ॲकॅडमीचे सुरेंद्र राठोड, शारीरिक शिक्षक संघटनेचे सदस्य क्रीडा शिक्षक, शेतकरी मित्र संतोष चव्हाण, विविध पत्रकार संघटना, टॅक्सी चालक मालक संघटना, केमिस्ट संघटना, शिक्षक संघटना, विविध समाज संघटना आणि दिग्रसकर नागरिक हातभार लावत आहेत.

### दररोज ४० रक्त पिशव्यांची गरज!

**रक्तासाठी एका माणसाला दुसऱ्या माणसावर अवलंबून राहावे लागते. माणूसच माणसाची रक्ताची गरज भागवू शकतो. त्यामुळेच रक्तदान शिबिरे आयोजित करून मानवी रक्त गोळा केल्या जाते. गोळा केलेले रक्त आवश्यक ती प्रक्रिया करून गरजेप्रमाणे वापरले जाते. यवतमाळ येथील शासकीय रक्तपेढीला दररोज किमान ४० रक्त पेशव्यांची गरज भासते. भविष्यात रक्ताची टंचाई जाणवू नये, म्हणून रक्त संकलन आवश्यक आहे.**

